# श्रीदत्तवाक्सुधा



प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

# श्रीदत्तवाक्सुधा

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे

*अल्प-चरित्र आणि प्रवचने*

संकलन आणि संपादन

अच्युत सिद्धनाथ पोटभरे

एम्. ए.

श्रीवासुदेव निवास प्रकाशन, पुणे–४११ ००४.

मूल्य : रुपये पंचवीस

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीमहाराज आणि प. प. श्रीलोकनाथतीर्थस्वामी-महाराज यांच्या ट्रस्टतर्फे चालविलेल्या श्रीवासुदेव निवास प्रकाशनातर्फे प्रकाशित.

**प्रकाशक :**
प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर
प्रधान विश्वस्त.

© सर्वहक्क प्रकाशन संस्थेकडे सुरक्षित.

**प्रकाशन संस्थेचा पत्ता :**
श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे
कर्वे पथ, पुणे ४११ ००४.

**प्रकाशन काल :**
श्रीदत्तजयंति
दि. ४ डिसेंबर १९८७

**मुद्रक :**
शं. द. घाटपांडे
श्री प्रिंटर्स अॅन्ड स्टेशनर्स,
शिवाजी पथ, ठाणे ४०० ६०२.

## अंतरंग

* समर्पण
* प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर, इंदोर यांचा मंगल आशीर्वाद.
* प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्यावर केलेली संस्कृतमधील श्री-षट्पदी
* संकलकांचे निवेदन.
* प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अल्प जीवन चरित्र
* प्रवचने :

प्रवचन पहिले–देवाजवळ काय मागावे ?
प्रवचन दुसरे–'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद-वल्लभ दिगंबरा' या महामंत्राचे महात्म्य
प्रवचन तिसरे–"तो पूर्ण आनंद गुरु समर्थ"
प्रवचन चौथे–हे क्लिन्नचित्त प्रभो ! क्षमस्व अपराधम् !!
प्रवचन पाचवे–घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते–१
प्रवचन सहावे–घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते–२
प्रवचन सातवे–घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते–३
प्रवचन आठवे–श्रीमद्भगवद्गीता–एक चिंतन
प्रवचन नववे–भगवान् श्रीमच्छंकराचार्य यांच्या षट्पदीमधील पहिल्या श्लोकावर

# प. पू. श्रीदत्तमहाराजांना समर्पण

नमो सद्गुरो बृहस्पती । श्रीगणेश विद्यावाचस्पती ।
वक्रतुंड अण्णा भारती । दत्तात्रेया कवीश्वरा ॥१॥

धुंडिराज आपुले पिता । सरस्वती आपुली माता ।
भगवती रेणुका कुलदेवता । त्यांचे चरणा वंदितो ॥२॥

श्रीगणेशमूर्ति मंगल । प्रसादमूर्ति श्रीदत्तबाळ ।
यांच्या उपासनेचे कुळ । थोर आपुली परंपरा ॥३॥

आपुले पुर्वेज दाजी दीक्षित । गाव सोडून आले वाडीत ।
श्रीदत्त सेवेत रमले चित्त । अन्य काही सुचेना ॥४॥

कवि मोठे प्रतिभावंत । पाच श्लोक नित्य करीत ।
श्रीदत्त चरणी अर्पित । गाऊनि रोज श्रीपुढे ॥५॥

नित्य नवी ही सेवा चाले । वाडीकरही प्रसन्न झाले ।
तेंव्हापासून म्हणू लागले । आपणासी 'कवीश्वर' ॥६॥

माझी गायनी अति प्रीति । स्वतः दत्तप्रभू सांगती ।
झाले प्रसन्न आपुले वरती । 'रहा वाडीत' म्हणाले ॥७॥

नंदीनामा कवीश्वर । हा आपुला पुर्वेज थोर ।
गुरुचरित्राचा आधार । घेऊनि हे सांगतो ॥८॥

वाडीत आणून ठेवले । दत्त-काव्य सुरू झाले ।
नावही कवीश्वर झाले । समोर श्रीदत्ताच्या ॥९॥

पितामह वक्रतुंड महाराज । महापंडित भक्तराज ।
वेद वेदांत ज्ञान-राज । त्यांचे चरण वंदितो ॥१०॥

श्रीमौनीस्वामी सद्गुरू । वक्रतुंड भक्त लेकरू ।
सहवास सेवा अति थोरू । केवढा हा अधिकार ॥११॥

टेंबेस्वामी त्यांचे भक्त । वक्रतुंड त्यांचे भक्त ।
काय संबंध होतो व्यक्त । गुरुबंधू म्हणोनिया ॥१२॥

गोविंदस्वामी महान । टेंबेस्वामींना मंत्र देऊन ।
आपणास 'दत्तबाळ' देऊन । आपुली योग्यता दाविली ॥१३॥

पितृछत्र धुंडिराज । हे ही मोठे महाराज ।
भक्तवत्सल भक्तराज । ज्ञानी पंडित प्रगाढ ॥१४॥

मोठा शिष्य परिवार । शिष्य प्रेम अनिवार ।
अपार केला लोकोद्धार । भव्य मंदिराची साक्ष आहे ॥१५॥

माता भगवती सरस्वती । पति सेवे देव तुष्टती ।
तिच्या शब्दा मान देती । देवही आणि भक्तही ॥१६॥

अहेवपण मागितले । पति अंकी प्राण सोडले ।
अंत्यकार्य ही करविले । पतिहस्ते, पतिव्रतेने ॥१७॥

अशी आपुली परंपरा । महापुरुषांचा वाहता झरा ।
भाग्य कुळ कवीश्वरा । गणेशदत्त रेणुका कृपा ॥१८॥

आपुले सद्गुरू दीक्षित स्वामी । साक्षात् प्रति टेंबेस्वामी ।
आपुल्या ते हृदयधामी । अखंड निरंतर राहिले ॥१९॥

तसेच योगिराज गुळवणी । आपुली योजना ठेऊन मनी ।
आयुष्यभरी जवळी घेऊनी । बसविले हृदय सिंहासनी ॥२०॥

गुणी गुणास ओळखती । गुणाप्रमाणे मान देती ।
आपणास 'दत्तमहाराज' म्हणती । स्वमुखाने योगिराज ॥२१॥

आपुले चरित्र लिहावे वाटले । परि ते धाडस अंगी आले ।
मशकाने उड्डाण घेतले । गिळण्यासाठी सूर्य बिंब ॥२२॥

हेतू साध्य नाही झाले । कर्तृत्त्व थिटे पडले ।
या निमित्ताने दर्शन घडले । सहस्त्ररश्मि सूर्याचे ॥२३॥

हे भाग्य नाही थोडे । कर्तृत्त्व अहंकाराचे घोडे ।
मज टाकून गेले पुढे । म्हणोनि झाले दर्शन ॥२४॥

पतंग दीपावर झेपतो । जळून तो खाक होतो ।
ही जाणीव जो घेतो । भाग्यवंत तो आहे ॥२५॥

क्षमा तर केली पाहिजे । परि मागणे आहे दुजे ।
पूर्ण कृपेचे ओझे । दयेने मजवरी घालावे ॥२६॥

करोनि आपुले स्मरण । वंदोनि आपुले चरण ।
आपणासी हे अर्पण । कृपा प्रार्थना पूर्वक ॥२७॥

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥

# प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर, इंदोर, यांचा
# सुमंगल-शुभाशीर्वाद

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः ॥ ८१/१ स्नेहलतागंज, इंदूर.
दि. ८-१०-१९८७.

**श्री. अच्युतराव पोटभरे यांस**

सप्रेम आशीर्वाद, वि. वि.

आपलें पत्र मिळाले. आपल्या ट्रस्टतर्फे आपण जो उपक्रम चालू केला आहे तो स्तुत्यच आहे.

"शोषणं भवसिन्धोश्च ज्ञापनं सारसम्पदम्" ।

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने याच धर्तीची आहेत. मानव देहाचे जे निःश्रेयस त्यालाच त्यांची प्रवचनें स्पर्श करून जातात. उपनिषदांमध्ये "रसो वै सः" तो परब्रह्मरूप परमात्मा रसमय म्हणजे आनंदमय आहे असे जे म्हटले आहे, त्याचा प्रत्यय प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या प्रवचनांतून व लिखाणातून येतो.

शृंगारादि रसांची आनंदाविषयींच्या अनुभूतीची प्रक्रिया व कीर्तन, श्रवण, मनन, प्रवचन इत्यादिंच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या भक्तीची प्रक्रिया यातील साम्य पाहून काही मान्यवर पंडितांनी "भक्ति स्तु दशमो रसः ।" असे प्रतिपादन केले आहे. याची प्रचीति ते आपल्याला स्वतःच्या प्रवचनांतून व लिखाणांतून प्रत्ययाला आणून देत आहेत हेच त्यांचे थोरपण आहे.

ज्ञानाच्या परिपक्वतेला दीर्घकाळ चिंतनाची व अनुभवाची जोड मिळाल्या कारणाने एका वेगळया आनंदाची अनुभूति ते श्रोत्यांना देऊ शकतात. वाङ्मयात जीवनाच्या अनुभूतीचें चित्रण असते. ही अनुभूति गुरुकृपेमुळे मिळाली असेल तर तिचा डौल काही वेगळाच असतो. म्हणूनच त्यांच्या वाङ्मयातून 'यद्दत्तमात्र विभव प्रकट प्रभावा' याची प्रचिति मिळते.

न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः । वृद्धा न ते ये न वदन्ति धर्मम् ॥
धर्मः स नो यत्र न सत्यमस्ति । सत्यं न तत् यत् छलमभ्युपैति ॥

या श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या जवळ धर्म-सत्य व वैभवशाली वृद्धत्त्व आहे. ज्ञानाची परिपक्वता व वाङ्मयाला झालेला परस्पर्श यामुळे त्यांच्या वाङ्मयाची गणना अक्षर वाङ्मयात होईल यात संशय नाही.

प्रवचनांच्या या प्रथम पुष्पात समाविष्ट केलेल्या वेगवेगळया विषयांतून त्यांची चतुरस्त्रः विचारसरणी व प्रत्येक विषयातून बुद्धीचे एक वेगळेच स्वरूप स्पष्ट होते. निरनिराळया विषयांची प्रसंगानुरूप वेगवेगळया घाटणीतून त्यांनी केलेली उकल हा एक प्रकारें ब्रह्मानंदच आहे.

"दिगंबरा" या शब्दातून निघणारे व त्या ब्रह्मतत्त्वाला स्पर्श करणारे तीन वेगळे अर्थ दाखवून अर्थ व परमार्थ यांची खुबीने सांगड घातली आहे.

स्थूल "मी" पासून शेवटी "अहम्" होता होता देहत्रयातीत होणारे सर्व व्यवहार अत्यंत रसाळपणे त्यांनी वर्णन केलेले आहेत. आणि अक्षर वाङ्मयाचे हेच कार्य आहे. अलिकडच्या पिढ्यांना साधन शुचिता व स्थूल "मी" पासून "अहम्" चीहि विस्मृति कशी करावयाची याबद्दलच्या मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे. ते कार्य प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या वाङ्मयामुळे घडून येईल यांत संशय नाही.

त्यांच्या वाङ्मयाबरोबरच आपण त्यांचे छोटेसे चरित्र छापणार अहात हेहि स्तुत्यच आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांसारख्या थोर विभूतीच्या चरित्रातून लोकांना खूपच बोध घेता येईल. कारण जीवन व वाङ्मय यात समन्वय असला की त्या वाङ्मयाचा "प्रकाश" साधकांचा मनोमय अंधःकार नाहिसा करण्यास समर्थ ठरतात. "बुद्धीने शोधला देवो । भाव बळे तत्काळ पावला ॥" या उक्तीची प्रचिती प. पू. श्रीदत्त-महाराजांच्या आयुष्यात आपल्याला दिसून येते.

"सो ऽ हं शब्दे मारा केला । देव काकुळती आला । आतां जीवें न सोडी तुला ।" या जनाबाईच्या म्हणण्याचा प्रत्यय महाराज आपल्या जीवनातून आपल्या वाचकांना व श्रोत्यांना पटवून देतात. श्रीगुरुमहाराजांवर असलेली अतूट श्रद्धा यामुळेच प. पू. श्रीवासुदेवानंदस्वामीमहाराज यांची स्तोत्रें त्यांची प्रेरणापुंज ठरली आहेत.

"येणे वचनामृत तुषारें । ग्रंथभूमिका विवेकांकुरें ।
अंकुरली एकसरें । फळभारें फलित ।"

"मी सदा हृदयीं वसता । भक्तांची भ्रांति जाता । मी स्वभावतां प्रकटचि ।" अशी सद्गुरु कृपा लाभलेल्या प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो व आपल्या ट्रस्ट तर्फे अधिकाधिक परस्पर्शाने नटलेली ग्रंथपुष्पे सामान्य जनांना "सुबोध" करोत हाच आशीर्वाद. उत्तरोत्तर असेच समाज जाग्रण घडो हाच आशीर्वाद

"सद्वाणी यदि का चिंता ?"
"जोडे अमृताचि सुरसरी । ते प्राणाते अमर करी ॥"

प. पू. श्रीदत्तमहाराजांची शांति व प्रपंच व परमार्थ कृतार्थ करण्याची हातोटी श्रीएकनाथमहाराजांसारखी आहे. यातूनच सामान्यजनांना धडा घेण्यासारखे आहे. त्यातूनच अनेकांना स्फूर्ति मिळेल याची आम्हाला खात्री आहे.

परमेश्वर आपणांस दीर्घायु करून सर्व सौख्ये प्रदान करो हा आमचा आशीर्वाद आहे.

**नानामहाराज तराणेकर**

प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्यावर केलेली संस्कृतमधील

# श्री षटपदी

श्रीदत्तस्य जनिः कवीश्वर कुले दैवी कृपायाः फलम् ।
देवांशः स्वयमेवमाविरभवन्मन्थे जनोद्धारणम् ॥
कर्तुंभक्तिपथेन शुद्धमनसा, ज्ञानादि मार्गेण वा ।
धुंडिराज सुतो ऽ व तीर्थ सकलं वंशं समुन्नीतवान् ॥१॥

अवर्ण्य सामर्थ्यं, मनसि शुचिता, वाचि मृदुता ।
निगर्व विज्ञानं, सदसि बुधता, शास्त्र पटुता ॥
अमेयं पांडित्यं, कुशलवसुता, वेदरतता ।
गुणानामेतेषां भवनमभव दत्तः चरितम् ॥२॥

नाहंकारो वसति हृदये नापि लोभो मदो वा ।
मायामोहादि लवमपि नो दृष्टि मायाति किंचित् ॥
मायामोहौ विगलित तथा स्वाश्रयं प्रेक्षमाणौ ।
सामान्यानां मनसि तु चिरं स्थानमाप्तुं प्रयातः ॥३॥

सुधांशुर्यथा शीतलो ऽऽ ल्हाददायी ।
स्वधाम्ना परेषां सुखं वर्धयन्सः ॥
तथेमे स्वविधांशुभिर्ज्ञान मार्गे ।
प्रपन्नेषु मोदं सदा वर्धयन्तः ॥४॥

यशोधनाश्च वाग्विभूषिताश्च सौख्यदायकाः ।
प्रदायकाः सुखं चिरं भवार्ति हारकाः स्वयम् ॥
तथैव शान्त चेतसो दया क्षमा गुणान्वितः ।
पुनन्तु मे मनो ऽ मलं स्वविद्यया कवीश्वरः ॥५॥

परम सगुण मायां ज्ञान मार्गेण तीर्त्वा ।
विदितसकलशास्त्रो ध्यानमार्गे प्रसक्तः
वसति हृदि जनानां यश्च कल्याणकारी ।
स भवतु मम भूत्यै दत्तवाणी विलासः ॥६॥

कवयित्री– सौ. ललिता वि. आर्वीकर
संघ कार्यालयासमोर, महाल, नागपूर.

# सिद्धवाणी - श्रीदत्तप्रवचनवाक्सुधा

सत्पुरुषांची वाणी- अमृत संजीवनी असते.

शाश्वत तत्त्वांचा निधी- चैतन्याचा प्रवाह असतो.

निर्दोष मूल्यांचा अक्षय निधी- अचूक तत्त्वचिंतन असते.

भावशुद्धीचा निर्मल निर्झर- आत्मचिंतनाचा प्रकाशपुंज असतो.

साधनेला गती देते तर सत्कर्माला प्रवृत्त करते.

मनोमालिन्य धुवून टाकते तर विक्षेप आवरणांचा छेद घेते.

श्रद्धाभक्ती पुष्ट करते तर चित्त चांचल्य नष्ट करते.

बुद्धीला विवेक देते तर विवेकाला आचाराचा आकार देते.

आत्मकल्याण हातात देते आणि आनंद सागरी नाचविते.

*** *** ***

**म्हणोनि साधका तू माऊली । पिके सारस्वत तुझिया पाऊली ।**
**या कारणे मी साऊली । न संडी तुझी ॥१॥**

**अहो सद्गुरुचिये कृपा दृष्टी । तुझे कारुण्य जयाते अधिष्ठी ।**
**तो सकल विद्याचिये सृष्टी । धात्रा होय ॥२॥**

**साहित्य सोनियाचिए खाणी । उघडवी देशियेच्चिया अक्षौणी ।**
**विवेक वेलीची लावणी । हों देई सैंध ॥३॥**

**संवाद फळ निधाने । प्रमेयांची उद्याने ।**
**लावी म्हणे गहने । निरंतर ॥४॥**

**पाखंडांचे दरकुटे । मोडी वाग्वाद् अव्हांटे ।**
**कुतर्काची दुष्टे । सावजे फेडी ॥५॥**

**मऱ्हाठियेचे नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळु करी ।**
**घेणे देणे सुखचिवरी । हो देई या जगा ॥६॥**

*** *** ***

**तरी अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासि पात्र होईजे ।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आइका जी ॥**
**परि प्रौढी न बोले हो जी । तुम्हां सर्वज्ञांचा समाजी ।**
**देयावे अवधान हे माझी । विनवणी सलगीची ॥**

*** *** ***

# "श्रीदत्तवाक्सुधा" संकलकाचे निवेदन-

श्रीवासुदेव निवास प्रकाशनाचे कार्य-संस्था व संचालक दृष्टीने सुरु होऊन छत्तीस वर्षे झाली. प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचे विराट वाङ्मय प्रकाशनाला इ. स. १९५१ मध्ये प्रारंभ झाला. या तीन तपांच्या काळात विविध ग्रंथांचे प्रकाशन होत आले. परिस्थितीची सापेक्षता कार्याच्या गतीचा वेग कमी अधिक करु शकते, याचा अनुभव या कालात आला. पण कार्य चालू राहिले ही समाधानाची गोष्ट आहे. आता प्रकाशन विभाग काही विशेष ग्रंथ प्रकाशनाच्या हेतूने वाटचाल करीत आहे. श्रीगुरुकृपेने अनुकूलताही येत आहे. याचाच अर्थ ईशेच्छेने हे कार्य घडत आहे.

विशेषतः या प्रकाशनाला प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या वाणीला अक्षर वाङ्मय रुपाने प्रकाशित करण्याची मोठी उत्कंठा लागलेली आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांची विविध विषयावर, भागवतावर, देवीभागवतावर, श्रीगुरुचरित्रावर, श्रीटेंबेस्वामींच्या वाङ्मयावर सतत ठिकठिकाणी प्रवचने चालू असतात. वेदान्तावर, उपनिषदावर, प्रस्थानत्रयीवरही त्यांची प्रवचने झाली आहेत व होतीलही. या प्रवचनांची अनेक ध्वनि-मुद्रिते ईश्वरकृपेने आज उपलब्ध होत आहेत. ही ध्वनिमुद्रिते जितकी अधिक उपलब्ध होतील तितके या कार्याचे स्वरुपही विशाल होणार आहे. त्या ध्वनिमुद्रितांवरून त्यांचे शब्द लिपिबद्ध करून, संपादित करून लेखद्वारा प्रकाशित करण्याचे हे कार्य, या प्रथम पुस्तका-पासून सुरू होत आहे. ही सर्वांच्या दृष्टीने परमभाग्याची गोष्ट आहे.

प. प. श्रीटेंबेस्वामींच्या-स्तोत्रावर – पदांवर – श्लोकांवर – आरत्यांवर वा याप्रमाणे मुक्तछंद काव्य न्यायाने ही स्वतंत्र प्रवचने अलग करून १०/१२, १५/२० प्रवचनांचे एक पुस्तक याप्रमाणे होतील तेवढी पुस्तके प्रकाशित तर करण्याची इच्छा आहेच. पण भागवत-देवीभागवत-गुरूचरित्र-द्विसाहस्त्री यासारख्या मोठ्या ग्रंथावरील त्यांचे झालेले सप्ताहही पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची प्रकाशनाची इच्छा आहे. घटना प्रसंगादिंची मार्मिक दृष्टी ठेवून सार्थ-तत्त्वशुद्ध भूमिकेतून उकल हे त्यांच्या प्रवचनाचे अलौकिक वैशिष्ट्य आहे. श्रोता वा वाचक ज्या मानसिक स्तरावरून त्यांचे प्रवचन ऐकेल वा वाचेल त्या प्रत्येकाला समाधान होईल. मार्गदर्शन होईल, म्हणून हे कार्य होणे म्हणजे भारताच्याच नव्हे तर अखिल जगताच्या दृष्टीने हिताचे होणारे कार्य आहे. एका महापुरुषाच्या अधिकारसंपन्न वाणीतून निघालेले अमोघ नी अमोल विचार प्रकाशित होणे म्हणजे काळाची गरज आणि ईश्वरी इच्छेचा संयोग आहे.

या संकलन कार्याला सहजपणे लाभलेले अनेक गुरुभक्तांचे सहाय्य आणि सहकार्य-सुद्धा, मानवी प्रयत्न वा कर्तृत्व यापेक्षा ईश्वरी योजना आणि कर्तृत्वच पदोपदी प्रत्ययाला आले आणि येत आहे. मुंबई उपनगरात विविध ठिकाणी राहणाऱ्या गुरुभक्तांनी, केवळ भक्ती आणि श्रद्धेने, प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सहवास, अडचण सोसून, विविध गावी, जाऊन घेतला. बरोबर ध्वनीमुद्रक नेले आणि प्रवचने ध्वनिमुद्रित करून घेतली. वेळ, पैसा आणि कष्ट या व्यवहारात अडथळा आणणाऱ्या शत्रूंचा पराभव केला. ध्वनि-मुद्रितांचे लिपिकरण केले. त्याच्या टंकलिपित प्रति केल्या. त्यावरून त्यांच्या मुद्रित प्रति काढल्या. हे काम अनेकांनी एक दिलाने केले. याची पुस्तकरूपाने छपाई व्हावी असेही त्यांना वाटू लागले आणि केवळ त्यांची आंतरिक तीव्र इच्छाशक्ती त्या कार्याला आज हे मूर्त स्वरूप देत आहे. यातही विशेष हा की 'श्रीवासुदेव निवास' या प. पू. श्रीदत्तमहाराज पीठाधीश्वर असलेल्या पीठाकडून हे कार्य होत आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना अखंड प्रवास, प्रवचने, सप्ताह-पारायणे, जनसंपर्क, आणि पीठाचे कार्य सांभाळून लेखन करणे अशक्य आहे. त्यांचा अधिकार, योग्यता, व्यासंग, ज्ञानभूमिका, सूक्ष्म चिंतन आदिंचा विचार करता या रुपाने हे कार्य घडून येत आहे, ही गोष्ट अत्यंत अपूर्व व योग्य अशीच आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव प्रसिद्धिपराङ्मुख, वृत्ती संकोची, मनाचा नम्रपणा, इत्यादींमुळे या कार्याला केवळ विश्वस्तांचा आग्रह, भक्तांसंबंधीचे वात्सल्य आणि ईशेच्छा म्हणूनच त्यांनी संमती दिली. त्यांची ही संमती हीच आमची शक्ती आहे. हाच त्यांचा कृपा-आशीर्वाद आहे. त्यांना उपाधीची गरज काय आहे? खरी गरज आपल्याला आहे. आपण त्यांच्या वाक्सुधेच्या

चिंतनाने आपल्यामध्ये विकास करून घ्यावयाचा आहे. ईश्वर कृपापात्र आपल्याला व्हावयाचे आहे !

या पुस्तकामध्ये प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अल्प–जीवन चरित्र दिले आहे. या चरित्रासंबंधी एवढेच नमूद करावे वाटते की, एवढी दिव्य परंपरा असलेले हे घराणे – आणि तेही उच्चतम तोलामोलाचे आहे की, असे उदाहरणच दुर्मिळ आहे. घराण्यात दोन तीन पिढ्या महापुरुष आढळतील पण लागोपाठ पाच सहा पिढ्यांची महापुरुषांची परंपरा खरोखर विरळाच आहे. हे आपण चरित्र वाचूनच मान्य कराल अशी खात्री वाटते. प. पू. योगिराज गुळवणीमहाराजांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांना आपले उत्तराधिकारी नेमले यामध्ये दोघांच्या अलौकिक दैवी गुणांची साक्ष आणि ईश्वरी कार्याची योजनाच स्पष्ट दिसते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अल्प जीवन चरित्र संकलन करताना ज्या पुस्तकांचे व तद्द्वारा त्या लेखकांचे अमोल सहाय्य झाले त्याचा उल्लेख कृतज्ञतेने करीत आहे. १–"धुंडिराज लिलामृत" याचे लेखक श्री. वा. पु. दामले वकील, बुलढाणा (विदर्भ) यांचे फार मोठे सहाय्य झाले. श्री. तात्यासाहेब दामले, वकील हे प. पू. श्रीधुंडिराज महाराज यांचे सश्रद्ध भक्त. लेखन क्षेत्रातही अनेक पुस्तके लिहून नाव लौकिक मिळविलेले लेखक. त्यांनी प. पू. श्रीधुंडिराज महाराज यांचेकडून व अन्य भक्तांकडूनही माहिती मिळवून हे चरित्र लिहिले आहे. त्यांनी माहिती मिळविताना कवीश्वर घराण्याचा इतिहासच संकलित केला आहे. या माहितीने या घराण्याची उज्वल परंपरा दृष्टी दिपवून टाकणारी आहे हेच स्पष्ट होते. उपासना पिढ्यान्-पिढ्या करणारी अनेक घराणे दिसतात. परंतु उपासना आणि उपासनेची फलप्राप्तीही झालेले महापुरुष पिढ्यान्–पिढ्या अखंड परंपरेने दिसणारी घराणी दुर्मिळ आहेत. अशापैकी कवीश्वरांचे घराणे आहे. हे स्पष्ट होणारी माहिती श्री. तात्यासाहेब दामले यांच्या संकलनातून साकारलेल्या 'धुंडिराज लिलामृतात' मिळाली. या पुस्तकातील बहुतेक सर्व माहिती आमच्याही संकलनात समाविष्ट केली आहे. म्हणून श्री. तात्यासाहेब दामले यांचे कृतज्ञतापूर्वक ऋणी आहोत.

२) 'प्रयाग'– या प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या अल्प–जीवन चरित्र लेखनाचे कार्य सद्गुरु कृपासंपन्न लेखिका सौ. नीलाताई जोशी यांचे आहे. या चरित्रामधून भरपूर माहिती मिळाली आहे. लेखिकेची इच्छा, मोठे चरित्र आमचेकडून लिहून व्हावे अशी आहे. हा त्यांचा संकल्प ईशेच्छेने सफल होईल. पण तूर्त तरी आम्हीही अल्पचरित्राचा हेतू यावेळी नजरेसमोर ठेवला आहे. यामुळे सौ. नीलाताईच्या कष्टाचा आयता लाभ घेऊन हे काम पूर्ण करीत आहोत. यामध्ये आमचे कष्ट नाहीत, काही

नाही. यासाठी या कार्याच्या श्रेयाचे अधिकारी असलेल्या सौ. नीलाताई जोशी यांचाही मी कृतज्ञतापूर्वक ऋणी आहे.

या महन्मंगल कार्याला ज्यांनी ज्यांनी हस्ते–परहस्ते हातभार लावला ते सारेच भाग्यवान आहेत. त्यांना मिळालेल्या सेवेने झालेला आनंद हा आमच्या आभाराने होणाऱ्या आनंदाच्या अनंतपटीने श्रेष्ठ, विशुद्ध आणि आत्मबल वाढविणारा आहे. याची जाणीव परस्परांना असल्याने, नामोच्चाराने त्यांची सेवा-भक्ती जाहीर करीत नाही. म्हणजे कोणाचाही संकोच होणार नाही. ईश्वरार्पण बुद्धीने केले गुरुसेवेचे मोल व्यवहारातील माध्यमाने होऊ शकत नाही. परंतु या सर्वसहकारी–साहाय्यक गुरुभक्तांना, भक्तवत्सल–भक्ताभिमानी भगवंताच्या प्रीत्यर्थ मनोभावे वंदन करतो.

सर्व वाचकांना या ग्रंथवाचनाने आनंद मिळेल अशी खात्री आहे. कारण ही 'श्रीदत्तवाक्सुधा' आहे.

❋ ❋ ❋



ब्रह्मश्री, प. पू. श्रीवक्रतुंडमहाराज
पू. श्रीदत्तमहाराज यांचे आजोबा.



ब्रह्मश्री, प. पू. श्रीधुंडिराजमहाराज
पू. श्रीदत्तमहाराज यांचे पितृदैवत.



प. पू. श्री. सौ. सरस्वतीबाई ऊर्फ आईसाहेब
पू. श्रीदत्तमहाराज यांच्या मातोश्री.



ब्रह्मश्री, प. पू. श्रीदत्तमहाराज
एक आगळे दर्शन !



प. प. श्रीनृसिंहसरस्वती (दीक्षित) स्वामीमहाराज.



प. पू. श्रीगुळवणीमहाराज, पू. श्रीधुंडिराजमहाराज, पू. श्रीदत्तमहाराज.

# प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर
## यांचा
# *अल्प जीवन-परिचय*

**अद्वैतानंद पूर्णाय व्यासशंकर रूपिणे ।**
**नमोऽस्तु वासुदेवाय गुरवे सर्व साक्षिणे ।**

अद्वैतानंद पूर्ण, श्रीगणेश, विष्णुस्वरूपी श्रीव्यासमुनी आणि सर्व मंगलकारक शंकर यासर्व स्वरूपी असलेले श्रीसद्गुरू वासुदेव, अशा सर्व साक्षी परब्रह्माला वंदन करून आत्मकल्याण हेतूने श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र लेखनास प्रारंभ करीत आहे.

**जन्तूनां नरजन्म दुर्लभमतः पुंस्त्वं ततो विप्रता ।**
**तस्माद्वैदिक धर्म मार्गपरता विद्वत्त्वमस्मात्परम् ॥**
**आत्मानात्म विवेचनं स्वनुभवो ब्रह्मात्मना संस्थिति-**
**मुक्तिर्नो शतजन्मकोटि सुकृतैः पुण्यैर्विना लभ्यते ॥**

(विवेक चुडामणि)

भगवान श्रीशंकराचार्यांनी वरील श्लोकात जन्मलेल्या जीवांच्या विकासाचे व त्यांच्यातील उच्चकोटी कोणती याचे वर्णन केले आहे. अत्यंत सूक्ष्म जंतूपासून जन्म होता होता मनुष्य जन्म मिळतो. नंतर पुढे मनुष्य जन्मात पुरुष जन्म व त्यात ब्राह्मण जन्म प्राप्त होतो. ब्राह्मण जन्मात प्रगती करता करता वैदिक धर्ममार्गपरायणता व विद्वत्त्व प्राप्त होते. विद्वत्तेपासून आत्मानात्म विवेकाचे ज्ञान होते. 'मीच ते ब्रह्म आहे' असा सर्व श्रेष्ठ अनुभव त्यावेळी येतो. हा अनुभव अखंड मिळत राहिला की मुक्ती मिळते.

'सा काष्ठा सा परागतिः' ही मुक्तीची हद्द आणि परागता होय. अशी मुक्ती असंख्य जन्मात केलेल्या पुण्याशिवाय मिळणे कठीण आहे.

मनुष्य जन्म परमेश्वर कृपेनेच प्राप्त होतो ही गोष्ट मानावीच लागेल. कारण पशु वगैरे खालच्या योनीमध्ये पाप-पुण्य फलस्वरूप कर्म होत नाही. अर्थातच, मनुष्य जन्म मिळण्यात या कर्माचा काहीही भाग नसल्यामुळे परमेश्वर कृपेशिवाय इतर कोणतेही कारण मनुष्य जन्माचे असू शकेल असे मानता येत नाही.

या दृष्टीने ईश्वर कृपानुग्रह होत होत जीव विकसित होत असतो. हे महापुरुषांच्या जीवन चरित्रातून स्पष्ट होत असते. सदैव ईश्वरकृपापात्र होत रहाणे हे जीवाचे-मनुष्य जीवाचे-कर्तव्य आहे. अशा महापुरुषांच्या जीवनाचा मागोवा घेताना त्यांच्या पूर्वपुण्याचे भांडार मुक्तपणे खुलत जाते. प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वरांचे घराणे हे ईशकृपेच्या पुण्याईचे भांडार गृह आहे.

चार पाच पिढ्यांपासून वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौतस्मार्त यागानुष्ठान, मंत्र, तंत्र, शास्त्र व रामायण, महाभारत-भागवत इत्यादींवर प्रभूत्व असलेल्या पवित्र, थोर, नामवंत शास्त्री घराण्यात आपले चरित्र नायक श्रीदत्तमहाराज यांचा जन्म झाला आहे.

यांचे मूळ घराणे नगर जवळच्या मांडवगणचे आहे. मांडवगण ही मांडव्य ऋषींची तपोभूमी. येथे शिवाचे स्वयंभू स्थान आहे. यांच्या घराण्याचे सप्तर्षि हे आडनाव होते. नगरच्या श्रीदत्तमंदिराचे पुजारी श्री. सप्तर्षि हे यांच्याच कुळातील होत. हे उपमन्यू गोत्राचे शुक्ल युजुः शाखीय माध्यंदिन ब्राह्मण घराणे. त्यावेळच्या यावनी राजाच्या जाचाला कंटाळून या घराण्याने ठिकठिकाणी स्थलांतर केले. यापैकी श्रीदत्तमहाराजांची शाखा वैराज क्षेत्री म्हणजे हल्लीच्या वाई गावी गेली. यांचे वाई येथे भाऊबंद आहेत.

श्रीदत्तमहाराजांचे पणजोबा भालचंद्रशास्त्री यांना दाजी दीक्षित म्हणत. ते रामायण, महाभारत व भागवत या ग्रंथावर पुराण व प्रवचन अुत्तम करीत. मंत्रशास्त्रात ते निष्णात होते. श्रौतस्मार्तयाज्ञिक कर्मात ते प्रविण होते. धर्मशास्त्रातही ते तज्ज्ञ पंडित होते. ते प्रतिभासंपन्न कवी असून त्यांनी संस्कृतात व प्राकृतात आख्याने रचिली आहेत. त्यांच्या चुलत घराण्यातील श्री. खंड दीक्षित हेही विद्वान शास्त्री असून यज्ञ कर्मात फार निष्णात होते. त्यांनी एक याज्ञिक ग्रंथ लिहिला आहे.

श्री. दाजी दीक्षित यांच्या काळात साताऱ्च्या दरबारात धर्मशास्त्राच्या प्रश्नावरील निर्णयासाठी वाईच्या पंडितांना मुद्दाम निमंत्रण देत असत. श्री. दाजी दीक्षित हे व्युत्पन्न पंडित व धर्मशास्त्रात पारंगत असल्याने त्यांना दरबारचे निमंत्रण प्रामुख्याने येत असे. दरबारात एकदा ग्रामीण वाद निर्माण झाला. त्याच्या निर्णयासाठी श्री. दाजी

दीक्षित यांना निमंत्रण आले. एकूण प्रसंग लक्षात घेऊन, राजदरबारच्या मान्यतेसाठी त्यांना हवा तो निर्णय देण्याचा प्रसंग नको म्हणून ते संकट टाळण्यासाठी श्री. दाजी दीक्षित यांनी स्वतःच त्वरीत निर्णय घेतला. त्यांनी ताबडतोब वाई सोडली व घोड्यावरून नरसोबाचे वाडीस आले व तेथेच कायम राहिले. यावरून त्यांची धर्मशास्त्र निष्ठा किती दृढ होती हे दिसून येते. त्यासाठी त्यांनी स्थान त्याग केला. अशा प्रकारे हे घराणे श्रीक्षेत्र नरसोबा वाडीस आले.

श्रीनरसोबाच्या वाडीला श्री. दाजी दीक्षित यांनी श्रीदत्तात्रेयांची उत्कृष्ठ उपासना केली. जप-जाप्य, अध्यात्म चिंतन, श्रीगुरुचरित्राची पारायणे व दत्तसेवा यात ते दंग असत. रोज पांच श्लोक रचून ती स्तुतिसुमने श्रीदत्तप्रभूंच्या चरणी समर्पित करण्याचा त्यांचा परिपाठ होता. त्यांच्या उत्कृष्ठ व प्रासादिक काव्यप्रतिभेवरून लोक त्यांना कवीश्वर म्हणू लागले व तेच नाव पुढे प्रचलित झाले. श्रीगुरुचरित्रातील नंदीनामा कवीश्वराचे कार्य दाजी दीक्षितांकडून होत होते, हाही पूर्व ऋणानुबंध असल्याचेच या घटनेवरून दिसते. ईश्वरदत्त गुणामुळें मिळालेल्या पदवीने कवीश्वर नामाभिधान धारण करणारे श्री. दाजी दीक्षित यांचेपासून सप्तर्षि आडनाव लुप्त होऊन 'कवीश्वर' म्हणून प्रसिद्ध झाले.

आपण वाडीतच कायम रहावे या इच्छेने त्यांनी एकदा आपले सर्व काव्य श्रीदत्तचरणी समर्पण केले व "कोठे रहावे ?" याचा देवाजवळ कौल मागितला. तेव्हां त्यांना स्वप्नात श्रीनृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांचे दर्शन घडले. स्वामींनी त्यांना आशीर्वाद दिला व सांगितले "येथेच रहा, तुला भाजी भाकरी खास मिळेल." हा आशीर्वाद ही तात्काळ सफल झाला. या शुभदर्शनानंतर पंधराच दिवसात कागवाडच्या श्री फणसळकरांनी त्यांना राहण्यासाठी कृष्णाकाठावर तीन मजली वाडा दान म्हणून दिला. तसेच जवळच्याच कुरुंदवाडच्या संस्थानिकांनी त्यांना अनगोल माधवपूर (वडगाव) व तिकोटा येथील जमिनी इनाम म्हणून दिल्या. त्या अजूनही त्यांच्या घराण्याकडे आहेत. कुरुंदवाडच्या राजेसाहेब पटवर्धनांचा त्यांना चांगलाच आश्रय मिळाला. याप्रमाणे ईश्वरीकृपाशीर्वादाचा प्रत्यय एवढ्या प्रभावाने आला.

श्रीदत्तकृपेने एवढी उत्तम सोय झाल्याने श्री. दाजी दीक्षित आनंदाने वाडीत राहू लागले. त्यांनी संस्कृतमध्ये हरिश्चंद्राख्यान व गालव चरित्र लिहिले आहे. श्रीगुरुचरित्रातील सतीच्या तीन अध्यायावर संस्कृतात सती चरित्रही लिहिले आहे. प्रसंग विशेषी ते विनंती केल्यास समारंभासाठी नाटकही रचून देत असत. त्यांच्या नाटकाचे प्रयोगही उत्तम होत असत.

श्री. दाजी दीक्षित यांच्या घराण्याची कुलस्वामिनी माहूरची श्रीरेणुकामाता आहे.

कुलात उपासना श्रीगणपतीची आहे. त्यांचे आजोबा श्री. दादा दीक्षित यांच्या वडिलांनी मोरगावक्षेत्री जाऊन मुद्गल पुराण भाष्य लेखक श्रीगणेश योगीन्द्र महाराज यांच्याकडून श्रीगणेश मंत्रोपासना घेतली होती. त्यांनी श्रीगणेशव्रत पुरश्चरण वगैरे करून व नुसत्या दुर्वांकुरावर वर्षभर राहून श्रीगणेशाची कडकडीत उपासना केली. तेव्हा श्रीगणेश प्रसन्न होऊन त्यांना श्रीगणेशाची एक स्वयंभू मूर्ति मिळाली! तसेच स्वप्नात एका तेजस्वी ब्राह्मणाचे दर्शन होऊन आशीर्वाद मिळाला "तुझी सेवा पावली, तुझे काम झाले. तू आता घरी जा. तुझ्या घरात ईश्वरी अनुग्रह असलेले व पुराण वाङ्मय पारंगत विद्वान जन्मास येतील!"

श्री. दाजी दीक्षित हे वाडीमध्ये श्रीदत्तात्रेय व श्रीगणेश या दोघांचीही कडक उपासना करीत असत. पहाटे उठून ते 'विद्यागणेश' व 'वांछाकल्प' यांचा पाठ करीत. विद्यागणेश हा स्वतंत्र मंत्र असून त्याचा प्रथम सोळावेळा ब्राह्मी मुहूर्तावर पाठ करावयाचा असतो व नंतर वांछाकल्प या मंत्राचा सबीज, सरळ व व्युत्क्रम पद्धतीने एकदा पाठ म्हणण्याचा प्रघात आहे. श्री. दाजी दीक्षित यांच्यावर श्रीगणेशाची कृपा असून त्यांना दृष्टांत होत असत. श्रीगणेश व श्रीदत्त एकच आहेत अशी त्यांची अभेद्य बुद्धी व श्रद्धा होती. साताऱ्याजवळील धावडशी येथील श्रीब्रह्मेन्द्र स्वामींचा सहवास व कृपा यांचाही लाभ श्री. दाजी दीक्षितांना झाला होता. श्रीब्रह्मेन्द्र स्वामींच्या गुणवर्णनपर काही पद्यरचनाही श्री. दाजी दीक्षित यांनी केली आहे.

यांच्या पत्नी श्री. सौ. सगुणाबाई या एकनिष्ठ पतिव्रता व फार धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांना पतीने सांगितले होते की, श्रीदत्ताला रोज १०८ प्रदक्षिणा घालून माळ जपत जा. यात खंड पडता कामा नये. "या प्रमाणे सौ. सगुणाबाईंचा नित्य नेम चालू होता.' पुढे त्यांना दिवस राहिल्याने त्यांना प्रदक्षिणा घालणे जड जाऊ लागले. तेव्हां श्री. दाजी दीक्षित म्हणजेच श्री. भालचंद्रशास्त्री स्वतःहून पत्नीला म्हणाले, "आता काही दिवस प्रदक्षिणा बंद ठेवल्या तरी चालेल. तुला श्रम झेपणार नाहीत. पण सौ. सगुणाबाई मोठ्या दृढनिश्चयी व भाविक होत्या. त्या विनयाने म्हणाल्या, "आपण माझ्या नियमात आता मोडता घालू नये. मी हळू हळू, मध्ये मध्ये थांबून, पण रोज प्रदक्षिणा पुऱ्या करीन, त्यात खंड नको. देव दयाळू व जाणता आहे. तो सगळं निभावून नेईल" पत्नीच्या या उत्तराने श्री. भालचंद्रशास्त्रीबोवांना समाधान वाटले व म्हणाले, "तुला गणपतीचा महान उपासक पुत्र होईल.!" असा प्रसन्न अन्तःकरणाने पत्नीला शुभाशीर्वाद दिला. शके १७६१ (इ. स. १८३९) मध्ये अश्विन वद्य चतुर्थीला—संकष्टी चतुर्थीच्या शुभ मुहूर्तावर—माध्यान्हानंतर सौ. सगुणाबाई प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झाले! आशीर्वाद सफल झाला. मुलाचे नाव वक्रतुंड ठेवण्यात आले.

याप्रमाणे श्रीदत्तमहाराजांच्या पणजोबांचे संक्षिप्त चरित्र पाहिले. पणजोबांचा अधिकार आणि जीवनाची बैठक डोळ्यासमोर उभी राहिल्या खेरीज बुद्धीला निश्चितपणा येत नाही. महापुरुषांचे दिव्य जीवनाचे शब्ददर्शनही श्रद्धा, भक्ती दृढ करण्यास उपयुक्त ठरते. यासाठी हे अज्ञात चरित्र वाचकांपुढे ठेवले आहे. आतां श्रीदत्तमहाराजांच्य आजोबांचे म्हणजे श्री. वक्रतुंड महाराजांचे जीवन चरित्रही संक्षेपाने पाहू.

## – श्री वक्रतुंड महाराज –

या मुलाचे दैवी गुण लहानपणासूनच दिसू लागले. खेळण्यातच देव मांडावा, त्याला फुले वहावी, त्याला नमस्कार करावा, टाळया वाजवाव्या, आरतीसारखे काही गावे, अशा त्यांच्या बाललीला असत. त्यांचे सख्खे चुलते श्री. चिंतामणशास्त्री यांनी वक्रतुंडांना लहानपणी पुष्कळ सांभाळले. शास्त्रानुसार आठव्या वर्षी मौजीबंधन झाले. घराण्यातील कुलाचार पद्धतीप्रमाणे लगेच संकष्टी चतुर्थीचे व्रत सुरु झाले. मुंजीनंतर श्री. वक्रतुंड यांची श्रीगणेश पूजाआर्चा पद्धतशीर सुरु झाली. आपल्या शास्त्रज्ञ व वेदवेदांत पंडित पित्याजवळच त्यांनी याजुष माध्यंदिन वेद संहितेचे चाळीस अध्याय, याज्ञिक पंच प्रयोग, उपनयनादि षोड्स संस्कार प्रयोग, यांचे अध्ययन केले. त्यांच्याच घराण्यातील वे. शा. सं श्री. बाळशास्त्री दीक्षित व श्री. लक्ष्मणशास्त्री या विद्वान गुरुजवळही ते संस्कृत व व्युत्पत्तीशास्त्र शिकले. त्यांची बुद्धी अतिशय कुशाग्र असून स्मरण व पाठांतर शक्ती दांडगी होती. महाभारत, भागवत यांचे सप्ताह व प्रवचनकला यातही ते अल्पवयातच पारंगत झाले.

त्यांच्या स्मरणशक्तीचे उदाहरण द्यायचे तर मोठेपणी मुलांना शिकवताना एखाद्या प्रश्नाचे उत्तर म्हणून संदर्भादाखल ते सहज सांगत. "धर्मसिंधूच्या पोथीतील तृतीय परिच्छेदात चौथ्या पानावर हा विषय आला आहे. तो काढून नीट वाच." असे अनेक संदर्भ नेमक्या ठावठिकाणासहित ते नेहमी सांगत असत.

श्री. वक्रतुंडशास्त्र्यांना वक्तृत्वाची अलौकिक ईश्वरदत्तदेणगी होती. रामायण–महाभारत–भागवत यांच्या सप्ताहातील त्यांची प्रवचने म्हणजे श्रोत्यांना वाङ्मयरसाची मेजवानी व एक अपूर्व पर्वणी वाटत असे. चातुर्मासात त्यांच्या प्रवचनाला चार चार हजार श्रोते आवडीने जमून मंत्रमुग्ध अवस्थेत श्रावणानंद लुटीत असत. शास्त्रीबोवांच्या डोक्यात विषय आणि जिव्हेवर सरस्वती सदैव सज्जच असत. त्यामुळे प्रवचनाची तयारी करण्याचा कधी प्रश्नच येत नसे. कधी कधी तर प्रवचनाचे प्रारंभी समोर मांडलेल्या दत्तू बाळाच्या प्रतिमेला प्रणाम केल्यावर ते श्रोत्यांना हसून प्रश्न करीत, 'सज्जन हो आज कोणता विषय श्रवण करण्याची आपली इच्छा आहे ?' यावर धीटपणाने कोणी विषय सांगितला तर दोन तास माहितीपूर्ण उद्बोधक व रसाळ प्रवचन त्याविषयावर करीत.

कुरुंदवाडला सरकार वाड्यात श्रीराजेसाहेब स्नान करीत असताना पुराण वाचण्याची पद्धत असे. श्री. वक्रतुंडशास्त्री त्याप्रमाणे पुराण वाचीत असत. तीच प्रथा त्यांनी वाडीला सुरू केली. श्रीस्वारीच्या सायंकाळच्या, प्रदोषाच्या पूजेच्या वेळी स्नानापासून पोषाख करुन स्वारी पालखीत बसण्यास निघेपर्यंत श्री. वक्रतुंडशास्त्री नित्यनेमाने पुराण वाचीत असत.

श्री. वक्रतुंडशास्त्री श्रीदत्तात्रेयांच्या भोगमूर्तीजवळच पुष्कळ काळ रहात व ध्यान धारणा करीत आणि भाष्य वाचीत. त्यावेळी वाडीला श्रीगोविंदस्वामी द्रविणऐच्या नांवाचे फार मोठे अधिकारी संत होते. त्यांनी श्रीवासुदेवानंद सरस्वतींना मंत्र दीक्षा दिली होती. त्या श्रीगोविंदस्वामींचीही सेवा श्री. वक्रतुंडशास्त्री शिष्याप्रमाणे करीत असत.

श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांना संसारात एक मोठे शल्य होते. त्यांची संतती अल्पायुषी ठरून वाचत नसे. त्यांना वीस आपत्ये झाली पण दोन मुलींशिवाय कुणीही वाचले नाही. त्यामुळे वैतागून व विरक्त होऊन त्यांनी श्रीगोविंदस्वामींना एकदा कळकळीने प्रार्थना केली. "आता संसार पुरे झाला. मला त्याचा वीट आला आहे. मला संन्यास दीक्षा द्या." शिष्याचे हे निर्धाराचे शब्द ऐकून स्वामींनी डोळे मोठे करून त्यास आपल्या निश्चयापासून परावृत्त केले. स्वामी समजूत घालण्याच्या स्वरात म्हणाले "अरे तुझा संसार अजून व्हावयाचा आहे. मी सांगतो, तुझी संतती यापुढे वाचेल. तुला अलौकिक पुत्र होणार आहे! तुझा विश्वास बसावा म्हणून हे घे तुला आत्ताच बाळ देतो!" असे म्हणून स्वामींनी स्वतःजवळची श्रीदत्तमूर्ती प्रभावळीसह श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांच्या हातात दिली.

या ईश्वरी देणगीने श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांना धन्यता वाटली. त्यांनी त्या दत्तमूर्तीला बालकच समजून त्याचे बारसे केले व 'दत्तू बाळ' असे नावही ठेवले. त्या बालकाला कडीतोडी, अलंकार, पाळणा, छत्रचामर इ. सर्व सोपस्कार केले. इतकेच नव्हे तर त्याचे व्रतबंध वगैरे षोडस संस्कारही यथाशास्त्र, यथासांग, थाटामाटाने केले!

एकदा श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांना काशीयात्रेला जाण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे ते सहकुटुंब व दत्तुबाळाला घेऊन निघाले. वाटेत एका शिष्याच्या घरी त्यांनी मुक्काम केला. तो शिष्य नुकताच काशीयात्रेहून आला होता व तेथून त्याने कावडभर गंगा आणली होती. आपल्या गुरुमहाराजांचे अचानक आगमन झाल्याने त्याला अत्यानंद झाला. त्याने आपल्या गुरूंना सचैल गंगास्नान घालून त्यांची षोडशोपचारपूर्वक पूजा केली. त्याच रात्री श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवाना स्वप्नात दृष्टांत झाला, 'तुझ्या प्रारब्धात काशीयात्रा नाही. तू मागे फीर! "या आदेशाप्रमाणे श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवा पुढचा बेत रद्द करून तेथूनच परत फिरले. पुढे श्रीदत्तुबाळाला घेऊन त्यांनी दक्षिणेची यात्रा केली.

प्रवासात ते दत्तूबाळाला मुलासारखे वागवीत व त्याची काळची घेत. एकदा ज्याठिकाणी उतरले होते तेथील उपाध्यायाने 'आपण किती जण आहात? असा साहजिकच प्रश्न केला. तेव्हा दत्तूबाळाला धरुन श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांनी आकडा सांगितला. तेव्हा भोजनासाठी पाने मांडल्यावर एक पान रिकामेच राहिले, कोण राहिलं? अशी चर्चा सुरू झाली. तेव्हां उलगडा झाला की, पाहुणे मंडळीत दत्तूबाळाचाही समावेश आहे. याप्रमाणे श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवा अगदी सहजपणे व मनापासून दत्तूबाळाला चालता बोलता जिवंत पुत्रच समजत. त्यांची ही आत्मोपम्य बुद्धी काही अलौकिच म्हणावी लागेल.

श्री. वक्रतुण्डशास्त्रीबोवांची एक गोष्ट मोठी उद्‌बोधक ऐकण्यासारखी आहे. तीवरून त्यांची स्वजनाविषयींची आत्मीयत्ता व त्यागवृत्ती दिसून येते.

त्यांचे विभक्त बंधू श्रीरामशास्त्री यांनी वाडीला एक मोठा यज्ञ केला. हा यज्ञ श्रीमौनीस्वामी महाराजांच्या उपस्थितीत झाला. केवळ श्रीमौनीस्वामींच्या कृपानुग्रहाने हा यज्ञ झाला. या यज्ञासारखा यज्ञ श्री. चिदंबर दीक्षितांच्या यज्ञानंतर न भूतो न भविष्यति असाच गणला जातो. श्री. रामशास्त्री कवीश्वरांना या यज्ञासाठी पुष्कळ देणग्या मिळूनही त्या महोत्सवात त्यांना १५/२० हजार रुपये कर्ज झाले. ते कर्ज फेडण्यासाठी त्यांनी मिरज वगैरे ठिकाणी प्रवचने करून प्रयत्न केला. या कर्ज फेडीसाठी श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांनीही अशीच गावोगावी प्रवचने, सप्ताह करून सहाय्य केले. पण हे कर्ज न फिटताच श्री. रामशास्त्री निधन पावले. त्यांचे चिरंजीव श्री. गणेशशास्त्री यांचे एकट्याचे हातून हे डोईजड कर्ज फिटणे शक्य नव्हते. वास्तविक श्री. वक्रतुंडशास्त्रीबोवांच्यावर या कर्जाची कायदेशीर जबाबदारी काहीच नव्हती. पण आपल्या पुतण्याला सावकार फारच बेजार करीत आहेत असे पाहून त्यांनी आपणहून या प्रकरणात लक्ष घातले. स्वतः सावकाराकडे जाऊन सांगितले "माझ्या पुतण्याला त्रास देऊ नका. मी स्वतः या कर्जाची जबाबदारी घेतो. मी त्याला जमानत रहातो. मी हे कर्ज लवकरच फेडतो. तुम्ही चिंता करू नका. मी आत्ता प्रवचनाच्या दौऱ्यावर निघतो, मिळेल तो निधी आपल्या गावच्या अन्तुशास्त्री पुजाऱ्याकडे पाठवित जाईन. तो ती रक्कम कर्ज फेडीत तुमच्याकडे जमा करीत जाईल.

याप्रमाणे आश्वासन देऊन श्री वक्रतुंडशास्त्रीबोवा पूर्वेकडे व श्री गणेशशास्त्री उत्तरेकडे असे दोघेही प्रवचनासाठी गागोगाव निघाले. याप्रमाणे तीन वर्षे फिरून त्यांनी हे कर्ज स्वकष्टाने फेडून टाकले. श्रीरामशास्त्री हे श्रीवक्रतुंडशास्त्रींचे ज्येष्ठ बंधू होते. 'ज्येष्ठो भ्रातः पितुः समः' या न्यायाने पितृऋण व कुलऋण निर्धाराने फेडले!

कर्ज फेडीसाठी केलेल्या प्रवचनांच्या या प्रदीर्घ दौऱ्यात त्यांना अनंत अडचणी

आल्या. श्रीवक्रतुंडशास्त्री फलटणला प्रवचनासाठी गेले असता स्वप्न पडले की श्रीगणेशमूर्तीचा हात एकाएकी निखळून पडला. हे अशुभ चिन्ह समजून ते ताबडतोब मिरजेला श्री. रामशास्त्रींच्या भेटीला आले–भेट झाली–पण श्री. रामशास्त्री आजारी होते व तो विकार वाढून ते स्वर्गस्थ झाले.

त्या काळात प्रवास बैलगाडीतूनच होत असे. पुष्कळसा दाट जंगलांतूनही प्रवास करावा लागे. एकदा प्रवासात नाईलाजाने जंगलात रात्रीचा मुक्काम करावा लागला. एका झाडाखाली मंडळी उतरली. थोड्या अंतरावर लमाणांचा तांडा होता. ते जंगली लोक शेकोट्याभोवती अचकट विचकट गाणी म्हणत ओरडत व नाचत होते. या मंडळींना पाहिल्यावर चांगली शिकार सापडली म्हणून ते रानटी लोक लाठ्याकाठ्या घेऊन प्रवाशांना लुटण्यासाठी धावत आले. पण— आश्चर्याची गोष्ट अशी की, श्रीवक्रतुंड महाराजांच्या तेजस्वी व दिव्य मूर्तीचे दर्शन होताच त्यांची दुष्ट बुद्धीच नष्ट झाली. इतकेच नव्हे तर त्या जंगली लोकांनी श्रीवक्रतुंड महाराजांना लवून प्रणाम केला. त्या प्रवाशांना संरक्षणाची हमी दिली. त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली.

एकदा या प्रवचनाच्या दौऱ्यात बालवयाचे श्रीधुंडिराज महाराजही बरोबर घेतले होते. त्या ठिकाणाहून एकाएकी श्रीवक्रतुंड महाराज बैलगाडीने वाडीला यायला निघाले. वाटेत अतोनात पाऊस पडल्याने रस्ता खराब झाला होता. एका उतरणीच्या रस्त्यावर सर्व मंडळी खाली उतरून पायी चालू लागली. गाडीत फक्त श्रीधुंडिराजमहाराजाना लहान म्हणून बसविले होते. पण थोड्या वेळाने श्रीवक्रतुंड महाराजांना काय वाटले कुणास ठाऊक त्यांनी गाडीतून श्रीधुंडिराजास खाली उतरवून घेतले. पुढे उतार फार होता. गाडी निघाली आणि थोड्याच अंतरावर बैलाचे पाय घसरले. गाडी उलटी पालटी झाली आणि घरंगळत जाऊन पूर्ण मोडून पडली. श्रीधुंडिराज महाराजांच्या संरक्षणाचा संकेत मिळाला असावा म्हणून असे घडले.

प्रवासात श्रीवक्रतुंडमहाराजांचे बरोबर एक गाय व तिचा एक मस्त गोऱ्हा होता. वाटेत एका गांवी मुक्काम झाला. गावकऱ्यांनी महाराजांचा सत्कार व पाद्यपूजा केली. मोठा सोहळा झाला. शिष्यांपैकी एक जण तट्टूवर बसून प्रवास करीत होता. या मुक्कामात त्या गोऱ्ह्याने त्या तट्टाच्या पोटात शिंग खुपसून ठार केले. तो शिष्य काहीही मागत नव्हता. त्याची तक्रारही नव्हती तरी श्रीवक्रतुंड महाराजांनी त्या गावचा बाजार भरला असता तेथे जाऊन त्या तट्टूसारखे दुसरे तट्टू खरेदी केले व शिष्याला प्रसाद म्हणून दिले.

एकदा नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्ड्याला श्रीवक्रतुंड महाराज प्रवचन-पुराणासाठी गेले होते. मुरलीधर मंदिरात मुक्काम होता. त्यावेळी कर्ज फेडीपैकी

वाडीचा मोतीरामशेठ आपली दोन हजाराची कर्जबाकी राहिली म्हणून वसूलीला शोध काढीत आला होता. शास्त्रीबोवांनी त्याला ठेवून घेतले. आणि सप्ताह समाप्तीला जमा झालेल्या निधीतून त्याचे दोन हजार रुपये सर्वासमक्ष दिले. श्रीवक्रतुंडमहाराज इतके सरळ स्वभावाचे की, त्यांनी त्या रकमेची पावती सुद्धा मागितली नाही. आणि शेठजींच्याही मनावर महाराजांच्या प्रवचनांचा, त्यांच्या दैवी शक्तीचा असा परिणाम झाला की, तो महाराजांच्या चरणी लीन झाला. यातून महाराजांची निर्लोभी आणि विरक्त वृत्तीचे उदार चरित दिसून येते.

## श्रीमौनीस्वामीमहाराज

श्रीवक्रतुंडमहाराजांना वाडीला ज्या थोर संतांचे मार्गदर्शन व कृपाप्रसाद लाभला त्यात श्रीमौनीस्वामीमहाराज प्रमुख होते. या प्रसंगाने आपण त्यांचेही अल्पचरित्र आत्मकल्याण हेतूने पाहू.

श्रीमौनीस्वामीमहाराज हे मूळचे सोलापूरकडील होते. लहानपणीच घराबाहेर पडून कडू लिंबाच्या पाल्याच्या केवळ रसाचा आहार ते कित्येक वर्षे घेत होते. त्यांनी काशी-रामेश्वरच्या यात्रा अनेक वेळा पायी केल्या. पंचवीसाव्या वर्षीच संन्यास घेतला. संन्यासाश्रमात 'प्रद्युम्नसरस्वती' हे नामाभिधान त्यांना प्राप्त झाले. पण बारा वर्षे कडकडीत मौन व्रत पाळल्यामुळे ''मौनीस्वामी' म्हणूनच सर्वजण त्यांना संबोधित होते. मौनानुष्ठानाने त्यांना वाक्सिद्धी प्राप्त झाली होती. उज्जैनीला ते काही वर्षे राहिले. तेथे त्यांनी गोपालकृष्णाचे सुंदर मंदिर बांधले आहे. पुढे ते नरसोबावाडीस येऊन राहिले. श्रीवासुदेवानंदसरस्वती त्यांना गुरुस्थानी मानीत. एवढी श्रीमौनीस्वामींची अध्यात्मिक थोरवी होती. श्रीवक्रतुंडशास्त्री श्रीमौनीस्वामींची शिष्याप्रमाणे सेवा करीत. मंदिरातील महाभारत पुराण संपल्यावर, श्रीमौनीस्वामींना महाभारत फार आवडे, म्हणून त्यांच्यासाठी मुद्दाम त्यांच्या मठात जाऊन पुनः त्यांचे पुढे श्रीवक्रतुंडशास्त्री महाभारत वाचीत.

श्रीमौनीस्वामी यांची सदैव बालवृत्ती असून लहान मुलांचा त्यांना फार लळा असे. लहान मुलांना खाऊ देणे हा त्यांचा आवडता छंद होता. श्रीटेंबेस्वामींच्यावर आणि कवीश्वर घराण्यावर श्रीमौनीस्वामींचे विशेष प्रेम असे.

एकदा वाडीला अवर्षण पडून पावसाच्या अभावी लोक हवाल दिल झाले. लोक श्रीमौनीस्वामींना शरण गेले. लोकांचा जमाव त्यांच्या मठात गेला. जमावाच्या प्रमुखाने प्रार्थना केली "महाराज! कसेही करून पाऊस येऊ द्या!" थोडावेळ ध्यानस्थ बसून स्वामी म्हणाले, "ठीक आहे चला! आपण सगळेच श्रीदत्तप्रभूंना शरण जाऊ." मग सर्वांच्यासह श्रीमौनीस्वामी मंदिरात गेले व सर्वांसह आरती करून

देवाला मोठ्याने प्रार्थना केली " हे दत्त प्रभो ! प्रजेवरील संकट जाण्यासाठी जलधारांचा प्रसाद लवकर द्या !" नंतर त्यांनी व त्यांच्याबरोबर सर्वांनी देवाला साष्टांग नमस्कार घातला. मग लोकांना घरी जाण्यास सांगितले. आश्चर्याची गोष्ट अशी की त्या रात्री आकाशात अचानक ढग येऊन मुसळधार पाऊस रात्रभर पडला.

श्रीवक्रतुंडशास्त्रीबुवांचे वडील बंधू श्रीरामशास्त्री यांची श्रौताग्नि उपासना दांडगी होती. पौर्णिमा-दर्श-चातुर्मास यावेळी इष्ट्या चालूच असत. एकदा साग्निचित ज्योतिष्टोम इष्टि करण्याची त्यांना इच्छा झाली. पण तयारी व सिद्धता काहीच नव्हती. श्रीवक्रतुंडशास्त्रींनी सल्ला दिला की, श्रीमौनीस्वामींचा आशीर्वाद मागावा. त्याप्रमाणे दोघे बंधू आले. श्रीमौनीस्वामी आणि श्रीगोविंदस्वामी ओट्यावर कथालाप करीत होते. त्यांना वंदन करून त्यांनी आपले मनोगत सांगितले. व कृपाप्रसाद मागितला. तेव्हां प्रसन्नचित्ताने श्रीमौनीस्वामी व श्रीगोविंदस्वामी या दोघांनी "छान ! छान ! अवश्य यज्ञ करा. सर्व ठीक होईल ! " असा शुभाशीर्वाद दिला.

यामुळे उल्हासित होऊन श्रीरामशास्त्री काशीस गेले. तेथे प्रवचने केली. यज्ञासाठी आर्थिक सहाय्य मिळविले. या श्रीरामशास्त्रींचा विशेष असा की, हे प्रसिद्ध गणेश क्षेत्र मोरगांव येथे जाऊन, प्रातःकाळी स्नान करून, सायंकाळपर्यंत मोरयाचे मंदिरात उभे राहून त्यांनी महाभारताची पारायणे केली व मोरयाचा प्रसाद संपादन केला व 'भारतीबुवा' अशी पदवी मिळविली. यांच्या भागवताच्या सप्ताहास प्रत्यक्ष दत्तप्रभू जात असत असे श्रीमौनीस्वामीमहाराजांचेकडून समजले. काशीतील सर्व पंडित मंडळी व दक्षिणामूर्ति स्वामीमहाराजांचे समक्ष यांचे पुराण झाले असता सर्व पंडितांनी पुराणास माना डोलविल्या आणि दक्षिणामूर्तींनी तर दृढ आलिंगन देऊन प्रेमाश्रुद्वारा त्यांचेवर अभिषेक केला. असे श्रीरामशास्त्रींचे विद्वान पुत्र श्रीगणेशशास्त्री यांनी प्रत्यक्ष श्रीआत्मारामशास्त्री यांना सांगितले. काशीला सर्व शास्त्री पंडितांना श्रीरामशास्त्रींनी यज्ञाचे निमंत्रण दिले. काशी यात्रेची समाप्ती गंगा-गोदा भेटीत गोदातटाकी करावी असे शास्त्र असल्याने परत येतांना ते नाशिकला उतरले व तेथील सर्व याज्ञिक ब्रह्मवृंदांना यज्ञाचे निमंत्रण दिले.

राजे रजवाडे व धार्मिक धनिक वर्ग यांनी स्वयंस्फूर्तीने यज्ञाला धान्य-पैसा-विविध वस्तू- यांची सढळ हाताने मदत केली. काशी रामेश्वर इ० तीर्थस्थानांचा ब्रह्मवृंद यज्ञाच्या कर्मकांडासाठी हौसेने जमला होता. वाडीला चिंचवनात यथाशास्त्र भव्य मंडप उभारला होता. ऋत्विजासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था केली होती. यज्ञवेदी व यज्ञकुंड कूर्माच्या-पाठीवर असावे असे शास्त्र आहे. म्हणून कृष्णा नदीतून मोठे कासवच आणून त्याला खाली मोठ्या जलपात्रात ठेवून त्याच्या खाद्याची सोय केली होती. यज्ञ सांगतेनंतर

ते जिवंत निघाले तरच यज्ञ यथाशास्त्र सफल झाला असे मानतात. त्याप्रमाणे त्या यज्ञानंतर ते सुखरूप बाहेर पडले! अवमृत स्नानासाठी यज्ञोनारायणाची कृष्णा शुक्लतीर्थापर्यंत थाटाची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. यज्ञात अन्नदानही भरपूर झाले. पूर्णाहुतीला हजारो पानांचा भंडारा झाला आणि विशेष हे की या दिवशी श्रीखंडाचा बेत होता. याच वेळी वसंतोत्सव सुरू असल्यामुळे यज्ञोत्सवाला विशेष शोभा आली होती. याप्रमाणे शके १८१३ (इ. स. १८९१) मध्ये हा साग्निचित ज्योतिष्होम यागाचा महायज्ञ निर्विघ्नपणे व मोठ्या थाटात पार पडला.

यावेळी श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांची अनुपस्थिती मात्र सर्वांना जाणवली. श्रीधुंडिराजांचे वय यावेळी ५/६ वर्षांचे होते ते एका शिष्याचे कडेवर बसून वटपत्रपटावर शयन करणाऱ्या बालमुकुंदाप्रमाणे हा यज्ञ सोहळा कौतुकाने पहात होते. आणि अपूर्व योगायोग असा की या यज्ञाच्या ब्रह्मवृंदांमध्ये कुडुत्रीचे श्रीशंकरशास्त्री गुळवणी उपस्थित होते. त्यांच्यामुळे मातोश्री उमाबाई व बाल श्रीवामन हेही हा सोहळा पाहण्यास येऊन राहिले होते. कवीश्वर घराण्याचा व गुळवणी घराण्याचा संबंध याकाळापासून आलेला आहे. श्रीमौनीस्वामींचे दर्शन यावेळी या सर्वांना घडले. त्यांच्या कृपाशीर्वादाने हे महान कार्य घडून आले.

श्रीमौनीस्वामी मार्गशीर्ष शु. ९ ला वाडीला समाधिस्त झाले. त्यावेळी श्रीवक्रतुंडशास्त्रीबोवा परगांवी होते. परंतु नेमके त्याचदिवशी सायंकाळी प्रवासात ते एकदम थांबले. सर्व मंडळींना जवळ बोलावले आणि अत्यंत दुःखित अन्तःकरणाने म्हणाले "माझ्याप्रमाणे वाडीकडे तोंड करून नमस्कार करा व देवाचे नाव घ्या. आपले मौनीस्वामी शांत झालें आहेत." सर्वांनी सांगितल्याप्रमाणे केले. पुढच्या मुक्कामावर पोचताच वाडीहून बातमी आली की, नवमीला सायंकाळीच श्रीमौनीस्वामी समाधिस्त झाले. त्यावेळी तत्पूर्वीच श्रीवक्रतुंडशास्त्रीमहाराज हे सर्व कार्यक्रम रद्द करून वाडीस निघाले. पण पावसाच्या त्रासाने व रस्ते फारच खराब झाले असल्याने श्रीमौनीस्वामी शांत होण्यापूर्वी ते वाडीला पोहोचू शकले नाहीत. व गुरूस्थानी असलेल्या श्रीमौनीस्वामींची व त्यांची शेवटची भेट होऊ शकली नाही.

श्रीवक्रतुंडशास्त्रीमहाराज पुराण उत्तम सांगत व रसाळ प्रवचने करीत. महाभारताचा त्यांचा अभ्यास सखोल होता. महाभारत त्यांना जवळ जवळ मुखोद्गत होते. त्यांना 'भारती अण्णा' असेच सर्वजण म्हणत. गावोगावी त्यांना प्रवचन पुराणासाठी आग्रहाची निमंत्रणे येत असत. ते प्रवासही पुष्कळ करीत. देऊळगाव राजा येथे पुष्कळदा प्रवचनासाठी जात. तेथे त्यांचा समाजातील सर्व वर्गात फार मोठा शिष्य परिवार होता. पुढे शिष्यांच्या आणि स्नेह्यांच्या आग्रहावरून ते देऊळगाव राजा

येथे वर्षातून काही दिवस येऊन राहू लागले. त्यांच्या एकनिष्ठ भक्त श्री. कुसाताई सावजी यांनी त्यांना शेती व घर दान दिले. त्यानंतर त्यांनी देऊळगाव राजा येथेच वास्तव्य केले.

श्रीवक्रतुंडशास्त्रीमहाराज व्युत्पन्न संस्कृत पंडित होते. देऊळगाव राजा येथील श्री बालाजीच्या मंदिरासंबंधी भविष्योत्तर पुराणाच्या आधारे त्यांनी 'देवालय-ग्राम-माहात्म्य' नावाचा बासष्ट अध्यायांचा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. त्यांना देऊळगाव राजा येथे फार मान असे. नरसोबाच्या वाडीचे म्हणून त्यांना वाडीकरकवीश्वर म्हणत.

श्रीवक्रतुंडशास्त्रीमहाराजांच्या आयुष्यातील एकच घटना, त्यांच्यावरील ईश्वरानुग्रह व त्यांचा आराध्य देवतेशी प्रत्यक्ष संबंध निर्विवाद सिद्ध करणारी आहे.

श्रीगणेश क्षेत्र राजूर येथील एक अभूतपूर्व प्रसंग आहे. हे राजूर क्षेत्र राजसदन म्हणजे जालना भोकरदन मार्गावरील स्थान आहे. जालना येथील श्री. सूर्यकांत दिगंबर कासार यांच्या आजीबाईंनी तो विलक्षण चमत्कार प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला व एक अद्भूत चमत्कार म्हणून त्यांनी तो सांगितला आहे. त्या १०/१२ वर्षांच्या असताना आपल्या आजोबांच्या बरोबर राजूरला श्रीगणेशाच्या दर्शनास गेल्या होत्या. श्रीवक्रतुंड–महाराज सहस्त्रावर्तनाच्या अभिषेकासाठी आलेले होते. अभिषेक संपल्यावर आरतीनंतर श्रीवक्रतुंडमहाराजांनी सर्वांना बाहेर लांब जाण्यास सांगितले. या बाईचे आजोबा बाहेरच पण मंदिरातील हालचालींचे दृश्य दिसेल अशा जागी आपल्या नातीसह उभे राहिले.

हल्ली राजूरच्या या श्रीगणेश मंदिरात भरपूर समया आहेत. पण त्यावेळी ५/६च समया होत्या. मंदिराच्या गाभाऱ्यात अंधारही असे. पण या समयांच्या नंदादीपाच्या प्रकाशात हालचाली दिसत होत्या. धूप दीप दाखवून झाल्यानंतर मंत्रोच्चार चालू असताना श्रीवक्रतुंडमहाराजांनी आपण एकटेच गाभाऱ्यात आहोत असे पाहून व मागे–जवळ कोणी नाही असे पाहून, श्रीगणेशासमोर प्रसादाचे ताट पुढे ठेवून भक्ती भावाने नैवेद्य दाखविला. तेव्हा श्रीगणरायाने चक्क सोंड वर करून–लांब केली–आणि त्या प्रसादाच्या ताटातील प्रसाद ग्रहण केला व आपल्या मुखात घालून आवडत्या भक्ताच्या भक्तीचा स्वीकार केला. हा अपूर्व–अद्भूत चमत्कार ती १०/१२ वर्षांची मुलगी व तिचे आजोबा आश्चर्याने मंत्रमुग्ध होऊन, टक लावून पहात होते. त्याचवेळी श्रीवक्रतुंडमहाराजांना ठसका आला म्हणून त्यांनी आपले तोंड मागे वळविले. तेव्हा त्यांच्या दृष्टीस ते आजोबा व नात दिसले. हा प्रकार त्यांनी पाहिलाच असणार असे श्रीवक्रतुंडमहाराजांना जाणवले. ते जरा आवाज चढवूनच त्यांना म्हणाले "सांगितल्याप्रमाणे तुम्ही लांब का गेला नाहीत ? बरं ! झालं ते झालं ! आता एवढच लक्षात ठेवा की, हा पाहिलेला प्रकार कधी कुणालाही सांगायचा नाही. !"

ईश्वरच भक्ताचे माहात्म्य वाढवीत असल्याने असे विशेष प्रसंग कोणाला निमित्त करून-ज्यांची तेवढी पुण्याई असेल त्यांनाही प्रत्यय देऊन स्वतः ईशशक्तीच हे प्रकट करीत असते. असे प्रत्यय कोणालाच आले नसते किंवा ते प्रकट केले गेले नसते तर या जगात कोणीही ईश्वर व ईश्वरीशक्ती मानलीच नसती. याची प्रचीती त्या योग्यतेच्या अधिकारी पुरुषाला येते आणि सश्रद्ध-सरळ वृत्तीच्या-निष्कपट व्यक्तीच्या माध्यमातून प्रकटही होते. तरी पुनः गुप्ततेचे आवरण घेण्याचा जो ईश्वरी संकेत आहे तोही जपण्याची काळजीही घेतली जाते. यामुळे अशा गोष्टींचा सरळवृत्तीच्या श्रद्धावान व्यक्तींनी विश्वास वाटतो. आणि संशयी अश्रद्ध लोकांना हे थोतांड वाटते. हे असे नेहमीच चालत आले आहे.

शके १८२९ (इ. स. १९०७) मध्ये वाडीला प्लेगची साथ आली. दुर्दैवाने श्रीवक्रतुंडशास्त्रीमहाराजांनाही प्लेग झाला. त्यावेळी त्यांची संगमाजवळ कृष्णा तीरावर श्रीदत्तमंदिरात पुराणांची पारायणे व प्रवचने सुरु होती. पण या अचानक ओढवलेल्या आजाराने त्यांना ते थांबवावे लागले. पतीच्या या दुखण्यामध्ये त्यांच्या पत्नीने देवाला प्रदक्षिणा घालण्याचा नेम केला. रोज दोन माळांची प्रदक्षिणा घालण्याचे ठरविले. १०८ मण्यांच्या दोन माळांचा जप करून प्रदक्षिणा घालण्यास पुष्कळच फेरा घ्यावा लागत असे. त्याही अतिश्रमाने आजारी पडल्या. श्रीवक्रतुंडमहाराजांनी आपला आजार वाढतो आहे असे पाहून श्रीधुंडिराजशास्त्रींना जवळ बोलावून घेतले व कळकळीने उपदेश केला– " कर्ज करणे फार वाईट ! मी या कर्जापायी फार कष्ट भोगले. तू शक्य तितके मिळेल तितक्यातच खर्च भागविण्याचा प्रयत्न कर. कर्ज कधीही काढू नकोस."

श्रीवक्रतुंडमहाराजांनी श्रीगणेशचतुर्थीच्या आदले दिवशी पत्नीला सांगितले–उद्या चतुर्थी आहे. श्रीगणेशाची मूर्ती माझ्यासमोर बिछान्यापाशी आणून ठेव. "त्याप्रमाणे त्या माऊलीने केले. तेव्हांपासून श्रीवक्रतुंडमहाराजांनी अखंड नामस्मरण सुरू केले ते शेवटपर्यंत. दुसरे दिवशी श्रीगणेश चतुर्थीच्या शुभ मुहुर्तावर सकाळी आठचे सुमारास श्रीवक्रतुंडमहाराज श्रीगणेशचरणी विलीन झाले. यावेळी त्यांचे वय ६८ होते. त्यांचा जन्म अश्विन व॥ चतुर्थीलाच झाला व निर्याणही श्रीगणेश चतुर्थीलाच झाले हा दैवी योगायोगच म्हणावा लागेल.

## श्रीधुंडिराजमहाराज

श्रीवक्रतुंडमहाराजांच्या जीवनात प्रापंचिक स्वास्थ आणि सौख्य अभावानेच लाभले. वीस अपत्यांपैकी दोनच मुली रहाव्यात या दैवदुर्विलासाला सीमा नाही. घरात अशी स्थिती आणि स्वतः कर्ज केले नाही तरी बंधूंचे कर्ज स्वशीरावर घेऊन शेवटची वर्षे कर्जफेडीत घालवावी लागली. ही गोष्ट सुद्धा सुसह्य होणारी नाही. सर्व अनुकूल

असताना चित्त स्वस्थ असणे ही परमार्थाची कसोटी होऊ शकणार नाही. परमार्थाची कसोटी प्रतिकूल स्थितीत चित्त स्वस्थ असणे ही आहे. श्रीवक्रतुंडमहाराजांच्या जीवनाकडे पारमार्थिक अधिकाराचा सत्पुरूष या दृष्टीकोनातून पहाता हेंच जीवन अलौकिक नि उत्तुंग दिसणार आहे. महान ध्येयाशी तद्रूप होणारे जीव महात्मे होतात. ही ध्येयाशी तद्रूपता–त्या ध्येयाग्नीच्या यज्ञकुंडात–आत्म समर्पणाशिवाय अप्राप्य आहे.

कवीश्वर घराण्याचे वैशिष्ठ्यच लक्षात घ्यावयाचे असेल तर असे दिसते की, या महापुरुषांनी घरे बांधली नाहीत त्यांना ती दान मिळाली आहेत. जमिनी घेतल्या नाहीत त्याही दानातून मिळालेल्या आहेत. त्यांनी प्रारब्धाने जे दिले तेवढेच घेतले. वासनापूर्तीच्या धडपडीला प्रयत्नांचे लोभस नाव देऊन किंवा आसक्तीला प्रारब्ध म्हणून, विरक्तीला शब्दाने फुलवून, आत्मवंचना अगर विश्ववंचना करणारे हे महात्मे नव्हते. एवढी स्पष्ट आणि प्रखर जाणीव यांच्या जीवनातून मनावर ठसते आणि म्हणूनच पिढ्यान् पिढ्या महान आत्मे या कवीश्वर कुलात जन्मास आले.

हे लौकिक वैशिष्ट्य जसे असामान्य आहे तसेच अध्यात्मिक नि पारमार्थिक वैशिष्ट्येही असामान्य अशीच आहेत. वेदांतादि ग्रंथांचे केवळ अध्ययन आणि अध्यापन करुन हे महापुरुष झालेले नाहीत. मूलतःच उपासनेच्या प्रखरतेमधून हे महान जीव मुखातून बोलतील तोच वेदांत झाला आहे. आपले काही न सांगता या महा–पुरूषांनी महाभारत सांगितले, रामायण सांगितले, भागवत सांगितले. पण त्यांच्या सांगण्यात प्रत्यही मार्मिकता होती, प्रसाद होता, परस्पर्शाचा प्रत्यय होता. तेव्हां त्यांचे सांगणे लोकांच्या हृदयाचा ठाव घेत होते, लोकादरास प्राप्त होत होते. हे महापुरूष प्रत्यक्ष देवांशी संभाषण करणारे होते. देवाच्या स्थूल मूर्ति यांच्याशी व्यवहार करताना सजीवां–सारखा व्यवहार करीत होत्या. यांच्या घराण्यात कोणी संन्यासी झाले नाहीत पण हे संसारी महात्मेही संन्यस्त वृत्तीचे होते. लौकिक संपत्ती दुसऱ्याकडून घ्यावी लागते. दैवीगुण संपत्ती स्वतःची स्वतःला मिळवावी लागते. त्याप्रमाणे प्रत्येक पिढीतील या एकेक महापुरूषांनी ही दैवी संपत्ती दृष्ट, अदृष्ट पुण्यकर्माने मिळविलेली होती.

श्रीधुंडीराजमहाराज हे श्रीगोविंदस्वामींसारख्या सत्पुरुषांच्या आशीर्वादाने आणि श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने प्राप्त झालेले पुत्र रत्न. श्रीवक्रतुंडमहाराज यांची श्रीगणेश उपासना या पुत्रप्रसादाने फळास आली. म्हणून धुंडिराज हे नांव ठेवले. तरी श्रीगोविंदस्वामींनी प्रसाद म्हणून दिलेली श्रीदत्तमूर्ती या पुत्रप्रसादाने घरात प्रत्यक्ष वावरु लागली. या प्रत्यय-कारी जाणीवेने सुपुत्राचे नांव धुंडिराज ठेवले असूनही ‘ दत्तूबाळ ’ म्हणूनच हाक मारीत असत. श्रीगणेश आणि श्रीदत्त यांच्या अभिन्नत्त्वाची दृढबुद्धी होती याची ही साक्ष होती. श्रीधुंडिराज महाराजांचे विभूतिमत्त्व या जन्मकथेवरुन उत्तम प्रतीत होते. परंतु हे

विभुतिमत्त्व एवढ्यावरच थांबत नाही. याची प्रचीती आयुष्यभर येतच असते. सूर्याला आज प्रकाश आहे आणि काल वा उद्या नव्हता वा नसेल हे जसे संभवत नाही तसेच या विभूतिमत्त्वाचे अखंडत्व सातत्याने असते. अन्य प्रकाश मात्र असताना दिसतील परंतु त्यांच्या भूतभविष्याची ग्वाही देता येत नाही.

कवीश्वर घराण्यातील माताही महासाध्वी होत्या. याचाही अनुभव त्यांच्या आचार वर्तनातून स्पष्ट दिसतो. श्रीवक्रतुंडमहाराजांची धर्म पत्नी सौ. सावित्रीबाई या फलटणच्या श्री. राजारामपंत कोचकांची कन्या. म्हणजेच श्रीधुंडिराजमहाराजांच्या मातोश्री. श्री. सौ. सावित्रीबाईंचा दत्ताला प्रदक्षिणा घालण्याचा नियम मोठा कडक व अखंडित होता. एके दिवशी त्या नित्याप्रमाणे प्रदक्षिणा घालीत होत्या. बाळ धुंडिराज कट्ट्यावर खेळत होता. खेळता खेळता तोल जाऊन, हा बालक, ३/४ पुरुष (२०/२५) फूट खोल अंतरावरून कृष्णा नदीत पडला! एखाद्या आईने सहाजिकच प्रदक्षिणा सोडून, रडत ओरडत मुलाकडे धाव घेतली असती! पण श्री. सौ. सावित्रीबाई या प. पू. वक्रतुंडमहाराजांची पत्नी आणि धुंडिराजांची माता होत्या. त्याही पतीला शोभण्यासारख्या आणि पुत्राला आदर्श अशा ईश्वरनिष्ठ होत्या. कदाचित श्रीदत्तगुरू आपली सत्त्व परीक्षाच पहात असेल असा विचार तत्क्षणी त्यांच्या बुद्धीला चमकून गेला असावा. चिलियाच्या मातेला ईश्वरनिष्ठेची किती भयंकर सत्त्व परीक्षा द्यावी लागली. त्यापेक्षा ही परीक्षा तेवढी नाही. विश्वाचा संरक्षक माझ्या मुलाचे संरक्षण करण्यास समर्थ आहे. माझ्या धावपळीचा आणि आरडा ओरडण्याचा काही एक उपयोग नाही. मी मात्र माझे व्रत भंग करून बसेन. असे विचार त्यांच्या मनात नक्की आले असले पाहिजेत. म्हणूनच त्या धीरोदात्त साध्वीने विचलीत होऊन प्रदक्षिणेची सेवा अर्धवट सोडली नाही. प्रदक्षिणा पुऱ्या झाल्यावर ती माऊली मुलाकडे धावली! पुत्र प्रेम नव्हते हे विधान मातेसंबंधी करताच येत नाही, असे आचार्यांचे मत आहे. मग असे घडण्याचे कारण दृढ ईश्वर निष्ठा हेच आहे.

बालधुंडिराज पाण्यात पडला. आईचे लक्ष असूनही प्रदक्षिणा सोडून ती गेलेली नाही. अशा वेळी लोक खाली कृष्णेकडे धावले. त्यांना अपूर्व दृश्य दिसले. बालधुंडिराज कृष्णामाईच्या मांडीवर डोलतो आहे. एवढा लहान मुलगा इतक्या उंचीवरून खोल नदीत पडल्यावर बुडला नाही तर वर उसळून येऊन जललहरींवर तरंगत होता. याचा अर्थ बालधुंडिराज घाबरला नव्हता. शांत चित्त होता. इतका की पाण्यावर तरंगता येण्याइतका शांत. श्वासोच्छासच तो करीत असला पाहिजे. इतकेच नव्हे तर शरीराचीही हालचाल न केल्याने तो तरंगत होता. बेशुद्ध नव्हता. शांतपणे पहात होता. या लहान वयात त्याचे संरक्षण करणारे श्रीदत्तप्रभूंशिवाय दुसरे कोण असणार ?

लोकांनी चटकन बालकास उचलून घेतले. आणि धावत आलेल्या त्या मातेला म्हणाले "प्रभूची लीला अगम्य आहे. तुमच्या दत्तात्रय सेवेचा हा घ्या प्रसाद." असे धन्योद्गार काढीत धुंडिराजांना सावित्रीबाईच्या ओटीत घातले! पुढे वयाच्या ८ व्या वर्षी वाडीला देवासमोरच या बालकाचे मौंजीबंधन झाले.

श्रीधुंडिराजशास्त्री यांनी प्राथमिक शिक्षण आपल्या तीर्थरूपांकडून घेतले. त्यांचे शालेय शिक्षण वाडीचे श्री. दामोधरपंत गोखले यांच्या वडिलांकडे झाले. नंतर वाडीलाच श्री. कृष्णशास्त्री वष्ट या विद्वत्संपन्न गुरुजींच्या संस्कृत पाठशाळेत वैदिक संहितेचे चौदा अध्याय, षोडश संस्कार, काव्य, अलंकार, छंद इत्यादींचा अभ्यास पूर्ण झाला. कांही संसारिक आपत्तीने श्रीकृष्णशास्त्री वाडी सोडून इंदोरला गेले. तेव्हां आपल्या आवडत्या गुरूंकडे इंदोरला, शिक्षणासाठी जाण्याचा श्रीधुंडिराजशास्त्रींनी आग्रह धरला, पण त्यावेळी त्यांचे वय अवघे १४/१५ वर्षांचे होते. वडिलांची इच्छा नव्हती पण बालहट्ट फारच झाल्याने श्रीवक्रतुंडमहाराजांनी मुलाची इच्छा म्हणून इंदोरला श्रीकृष्णशास्त्रींना पत्र या वयात ज्ञानार्जनासाठी हा श्रीधुंडिराजशास्त्री यांचा आग्रह सामान्य मुलांपेक्षा असाधारण होता. श्रीकृष्णशास्त्री श्रीवक्रतुंडमहाराजांना गुरूस्थानी मानीत. त्यामुळे त्यांनीही आत्मीयतेने ताबडतोब उत्तर पाठविले. "आपली इच्छा आम्हास शिरसावंद्य आहे. धुंडिराज आमचाच आहे. त्याला अवश्य पाठवा. खर्चाचे आम्ही पाहून घेऊ. आपण तो विचार करण्याचे कारण नाही." याप्रमाणे श्रीधुंडिराजशास्त्री आणखी तीन सहाध्यायी विद्यार्थ्यांसह इंदोरला शिक्षणास गेले.

इंदोरला श्रीकृष्णशास्त्री यांचे चरणाजवळ राहून श्रीधुंडिराजशास्त्री यांनी न्यायशास्त्र, वाक्वृती, पंचलक्षणे, सामान्य निवृत्ती इत्यादींचे उत्कृष्ट अध्ययन केले. एकेक शास्त्र विषयांची नावे वाचून त्यांच्या आशयविस्ताराची कल्पानही करता येणार नाही. असे विषय संस्कृतामधून अध्ययन करणारे विद्यार्थी आणि भारतीय तत्त्वज्ञानाची चौरस बैठक पाहून आपली संस्कृती आणि तिचे व्यासंगी विद्यार्थी पाहून आपण आदराने नतमस्तकच झाले पहिजे. श्रीसखारामशास्त्री टिल्लू यांच्या स्मरणार्थ घेतल्या जाणाऱ्या कसोटीच्या परिक्षेत, श्रीधुंडिराजशास्त्री उत्तम प्रकारे उत्तीर्ण होऊन, त्यांना होळकर शिष्यवृत्ती मिळली. ते इंदोर संस्थानच्या सरस्वती पूजनाच्या उत्सवातही प्रामुख्याने भाग घेत असत. पुढे श्रीधुंडिराजशास्त्री यांनी श्रीचित्रोडीकरशास्त्री यांचेजवळ न्यायशास्त्राचा उत्तम अभ्यास केला. इंदोरला त्यावेळी श्रीनारायणशास्त्री जेरे हे त्याचे सहध्यायी होते.

असे हे शिक्षण केवळ वर्षभरात झाले. पुढे इंदोरला प्लेग सुरू झाल्याने श्रीधुंडिराजशास्त्री वाडीला परत आले. ज्ञानलालसा प्रखर असली म्हणजे जिज्ञासू

विद्यार्थी स्वस्थ बसू शकत नाही. वाडीला आल्यावर श्रीधुंडिराजशास्त्री सांगलीच्या वेदपाठशाळेत गेले. त्यांची बहीण सौ. नर्मदाबाई यांना सांगलीला दिले होते. तिच्याकडे राहून अध्ययन पुढे सुरू झाले. सांगली संस्थानच्या अधिपतींना वेदांत व संस्कृत याविषयी फार अभिमान व प्रेम होते. त्यांच्या उत्तेजनाने आणि आश्रयाने सांगलीला न्याय-वेदांत-व्याकरण-वेद यांचे शिक्षण देणाऱ्या निरनिराळया पाठशाळा स्थापन झाल्या होत्या. शिक्षणासंबंधी आस्था, योग्य दृष्टीकोन असलेले ते संस्थान होते. म्हणून त्या काळात उत्तम पाठशाळा तेथे होत्या. सांगलीला श्रीधुंडिराजशास्त्री तीन वर्षे राहिले. या काळात त्यांनी तेथील न्याय व व्याकरण या दोन्ही पाठशाळेतून शिक्षण घेतले. श्रीव्यंकटरमणाचार्य यांच्या सारख्या विद्वान व अधिकारी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सिद्धांत कौमुदी, मनोरमा, मुक्तावली, व्याकरण व न्यायशास्त्र यावरील ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला. पुढे पुनः काही दिवस इंदोरला जाऊन वे. शा. सं. श्रीरामशास्त्री वाळवेकर यांचेकडेही त्यांनी न्यायशास्त्र-वाक्वृत्ती-पंचलक्षणे-सामान्य. निवृत्ती इत्यादींचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला.

वर्तमान शिक्षण पद्धती व शिक्षण क्षेत्रातील विषय यांचा विचार करता असे दिसते की, यात केवळ भौतिक ज्ञानालाच सर्वोच्च प्राधान्य आहे. हे भौतिक विज्ञान भौतिक सुखापुरतेच मर्यादित रहाते आणि या भौतिक विज्ञानाचा दुरुपयोग करण्याचे ठरविले तर किती भयंकर विनाश ओढवला जातो हेही दिसते. या शिक्षणात आत्मविकास-आत्मोन्नति, सुसंस्कार-शुद्धज्ञना-इत्यादी मोलाची मूल्ये जोपासणारी ज्ञानशाखा पूर्णतः वगळल्याने विशुद्ध मनोबुद्धीचा विकासच दुर्लक्षित झाला आहे. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचे जे निर्दोषत्व प्रत्ययास येते ते या भौतिक विज्ञानाला गौणत्व व आत्मविकासी ज्ञानाला प्राधान्य देणाऱ्या निश्चित दृष्टीकोनामुळे येते वर्तमान शिक्षण पद्धतीच्या दोषांचे कारण पाश्चात्य शैक्षणिकदृष्टी व शिक्षण पद्धती यांचे अनुकरण हे आहे. मानवी मांगल्याची दृष्टी भारतीय ऋषी, मुनी, तपस्वी, महात्मे यांच्या आत्मप्रत्ययी दिव्य दृष्टीतून व चिंतन-मननातून जशी निर्माण झाली आहे तितकी परमोच्च विशुद्ध व उदार दृष्टी पाश्चात्य चिंतकामध्ये नसल्याने हे दोष राहून गेले आहेत. अशी दोषैक अशुद्ध दृष्टी समजून न घेता आपण अंधानुकरण करीत आहेत. 'कालाय तस्मै नमः' म्हणून हा विषय येथेच थांबवू.

तर, श्रीधुंडिराजशास्त्री यांनी विद्यार्थी दशेतच वेद, वेदांत, धर्मशास्त्र, काव्यालंकार, न्यायशास्त्र अशा गहन शास्त्रांचे अध्ययन पूर्ण केले. अशा शास्त्रांच्या अभ्यासातील पारंगताला शास्त्री म्हटले जाते. मुलाची ही ज्ञानलालसा अजूनही तृप्त होत नाही असे पाहून श्रीवक्रतुंडमहाराज म्हणाले, "आता अध्ययन पुरे झाले. तू

चांगला तयार झाला आहेस. परीक्षा देण्यातच काय ठेवले आहे ? तू आता पुराण सांगण्याचे व प्रवचन करण्याचे वडिलोपार्जित कार्य सुरू कर. माझी जागा तू घे."

वडिलांच्या आज्ञेनुसार श्रीधुंडिराजशास्त्री यांनी अध्ययन पुरे करून पुराण सांगण्यास प्रारंभ केला. वाडीला सायंकाळी श्रीदत्ताची पूजा होऊन, मूर्तीला पोषाख घालून, पालखीत बसवीपर्यंत स्वारीपुढे श्रीवक्रतुंडमहाराज नियमाने मंदिरात पुराण सांगत असत. ते कार्य श्रीधुंडिराजशास्त्रींनी आपल्याकडे घेतले.

श्रीधुंडिराजशास्त्रांनी अथर्वशीर्षाची व श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणे केली आहेत. त्यांच्या वडिलांनी त्यांना श्रीगणेशाची व त्यांच्या पत्नीला (सौ. सरस्वतीबाईंना) देवीची उपासना दिली. श्रीधुंडीराजशास्त्री यांनी पुरश्चरणयुक्त जप पुष्कळ केला. त्यांना स्वप्नात ईष्टदेवतेचे अनेकदा दर्शन व मार्गदर्शन घडत असे. स्वप्नात एक अधिकारी ब्राह्मण दर्शन देऊन त्यांना मंत्र देत असे व आश्वासनपूर्वक सांगत असे की, "हा जप चालू ठेव म्हणजे सर्व ठीक होईल. तुला कृपाप्रसाद मिळेल." त्याप्रमाणे श्रीधुंडिराजशास्त्रीही करीत असत. एकदा असेच एक पुरःश्चरण संपताना त्यांना तेजस्वी ब्राह्मण दिसला. त्या ब्राह्मणाने त्यांच्यापुढे हिरव्या व पक्या आंब्याची टोपली ठेवली व म्हणाला, "व्रतानुष्ठान पक्के होत चालले आहे. पण अजून थोडा कच्चा माल आहे. धीर धरावा व क्रम चालू ठेवावा."

ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकरमहाराज, श्रीरंगनाथमहाराज यांच्या दर्शनाचा लाभ व त्यांचा कृपाप्रसादही मिळाला आहे. श्रीटेंबेस्वामींचा तर शास्त्रीबोवांच्यावर विशेष लोभ असे. श्रीटेंबेस्वामींचा मुक्काम वर्षातून ३/४ महिने वाडीत असे. त्यावेळी त्यांच्या सानिध्याचा भरपूर लाभ शास्त्रीबुवा घेत असत. श्रीटेंबेस्वामींच्या आज्ञेनुसार श्रीधुंडिराजशास्त्री यांनी काही काळ एक संस्कृत पाठशाळाही चालविली होती. श्रीटेंबेस्वामी यांनी एकदा श्रीधुंडीराजमहाराजांना एक पुरःश्चरणयुक्त जप करण्यास सांगितला. त्यावेळी स्वामींनी त्या पुरःश्चरण प्रारंभाचा शुभमुहूर्त, संकल्प, विधी इ. सर्वकाही सांगून हविष्याचे भोजन, सीमोल्लंघन वर्ज्य वगैरे नियमही पाळण्यास सांगितले. याप्रमाणे श्रीधुंडिराजशास्त्री यांनी व्रतस्थ राहून काही महिन्यात ते पुरःश्चरण पुरे केले. परंतु या पुरःश्चरणामध्ये एके दिवशी त्यांना जरूरीच्या कामासाठी अन्य ठिकाणी अनिच्छेने जावे लागले. आपल्या हातून सीमोल्लंघनाचा दोष घडला याबद्दल त्यांना फार खंत वाटली. त्यांनी श्रीटेंबेस्वामी यांना सगळी हकीगत कळवून क्षमा मागितली व घडलेल्या दोषावर उपाय व प्रायश्चित्त विचारले स्वामींचे लगेच उत्तर आले, "काही चिंता करु नये. या दोषाने काही विशेष बिघडले नाही. वाईट वाटते आहे व अनिच्छेने दोष घडला यात सर्व परिमार्जन आले !"

श्रीधुंडिराजमहाराज यांचा त्या कालानुसार १८ व्या वर्षी शके १८२६ (इ. स. १९०४) मध्ये विवाह झाला. शिरहट्टी येथील श्री. गोपाळराव हणमसागर यांची कन्या गंगू ही वधू म्हणून निवडली. हिचेच नाव सरस्वती ठेवण्यात आले. या श्री. सौ. सरस्वतीबाई आपल्या उदारचरिताने श्री. सौ. आईसाहेब म्हणून नावलौकिकास आल्या. या मोठ्या देवभक्त, पतिनिष्ठ, थोर अन्तःकरणाच्या व दैवी संतत्तीचे वरदान घेऊनच आलेल्या होत्या. श्रीधुंडिराजमहाराज यांना आणि कवीश्वर घराण्याच्या नावलौकिकाला शोभणाऱ्या व त्यात भर घालणाऱ्या होत्या.

प्रत्येक पिढीत ईश्वराला यांच्या कुलात जन्मास येण्याची इच्छा होत होती. म्हणून तीव्र ईश्वरभक्तीने भूमिका उत्पन्न होण्यासाठी संतती न होणे किंवा झाली तरी न वाचणे अशी स्थिती निर्माण होऊन ईश्वरभक्तीची तीव्रतम कमाल गाठली जात असे व मग होणारा पुत्र हा ईश्वरी अवतारच जन्मास येई. श्रीवक्रतुंडमहाराजांच्या जन्माची किंवा श्रीधुंडिराजमहाराजांची जन्मकथा पाहूनच हा विचार मनात आला. तसेच आताही घडत आहे. अशा स्थितीपैकी श्रीकृष्णजन्मापूर्वी सात अपत्ये ईशयोजनेने नष्ट झाली आणि श्रीराम जन्मासाठी तर पुत्रकामेष्टी यज्ञ करावा लागला. तेव्हा राम-कृष्णाचा जन्म झाला. तसाच प्रकार येथे-या घराण्यात-घडत आल्याचे स्पष्टपणे दिसत असतानाही समाजाला याची सम्यक जाणीव न होण्यासाठी या महापुरुषांनी अति सामान्य जीवन जगून आपले असामान्यत्व झाकून घेतले आहे.

श्रीधुंडिराजमहाराजांचा विवाह होऊन पुष्कळ वर्षे संतती होत नव्हती. त्यामुळे त्यांची पत्नी सहाजिकच नेहमी कष्टी असे. याबाबतीत त्यांनी श्रीटेंबेस्वामी यांना पत्र लिहिले. त्याला स्वामींचे सविस्तर उत्तर आले. त्यात धर्मसिंधूत दिलेल्या मंत्राचा जप व विधिविधान व होमहवन करण्यास सांगितले होते. ते सर्व यथास्थित केल्यानंतर श्रीधुंडिराजशास्त्री यांना संतती लाभली.

श्रीधुंडिराजशास्त्रींची श्रीटेंबेस्वामींच्यावर अनन्य श्रद्धा व भक्ती होती. इ. स. १९१०, शके १८३१ मध्ये श्रीटेंबेस्वामींचा चातुर्मास हावनूरला झाल्याचे ते वर्ष होते. त्यावेळी स्वामी वाडीहून कोणालाही न सांगता श्रींचे दर्शन घेऊन वाडी सोडून निघून गेले. त्यामुळे वाडीकर मंडळींना फार वाईट वाटले. आपण देवाची सेवा नीट करीत नाही हे स्वामींना पसंत नव्हते याची वाडीकरांना जाणीव झाली. स्वामींच्या अचानक जाण्याने प्रत्येकाला दुःख झाले व आपल्या सेवेतील उणीवा लक्षात येऊन अनुतापही झाला. तरी सुद्धा श्रीधुंडिराजशास्त्रींना स्वामींच्या दर्शनाची तीव्रतेने तळमळ लागून राहिली. त्यांना अंधुकशी कल्पना होती की या वर्षीचा चातुर्मास स्वामी दक्षिणेकडे करणार आहेत. म्हणून त्यांच्या दर्शनासाठी ते वाडीहून एकटेच निघाले. त्याचवेळी

श्रीगुळवणीमहाराजही गाणगापूराहून स्वामींच्या भेटीसाठी दक्षिणेकडे शोध घेत फिरत होते. पण या दोघांची प्रत्यक्ष भेट कुठेच झाली नाही.

श्रीधुंडिराजमहाराजांचा योग असा की ते वाडीहून निघाले ते धारवाडला आले. तेथे जवळच असलेल्या मदिहाळ येथील श्रीदत्तमंदिरात श्रीधुंडिराजशास्त्री मुक्कामास आले आणि आश्चर्य असे की त्यावेळी त्याच मंदिरात श्रीटेंबेस्वामींचा मुक्काम होता. इतक्या अचानकपणे आणि अगदी सहजासहजी भेट झाल्याने श्रीधुंडिराजशास्त्रींना अत्यानंद झाला. सर्व हकीगतीचे बोलणे झाले. यावेळी शास्त्रीबोवांच्या मनात आले की उद्या आपण आपल्या हाताने स्वैंपाक करून श्रीस्वामींना भिक्षा घालावी. पण ते स्वामींना हा विचार सांगण्यापूर्वीच स्वामी म्हणाले, "शास्त्रीबोवा येथे आलाच अहात तर उद्या तुमच्या हातची आम्हा भिक्षा घाला." स्वामींनी आपल्या मनातलेच बोलून दाखविल्याने तर श्रीधुंडिराजशास्त्री आनंदाने बहरूनच गेले. सत्संगती म्हणजे आनंदाची दिवाळीच असते. झाले त्याप्रमाणे दुसरे दिवशी श्रीधुंडिराजशास्त्रीबोवांनी स्नान-आन्हिक उरकून स्वामींसाठी स्वहस्ते स्वैंपाक करून त्यांना भिक्षा घातली. आपणही त्या भिक्षेचा प्रसाद घेतला आणि अशी अपूर्व अचानक व सहज स्वामीदर्शनाची दिवाळी साजरी करून महाराष्ट्रात परतले. स्वामीही पुढे दक्षिणेकडेच कुठेतरी निघून गेले.

इ. स. १९१० शके १८३१ हे वर्ष अपूर्व होते. श्रीस्वमीआज्ञेप्रमाणे पुत्रप्राप्तीसाठी विधिविधानपूर्वक नि होमहवनादिच्या सांगतेने जपानुष्ठान झाले. आणि अशी अपूर्ण भेटही स्वामींचीही झाली. श्रीदत्त अवतार जन्माच्या कथेमध्ये भिक्षेचा आणि प्रत्यक्ष दत्तच पुत्ररूपाने प्राप्तीच्या कथा आहेत. येथेही भिक्षेचा एक अपूर्व प्रकार घडलाच. ज्याच्या घरात जन्मास यायचे त्या पित्याकडून भिक्षा मागून घेऊन श्रीदत्तप्रभूच श्रीस्वामींच्या रूपाने तृप्त झाले व मनोकामना तृप्त करणारा प्रसाद पुत्र प्रदानाने दिला. कारण पुढे माघ व॥ ६ ला श्रीधुंडिराजशास्त्रींना पुत्रप्राप्ती झाली. श्रीदत्त कृपेने पुत्र प्राप्ती झाली म्हणून 'दत्तात्रेय' नावही ठेवले. असा हा विशेष या पुत्रजन्मकथेत आहे.

असा एक सर्वसाधारण समज आहे की हे विचार बुद्धीनिष्ठ नाहीत-भोळ्या भाव भक्तीमुळे- व्यक्ती पूजेची – व्यक्तीनिष्ठ श्रद्धेची ही काल्पनिक कसरत आहे. यामुळे समाज तत्त्वनिष्ठ न रहाता व्यक्तिनिष्ठ होतो. यादृष्टीनेही आपण या मुद्यांची नीट विचारपूर्वक सत्यस्थिती समजून घेतली पाहिजे. ज्यांचे संपूर्ण जीवन लोकमांगल्यासाठी खर्च होत असते. त्या व्यक्तीवर श्रद्धा असणे स्वाभाविक आहे. कारण ती श्रद्धा व्यक्तीवरील गुणावर आणि वर्तनावर असते आणि म्हणून लोकोद्धारक महापुरुषांच्या निर्याणानंतर शतकानुशतके समाज त्यांच्यावर म्हणजेच त्यांच्या अलौकिक गुणांवर नि व्यवहार वर्तनावर श्रद्धा ठेवतो. ही श्रद्धा खऱ्या अर्थाने देहापेक्षा देहातील अलौकिक गुणसामर्थ्यावर

असते. अशा श्रद्धेनेच समाज सद्गुण आणि सद्वर्तन यांचे अनुकरण करून सुधारत असतो. चांगली जीवन मूल्ये जोपासित असतो. भारतीय संत सत्पुरुषांनी हजारो वर्षे जी अलौकिक जीवन मुल्ये समाजाला दिली आहेत त्यामुळेच भारत जगातील सर्व राष्ट्रांपेक्षा अत्यंत आगळा देश म्हणून सतत सर्वांच्या आकर्षणाचा विषय झालेला आहे.

व्यक्तीच्या संपूर्ण जीवन वर्तनावरून त्याचे मोठेपण ठरते, हा मोठेपणा जर देशकाल मर्यादा ओलांडणारा असेल तर त्याला महान म्हटले जाते. अशी महानता प्रत्ययाला आली तर जन्माचे वैशिष्ट्य शोधण्याची इच्छा होते आणि ते वैशिष्ट्यही आढळते व महापुषांच्या जन्मालाही महत्त्व येते.

## श्री. सौ. आईसाहेब ( श्री. सौ. सरस्वतीबाई )

श्रीधुंडिराजमहाराजांच्या विभूतिमत्त्वात त्यांच्या पत्नी श्री. सौ. सरस्वतीबाई यांचा फार मोठा वाटा आहे. त्या पतिकार्यात पूर्णपणे समरस झालेल्या होत्या. असे असूनही त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्वही होते. सगळे परिचयाचे लोक त्यांना 'आईसाहेब' म्हणूनच ओळखत व तसाच मानही देत.

श्री. सौ. आईसाहेबांचे धार्मिक आचरण व पूजा अर्चा फार कडक व अखंडित असे. वाडीला समाधीला प्रदक्षिणा घालण्याचा आपल्या सासूबाईचा नियम त्यांनीही अखंडित सुरू ठेवला होता. त्या सूर्योदयापूर्वी स्नान करून श्रीदत्ताला १०८ प्रदक्षिणा घालीत. मुले त्रास देऊ लागली तर त्यांना श्रीदीक्षितस्वामीमहाराजांकडे सोपवून त्या आपल्या प्रदक्षिणा पुऱ्या करीत असत.

श्री. सौ. आईसाहेबांचे शिवलीलामृत, व्यंकटेशस्त्रोत्र, श्रीगजाननमहाराज, लोणीचे श्रीसखाराममहाराज यांच्या पोथ्यांचे पारायण अखंडित चालू असे. लोणीला त्यांनी एकदा श्रीसखाराममहाराजांच्या मंदिरात तुलसी विवाहाचा सोहळा सोळा दिवस यथाशास्त्र यथाविधी केला. वाङ्गनिश्चय, सीमान्तपूजन असे सर्व विधी प्रत्यक्ष लग्नाप्रमाणे समारंभ पूर्वक केले. वाजंत्री लावली. वधू वरांचे नवे पोषाख– खरे अलंकार– हारवेण्या, मुंडावळ्या इ. सर्व यथासांग केले. उखळ, मुसळ, जाते, आरसा फणी, वस्त्रप्रावरणे, भांडीकुंडी, असा सगळा प्रपंच रुखवता प्रमाणे मांडून देवाला अर्पण केला. सोळा दिवस सोहळा केला म्हणजे काय कमी केले असेल ! रोज पक्वान्नाची लग्नाची भोजने होत होती. असा तुलसी विवाह केला याला फार महत्त्व आहे. सगुण भक्ती कशी केली म्हणजे ईश्वरी कृपा होते हे अशा प्रसंगातून जिज्ञासूंनी ध्यानी घ्यावयाचे असते. जो देव सर्वत्र व्यापून भरला आहे तो मूर्तीत नाही असे कसे म्हणता येईल ? निदान रोज पूजा अर्चा करणारे, देवाला नमस्कार करणारे, तीर्थयात्रा करणारे, देवादिकांचे

फोटो घरात लावणारे, डायरीत देवाचा फोटो ठेवणारे, जे जे कोणी असतील त्यांच्या मनात तरी, निर्गुण देव, निराकार देव, आकार – गुणात असणार नाही अशी शंका सुध्दा येता कामा नये. मन सगुण साकाराच्या माध्यमातूनच निर्गुण निराकारात प्रवेश करते. पण देहबुद्धी असे पर्यंत ते सगुण साकाराचाच आश्रय करून रहते. सगुण साकार ईश्वराचे आलंबन हे निरालंब निर्गुणाचे प्रवेश द्वार आहे. या प्रवेशद्वारात उभे राहण्याचा अभ्यास पक्का झाला तर केव्हां ही निरालंबात प्रवेश करता येतो तर केव्हांही आलंबन सगुण स्थितीच्या आश्रयाला आणता येतो. अशा सगुण पूजा भक्तीची एकरूपता श्री. सौ. आईसाहेबांच्या तुलसी विवाह प्रसंगातून लक्षात घेता येते. सगुणाची साकाराशी जी तदाकारता होते ती त्या निर्गुण स्थितीहून भिन्न नसते.

श्री. सौ. आईसाहेबांचे नित्याचे नेम व्रतधारी साधिके प्रमाणे कडक असत. प्रवासात सुद्धा श्रीगुरुचरित्र व श्रीगणेश मूर्ती मांडून त्या प्रदक्षिणा घालीत असत. कुठेही असल्या तरी भल्या पहाटे स्नानाचा त्यांचा नेम कधीही चुकला नाही. दर शनिवारी न्हायचे. पौर्णिमेला मंगल स्नान करायचे असे त्यांचे कितीतरी नियम होते.

त्या अतिशय साध्या स्वभावाच्या होत्या. त्यांनी अतिथ्याचे जणू व्रतच घेतले होते. आलेला अतिथी कधीही विन्मुख जात नसे. कोणी भक्त सहकुटुंब येवो, कोणी प्रवासी येवो-त्या त्यांना स्वहस्ते करून वाढीत असत. हे त्या वृद्धपणीही प्रसन्न मुखाने करीत असत. इतकेच नव्हे तर भक्तांच्या स्त्रियांनाही त्या काम करू देत नसत. उलट हसत हसत त्यांना म्हणत "अग तुम्ही माहेरवाशिणी आल्या अहात ना? तुम्ही नाही कशाला हात लावायचा!" काय प्रेम या शब्दात भरलेले असायचे.

श्री. सौ. आईसाहेबांचा आणखी एक विशेष असा होता की, कोणाही भक्ताची अडचण, दुर्घटना, आजारपण, कळताच त्या त्याभक्ताच्या घरी जाऊन भेटून येणार. खऱ्या प्रेमाने-मायेने–समाचार घेणार! वयोमानाने त्यांचे सांधे व पाय नेहमी दुखत असत तरी त्या जाऊन भेटून येत असत. कशाबशा चालत जाऊन जीना चढावा लागला तर चढून जाऊन भेटून आल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. फार काय अशा समाचाराला प्रसंगी त्या परगांवीही मुद्दाम जाऊन येत असत. भक्तावर ईश्वर जसे प्रेम करतो तसेच प्रेम त्यांच्या भक्तावर त्या करीत.

श्रीधुंडिराजमहाराजांप्रमाणे त्यांच्यावही ईश्वरी अनुग्रह आणि त्यांच्यामध्ये दैवी शक्ती जागृत होती. श्रीधुंडिराजमहाराजांच्या ८० व्या वर्षीच्या सहस्रचंद्रदर्शन शांती महोत्सवात श्री. सौ. आईसाहेबांनी १०८ लुगडी व खण सुवासिनी व कुमारीका यांची पूजा करून अर्पण केली. अन्नदान किती झाले याची तर गणतीच नाही. हजार हजारांच्या

पंगती होत होत्या. अशा पंगती दुपारपासून संध्याकाळपर्यंत चालत. रात्रीही पंगती उठत होत्या. असा अन्नदानाचा सोहळा सप्ताहभर चालत होता. देऊळगावराजामध्ये कोणाच्या घरी चूल पेटत नव्हती. असा हा शिष्य परिवार. अशी त्यांची भक्ती आणि त्या सर्वांवर या सद्गुरु मातापित्यांचे हे प्रेम! भक्तांच्या गावोगावच्या आलेल्या लोंढ्याला अन्न पुरेल किंवा नाही याचो व्यवस्थापकांना चिंता! पण आलेला कोणीही उपाशी रहात नसे ही वस्तुस्थिती. अन्नपूर्णा पूर्ण प्रसन्न होती. हे सारे ईश्वरीशक्तीच्या कृपेशिवाय का शक्य आहे? अवभृत स्नानाच्या दिवशी मुदपाक खान्याजवळ सहज ही बोलणी चालली होती तेव्हां आईसाहेब श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या "दत्ता! भंडाऱ्याच्या प्रत्येक पातेल्यात या अक्षता टाक बरं! कसं पुरत नाही ते मी पहाते!" आश्चर्य असे त्यादिवशी पंचवीस/पंचवीस, तीस/तीस हजारांच्या कित्येक पंगती झाल्या. कशाचाही तुटवडा पडलाच नाही. अन्न पुरतच गेले. ईश्वराच्या शक्तीचे हे विराट दर्शन आहे. देऊळगावराजामधील सर्व रस्ते झाडून-सडासंमार्जन करून पवित्र करून त्यावर या पंगती उठत असत. हजारोभक्त या सेवाकार्यात-व्यवस्थेत- स्वयंभावीपणाने राबत होते. असा हा एक महोत्सव, नाही अनेक महोत्सव झाले. देवाचे उत्सव सुद्धा अशाच ऐश्वर्याने सतत अद्यापही होत आहेत. त्यापैकी दसऱ्याचा उत्सव त्यातील ळळीत आणि अन्नदान हे एकदा पाहून आल्याशिवाय सत्यता पटणार नाही. कारण सत्य हा अनुभवाचा धर्म आहे.

त्या महान पतिव्रता होत्या. पतीची त्या देवाप्रमाणे पूजा-सेवा करीत. श्रीधुंडिराज महाराज जरा जास्त आजारी झाले व भोवतालचे लोक काळजी करू लागले की त्या म्हणत, "अरे! मी आधी जाणार हे ठरलेले आहे. मी धडधाकट आहे ना! मग त्यांची कशाला काळजी? अनेक संतांचे आशीर्वाद फुकट कसे जातील?" इतर वेळीही प्रसंग विशेषी त्या सांगत "मी अहेवपणी महाराजांच्या सान्निध्यातच जाणार आणि तेच माझं पुढचही सगळ करतील, ध्यानात ठेवा." त्या महासतीचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले.!

सुलतानपुरला त्यांचे भाचे श्री. अष्टीकर यांना उपदेश घ्यावयाचा होता म्हणून श्रीधुंडिराजमहाराज व श्री. सौ. आईसाहेब ही दोघे तेथे गेली होती. मंत्रोपदेश द्यायच्या दिवशी त्या आजारी झाल्या. म्हणून श्रीधुंडिराजमहाराजांनी पर्याय काढला की, "मी एकटाच मंत्र देतो व आपण परत जाऊ. "पण सौ. आईसाहेबांना पसंत पडले नाही. त्यांना मृत्यू कळला होता, किंवा त्या इच्छा मरणी होत्या की काय कोण जाणे! पण त्यांनी तेथेच रहायचे ठरविले. माघ शुद्ध चतुर्थीला अंगात खूप ताप असतानाही शनिवारचा नियम म्हणून त्या न्हायल्या, आजार वाढला. आणि त्या आजारात जणू पूर्व जाणीव झाल्याप्रमाणे त्यांनी सुवासिनींच्या यथासांग खण लुगडी नारळाने ओट्या भरल्या आणि शेवटी तर स्वतः पतीदेवांना सांगितले माझे डोके तुमच्या मांडीवर घ्या. त्याप्रमाणे

पतीदेवांच्या मांडीवरच त्यांनी आपली प्राणज्योति पतिदेवांमध्ये विलीन केली. भारतीय संस्कृतीची उदात्तता केवढी आहे, पातिव्रत्य, महासतीत्व, महासाध्वीपणा ही तत्त्वे किती परमोच्च आहेत हें अशा उदाहरणावरून लक्षात घेण्यासारखे आहे. महानतेचा जन्म–जीवन आणि मृत्यूही महानच असतो म्हणूनच महात्मे वंदनीय असतात.

या पुढची हकीगतही चमत्कारासारखीच आहे. श्री. सौ. आईसाहेब म्हणाल्या होत्या "मी अहेवपणी महाराजांच्या सान्निध्यातच जाणार आणि तेच माझं पुढचही सगळ करतील. हे ध्यानात ठेवा." हे उद्गार काल्पनिक नव्हते हे प्रत्यक्ष अनुभवानेच प्रत्यकारी ठरतात. खरोखर श्री. सौ. आईसाहेबांना वाचासिद्धीच होती. और्ध्वदेहिकाचा प्रकारही कसा घडला पहा.

त्यांच्या निर्याणाची वार्ता ताबडतोब त्यांच्या मुलांना आणि देऊळगाव राजा येथे तारेने कळविली. देऊळगांवराजाची भक्तमंडळी, श्री. सौ. आईसाहेबांचे अत्यंसंस्कार देऊळगावराजा येथेच व्हावेत असा स्वाभाविक आग्रह धरून, त्यांचा पार्थिव देह आणण्यासाठी, स्वतंत्र मोटार घेऊन सुलतानपुरला गेली. श्रीदत्तमहाराजही तातडीने सुलतानपुरला जाण्यासाठी देऊळगावराजा येथे येऊन पोहोचले. पण तत्पूर्वीच ही मोटार सुलतानपुरला निघून गेली असल्याने त्यांना त्या मोटारीतून जाता आले नाही. गेलेली मंडळी श्री. सौ. आईसाहेबांना येथे आणण्यासाठीच गेलेली आहेत. तेव्हां आपण तिकडे मिळेल त्या गाडीने जाऊ शकत असला तरी उगाचच चुकामुक होण्याचा संभव म्हणून तिकडे न जाता येथेच थांबलेले बरे असे देऊळगावच्या लोकांनी श्रीदत्तमहाराजांना सांगितले. त्यांनाही त्यांचे म्हणणे पटले व श्रीदत्तमहाराज वाट पहात देऊळगावराजा मध्येच थांबले. नियतीला महासाध्वीचे शब्द पाळायचे होते. ते शब्द नव्हते तर नियतीला आज्ञा होती. म्हणून ज्येष्ठ पुत्र श्रीदत्तमहाराज तिकडे जाऊ शकले नाहीत. ते तिकडे जाते तर सर्व क्रियाकर्मे त्यांचे हातूनच घडते–पण त्या महासाध्वीची इच्छा पुढचे सगळे आपल्या पतीदेवांकडून व्हावं अशी होती. महापुरुषांचे संकल्पही तितकेच समर्थ असतात म्हणून ते सिद्धीस जातात.

देऊळगावराजाची मंडळी मोटार घेऊन सुलतानपुरला पोहचली. अंत्यसंस्काराच्या स्थानासंबंधी परस्परात थोडा वाद झाला. सुलतानपुरच्या भक्तमंडळीचे म्हणणे पडले की, जिथे अंत झाला तिथेच अंत्यसंस्कार व्हावेत. श्रीधुंडिराजमहाराजांनी सुलतानपुरकरांच्या मताला मान्यता दिली. आणि ती. सौ. आईसाहेबांचे और्ध्वदेहिक श्रीधुंडिराजमहाराजांनाच सुलतानपुरात करावे लागले. अशा प्रकारे त्या महासाध्वीचे शब्द खरें ठरले. सुलतानपुर येथे त्यांच्या समाधीवर चौथरा व छत्री बांधली असून माघ पौर्णिमेला तेथे त्यांची पुण्यतिथी दरवर्षी साजरी केली जाते. इ. स. १९६९ च्या माघ पौर्णिमेला हे महानिर्याण झाले. हे

स्थान मळ्यात आहे. तेथे अभिषेक पूजा व अन्नदान हे सर्व कार्यक्रम व्यवस्थित होतात. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्तो रमन्ते तत्र देवता' याची ही साक्ष आहे.

## श्रीधुंडिराजमहाराजांचे स्वभाव विशेष

श्रीधुंडिराजमहाराज हे आत्मज्ञानी, साक्षात्कारी व पंडितप्रवर असूनही त्यांचा स्वभाव व वागणे अतिशय साधे व प्रेमळ होते. भक्तांसाठी इतके कष्ट करीत असतांना व त्यांना मुक्तहस्ताने कृपादान देत असताना त्यांची प्रसन्नता विशेष अनुभवास येत असे एवढा मोठा शिष्य परिवार होता की त्यांचे घर सदैव भक्तमंडळींच्या गर्दीने भरलेले असायचे या सर्वांचा ते समाचार घेत, विचारपूस करीत-उपाय सांगत-मार्गदर्शन करीत त्यांचा दिवस न् दिवस याच कारणी लागत असे. त्यांच्या वागण्यात कधी त्रागा नाही, चीड चीड नाही का रागावणे नाही. इतके सर्व असून कधी गर्व ताठ्याचा स्पर्श त्यांना झाला नाही. त्यांना ज्ञानाचा गर्व नव्हता. प्रेमळ शब्दांनी दान करणे हा त्यांचा विशेष होता.

त्यांचा दिनक्रम ठरलेला असे. पहाटे सूर्योदयापूर्वी उठून-स्नानही लगेच करीत. नंतर तास दीड तास नित्याचे आन्हिक असे, ते त्रिकाळ संध्या करीत. पूजा अर्चेचे नियम कडक असत. गणपतीला नित्य २१ दुर्वा वाहाणे हा त्यांचा नियम फार काटेकोर होता. दत्तबाळाच्या मूर्तीची डबी नेहमी त्यांच्या कमरेला खोचलेली असे. तिच्या पूजेशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. कमरेला कसली डबी आहे म्हणून कोणी विचारले तर ते विनोदाने म्हणत "आमची तंबाखूची डबी आहे ती." सामान्यासारखे रहाणे वागणे ही जाणीव ठेवून ते वागत बोलत असत. ते दिवसा एकवेळ सर्वांबरोबर भोजन घेत असत. रात्री दशमी फराळाला असे, त्यांना वाचनाचा छंद फार मोठा होता. उतारवयातही दृष्टी स्वच्छ होती, चष्मा लागत नसे.

परावलंबित्व त्यांच्या स्वभावातच नव्हते. 'एकटे का रहाता ? आमचेकडे चला, आम्ही सर्व व्यवस्था करतो' असे त्यांचे चिरंजीव, जावई आग्रहाने पुष्कळदा म्हणत असत. पण ते स्वतंत्र एकटे रहाणेच पसंत करीत. स्वतःची कामे स्वतः करण्यावर त्यांचा मोठा कटाक्ष असे. दुसऱ्याला आपली सेवा ते सहसा करून देत नसत. ते रात्रीसुद्धा आपल्याजवळ 'काही हवं नको' पहाण्यासाठी कोणालाही निजू देत नसत. 'मला काही लागत नाही, सगळं ठीक आहे' असे सांगून एकटेच झोपत. रात्री अपरात्री त्यांचे नामस्मरण ध्यान चालूच असे.

दिलेला शब्द पाळण्याबद्दल ते अतिशय दक्ष असत. आजारी असले तरी एकदा 'येईन' म्हणून कबूल केले असले की तिकडे जाऊन आल्याशिवाय रहात नसत. त्यांना

कोणीही म्हटले की "महाराज, ! खरंच जाऊ नका. आपल्याला बरं नाही, त्रास होईल ! उद्या परवा जा, आम्ही आपला निरोप त्यांना सांगून येतो." तरीही त्यांचा शब्द पाळण्याचा निर्धार बदलत नसे. सौम्य शब्दात ते आपले भाव सांगत "नाही हो ! बिचारा वाट पहात असेल. आपण कबूल केले आहे ना ? मग गेलेच पाहिजे ! अहो, नाही गेलो तर त्याला किती वाईट वाटेल ! मला गेलेच पाहिजे !" ही त्यांची कळकळ पाहून त्यांना 'नाही-नको' म्हणणेही जड होत असे. उलट त्यांच्या बरोबर जाऊन त्यांचेवर लक्ष ठेवण्याची पाळी आली तरी त्यांना तेही आवडत नसे.

भक्तांच्या बद्दल त्यांचा लळा, जिव्हाळा काही विलक्षणच होता. भारजच्या एका भक्ताचे कुटुंब वारले. तेव्हां खामगावला असतांना ही बातमी कळताच ते घाईघाईने लहान मुलांना पाहण्यासाठी भारजला आले. भक्ताचे भगवंतावर जेवढे प्रेम असते त्याच्या अनंत पटीने भगवंताचे प्रेम त्या भक्तावर असते. म्हणून तर भगवंताने त्याला आपले म्हटले असते. हे जेव्हां भक्त हृदयाला जाणवते तेंव्हापासून खऱ्या भक्तीच्या विकासाला प्रारंभ होत असतो. भक्ताचे हृदय ईशकृपाप्रेमाने हेलावण्यासाठी भगवंत मिळेल त्या संधीचा आणि क्षणाचा उपयोग करून भगवंत भक्ताची भक्ती हेलावून टाकण्याचा प्रयत्न करीत असतो. भगवंताचे मानवी रूप म्हणजेच सद्‌गुरू-त्यांचे व ईश्वराचे कार्य एकच ! सुदामा ब्राह्मणाला उत्तम पाहुणचार दिला पण परत पाठवितांना रिक्त हस्ताने आणि पूर्वीच्याच जीर्णवस्त्रावर परत पाठविले ! भगवंताच्या आपार प्रेमाची खात्री असल्यामुळे सुदामाला निःशंक मनाने वाटले की, 'असे परत पाठविण्यात भगवंताची माझ्यावर केवढी कृपा आहे ? चित्त चांचल्य निर्माण करणाऱ्या लक्ष्मीपासून त्याने माझे रक्षण केले इ.' विचार सुदाम्याच्या मनात आले नसते.

जालन्याचे डॉ. काळे श्रीधुंडिराजमहाराजांचे परमभक्त होते. एकदा श्रीमहाराज विशेष आजारी झाले. विषमज्वरात अर्धांगाची भीति वाटू लागली. डॉ. काळे यांची औषधयोजना चालू होती. त्यांनी अतिशय परिश्रम करून, योग्य ती औषध योजना करून महाराजांना बरे केले. त्यानंतर महाराजांनी डॉ. काळे यांना सहज प्रश्न केला "फी काय द्यायची डॉक्टर साहेब ? " त्यावर डॉ. साहेब हसून म्हणाले सांगतो ! माझी फी फार जबर असते." लगेच डॉक्टरांनी रोगी बरा झाल्याच्या आनंदोत्सवा प्रीत्यर्थ बँड बोलावला. आणि श्रीधुंडिराज महाराज यांची पाद्यपूजा करून १०१ रु. दक्षिणा दिली. डॉक्टरांनी प्रणाम केल्यावर महाराजांनी सद्‌गदित होऊन आशीर्वाद दिला. तेव्हा डॉक्टर टाळी वाजवून म्हणाले, "मंडळी मला ही फी मिळाली!" पुढेही श्रीधुंडिराज महाराज आजारी पडल्यावर औषधोपचार करीत असत, त्याचबरोबर गुरूंना बरे वाटावे म्हणून स्वतः श्रीगुरुचरित्राची पारायणे व इतर अनुष्ठाने करीत.

अशा एकनिष्ठ शिष्याबद्दल गुरूंनाही पराकाष्ठेची आत्मीयता होती. पुढे डॉ. काळे वारले. त्यानंतर त्यांच्या मुलाचे लग्न पुण्यात होण्याचे ठरले. त्यावेळी श्रीधुंडिराज महाराज जाफराबादला ब्लडप्रेशरने आजारी होते. या लग्नाला तशाहीस्थितीत कोणाचे काहीही न ऐकता, पुण्याला आले व मुलांना आशीर्वाद दिला. "जाऊ नका प्रकृती जास्त बिघडेल आपण शुभाशीर्वादाची तार करु!" असा सल्ला देणाऱ्यांना श्रीधुंडिराज म्हणाले, "डॉ. काळे व माझे संबंध काही विशेष होते. माझ्या भावना मलाच माहित! मला गेलेच पाहिजे. प्रकृतीचे काय वाटेल ते होवो! महाराज होणे सोपे काम नाही!"

श्रीधुंडिराजमहाराजांचा ठळक दिसणारा गुण म्हणजे साधेपणा त्यांच्याकडे पाहिल्यावर किंवा कामापुरते त्यांचेशी बोलल्यावर ते सर्व साधारण भिक्षुक वर्गापैकीच असतील असा अपरिचित मनुष्याचा ग्रह होत असे. त्यांचा वेदवेदांताचा गाढ व्यासंग व अध्यात्मिक श्रेष्ठता या साधेपणामुळे त्यांनी पूर्ण झाकून ठेवली होती.

विनम्रपणा, लीनता हा तर त्यांचा सहज गुण होता. त्यांच्या कृपाप्रसादाने इष्टसिद्धी झाल्यावर भक्त कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी येतात. त्यावेळी महाराज मनापासून म्हणत "अहो! मी काय केले? मी तुमच्या सारखाच आहे! ही ईश्वराची कृपा समजा!" त्यांच्या विद्वत्तेबद्दल कोणी प्रशंसा करू लागले की महाराज चटकन म्हणत "अहो मला काय येतय? मी कोण? आमचा 'दत्तू' खरा पंडित आहे." आपल्या मुलांसंबंधी त्यांची भावना व भूमिका काय होती ही एका छोट्या वाक्याने त्यांनी स्पष्ट केली.

श्रीधुंडिराजमहाराजांना लहान मुलांचा फार लळा होता. लहान मुलांशी त्यांच्या सारखे बोलून ते खेळवत असत. "अरे! तू बंड्या तर मीहि धोंड्याच आहे! आमच्या वडिलांची मुलं जगत नव्हती. मग मी धोंड्या झालो." अशा गंमतीदार बोलण्याने मुलांना हसवीत असत. ते मुलांमध्ये समरस होऊन जात म्हणून तेही बाल स्वभावी झाले असावेत. त्यांच्याकडे येणारे भक्त इतका प्रसाद आणीत की त्यावर एखादे मेवा-मिठाईचे दुकान उत्तम चालले असते. हा सगळा प्रसाद येणाऱ्यांना आणि मुलांना वाटून टाकीत. त्यामुळे त्यांच्याकडे मुले दर्शनाचे निमित्त करुन प्रसादासाठी येत असत. त्यांच्याकडे आलेल्याला प्रसाद मिळायचाच असा महाराजांचा दंडक होता.

श्रीधुंडिराजमहाराजांच्या कृपेची व कृपा सामर्थ्याची शेकडो उदाहरणे आहेत. या अल्पचरित्राची मर्यादा घालून घेतलेल्या ग्रंथात ती देणे शक्य होत नाहीत. पण त्यांच्या कृपेने अनेकांची अनेक संकटे, कामे पार पडली. या अनुभवानेच त्यांचे हजारो शिष्य झाले आणि त्यांच्या चरणी श्रद्धेने लीन झाले.

## श्रीधुंडिराजमहाराजांचा परिवार

यांना पाच पुत्र व एक कन्या. श्रीदत्तमहाराज हे ज्येष्ठ पुत्र. त्यांच्या पाठीवर श्री. दिगंबरपंत हे आयुर्वेदतीर्थ असून कोल्हापूरकडे नेसरीला असतात. त्यानंतरचे श्री. वासुदेवराव हे जालन्याला असतात. कन्या सौ. पद्मावती या सांगलीला कुलकर्ण्यांकडे दिलेल्या आहेत. त्यांच्या पाठचे श्री. श्रीपादराव हे बी. ए. काव्यतीर्थ व संस्कृत प्रचारक मुंबईला अंधेरीस राहतात. सगळ्यात धाकटे श्री. गजाननराव हे लवकर वारले.


श्रीधुंडिराजमहाराजांचा आणि श्रीगुळवणीमहाराजांचा फार जुना, वाडीपासूनचा परिचय. दोघांचेही गुरू श्रीटेंबेस्वामीच होते. दोघांचा सहवासही अनेकदा अनेक प्रसंगातून आला. सहस्त्रचंद्रदर्शन शांती महोत्सवाला श्रीगुळवणीमहाराज देऊळगावराजाला मुद्दाम गेले होते. श्रीधुंडिराजमहाराज आणि श्री. सौ. आई–साहेब अनेकदा पुण्याला आले होते. प्रत्येक वेळी श्रीगुळवणीमहाराजांना भेटून जात असत. दोघांमध्ये सहा महिने अंतर होते. श्रीधुंडिराजमहाराज सहा महिन्यांनी मोठे परंतु श्रीगुळवणीमहाराजांनंतर ते चार वर्षे मागे होते.

श्रीधुंडिराजमहाराजांची उग्ररथषष्ठयद्विपूर्ती शांती महामहोपाध्याय श्री. श्रीधरशास्त्री यांच्या हस्ते नासिक येथे झाली. इ. स. १९५६ मध्ये भीमरथी शांती (वय ७०) व विष्णुयाग देऊळगावराजा येथे श्री शिरोळकर शंकराचार्य यांचे अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी श्री शंकराचार्यांनी 'भक्तरत्न' ही पदवी त्यांना दिली. सहस्त्रचंद्रदर्शन शांती ८० व्या वर्षी झाली. त्यावेळी श्री गणेशयाग, शतचंडी, श्रीदत्तयाग, श्रीमद्‌भागवत स्वाहाकार व श्री दिंगबर नाम सप्ताह इ. अनेक मोठमोठाले धार्मिक विधी झाले.

त्या प्रसंगी श्रीशृंगेरी पीठाचार्य, श्रीयोगीराज गुळवणीमहाराज, श्रीआत्माराम शास्त्रीमहाराज जेरे, श्रीशंकरकाका आजेगावकर इ. अनेक संतश्रेष्ठ अभिष्टचिंतनास आले होते. रौद्रीशांती (वय ८५) ही देऊळगावराजा येथे मोठ्या थाटात भक्तांनी साजरी केली. आणि सौरीशांती, वय ९०, ही सुद्धा त्यांच्या भक्तांनी स्वयंस्फूर्तीने उत्तम रीतीने साजरी केली.

## देऊळगावराजा

श्रीधुंडिराजमहाराजांचा विवाह झाल्यावर दोन तीन वर्षातच श्रीवक्रतुंडमहाराजांनी इ. स. १९०६/७ मध्ये देऊळगावराजाला बिऱ्हाड केले. त्यामुळे श्रीधुंडिराजमहाराज हे त्यावेळेपासून देऊळगावराजाला राहू लागले. त्यांचा प्रवचनांच्या निमित्ताने प्रवास भरपूर घडत असे. वाडीलाही दरवर्षी जात असत.



प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

गुरुमंत्र देण्याचा अधिकार व पात्रता येण्यासाठी जे अनुष्ठान व विधी करावे लागतात ते वडिलांनी त्यांच्याकडून सशास्त्र करवून घेऊन मग गुरुमंत्राची आज्ञा दिली. तेव्हापासून त्यांची शिष्य शाखा मराठवाड्यात पुष्कळ पसरली आहे. देऊळगावराजा येथे त्यांना फार मान आहे. येथील श्री. बालाजी साहेबांच्या नवरात्र उत्सवात व लळीतात त्यांना विशेष मान आहे. तोच मान पुढे श्रीदत्तमहाराजांना मिळत आहे.

वयाच्या ९२ व्या वर्षी इ. स. १९७८ मध्ये श्रीधुंडिराजमहाराज श्रीदत्त चरणी लीन झाले.

त्यांच्या शिष्यांनी देऊळगावराजा येथे विश्वस्त मंडळाची स्थापना करून त्यांचे मोठे मंदिर बांधले आहे. शेगावच्या श्रीगजाननमहाराजांच्या मंदिरासारखी रचना आहे. तळघरात श्रीधुंडिराजमहाराज यांचा सुंदर संगमरवरी पुतळा आहे आणि ३/४ शे मंडळी बसू शकतील एवढा हॉलही तळघरातच आहे. वर श्रीदत्तमूर्ती असून सभामंडप एवढा मोठा आहे की त्यामध्ये हजार माणूस बसेल. भोवतालचा परिसरही खूप मोठा आहे. दर पुण्यतिथीला ४०/५० हजार पानांचा भंडारा होत असतो. यावरून त्यांच्या अध्यात्मिक अधिकाराचा बोध होतो.

## प. पू. श्रीदत्तमहाराज

**सच्चिदानन्द रूपाय विश्वोत्पत्यादिहेतवे**
**तापत्रयविनाशाय श्रीकृष्णाय वयं नुमः ॥**

अखिल विश्वाची त्रिविध कार्ये उत्पत्ति स्थिती व लय किंवा सत्त्व, रज, तम गुणांनी पंच महाभूतांची होत असलेली कार्ये ज्याच्या सत्तेने होतात अशा सत् चित् आनंदरुप असलेल्या, आणि तापत्रयांचा नाश करणाऱ्या परमेश्वराला विघ्न निवारणार्थ प्रारंभी वंदन करतो.

**क्वसूर्य प्रभवो वंशः क्व चाल्पविषयामतिः ।**
**तीतीर्षुर्दुस्तरं मोहात् उडुपेनाऽस्मि सागरम् ॥** —रघुवंश

वास्तविक ईश्वरी कृपेच्या पियुष वर्षावाने समृद्ध झालेल्या कवीश्वर कुल क्षेत्रातील महापुरुषांचे आम्रवृक्ष श्रांततृषितांना संजीवन देत, जिज्ञासू भक्तांना तृप्त करीत, तापत्रयांनी त्रस्त झालेल्यांना शांत करीत स्वजीवन कृतार्थ करुन धन्य झाले आहेत. अशा महापुरुषांचे जीवन चरित्र लिहिण्याचा हा प्रयत्न म्हणजे ज्योतिच्या अल्पतम तेजाने तेजोभास्कराला श्रद्धाभक्तीने ओवाळण्यातील प्रकार आहे.

श्रीमन्माघकवि हे महापुरुषांचे वर्णन करतात

**तुङ्गत्वमितरा नाद्रौ नेदं सिन्धावगाधता**
**अलङ्घनीय ताहेतुरुभयं तन्मनस्विनि ॥**

अनुल्लंघनीय उत्तुंगत्व नगाधिराजाशिवाय कोठेही नाही किंवा अनुल्लंघनीय अगाधत्व महासागराशिवाय कोठेही नाही. परंतु मनस्वि महापुरुष हे उत्तुंगत्व आणि अगाधत्व या दोनही सीमा रेषा पार करणारे असतात. ही काव्योक्ति या संदर्भात कवीश्वर कुलातील महापुरुषांचे योग्य असे दर्शनच घडविते, 'यस्यावतारो भूतानां क्षेमायच भवायच' याची प्रचीती यांच्या जीवनदर्शनाने येत असते.

अशा या महापुरुषांच्या महान परंपरेत प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणजे सुवर्णालंकारातील रत्नपदक, मुकुटातील कौस्तुभ, पुष्पातील पारिजात आहेत. त्यांच्या जीवनचरित्राची उंची आणि खोली अथांग आहे. त्यांच्या उंचीचा आणि खोलीचा बिंदू कोणी कितीही प्रयत्न केले तरी अस्पर्शितच राहतील. त्यांचे जीवन चरित्र लिहिणे म्हणजे आकाशाचे क्षेत्रफळ मोजण्यासारखे आहे. पण हे निमित्त करून तरी क्षुद्र पक्षाला आपल्या कुवती एवढी झेप आकाशात घेता येऊन विहंगम दर्शनाचा आनंद मिळेल. पण खरे म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या शब्दाची प्रचिति घेण्यासाठी हा चरित्र लेखन खटाटोप सुरू केलेला आहे.

**तेही प्राणापरौते । आवडती हे निरुते**
**जे भक्त चरित्राते । प्रशंसिती ॥**

हे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र श्रीदत्तमहाराजांसाठी लिहिले जात नाही तर हे चरित्र लिहिल्याने त्यांच्या गुरुंना अत्यंत आवडणार आहे. श्रीसद्गुरु प्रसन्नता झाली की श्रीगुरुकृपावर्षाव होतो. त्यासाठी लिहिण्याचा यथाशक्ती यथामती प्रयत्न करीत आहे.

हिमालयाची बर्फाच्छादित उत्तुंग शिखरे, आसमंतात वाहणारे शुभ्र स्फटिकासारखे जलप्रवाह, त्या जलप्रवाहांनी हिमालयाच्या कुशीत स्वच्छंद बागडताना, दृष्टी खिळवून टाकणारे, ठिकठिकाणचे भव्य जलप्रपात, शेंकडो फूट उंचीचे वृक्ष, घनदाट वृक्षराजी, विविध पशुपक्षांचे निर्भय नि रम्य निवासस्थान, निरव शांततेचे आगर असे स्थान पाहून भगवान शंकर कैलासपती झाले. भागिरथाचे निमित्त करून गंगाभागिरथी स्वर्ग सोडून येथे आली आणि शिवसान्निध्यात अवखळपणे बागडू लागली, सारे देव या नगाधिराजाच्या आश्रयाला आले, ऋषी-मुनी, जपी-तपी, योगी-विरागी याच स्थानात आले आणि रमले. असे हे पवित्र स्थान युगायुगाने आश्रयी जीवांचा पुण्यसंचय वाढवित आहे. पापक्षालन करीत आहे. म्हणून हे स्थान चतुर्धाम तीर्थक्षेत्र बनले आहे. यात्रेकरुंना कृतार्थ करीत आहे.

महापुरुषांच्या जीवनाचे हे प्राकृतिक वर्णन आहे, आदर्श नि विशुद्ध ध्येयाची उत्तुंग शिखरे, मनोबल वाढविणारे, विशुद्धत्वाने ओथंबलेले, लोकोद्धारासाठी तीव्र तळमळीने वाहाणारे, अश्रितांची श्रांती शांत करणारे, शांतीचे महासागर, चैतन्याचे महाप्रभू असे महापुरुष असतात. म्हणून यांच्या हृदयसिंहासनावर स्वतः शंकरच येऊन

रहातात, ईश्वरीकृपेची पापविनाशिनी साधन धारा या महापुरुषांच्याच आश्रयाला येते. विविध ईश्वरप्रेमानुरागी यांच्या सान्निध्यी येऊन कृतार्थ होऊन जातात.

अशांचे चरित्र लिहिण्याचे धाडस तेंव्हा ठरेल जेंव्हा चित्तात अंहकार असेल. पण हे धाडस करण्याचे स्थान नाही, येथे धाडसाने काहीही होणार नाही. 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे नाचती' हे हृदयी धरून येथे प्रवेश केला तरच काही हाती लागण्याची शक्यता आहे. वास्तविक येथील दृश्य–वातावरणच असे आहे की अंहकाराला येथे थागच नाही. येथील औदार्याने आणि प्रेमाने मनात भक्तीचे झरेच पाझरू लागतील. त्यांच्या सद्गुण फलभारांनी विनम्र झालेल्या जीवनाचे दर्शन आपल्या पातळीवरून दंडवत् नतमस्तक होऊन घ्यावे लागेल. त्यांच्या ज्ञानाला अज्ञानानेच वंदन करावे लागेल. त्यांच्या सामर्थ्याचे अंदाज आपल्या दौर्बल्यातूनच बांधावे लागतील. त्यांच्या सद्गुण संभाराच्या राशीपुढे आपल्या क्षुद्र दुर्गुणांना क्षमेसाठी त्यांच्यापुढे लोळणच घ्यावी लागेल.


हे भाव सुद्धा संतांच्याच समर्पक शब्दांनी स्पष्टपणे व्यक्त होतील.

**एवढे जिये महिमेचे करणे । ते वाचाबळे वानावे कवणे ।**
**काई सूर्याचिया । आंगा उटणे लागतसे** ॥१॥
**गुरु तेथ ज्ञान । ज्ञानिं आत्मदर्शन ।**
**दर्शनी समाधान । आथि जैसे** ॥२॥
**स्तुति काही न बोलणे । पूजा काही न करणे ।**
**संनिधी केही न होणे । तुझा ठायी** ॥३॥
**श्रीगुरुचे पाये । हृदय गवसून ठाये ।**
**तेंव्हाच एवढे भाग्य होये । उन्मेषासि** ॥४॥
**माझी तनु आणि प्राण । इया पाडवां लेववूं श्रीचरण ।**
**करूं भोग-मोक्ष निंबलोण । पायां तेथा** ॥५॥


हे भाव ठेवून चरित्रलेखनरूपी मानस पूजा सुरू केली आहे. त्यामुळे या कार्याला अपात्रता हीच भावबुद्धी त्यांच्या कृपापात्रतेचे फळ देण्यास समर्थ ठरावी अशी प्रार्थना आहे.

**जन्म**—श्रीदत्तमहाराजांच्या जन्मापूर्वीच प. प. श्रीटेंबेस्वामींनी श्रीधुंडिराजमहाराज यांचेकडून धर्मसिंधूत दिलेल्या मंत्राचा जप–विधी विधानपूर्वक आणि होमहवनादि-युक्त यथासांग करून घेतला आणि केवळ ईश्वरकृपेचा प्रसाद म्हणून पुत्र प्राप्ती झाली. म्हणजे श्रीटेंबेस्वामींचा व श्रीदत्तमहाराजांचा संबंध त्यांच्या जन्मापूर्वीपासूनच आलेला आहे. त्यांच्या संकल्पशक्तीचे हे फळ आहे. श्रीधुंडिराजमहाराजांनीही पत्नी गरोदर असतांना मुलगाच होणार या श्रद्धेने त्या गर्भावर पुंसवन सीमंत वगैरे संस्कार यथाशास्त्र केले.

श्रीदत्तमहाराज यांचा जन्म वाडीस झाला. शके १८३१ मध्ये माघ वद्य षष्ठी, बुधवार दिनांक २ मार्च १९१० रोजी सूर्योदयसमयी सकाळी ६-२० ला जन्म झाला. त्यांची जन्पत्रिका खालीलप्रमाणे आहे.




जन्मलग्न कुंडली




नवमांश कुंडली

सोबत दिलेल्या जन्म कुंडलीत मंगळ वृषभेचा-चतुर्थात दिलेला आहे. तो चुकून पडलेला नाही. पूर्वीची पत्रिका ज्यांच्या पाहण्यात व अभ्यासात असेल त्यांना मंगळ मेषेचा तृतीयात असल्याचे लक्षात असेल. परंतु ही चूक अनावधानाने राहून गेली असावी व त्या अनुरोधाने भविष्य पाहिले गेले. पण येथील संग्रहातून शके १८३१ चे पंचाग काढून पत्रिका नीट पडताळून पहाता असे स्पष्ट व निश्चित लक्षात आले की, दि. २ मार्चला मंगळ वृषभेमध्येच आहे. कारण दि. २७ फेब्रुवारीला मंगळ वृषभेत आल्याची नोंद पंचांगात आहे. बाकी लग्न वगैरे कशातही फरक नाही. हा मंगळातील बदल पाहून व्यासंगी चिंतकांना धक्का बसेल यात शंका नाही. परंतु त्याचबरोबर तौलनिक चिंतनास चालनाही मिळेल. वस्तुस्थितीशी ग्रहांचे फलित पडताळून पहाण्याइतका विस्तृत जीवन कालही आपल्यासमोर आहे. मंगळ वृषभेत कल्पनेने घातला नाही याचा प्रत्यय शके १८३१ चे पंचाग काढून पहाण्यास हरकत नाही. मात्र पंचांग जुने किंवा दातेपंचांग असावे. टिळक पंचांगाप्रमाणे हे पाहिलेले नाही.

मंगळ चतुर्थात आल्याने त्याने सौख्यावर गदा आणली आहे. मातृपितृ सौख्यातही उणीव आणली आहे. हे पटवून देण्याची आवश्यकता जाणकारांना नाही. जीवन चरित्र समजल्याबर इतरानांही पटेल. हाच विषय विरक्तीला पूर्ण अनुकूल झालेला आहे. अष्टमातील गुरुची दशम व चतुर्थ स्थानावरील शुभ दृष्टी मातृपितृ आंतरिक संबंध श्रद्धेचे, जिवाळ्याचे व परस्परांत आदरभाव असणारे असल्याचे आहेत हे स्पष्ट करते. पण मंगळाने व्यावहारिक वियोगही स्पष्ट केला आहे. लहानपणापासूनच विद्याध्ययननिमित्ताने सांगली, धारवाड, काशी इ. ठिकाणी जाण्याने गृहवियोग घडला. पुढे तर आयुष्यभर भागवत धर्माच्या प्रचारार्थ अखंड प्रवास सुरुच झाला. या प्रवासाचे सुसंगत संकलन करता आले तर त्या स्थूल माहितीनेही आपण आश्चर्याने मंत्रमुग्ध होणार आहोत. विरक्तीला पोसणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यामध्ये गृहसौख्याचा अभाव हे जसे प्रमुख कारण आहे, तसेच सतत भ्रमण हेही विरक्तीचे सामर्थ्य वाढवित असते. वस्तुस्थितीकडे बघतांना अशी चिंतनवृत्ती अर्थबोध करणारी ठरते.

तर ईश्वरकृपेने प्राप्त झालेला पुत्र म्हणून वडिलांनी 'दत्तात्रेय' हे नाव ठेवले. शके १८२९ मध्ये श्रीवक्रतुंडमहाराज श्रीगणेशचरणी लीन झाले. म्हणजे या पुत्राच्या जन्मापूर्वी दीडदोन वर्षे आधीची ही घटना आहे. शके १८३० मध्ये श्रीटेंबेस्वामींनी श्रीधुंडिराजमहाराजांकडून जपानुष्ठान करून घेतले. शके १८३१ च्या ज्येष्ठ आषाढात पत्नी गरोदर असता श्रीधुंडिराजमहाराज एकटे श्रीटेंबेस्वामींच्या दर्शनास धारवाडच्या मदिहाळ येथील दत्तमंदिरात गेले. तेथे योगायोगाने भेट झाली. दुसरे दिवशी स्वहस्ते स्वैंपाक करून श्रीटेंबेस्वामींना भिक्षा घातली आणि स्वतः प्रसाद घेऊन प्रसन्नतेचा कृपाशिर्वादही घेऊन आले. त्यानंतर शके १८३१ च्या माघात पुत्राचा जन्म झाला आहे. हा सर्व घटनाक्रम सुसंगत असा दृष्टीसमोर येऊन मनातील श्रद्धा निःशंक आणि दृढ

होते. की या पुत्राच्या जन्माला निश्चितपणे ईश्वरी प्रसादाचा अर्थ आहे. पण ही गोष्ट सुद्धा आपण मानीत बसण्याचे कारण नाही. तर या दत्तात्रेयाच्या जन्मानंतर थोड्याच दिवसात श्रीटेंबेस्वामी वाडीस आले, त्यावेळी श्रीधुंडिराजमहाराज यांचेकडे स्वामी आले असताना त्यांच्या मांडीवर या दत्तबाळाला ठेवले. तेव्हा श्रीटेंबेस्वामी त्या बाळाकडे पहात म्हणतात, –"काय बुवा राहिलेले कार्य पुरे करण्यासाठी नातू म्हणून आलात ना? आपण पांढऱ्या वेषात नि आम्ही भगव्या वेषात. एवढाच वरवरचा फरक आहे. बाकी काय?" असे म्हणून स्वामीमहाराज प्रसन्नतेने हसले. बाळाला प्रेमाने कुरवाळले, सर्व अंगावरून हात फिरवला. गालावर टिचक्या मारून गंभीर असलेल्या बाळाला हसते केले. एवढे बोलणे एकाग्रतेने त्या दत्तबाळाशी समरस होऊन स्वामींचे झाल्यावर स्वामींनी मान वर केली आणि समोर उभ्या असलेल्या बाळाच्या मातापित्यांकडे पाहून म्हणाले–"हे आजोबा आले आहेत हं! यांचे पुनः नाव ठेवा 'वक्रतुंड' म्हणून!" मग दोघांनी स्वामींना नमस्कार केला. आईने बाळाला घेतले आणि स्वामीमहाराज निघून गेले.

या घटनेने पूर्वी घडलेल्या या संदर्भातील घटनांची सुसंगती लागते. आणि आपण आपल्या बुद्धीने काहीही न ठरवता श्रीस्वामींच्या मुखातून अधिकार वाणीने सर्व काही बोध होतो. श्रीस्वामींच्या इच्छेप्रमाणे या दत्तात्रेयाचा पुनः नामकरण विधी झाला आणि वक्रतुंड हे नाव ठेवले. हे वक्रतुंड नाव याच्या मौंजीबंधन प्रसंगीच्या आणि पुढे विवाह प्रसंगीच्या निमंत्रण पत्रिकामध्ये छापलेलेही आढळले आहे. इतका व्यावहारिक आधार वक्रतुंड नावापासून प्रत्यक्ष आजोबापर्यंत पोहचतो. स्वामींच्या एका वाक्याने या बालकाचे उज्वल भविष्यच उद्घोषित केले.

यानंतर श्रीधुंडिराजमहाराजाना चार पुत्र आणि एक कन्या झाली. श्री. सौ. सरस्वतीबाई-आईसाहेब यांच्या जीवनाचा आढावा पूर्वी घेतला आहे. त्यांचे प्रातःकाळचे स्नान आणि श्रीदत्तांना प्रदक्षिणा घालणे हा नेम चालू असता ही मुले त्रास देऊ लागली की त्यांना श्रीदीक्षितस्वामीमहाराजांकडे सोपवित. म्हणजे श्री. सौ. आईसाहेबांचा अधिकार व श्रीदीक्षितस्वामींचे या घराण्यातील प्रेम यांचा मेळ बसतो आणि मुलांच्या परमभाग्याचे लक्षणही दिसते. ज्या श्रीदत्तात्रेयांचे हे पुढे सद्गुरु झाले त्यांच्या अंगा-खांद्यावर खेळण्याचे भाग्य लहानपणी लाभावे या पुण्याईला काय म्हणावे? सद्गुरूंचा पवित्र स्पर्श आणि मंगल दृष्टी ज्यांच्यावर एकदा पडली तर जीवन कृतार्थ होते. त्यांचा असा सहवास लाभला. भले मुले अजाणती असतील, त्यांना संन्यासी स्वामी सद्गुरू यांचे माहात्म्य कळतही नसेल पण श्रीदीक्षितस्वामी तर जाणते होते. त्यांच्या स्पर्शात नि दृष्टीत ईश्वरी शक्ती होती. ते अहेतुक कृपा करणारे होते. त्यांनी या सर्व मुलांवर कृपा केली असेल यात शंका नाही. परंतु या थोरल्या दत्तात्रेयावर त्यांनी निश्चितच फार फार प्रेम केले असेल. एवढी जवळीक या परिवाराशी असल्यामुळे

या दत्तात्रेयाच्या संबंधीच्या 'स्वामी उद्गारांची' माहितीही त्यांच्या कानावर होतीच. दत्तात्रेयाचे गुण ही श्रीस्वामींच्या प्रेमाला बहरच आणीत असे.

श्रीक्षेत्रनृसिंहवाडीत श्रीदत्तात्रेयांचे बालपण गेले. चार दिवस कोणी यात्रेकरू वाडीला गेला तर त्या वातावरणाने, देवाच्या दिनक्रमाने, सायंआरतीने, कृष्णामाईच्या स्नानाने भारावून जातो. मग वाडीनिवासी ही निरागस बालके मोठ्यांच्या अनुकरणाने दिवसभर त्या दिव्य वातावरणात रमतील यात आश्चर्य ते कसले ? कदाचित् मायेचा प्रभाव अधिक असलेल्या किंवा पूर्व कर्माचा जोर नसलेल्यांना या देव कार्यात रस नसेलही ! पण वाडीचे सर्व व्यवहारच देवाशी निगडीत असल्याने त्यांनाही देवाला टाकून काय करता येईल ? मग ज्यांच्या गाठी 'बहुतसुकृताची जोडी' असेल अशा या बालदत्तात्रेयांच्या बालपणाची कल्पना यादृष्टीनेच केली पाहिजे, देवापुढे उभे राहून राहून नित्यक्रमातील कितीतरी पाठातर सहज झाले. कृष्णेचे स्नान दत्ताने कधी संकोचाने केलेच नाही. आईच्या अंगाखांद्यावर ज्या निःशंकमनाने बालक खेळते तसेच या बाल दत्ताचे कृष्णा स्नान असे, वाडीतल्या मुलांना म्हणे जन्मतःच पोहता येते. कारण पोहता न येणारा वाडीनिवासी कोणीही नाही. या न्यायाने बालदत्ताचे स्नान म्हणजे पोहणे असे. पोहण्याची आवड आणि ओढ बालपणापासूनच होती. मनसोक्त पोहण्याचा नित्यक्रम होता. देवाला पाणी घालणे हा दिनक्रमातील एक कार्यक्रम असल्याने हा सहज होणारा नित्य नेम झाला होता.

वाडीलाच देवापुढे आठव्या वर्षी दत्ताची मुंज झाली. उपासना आणि वेदाध्ययन याचा अधिकार प्राप्त करून देणारा हा संस्कार आहे. घरचे संस्कार आणि स्वाभाविक प्रवृत्तीमुळे बालबटूचा फार मोठा मार्ग मोकळा झाला. संध्यावंदन–गायत्री उपासना आणि श्रीगुरुचरित्रवाचनाचा प्रारंभ मौंजी बंधनापासून झाला. प्राथमिक शाळेची सुरुवात यापूर्वीच झाली होती. मुंजीनंतर श्रीदीक्षितस्वामींच्याकडे जाणे येणे विशेष होऊ लागले.

## श्रीसद्गुरु पुण्यतिथी सोहळा

श्रीदीक्षितस्वामींना वाडीकर मंडळी थोरल्या महाराजांप्रमाणेच मानीत. थोरले महाराज शके १८३६ मध्ये समाधीस्त झाल्यानंतर शके १८३७ पासून श्रीदीक्षित-स्वामींनी आपल्या गुरूंचा (श्रीटेंबेस्वामींचा) पुण्यतिथी उत्सव सुरू केला. आषाढ शुद्ध प्रतिपदेपूर्वी सहा दिवस उत्सव सुरू होत असे. श्रीदीक्षितस्वामी हा उत्सव मोठ्या थाटाने व भरगच्च कार्यक्रमांची योजना करून करीत असत. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांच्या मठाला चुना देणे, त्यावर चित्रे काढणे, जमिनी सारवून ठेवणे, कुरूंद-वाडच्या वाड्यातून मोठी भांडी, अरगिनी दिवे वगैरे आणणे. हरिदास, पुराणिक, वैदिक, अभिषेक करणारे, ग्रंथ वाचणारे, भजनात सप्त्याचा पहारा करणारे, स्वयंपाक करणारे, वाढणारे, उष्टी काढणारे, रांगोळया, पाट करणारे, वाजंत्री वाजविणारे इत्यादी लोकांना

निमंत्रणें देणे, त्यांना त्यांच्या त्यांच्या कामावर नियोजित करणे, ती सर्व महोत्सवाची कामे चालू ठेवणे, हे सर्व काम श्रीदीक्षितस्वामी बाल-गोपाळांना हाताशी धरून करवून घेत असत. प्रतिपदेच्या पूर्वी सात दिवस या महोत्सवाला प्रारंभ होई. ज्येष्ठ वा॥ ९ ला माडीवरून श्रीदत्त दिगंबराच्या पितळी पादुका आणि श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी-महाराजांच्या खडावा, ज्या श्रीदीक्षितस्वामींना व विद्यार्थ्यांना म्हणजेच कार्यकारी मुलांना स्वतः श्रीटेंबेस्वामीमहाराजांनी दिल्या त्या खडावा, असे तीन पादुकांचे जोड मठाच्या तळमजल्यात, जिथे श्रीगुरुस्वामी (श्रीटेंबेस्वामी) बसत असत त्या जागी सिंहासनावर पुजारी आणून ठेवीत. सात दिवस त्या पादुकांवर महाअभिषेकयुक्त महापूजा होत असे.

वे. मू. बाळंभट बोरगांवकर अभिषेक पूजा व नैवेद्य करीत. वे. शा. सं. बाळशास्त्री कोडणीकर भागवताचा सप्ताह वाचीत. वे. शा. सं. अण्णा दीक्षित सकाळी श्रीटेंबेस्वामी विरचित 'समश्लोकी गुरुचरित्र' वाचीत व दुपारी त्याचाच अर्थ सांगत, कित्येक पुजाऱ्यांची सुशिक्षित मुले आणि काही शास्त्री मंडळी श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी विरचित समग्र ग्रंथांची पारायणे करीत. वे. मू. दामले, वे. मू. सखाराम भटजी येडूरकर, वे. मू. बाळू कंटराव पुजारी वगैरे वेद पारायणे करीत व रात्री मंत्रजागर करीत. ह. भ. प. गणेशशास्त्री शिरोलीकर हे रोज कीर्तन करीत. कोणी स्वयंपाक करीत, कोणी वाढीत, कोणी पाणी भरत, ही कामे स्त्रिया करीत. कीर्तन पुराणाला गर्दी असे. रोज ब्राह्मण भोजन होत असे. तीन त्रिकाळ आरतीला, कीर्तनाला, पुराणाला स्वतः श्रीनृसिंह-सरस्वती (दीक्षितस्वामी) स्वामीमहाराज येत असत. सकाळी पादुकांना पाणी घालून उत्सवात ते आपली जप समाधी लावीत. देवाजवळ मठातच बसत असत.

आषाढ शु० प्रतिपदेला मिळतील तेवढे संन्यासी व बाकीचे ब्राह्मण मिळून सोळा ब्राह्मणांची यथाविधी पूजा होई. ती वर्षिलदार पूजारी करी. या ब्राह्मणांना पंचपक्वाने वाढीत. वस्त्रे व दक्षिणा देत. हरिदास, पुराणिक सप्तावाचक, वाजंत्री इत्यादिकांना वस्त्रे व दक्षिणा प्रसाद म्हणून दिला जाई. सार्वजनिक मुक्तद्वार भंडारा केला जाई.

गावचे-परगावचे भक्त मोठ्या संख्येने या महोत्सवाला मोठ्या श्रद्धाभक्तीने येत असत. सर्व वाडीगांव श्रीनृसिंहसरस्वतींच्या इच्छेनुरूप उत्सव कार्याला मदत करी. स्वतः श्रीनृसिंहसरस्वती समर्थ सिद्धपुरुष असल्यामुळे त्यांच्या संकल्पाप्रमाणे जेव्हा जेव्हा जसे जसे व्हावयाला पाहिजे तेव्हा ते तसे तसेच सर्व व्यवस्थित होत असे. कोणत्याही गोष्टीची उणीव नसे.

असे हे वर्णन वाचले म्हणजे तो काळ, ते दृष्य डोळ्यासमोर उभे रहाते. "देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा" या समर्थांच्या शब्दाची प्रचिती येते, वाचकांनी या महोत्सवात बालबटु दत्तात्रेय कवीश्वर आपल्या अन्तःचक्षूनी पहावा. काय संस्कार होत असतील याचाही विचार करावा. कारण दत्तात्रेय वयाच्या १५/१६ पर्यंत वाडीतच

होते. मुंजीनंतर ७/८ वर्षे या पवित्र स्थानात आणि सद्गुरू सान्निध्यात घालविण्याचे परमभाग्य त्यांना लाभले.

## वाडीतील बालपण

वाडी क्षेत्रात असा एकच उत्सव नसे. संपूर्ण वर्षभरात, गुरुद्वादशीचा उत्सव, श्रीनृसिंहसरस्वती जयंत्युत्सव, श्रीपादश्रीवल्लभ जन्मोत्सव, श्रीदत्त जयंती उत्सव, श्रीनारायणस्वामी पुण्यतिथी उत्सव, श्रीवासुदेवानंदस्वामी जयंत्युत्सव, श्रीकृष्णामाईचा उत्सव, श्रीमौनीस्वामींचा, श्रीगोपाळ स्वामींचा उत्सव, पुनः वैशाखात देवावर संततधार, महापूर आल्यावर दक्षिणद्वार, उत्तरद्वार, स्नान माहात्म्य, कन्यागताचे उत्सव याशिवाय रोज हजारो यात्रेकरू येणार त्यांच्या महापूजा, अन्नदान असे सारखे चालूच असते. अनेक थोर, संत-सिद्ध, पुरुष–महात्मे या स्थानी येणार, वास्तव्य करणार, उपासना करणार, महापूजा, भंडारा करणार ! अशा वातावरणांत, संस्कारक्षम बाल वयात, स्वभावतःच दत्तभक्तीची ओढ असलेले दत्तात्रेय कवीश्वर येथे नांदत होते

त्यांचे शालेय शिक्षण चालू होते. परंतु त्याच्या अनंत पटीने मोठे शिक्षण हे परमार्थ विद्यापीठाचे चालू होते. त्यांचे प्राचार्य होते श्रीदीक्षितस्वामी. या परमार्थ विद्यापीठात जाण्यासाठी फी द्यावी लागत नसे. तर आपल्या या विद्यापीठात मुलांनी येऊन जावे म्हणून प्राचार्य श्रीदीक्षितस्वामी त्या मुलांना स्वतःच प्रसाद म्हणून खाऊ वाटीत. आलेली मुले स्वामींच्या ओढीने त्यांचे विद्यार्थीपण स्वीकारीत. असे हे मुंज झालेले विद्यार्थी सन्मार्गाला लावण्यासाठी, भक्तीमार्गाला लावण्यासाठी श्रीदीक्षितस्वामी मुलांवर अतोनात प्रेम करीत. त्यांना आपला लळा लावीत. रोज रात्री मुले संध्या करून भजनाला आली म्हणजे स्वामीमहाराज त्यांना भरपूर प्रसाद आणि तुपाचे निरांजन आरतीला देत असत. आपल्याला आरतीला झांजा मिळतात, निरांजने मिळतात म्हणून मुलांनाही समाधान वाटत असे. पुढे पुढे तर अशा मुलांना स्वामी लाडू-चिवडासुद्धा प्रसाद म्हणून देत असत. सद्गुरूंचे असे एकमेव पारमार्थिक विद्यापीठ आहे की, जेथे शिष्यांनी काही न देता फक्त घेत राहायचे आणि सद्गुरू अशी विभूती असते की, जी सारखी देत असते.

**जात आमुची श्रीगुरुची । सदा देत राहण्याची ।**
**काही एक न घेण्याची । दत्त आमुचे गुरुदेव ॥**

स्वामींच्याकडे कोणत्याही वेळी बालक गेला तरी स्वामी त्याला खारीक, जर्दाळू, बेदाणा, संत्री, केळी, खडीसाखर, पेढे यातला जो हाताशी येईल तो प्रसाद दिल्या-शिवाय कोणालाही जाऊ देत नसत. मग ते मुलांना भजने, स्तोत्रे, आरत्या शिकवीत. त्यांना सन्मार्गाला लावीत.

स्वामींच्याकडे वयस्कर मंडळीही भावभक्तीने येत असत. काहीजण त्यांच्या सेवेलाही

राहिलेले होते. बोरगांवकर, रामचंद्र बडवे शिंगणापूरकर, कृष्णंभटजी पुजारी, कोल्हापूरचे हरिभाऊ कडेकर ही वयस्कर शिष्यमंडळी स्वामींच्या दर्शनास येत असत. बालगोपाळांमध्ये दत्तात्रेय कवीश्वर, दिगंबर हवळे, बापू कोडणीकर, श्रीपाद उपाध्ये, बाळू पुजारी इ. बालभक्त नित्य स्वामीसेवेत रहात असत.

श्रीनृसिंहसरस्वती म्हणजे साक्षात् कर्पूरगौर-भोळे नि भव्य शंकरच भासत असत. सहाफुटाची उंची, पुष्ट शरीर, प्रसन्न मुख, बालकासारखे गुबगुबीत गाल, कुठे शरीरावर सुरकुती नाही. भगवी छाटी परिधान केलेले, भस्मांकित भव्य भालप्रदेश, सर्वांगावर त्रिपुंड भस्म लेपन केलेले. असे नयनमनोहर रूप एकसारखे बघत रहावे असेच प्रत्येकाला वाटत असे. त्यांचे रसाळ हास्य अविस्मरणीय असे. त्यांची कृपादृष्टी, अमृतमधूर वाणी वातावरणाला मोहिनी घालीत असे. खरोखर स्वामी म्हणजे साक्षात आनंदमूर्ती होती. त्यावेळी भक्तांना वाटे "जनासिवाटे दत्तात्रेय हा अवतारचि पूर्ण" किंवा "मनासि वाटे दत्तात्रेय हा" अशी काव्ये भक्त मुखातून निघत. अशा पूर्ण अधिकारी महात्म्याकडून श्रीदत्तात्रेय कवीश्वर यांस मंत्रोपदेश मिळाला आणि सद्‍गुरुही मिळाले.

वाडीत श्रीमत् जगद्‍गुरू शंकराचार्य जेरे स्वामीमहाराज यांची संस्कृत पाठशाळा होती. त्या पाठशाळेत दत्तात्रेय जाऊ लागले. तेथे काव्य व व्याकरण येथपर्यंत अध्ययन झाले. दत्तात्रेयांची बुद्धी असाधारण असे. ते एकपाठी असत. विषयाचे आकलनही तो विषय ऐकताक्षणीच होत असे. श्रीधुंडिराजशास्त्री यांनी देऊळगावराजाला वास्तव्य केलें होते. श्री. सौ. आईसाहेबही तिकडेच असत. परंतु वर्षातून काही महिने त्यांचा मुक्काम वाडीलाही असे. वाडीला श्री. सौ. आईसाहेबांच्या मातोश्री, दत्तात्रेयांची तुंगभद्रा आजी रहात असे. नंतर सांगलीच्या संस्कृत पाठशाळेत वे. शा. सं. श्री. व्यंकटेशशास्त्री अभ्यंकर यांचेकडे व्याकरणशास्त्राचा अभ्यास पूर्ण केला. सांगली, वाडी अंतर फार नसल्याने वाडीला दत्तात्रेयांचे येणे वारंवार होत असे. कारण त्यांना आपल्या सद्‍गुरूंच्या भेटीची एकसारखी ओढ असे.

या कालावधीत श्रीदीक्षितस्वामी अमरापुरात (औरवाडला) निवासासाठी गेले. तेथे त्यांनी आपल्या सद्‍गुरूंच्या नावे मठाची स्थापना केली. वाडीप्रमाणे येथेही नित्यक्रम सुरु केला. वाडीतले बालगोपाळ नदी ओलांडून स्वामींच्या भेटीसाठी येऊ लागले. कोल्हापूरचे हरीभाऊ कडेकर तर श्रीदीक्षितस्वामींच्या भेटीसाठी कोल्हापूरहून अमरापुरला येत असत. तेव्हां स्वामीमहाराजांनी आम्ही त्रिस्थळी करणार आहोत. व मग गरुडेश्वरी जाऊन येणार असे मंडळींना सांगितले. महाराज निघालेले पाहून अमरापुरातील १६ भजनीगडी पुढे येऊन म्हणाले, "आम्ही गुरुमहाराजांना मिरजेपर्यंत नौकेतून पोचवावे म्हणतो." महाराज बरे आहे म्हणाले. भक्तांनी मोठी नौका आणली. श्रीगुरु नृसिंहसरस्वती निघतांना अमरापूरवासी भक्तांचा मेळा निरोप देण्यासाठी आला होता. नौकेतही काही भक्त-

गण तीर्थयात्रेसाठी बरोबर घेतले होते. बाळभक्तांनाही स्वामीमहाराजांनी बरोबर घेतले होते. या बालगोपाळात दत्तात्रेय कवीश्वर, दिगंबर हवळे, बापू कोडणीकर, बाळू पुजारी, कृष्णंभट, कट्टी, शिंगणापूरकर इ. होते. मोठी नौका भक्तांनी भरली होती. अशी मोठी दिंडीच त्रिस्थळीला निघाली. सोळापैकी आठ-आठजण आळीपाळीने नाव वल्हवीत नेत होते. दत्त नामाचे, सद्गुरूंच्या नामाचे प्रचंड जयजयकार करीत नौका चालली होती. भजने म्हणत, दिगंबराची धून म्हणत. सद्गुरु समवेत अपूर्व जल प्रवास होत होता. हास्य विनोदाच्या लहरी उसळत होत्या. नाव प्रथम शेडशाळ कौठ्याला पोचली. कवठेकर इनामदार पाटील साहेब यांनी आपल्या दिवाणाकडे सर्वांची भोजनादिंची उत्तम सोय केली. गुरुमहाराजांची उत्तम पूजा केली. तेथे थोडी विश्रांती घेऊन नाव तेथून पुढे निघाली. नंतर कनवाड गावी थोडा मुक्काम झाला. येथेही गावकऱ्यांनी स्वामीमहाराजांचा सत्कार व पूजा केली. येथून दुसरे दिवशी सकाळी निघून मिरजेला मंडळी पोचली. प्रवासात स्वामींचे चमत्कारही अनुभवास आले.

मिरजेहून रेल्वेने मंडळी कोल्हापूरला आली. तेथून सांगलीला, हरिपूरला भक्तांकडे गुरूमहाराज गेले. बरोबर पन्नास भक्तमंडळींची दिंडी होती. या सर्वांचे अखंडभजन. चालूच होते. नामस्मरणाच्या गजरात, मिरवणुकीच्या थाटात हा प्रवास चालला होता. प्रत्येक क्षणनिक्षण आनंदाच्या स्मृतींनी भरलेला होता. कोल्हापुरात सर्वजण आले. हरिभाऊ कडेकरांनी आपल्या घरी सर्वांना नेऊन उत्तम गुरु सेवा केली व सर्व भक्तांचेही आदरातिथ्य केले. कोल्हापूर ही दक्षिणेकडची गया म्हणून येथे आले. गावोगावी मुक्काम होत होत येणे झाल्यामुळे अमरापूर सोडून बरेच दिवस झाले.

तिकडे बाळगोपाळांचे आईवडील, पालक मुलांची शाळा बुडते, अभ्यास बुडतो म्हणून मुलांना परत नेण्यासाठी कोल्हापूरला आले. स्वामींनी काही भक्तांना परत जाण्यासही सांगितले. त्याप्रमाणे स्वामींचा निरोप घेऊन सखाराम बापू गेंडे, पुजारी वगैरे भक्तमंडळी वाडीला परत गेली. पण बरोबरचे बाळ-गोपाळ स्वामी 'जा' म्हणाले नाहीत म्हणून तेथेच राहिले. स्वामींना बाळगोपाळांना 'जा' म्हणवत नव्हते. तेवढ्यात वाडीहून या बाळगोपाळांच्यापैकी कांहींची वडीलधारी माणसे आपल्या मुलांना परत नेण्यासाठी आली होती. त्यामध्ये श्रीधुंडिराजशास्त्री होते. ही वडीलधारी माणसेही स्वामींचे भक्तच होते. तसा संघर्षाचा भाग यात काहीच नव्हता. मुलांनी परत येण्याची इच्छा नसल्याचे बोलून दाखविले. रडून-दुःखी होऊन, खट्टू होऊन न जाण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. बालभक्तांची ही भक्ती आणि प्रेम पाहून श्रीदीक्षित-स्वामींनाही वाईट वाटले. पण व्यवहारदृष्टीने त्यांनाही त्या आलेल्या पालकांना नाही म्हणता आले नाही. इतर मुलांच्या बरोबर श्रीधुंडिराजशास्त्रींनी आपल्या 'दत्ता'लाही वाडीस परत आणले. घरी आल्यावर तर या दत्ताने रडून रडून नकोसे केले. ह्या प्रसंगाची माहिती सांगताना श्रीधुंडिराजशास्त्री म्हणाले, कोल्हापूरहून दत्ताला घरी आणल्यावर

तो रडूच लागला. म्हणू लागला 'आम्हाला महाराजांकडे पोचवा नाहीतर आम्ही जेवतच नाही.' त्याने परत जाण्याचा हट्टच धरला. दत्ताची समजूत घालता घालता आमच्या नाकी नऊ आले. महाराजांनी सर्व बाळांना आपला इतका लळा लावला होता. चाक्षुषी दीक्षाच ते देत राहिले होते. म्हणून या सर्व बाळगोपाळांना त्यांच्या जवळ राहण्यात इतका आनंद होत होता. संत महात्म्यांच्या दृष्टीत आणि संगतीत असे अद्भुत सामर्थ्य असते. कूर्मदृष्टी ती हीच होय. श्रीगुरुनाथ आपल्या कृपादृष्टीने भक्तिज्ञानाची पेरणी अशी करत सुटले होते. "आम्ही आता पोते मोकळे केले आहे" असे स्वतः श्रीदीक्षितस्वामीच म्हणत होते."

या वयात दत्तात्रेयांची गुरुभक्ति इतकी विलक्षण होती. ती यापुढेही उत्तरोत्तर वाढतच गेली. हे सर्व बालगोपाळ श्रीदीक्षितस्वामींच्या सहवासात छायेसारखे राहिले होते. स्वामींचे छोटे मोठे प्रवास सुरू झाले. भक्तांच्या आग्रहावरून त्यांच्या त्यांच्या गावी जाऊन परत अमरापुरास येत असत. त्यामुळे बालगोपाळांचे संयोग-वियोग-विरहाच्या प्रेमाचे तरंग तीव्रतेने तरंगीत होत असत. स्वामी आले की आनंदाचे तरंग आणि परगावी गेले की वियोगाचे तरंग निर्माण होत असत. पण दोन्ही अवस्थेत भक्ति प्रेमाचाच ओलावा असे.

श्रीदीक्षितस्वामींच्या संकल्प इच्छा शक्तीप्रमाणे अमरापुरात सद्गुरूंचे स्थान निर्माण झाले. 'श्रीवासुदेवानंद दत्त अमरेश्वर' या नावाने हे स्थान स्थापन झाले. येथे श्रीदत्तप्रभूंची स्थापना झाली. श्रीसद्गुरुवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांच्या वस्तू, प्रतिमा, खडावा, श्रीपादुका साहित्य येथे दर्शन पूजनासाठी ठेवण्यात आल्या. मग येथे नित्यपूजा महोत्सव सुरू झाले. अगदी वाडीसारखे सारे काही सुरू झाले.

## पहिला भागवत् सप्ताह

चातुर्मास संपण्याचे पूर्वी भाद्रपदी पौर्णिमेला भागवताचा सप्ता वाडीत असतांना वे. शा. सं. श्रीधुंडिराजशास्त्री कवीश्वरांचेकडून ते जसा करवून घेत तसा अमरापुरातदेखील त्यांनी शास्त्रीबुवांचे चिरंजीव वे. शा. सं. श्रीदत्तात्रेयशास्त्री यांचेकरवी करविला. यावेळी श्रीदत्तात्रेयशास्त्री पाठशाळेत संस्कृत शिकायला नुकतेच जाऊ लागले होते. भागवताचा सप्ता करण्याइतकी त्यांची तयारी नव्हती. तथापि महाराजांनी त्यांनाच सप्ता करा म्हटले, "नुसता मूळ ग्रंथ वाच म्हणजे झाले" बाल दत्तात्रेयशास्त्रींनी लगेच ही सद्गुरूंची आज्ञा मान्य केली. यावेळी दत्तात्रेय शास्त्री अवघे सोळा वर्षांचे होते.

हे श्रीमद्भागवत ग्रंथाचे संहिता वाचन श्रीदत्तात्रेयशास्त्रीनी प्रथमच केले. सात दिवसात–सप्तापद्धप्रमाणे–फार वेळ न लावता–शुद्ध नि स्पष्ट उच्चारात हे वाचन केले. स्वतः श्रीनृसिंहसरस्वतीस्वामीमहाराजांनी हा सप्ता–संपूर्ण सात दिवस–श्रीदत्तात्रेय-शास्त्रींच्या जवळ बसून–साद्यंत ऐकला. त्यांना फारच समाधान झाले. त्या प्रसन्नतेमध्येच

स्वामीमहाराजांनी उत्स्फूर्तपणे आशीर्वाद दिला "दत्ता तू पूर्ण ज्ञानी होशील. आता-पासून भागवत सप्ताह सुरू कर. या भागवत सप्ताहामुळे तुझ्याकडून फार मोठा धर्म-प्रचार होईल. तू माझा प्रिय भक्त आहेस. तुझ्यावर ईश्वराची फार मोठी कृपा आहे." असे म्हणून स्वामींनी बालशास्त्रींच्या अंगावर स्वहस्ते उंची शाल घातली. चांदीचे संध्या-पात्र दिले. या सद्गुरु कृपाप्रसादाने बालशास्त्रींची वृत्ती भावभक्तीने भारावून गेली. अन्तस्थ सद्गुणांची जाणीव असलेल्या सद्गुरुस्वामींनी शास्त्रीबोवांच्या गुणाचे अन्तःकरणपूर्वक कौतुक केले. या कौतुकाने शास्त्रीबोवांची श्रद्धा शतगुणीत झाली. उत्साहाला शक्ती मिळाली. विद्येला आदर्श मिळाला. कर्तृत्वाला रस्ता मिळाला. जीवनाला आधार मिळाला. परंपरेला उजाळा आला. स्वामी केवळ कौतुक करून थांबले नाहीत. एका नौकेला पताकांनी सजविले. श्रीमद् भागवत त्यात ठेवले. तुलसीहार फुलांनी भागवताची पूजा केली. जवळ १६ वर्षांचे बाल दत्तात्रेयशास्त्री बसविले. प्रसादाची उंची शाल पांघरविली. चंदन कुंकुम त्यांच्या भाळी लावले. सुंदर पुष्पांचे हार गळ्यात घातले. स्वतः शेजारी बसले. वैराग्याच्या कुशीत ऐश्वर्य बसले. नाव भक्तांनी भरली. श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे । हे नाथ नारायण वासुदेव । प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ । मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।। या महामंत्राचे लयबद्ध, सुरेल भजन सुरू झाले. दत्तप्रभूंचे जयजयकार झाले. सद्गुरूंचे जयजयकार झाले. मधून मधून 'दिगंबरा दिगंबरा' महामंत्राचे भजन झाले.

बाल दत्तात्रेयशास्त्री संकोचून गेले होते. नुसते भागवत वाचले आपण. काही कळले सुद्धा नाही. तरी हे कौतुक ? नाही, हे माझे कौतुक नाही. श्रीमद्भागवताचे हे सामर्थ्य आहे. अशा विचारांनी ते पूर्ण अंतर्मुख झाले होते. गुरूंनीच जवळ घेतले, सर्व करवून घेतले, नाही कशाला म्हणताच आले नाही. हे करण्यात गुरु प्रसन्न होतात मग आपण नाही म्हणून त्यांची प्रसन्नता का कमी करायची ? म्हणून ते गप्पच होते. त्यांना वाटत होते -

**हे माझ्याचसाठी झाले । परि म्यां नाही केले ।**
**ऐसे जेणे जाणितले । तो सुटला गा ॥ —ज्ञानेश्वरी.**

नाव संथपणे श्रीकृष्णामाईच्या तरंगावरून तरंग होती. समोर मनोहर पादुकांचे रम्य मंदिराचे दर्शन होत होते. ही भक्तांनी भरलेली नौका सद्गुरूंच्या छायेत, भागवताच्या आधारवर, आनंदाची लयलूट करीत, भवसागर तरून जात होती. सर्वांना जगाची विस्मृती झाली होती. सत् चित् आनंदाच्या अनुभूतीमध्येच सर्वजण रमले होते. दत्तात्रेयशास्त्रींनी श्रीकृष्णामाईला वंदन केले. मनात म्हणाले—

**समर्था थापि त्वं शिशुवचनवन्मे शृणु मुदा ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरु मते ॥**

नावेने सिमोल्लंघन केले. भक्त मंडळी भवसागराच्या पैलथडीला गेली. भगवंताच्या जयजयकाराने दशदिशा कोंदून गेल्या. स्वर्गीचे देव या दृश्य दर्शनात स्वर्ग सुखाचा अनुभव विसरले. या परमोच्च आनंदाला आपण स्वर्गात येऊन मुकलो. यांची त्यांना चुटपुट लागली. पण कर्म फळ अटळ असल्याने ते बिचारे स्वर्गातच अडकून पडले. या परमानंदाला सर्व श्रेष्ठ आनंद मानतात. तो पराभक्तीनेच लाभतो. ती पराभक्ती भागवतात भरलेली आहे. म्हणून भागवत सप्ताह समाप्तीचा सोहळा ही परमानंद पर्यावसायी होत असतो. कुरुंदवाडहून नाव परतली आणि अखेरपर्यंत या आनंदातच 'श्रीवासुदेवानंददत्तामरेश्वरास' येऊन पोचली.

## शिष्यातील वंदनीयत्व सद्गुरु दाखवितात

ज्ञानेश्वर वंदनीय आहेत हे सद्गुरु निवृत्तीनाथांनी दाखवून दिले. हे दाखविण्यासाठी त्यांनी सांगितले "ज्ञाना भगवद्गीतेचा भावार्थ समजून सांग." ज्ञानदेवांना ती सद्गुरूंची आज्ञा होती. नेवाशाला हे कार्य सुरू झालें. गावातील मंडळी येऊ लागली. स्वतः सद्गुरु निवृत्तीनाथच श्रोते झाले. यातूनच ज्ञानदेवांचे वंदनीयत्व प्रकट झाले.

श्रीदीक्षितस्वामी वंदनीय आहेत हे सद्गुरुवासुदेवानंदांनी दाखवून दिले. हे दाखविण्यासाठी श्रीवासुदेवानंदांनी अनेक प्रसंगी त्यांच्याबद्दल स्वमुखाने सांगितले. दंडग्रहण सद्गुरुंच्याकडून होणारे एकमेव शिष्य श्रीदीक्षितस्वामीच होते. वेदांतातील अनेक ग्रंथ गुरुमुखाने ऐकले. या गुरुशिष्याच्या प्रेमाला जोड नव्हती. गुरु आज्ञा प्राण मानणारे श्रीदीक्षितस्वामी होते. केवळ गुरुआज्ञा म्हणूनच ते वाडीत रहात असत. या अनन्यतेमुळे शिष्याचे वंदनीयत्व स्वतः सद्गुरू अनेक प्रसंगी वारंवार प्रगट करीत असत. इतकेच नव्हे तर श्रीदीक्षितस्वामी म्हणजे प्रत्यक्ष प्रतिटेंबेस्वामीच अशीच सर्वांची धारणा होती. पण स्वतः सद्गुरुस्वामी म्हणत 'आम्ही चार आश्रम केले पण आमच्या शिष्याने पाचवा आश्रम (अवधूत अवस्था) ही सिद्ध केला. तो आमच्या पुढे आहे." हे सर्व शिष्याचे वंदनीयत्व गुरुमुखातून प्रगट झालेले आहे. यासाठी श्रीदीक्षितस्वामींचे चरित्र वाचनीय, चिंतनीय व मननीय आहे.

पू. वामनरावजी गुळवणीमहाराज वंदनीय आहेत हे श्रीलोकनाथतीर्थ सद्गुरूंनी दाखवून दिले आहे. आपण असताना दीक्षा देण्याचा अधिकार दिला. तेव्हां बार्शीकरांना त्यांचे वंदनीयत्व चांगलेच जाणवले. कारण तोपर्यंत एक सज्जन, धर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न पण मास्तर म्हणूनच सर्वजण त्यांना ओळखत होते. त्या सर्व लोकांच्या दृष्टीत श्रीलोकनाथ-तीर्थस्वामीमहाराजांनी परिवर्तन घडविले. वामनराव नुसते मास्तर नाहीत तर सद्गुरू आहेत हे प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध केले. सौ. गोपिकाबाईंची दीक्षा-'वामन तुम इनको देख लो' या शब्दांनी स्वतः स्वामींनी दाखवून दिले. वंदनीयत्व असल्याशिवाय सद्गुरुपण येत नसते आणि ज्या अधिकारी शिष्यात ते वंदनीयत्व आहे ते कधीही प्रगट करीत नसतात. म्हणून प्रत्यक्ष सद्गुरूच हे शिष्यातले वंदनीयत्व दाखवून देतात.

आज अमरापूरच्या 'श्रीवासुदेव दत्तामरेश्वर'च्या मंदिरात श्रीसद्गुरुदीक्षित-स्वामींनी-कल्पनाही नसलेल्या सोळा वर्षाच्या बालदत्तात्रेयशास्त्रींना भागवत सप्ताहास बसवून शास्त्रीबोवा वयाने लहान असले तरी वंदनीय आहेत हेच या प्रसंगाने सिद्ध केले आहे. सद्गुरू त्रिकालज्ञ अंतर्ज्ञानी असतात म्हणून ते सांगतात. दाखवितात ते पूर्ण सत्यच असते. या सप्ताहात सर्वांनी बालदत्तात्रेयशास्त्रींच्या चरणावर मस्तक ठेवले. आणि हे विलोभनीय दृश्य मोठ्या संतोषाने सद्गुरुस्वामी पहात होते. शिष्याचा संकोचही नाहिसा करीत होते.

श्रीदत्तात्रेयशास्त्रींचा पुढील जीवनात श्रीगुळवणीमहाराजांचा घनिष्ठ संबंध आला त्यावेळी संबंध आल्यापासून श्रीगुरुमहाराज आपल्या व्यक्त जीवनसूर्याचा अस्त होईपर्यंत सतत प्रत्येकाला, याच शास्त्रीबोवांना 'दत्तमहाराज' असे स्वतः म्हणून तुम्हीही याच नावाने त्यांचा उल्लेख करीत जा हे दाखवून देत होते. इतकेच नव्हे तर आपल्या सन्निध कुठेही दत्तमहाराज असले तर नमस्कार करणाऱ्याला सांगत होते, "दत्तमहाराजांना नमस्कार करा." हे वंदनीयत्व आणि पूजनीयत्व महाराज प्रत्येकाला कृतीने जाणवून देत होते.

श्रीदीक्षितस्वामींनी श्रीदत्तात्रेयशास्त्रींना म्हटले-'आता असा हा सप्ताह दरवर्षी प्रौष्ठ पदीत आपण चालू ठेवायचा.' याप्रमाणे शके १८४७ ला हा सप्ताह सुरु झाला. दरवर्षी श्रीदत्तात्रेयशास्त्री कोठेही असले तरी भाद्रपदातील या सप्ताहासाठी येऊ लागले. शके १८४८ च्या सप्ताहात श्रीदीक्षितस्वामी नव्हते. ते काशीयात्रेला गेले होते. वाडी सोडण्यापूर्वी श्रीदत्तात्रेयशास्त्रींना सप्ताहाची आठवण दिली होती. आदले वर्षीप्रमाणे दुसरे वर्षीचा सप्ताह झाला. सद्गुरुस्वामी काशीयात्रेला गेले होते. तरी सप्ताह चांगलाच झाला. पुढे अश्विन व॥ ७ ला अयोध्येला स्वामीमहाराजांचे महानिर्वाण झाले. भक्तांना अतिशय दुःख झाले. यानंतर श्रीदत्तात्रेयशास्त्री श्रद्धेने प्रौष्ठपदीच्या भागवत सप्ताहास अमरापुरास जाऊ लागले. यात कधीही खंड पडला नाही. हा नियम शके १८८७ (इ. स. १९६५) पर्यंत चाळीस वर्षे चालू होता. यानंतर पुण्यात श्रीवासुदेव निवास निर्माण झाला. तेव्हा श्रीसद्गुरुगुळवणीमहाराजांनी त्यांना आश्रमात भागवत सप्ताह करण्यास सांगितले. दरवर्षीच्या सप्ताहात खंड पडला नाही. तो अखंडच चालू आहे. वासुदेवानंद दत्तामरेश्वरातून तो श्रीवासुदेव निवासात सुरू झाला. आणि या योजनेने परंपरेचा प्रवाह अधिक प्रकर्षाने पुढे वाहू लागला

## पुरातून पोहून सद्गुरूंची भेट

सांगलीच्या पाठशाळेत अध्ययन चालू असताना मधूनमधून वाडीला येणे होत असे. वाडीत आल्यावर प्रथम औरवाडला (अमरापूर) जाऊन सद्गुरुस्वामींचे दर्शन घेऊन यायचे, घरी आजी (आईची आई) असे. तिला सांगून जायचे.

एका अधिक महिन्यातील घटना आहे. पावसाळ्याचे दिवस. श्रीदत्तात्रेयशास्त्री ांगलीहून वाडीस आले. सकाळची वेळी घरी गेले. आजीची भेट घेतली. त्या दिवशी गधिकाचे तीन ब्राह्मण भोजनाला येणार होते. आजीची तयारी चालली होती. थोडा वेळ गाहे. जाऊन येता येईल अमरापूरला असा विचार करून श्रीदत्तात्रेयशास्त्री आजीला हणाले "आजी मी अमरापुरला जाऊन येतो" तेव्हा आजी म्हणाली 'अरे ! आपल्याकडे माज ब्राह्मण जेवायला येणार, तुला जायलाच पाहिजे का ? आता गेलास तर वेळेवर ारत येता येईल का ?' त्यावर श्रीदत्तात्रेयशास्त्री म्हणाले "आजी ! सांगलीला गेल्यापासून वामीमहाराजांचे रोज दर्शन होत नाही. बरं संध्याकाळी परत जायचय ! आत्ताच जाऊन ोतो की, अकरा वाजेपर्यंत येईन." आजीच्या मुखातून अनुज्ञा मिळाली, "बरं ! पण ीट जपून जा, पावसाळ्याचे दिवस आहेत."

श्रीदत्तात्रेयशास्त्री सद्गुरुंच्या भेटीला निघाले. घाटावर आले. कृष्णेला पूर आलेला होता. पुरात पोहणे शास्त्रीबोवांना नवीन नव्हते. उलट, पूर पाहिला की पोहणारालाुद्धा स्फूर्तीच चढते. शास्त्रीबोवांनी धोतर आवरले, उपरणे डोक्याला बांधले. पहिल्यापासून अंगावर वस्त्रे दोनच–धोतर आणि उपरणे ! पुरात पोहताना उड्या मारायच्या जागा ठरलेल्या असतात. वाहत्या बाजूच्या विरूद्ध दिशेला वर जावे लागते. तिथून उडी मारली म्हणजे प्रवाहाबरोबर वहात–हात मारीत–तिरक्या दिशेने पण प्रवाहाच्या मध्याकडे जाण्याचा प्रयत्न करायचा. नदीच्या एका काठावर वरून–खाली पुरात येणे सोपें असते. पण नदी ओलांडून पैलतीर गाठायचे म्हणजे तोंडच्या गोष्टी नाहीत. त्यातून कृष्णेसारखी मोठ्या पात्राची आणि पाण्याला ओढ असलेली नदी. त्यातून पूर ! नदीला ओढ वेगळी असते आणि भेटीची ओढ वेगळी असते. दोन्ही ओढी परस्पर विरुद्ध असतात. एक ओढ पाण्यात खेचते तर दुसरी ओढ पुढे ढकलते. हे पाण्याची पाण्याशी युद्धच असते. पण सराईत–पट्टीचे पोहणारे यालाच खेळ समजतात. पोहणाऱ्यांचा आत्मविश्वास मोठा असतो. पाण्याच्या खुब्या ओळखून पोहायचे असते. प्रकृती दमदार लागते. बदलत्या प्रवाहाचे, भोवऱ्याचे अंदाज घ्यावे लागतात. शास्त्रीबोवांचा पोहणे हा आवडता छंद होता. हा छंद हाच त्यांचा नित्याचा व्यायामही होता. यामुळे पाण्यात कधी दमछाट होण्याची भीती रहात नाही.

कृष्णेचे पात्र सागरासरखे विशाल झाले होते. इकडे घाटावर पाणी होते तर तिकडे औखाडच्या गावाजवळ पाण्याची दुसरी हद्द भिडली होती. शास्त्रीबुवांनी 'श्रीगुरुदेदत्त' म्हणून सूर मारला आणि अथांग कृष्णेच्या पात्रात पोहायला सुरवात केली. हा हा म्हणता पैलतीर गाठले. डोक्यावरचे उपरणे पिळले, ते नेसले आणि धोतर पिळून घेतले व मठाच्या मंदिरात गेले. स्वामी पूजेत तल्लीन झाले होते. पण लाडका शिष्य आल्याचे लक्षात येताच चौकशी केली. शास्त्रीबोवांनी साष्टांग नमस्कार घातला आणि संकोचाने सद्गुरूंच्या प्रश्नांना उत्तरे देत जवळ उभे राहिले. स्वामी पूजेतून

उठले. कोरडे धोतर शास्त्रीबोवांना नेसायला दिले. कोरडे उपकरण पांघरायला दिले आज भोजन प्रसादाला इथेच थांब म्हणाले. शास्त्रीबोवांनी घरी आजीला 'जेवायला येतो' म्हणून सांगून आलो. असे सांगितले. मग स्वामींनी प्रसाद दिला. पुनः नमस्कार करून शास्त्रीबोवा परतले. सद्‌गुरूंची–साधू–संतांची भेट पारमर्थिक सुखाच्या देवाण घेवाणीची असते. लौकिक भेट व्यावहारिक असते. सद्‌गुरूंच्या दर्शनाने–भेटीने आनंद आणि उत्साह कल्पनातीत मिळतो. हे पारमार्थिक सुख असते. आज थांबायला मिळालं नाही म्हणून मन जरा नाराजही झाले. पण दर्शनाच्या आनंदाने ती नाराजी नाहिशी झाली.

लगबगीने कृष्णेच्या काठावर आले. पुरात उडी घेतली आणि हात मारायला सुरवात केली. पैलतीराच्या जवळ आले आणि एका भोवऱ्यात सापडले. भोवऱ्यातून निघणे फार कठीण असते. पोहणारा भोवऱ्यात खाली खेचला जातो. स्वतःभोवती गरगर फिरायला लागतो. इथे विश्वास रहात नाही. क्षणभर मनाला कसेसे झाले पण त्यांनी श्रीदत्तप्रभूंचे स्मरण केले. तेवढ्यात त्यांना श्रीदत्तप्रभूंचे दर्शन होऊन त्यांनीच त्यांना भोवऱ्यातून ओढून काढले व तेथेच अदृश्य झाले. अशा प्रकारे सद्‌गुरूभक्तीचे फळही अनुभवास आले. शास्त्रीबोवा भवसागराच्या भोवऱ्यात अडकले असता श्रीदत्तप्रभूंच्या कृपेने व सामर्थ्याने त्यात न सापडता पार पडले याचा तो पूर्व वयातील सूचक पण प्रत्यक्ष अनुभव होता.

श्रीदत्तात्रेयशास्त्रींचा व क्षेत्र श्रीनृसिंहवाडीचा जन्मभूमि, सिद्धभूमि, पावनभूमि म्हणून बालवयात संबंध आल्यामुळे येथील प्रत्येक स्थान अनेक स्मृतींचे भांडार झालेले आहे. वर्षातून अनेक वेळा अनेक कारणांनी जाण्याचा प्रसंग आल्यामुळे वाडीशी अभिन्नत्व आले आहे. कृष्णामाईचे दर्शन घेताना किती तरी आठवणी, स्मृतीपटलावर तरंगित होऊन कृष्णेच्या तरंगात विलीन होतात. देवाच्या कट्ट्याजवळ आल्यावर दत्तमहाराज अनंत स्मृतींच्या स्पंदनांनी मंत्रमुग्ध होतात, भारावून जातात. बाल स्नेहांचा सहवास, कृष्णेमधील पोहण्याचे विविध अनुभव, देवाचे विविध उत्सव, पालखी सोहळा, त्यामधील विविध आठवणी, श्रीदीक्षितस्वामींचा सहवास, त्यातील आठवणी, कट्ट्यावरून औरवाडच्या आठवणी इ. स्मृतींचा महासागर अन्तःकरणात या ठिकाणी उचंबळून येतो.

## विवाह

श्रीदत्तात्रेयशास्त्रींचे अध्ययन सांगलीच्या पाठशाळेत चालू होते. पितृचरण श्रीधुंडिराजमहाराज व श्री सौ. आईसाहेब देऊळगावराजाला रहात होते. तिकडून श्रीधुंडिराजमहाराज प्रवचन-पारायणासाठी गावोगावी जात असत. या वार्षिक कार्यक्रमात वाडीलाही त्यांचा मधून मधून मुक्काम होत असे. धर्मप्रचाराचे अखंड कार्य पिढ्यान्-पिढ्या करणारे हे घराणे आहे. बार्शी गावी प्रवचन पुराणासाठी श्रीधुंडिराजमहाराज

अनेक वेळा जात. तेथेही त्यांचा मोठा शिष्यपरिवार आहे. येथे बार्शीत एका भक्ताने त्यांना घर गुरुदक्षिणा म्हणून दिले. त्यामुळे श्रीधुंडिराजमहाराजांचा मुक्काम बार्शीतही अनेक दिवस होत असे.

बार्शीमधील महाराजांच्या शिष्य–परिवारात भगवंतराव पाठक एक भक्त होते. भगवंतराव पाठकांनी महाराजांकडून मंत्रोपदेश घेतला असल्याने उभयतांचे नाते गुरु-शिष्याचे होते. साधे-बाळबोध घराणे होते. ते बार्शी गावातच घर असल्यामुळे श्री. सौ. सरस्वतीबाई आईसाहेबांच्या नजरेखालून भगवंतरावांची सुकन्या गेली. सुंदर मुलगी पाहून आईसाहेबांनाच मुलीबद्दल आपलेपणा उत्पन्न झाला. त्या मुलीचे नावही 'सुंदर' होते. आईसाहेबांना वाटले एकदा मुलगी बघून तर ठेवावी. ईश्वरी योजना असल्या म्हणजे सूत्रे कशी सहजतया हालत असतात ते अशा प्रसंगातून लक्षात येते. त्या त्या वेळी तशी बुद्धी होऊन कार्य घडत असते. लग्नाच्या व्यवहारात मुली दाखविणे आणि पहाणे हा कार्यक्रम अनेकांच्या नशीबी वर्षानुवर्षे चाललेला असतो. तोही नियतीचाच खेळ असतो, पण! सहज घडले की आश्चर्य वाटते, इतकेच!

एकदा श्री. सौ. आईसाहेब सकाळच्या वेळी सहज ओटीवर बसल्या होत्या. तेवढ्यात ती मनात भरलेली मुलगी 'सुंदर' दारावरून जाताना दिसली. परकर पोलके नेसलेली 'सुंदर' बाजारातून काही घेऊन घरी चालली होती. तिला पाहताच श्री. सौ. आईसाहेबांनी तिला हाक मारून म्हटले "सुंदर! जरा घरात ये ना!" परकराच्या ओच्यात आणलेली वस्तू धरून ती चालली होती. आईसाहेबांची हाक ऐकून सुंदर थोडी गडबडली. पण ती आईसाहेबांची हाक होती. ज्यांना आपण सर्वजण वंदनीय म्हणून नमस्कार करतो त्यांची हाक होती. सुंदर संकोचाने परंतु निशंक मनाने आली. म्हणाली "आईसाहेब आपण मला हाक मारलीत?"

आईसाहेब—"हो! कुठे गेली होतीस?"

सुंदर—"बाजारात वस्तू आणायला!"

आईसाहेब—"काय ग, या वाड्यात तुझ्या मैत्रिणी आहेत का?"

सुंदर—"हो! आहेत की!"

आईसाहेब—"मग येत जा की इकडे."

सुंदर—"येईन की."

तेवढ्यात सुन्दरने सहज बाजूला पाहिले. एका खुर्चीवर एक तरूण व्यक्ती वाचनात गुंग असलेली दिसली. घरी गेले पाहिजे या विचाराने सुंदरने आईसाहेबांना नमस्कार केला आणि "येते हं!" म्हणून निघून गेली.

घरी गेल्यावर काकांनी विचारले, 'का ग सुंदर वेळ का लागला?'

सुंदर—अहो काका, शेजारच्या आईसाहेबांनी हाक मारली म्हणून गेले होते त्यांच्या घरी.

काका—अशीच गेलीस ? परकरात पुडी घेऊन ? घरी येऊन, जरा आवरून सावरून जायचं की नाही ?

सुंदर— आईसाहेबांनी बोलावले की लगेच जायला हवं अशी तुमचीच सांगी असते, म्हणून गेले तशीच !

काका— अग पण त्यांचा थोरला मुलगा दत्तात्रेय आलेला आहे घरी. काकांच्या या वाक्यातला हेतू सुंदर समजू शकली नाही. कारण ती अवघी बारा वर्षांची होती. म्हणजे आईसाहेबांच्या मनात मुलगी पाहून जो विचार आला तसाच विचार दुसऱ्या बाजूच्या पाठक मंडळींपैकी किमान काकांच्या मनात तरी येऊन गेला असला पाहिजे. हे सुंदरशी झालेल्या बोलण्यावरून लक्षात येते. या घडलेल्या प्रसंगातूनच मुलीची पसंती लक्षात घेऊन काका आणि सुंदरचे वडील यांनी विचारविनिमय केला. मुलाच्या पसंतीचा प्रश्नच नव्हता. कारण असा मुलगा मिळणे दैवदुर्लभच होते. रूप–प्रकृति–कुल–घराणे सर्व काही दुर्मिळ होते. आपल्या मुलीला या 'शुचिनां श्रीमंता गेहे' मध्ये पसंती मिळावी म्हणून किती तरी मुलींचे वडील खटपटीत होते. भगवंतराव पाठक स्थळाबद्दल एवढ्या मोठ्या अपेक्षा करीत नव्हते. पण श्री. सौ. आईसाहेबांनी कारण नसता बोलावून घेतले, येत जा म्हणाल्या, एवढ्यावरून त्यांच्या मनात आशेचे किरण चमकून गेले. काका आणि वडील यांनी एके दिवशी ठरविले की–

श्रीधुंडिराजमहाराज आज देऊळगावराजाहून येणार आहेत. टांगा घेऊन स्टेशनवर जायचे व तेथूनच आपल्या घरी घेऊन यायचे आणि हा विषय काढून बोलणीच करायची. त्याप्रमाणे पाठक मंडळी टांगा घेऊन गेले स्टॅंडवर. तर आश्चर्य असे की चार वधू पिते असाच विचार करून टांगे घेऊन आले होते. गाडी आली. हे वधू पिते लगबगीने पुढे झाले. पण योगायोग ! काकांची भेट होऊन महाराजांनी घरी येण्याचे कबूल केले. काका श्रीधुंडिराजमहाराजांना घेऊन घरी आले. मुलगी पाहण्यातली होतीच. पत्रिकाही पाहिली होती. तेव्हां सुंदरचे वडील म्हणाले– आज बैठक करून निर्णय होऊन बाहेर पडायचे.

श्रीधुंडिराजमहाराज म्हणाले, "ठीक आहे. आमच्या अटी काही नाहीत. मानपान वगैरे अपेक्षाही नाही. परंतु वाडीला येऊन लग्न करून द्या म्हणजे झाले. सुंदरच्या वडिलांनी ते मान्य केले, लग्न ठरले, बैठक झाली. पाठक घराण्यात आनंदीआनंद झाला. मुलीचे भाग्य मोठे असे सर्वांना वाटले. सौ. आईसाहेबांना सुंदरचे वडील म्हणाले "मुलीला आई नाही, आपण तिला आई मिळालात. भाग्य आहे तिचे" आपल्यासारख्या ईश्वरीकृपाप्रसाद असलेले कुळ तिला मिळाले. ही केवढी मोठी आमच्यावर गुरुकृपा आहे"

धुंडिराज महाराजांनी विवाह पत्रिका काढली—

श्रीगणेश

**श्रीमन्मंगलमूर्त्यखंड कृपया शाके खबाणाष्टभू— ।**
**युक्ते फाल्गुनमासि भार्गव दिने कृष्णा चतुर्थी तिथीः ॥**
**तस्यां ज्येष्ठ सुतस्य सत्परिणयो दत्ताभिध्येयस्य वै ।**
**सुंदर्याख्य वधू स्तु पाठक कुलोत्पन्ना सुभाग्यैषिणी ॥१॥**
**विज्ञप्ति स्तत्रभवान् सकुटुंबोऽवश्यमेत्य परिवारैः ।**
**समलंकरोतु मंगलविवाह कार्यं सदाशीर्भिः ॥२॥**

सप्रेम विनंती विशेष

आमचे घरी श्रीगणेशकृपेकरून आमचे ज्येष्ठ चिरंजीव **वक्रतुंड** (दत्तात्रेय) याचा विवाह मिती फाल्गुन वद्य ४ शके १८५० शुक्रवार ता. २९–३–२९ इ. रोजी दिवसा घ. २५ प. २८ (स्टँ. टा. ४-४५ वाजता) निश्चित केला आहे. शरीरसंबंध वे. भगवान धोंडिबा पाठक, बार्शीकर यांची कन्या सौभाग्य कांक्षिणी, चि. **सुंदराताई** इजला वधू नेमस्त केली आहे. हे मंगल कार्य श्रीनरसिंहवाडी क्षेत्री श्रीदत्त चरणाजवळ होणार आहे. कार्य सिद्धीस नेणार श्री समर्थ आहेत. तरी आपण सहकुटुंब सहपरिवार अगत्य येऊन कार्य सिद्धी करावी. आपण आल्याने कार्यास विशेष शोभा येऊन आम्हास आनंद होणार आहे. कळावे ही विनंती.

श्रीक्षेत्र नरसिंहवाडी — आपला
ता. ८–३–२९ — धुंढिराज वक्रतुंड कवीश्वर

सूचना– श्रीनरसिंहवाडीस येणेचे ते एस. एन्. रेल्वेने व्हाया मिरज जयसिंगपूर स्टेशनने यावे, मोटारीची सोय आहे.

मोठ्या सोहळ्याने विवाह झाला. कवीश्वर घराण्यात श्रीगणेशाची उपासना असल्याने विवाह तिथी संकष्टी चतुर्थी निवडली होती. लग्न सोहळा पाच दिवस मोठ्या थाटामाटाने साजरा झाला. आता चि. कु. सुंदर या चि. सौ. लक्ष्मीबाई झाल्या.

भगवानराव पाठक कृतार्थ झाले. त्यांना फार मोठी धन्यता वाटत होती. त्यांच्या अन्तःकरणातील भावना साश्रुनयनांनी बाहेर पडत होत्या. 'आता मुलगी आपलीच झाली.' एवढे शब्द फक्त मुखातून बाहेर पडले. मुलीला हवाली करून पाठक मंडळी बार्शीला गेली.

विवाहाचे वेळी श्री. दत्तात्रेयशास्त्रींचे वय २० होते, तर सौ. लक्ष्मीबाई १२ वर्षांच्या होत्या. सौ. लक्ष्मीबाईंनी सासुबाईंच्याबरोबर प्रदक्षिणा घालण्याचा नेम धरला. वाडीला मुक्काम असेपर्यंत हा प्रदक्षिणेचा नेम सौ. लक्ष्मीबाईंनी अखंडपणे चालविला.

तसेच श्रीदत्तमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे रोज दत्तमाहात्म्याचा एक अध्याय वाचणे आणि श्रीवासुदेवानंदसरस्वतीच्या ओवरीत संध्याकाळी थोडावेळ दिगंबराची धून सांगणे या दोन गोष्टींचाही नेम त्यांनी चालविला. संगत आपला संस्कार कशी करते हे लक्षात येते. कवीश्वर घराण्यात ईश्वरोपासनेचे बाळकडू प्रत्येकाला मिळत गेल्याने प्रत्येक व्यक्ती ईश्वरोपासक होत जाते. वयाच्या १२/१३ व्या वर्षी देवाला १०८ प्रदक्षिणा, दत्त-महात्म्याचा एक अध्याय आणि दिगंबराची धून एवढे नियम सुरू झालेले पाहिले म्हणजे आजकाल आमच्या घरातील लेकी-सुनांना असा उपासनेचा काही संस्कार-काही वळण आहे का ? याची आठवण येते. मग लहान मुलांवर काय संस्कार होणार ? याशिवाय घरातील वडीलधारी माणसे आचारधर्म पाळणारे असले की सहजासहजी कितीतरी नियम–पद्धती शास्त्रशुद्ध समजतात. आचार वर्तनाचा संस्कार तर सर्वात मोठा असतो. सोवळे–ओवळे, नेवैद्य-वैश्वदेव, स्पर्शा-स्पर्श, कुलधर्म–कुलाचार, खरकटे-चोखट, जेवण–धान्यफराळ, सकच्छ–विकच्छ अशा कितीतरी गोष्टी घरात आचारधर्म न पाळल्याने समजतच नाहीत. त्याला काही महत्व नाही असेच वाटू लागते. जणू ते कर्मठांचे आग्रही वर्तन होते त्याची गरज नाही असा विपरीत समज होतो. म्हणून सौ. लक्ष्मीबाईंच्या भाग्याची धन्यता वाटते. घरात अग्निहोत्र असेल तर यापेक्षा अधिक पटीने आचारांचे मार्मिकत्व नित्यक्रमात दिसते. वाडीच्या घरात असे अग्निहोत्र चालू होते.

श्रीधुंडिराजमहाराजांची सर्वांच्या भावनेशी समरस होण्याची क्षमता फार मोठी होती. म्हणून तर ते बालगोपाळांत रमून जात. शास्त्री–पंडितांमध्ये रमून जात. दुःखी–कष्टी लोकांमध्ये समरस होत असत. या त्यांच्या गुणाचा प्रत्यय एक घटना वाचून वाचकांना येईल.

सिनेमा-नाटक यांचे आकर्षण प्रत्येकाला सामान्यतः असते. ज्याला नसेल तो स्वाभाविकपणे असामान्यच म्हटला पाहिजे. वाडीला या काळात सिनेमाचे फिरते टॉकिज आले होते. म्हणजे तंबूतला सिनेमा आला होता. इ. स. १९२९/३० चा काळ होता तो सिनेमाचे वेड सुरू व्हायचे होते. कुतुहल म्हणून लोक सिनेमा पाहायला जात. अशा स्थितीत श्रीधुंडिराजमहाराजांना वाटले की, सूनबाईचे वय लहान आहे. लहान मुलांमध्ये कुतुहल फार असते. आपल्या सुनबाईला सिनेमा पाहावासा वाटत असेल. आपला दरा काही तिला नेणार नाही. म्हणून श्रीधुंडिराजमहाराजांनी सूनबाईसाठी मुद्दाम आईसाहेबांना विचारले "काय आपण सिनेमाला जाऊया काय ?', आईसाहेब म्हणाल्या, "मला नाही तुमचा सिनेमा–बिनेमा आवडत, तुम्ही आपल्या सुनेला घेऊन जा." याचा असा अर्थ नाही की, श्रीधुंडिराजमहाराजांना सिनेमा आवडत होता. दुसऱ्याच्या अंतःकरणाला सुखावणे ही संतांची वृत्ती असते. अशा नाजुक बाबतीत ते कुशलतेने व्यवहार सांभाळतात. त्यातूनही सर्व दृश्य जगताकडे पहाताना ते विवेकबुद्धीने पाहणारे असतात. त्यामुळे त्यांच्या चित्तावर विपरीत परिणामही संभवत-

नाही. पू. श्रीगुळवणीमहाराज तर कलेच्या दृष्टीने पहाणारे होते. त्यांनीही एकदोन सिनेमे पाहिल्याचा उल्लेख आहे, म्हणजे काय ते सिनेमा शौकिन होते असे समजणार काय? विवेक ही फार मोठी शक्ती आहे, ती जागृत झाली म्हणजे बुद्धी योग्य-चांगले तेवढेच ग्रहण करते. त्यांनी तर सिनेमा पाहिल्यावर ब्रह्म मायेच्या खेळाचा आधुनिक दृष्टांतच सिनेमाचा सांगितला. ब्रह्म हे सिनेमातील केवळ प्रकाश आहे आणि त्या प्रकाशाच्या आधाराने विविध दृश्ये ही माया आहे असे सांगितले. आणखी म्हणाले, प्रकाश नसेल तर विविध दृश्ये निर्माण तरी होतील का? हा दृष्टांत सुचणे म्हणजे सिनेमाकडे पाहाण्याची त्यांची दृष्टी काय होती यावर प्रकाश पडतो. असो. श्रीधुंडिराजमहाराजही अशाच विवेक दृष्टीचे होते. पण लहान वयाच्या सुनेच्या समाधानासाठी त्यांनी सिनेमा पाहिला. सून आणि सासरे सिनेमाला गेले. त्यामुळे सुनेच्या मनावर सासऱ्याच्या प्रेमळ वृत्तीची छाप आयुष्यभर राहिली. संसारात कसे वागावे हे किती सहजपणे शिकविले! अलिप्त राहिल्यावर संसारात सर्व काही करता येते. जमत नाही ते अलिप्त रहाणे, म्हणून प्रत्येक कर्मांचा विपरीत परिणाम नि अनुभव येत असतो. तुकाराममहाराज सुद्धा 'अवघाचि संसार सुखाचा करीन' म्हणतात. याला दुसरे अर्थ आहेत पण मनाचा पक्केपणा आल्यावर म्हटलेले हे शब्द आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

सौ. लक्ष्मीबाईंच्या घरी धार्मिक उपासनेचे वातावरण कवीश्वरांच्या घरासारखे नव्हते. त्यामुळे सौ. लक्ष्मीबाईंचे मन गोंधळून जात असे. घरी नित्य कोणी ना कोणी येणार, त्यांचेशी धार्मिक चर्चा होणार. व्रतांचे पालन, नित्यकर्मांचे पालन, शास्त्रनिष्ठ आचरण, हे सर्व सौ. लक्ष्मीबाईंना या नव्या घरात नव्याने दिसू लागले. त्यांच्या पतींची म्हणजे दत्तात्रेयशास्त्रींची मानसिक बैठक तर फारच वरच्या दर्जाची. अबोल स्वभाव, नित्य वाचनात मग्न, अत्यंत साधी रहाणी, गंभीरवृत्ती यामुळे सौ. लक्ष्मींबाईंना फार जड जात असे. एवढा परमार्थ मनाची तयारी झाल्याशिवाय झेपत नसतो. म्हणून सौ. लक्ष्मीबाई या साध्यासुध्या गृहिणी राहिल्या. वातावरणाने आणि संस्काराने त्या घडत गेल्या पण अंतरही राहिले.

## माहुरची ओहर यात्रा

पू. श्रीगुळवणीमहाराज आणि पू. श्रीधुंडिराजमहाराज यांचे स्नेहसंबंध फार जुने आहेत. याचे स्पष्ट आणि महत्त्वाचे कारण असे की, दोघांची गुरु परंपरा एक आहे. उपास्य दैवत एक आहे आणि श्रीक्षेत्रनृसिंहवाडी हे श्रद्धा स्थान आहे. त्यातूनही श्रीगुळवणीमहाराजांचे थोरले बंधू श्रीशंकरशास्त्री म्हणजे संन्यासी स्वामी-श्रीशंकरानंद भारती कौलवकर यांचा या क्षेत्रातील संबंध आधीचा असल्याने त्यांच्यामुळे श्रीवामनरावांचा संबंध अगदी लहानपणापासून या क्षेत्राशी, परंपरेशी आणि या परंपरेच्या परिवारातील, अनेक कुटुंबांशी आला. अधिकारी गुरुबंधूंचे संबंध तर फारच

जिव्हाळयाचे असतात. किती जिव्हाळयाचे हे जर स्पष्टच करून घ्यायचे असेल तर कवीश्वर घराण्याचे व श्रीवामनरावांचे सर्व प्रासंगिक म्हणजे लौकिक प्रसंग आणि त्यामधील परस्परांचे संबंध पहावेत. अशापैकी एक प्रसंग खाली लिहीत आहे.

इ. स. १९३२/३३ मधील एक घटना. कवीश्वरांची कुलस्वामिनी माहूरची श्रीरेणुकामाता. घरात मंगल झाले की, नूतन वधू–वरांना कुलस्वामिनीच्या दर्शनासाठी न्यावयाचे असते. याला ओहर यात्रा म्हणतात. ही प्रत्येक कुळाची परंपराच आहे.

श्रीधुंडिराजमहाराजांच्या घरात ज्येष्ठ चिरंजीव श्रीदत्तात्रेयशास्त्री यांचा विवाह होऊन ३/४ वर्षे होत आली. तेव्हा या नूतन दांपत्याला देवीच्या दर्शनाला नेण्याचे १९३२/३३ मध्ये जमून आले. यावेळी श्रीधुंडिराजमहाराजांनी हा विषय श्रीवामनराव गुळवणीमहाराज वाडीला आले असता काढला. तेव्हा श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, "घरच्या कार्यात मलाही आले पाहिजे. मीही येतो तुमच्याबरोबर." या यात्रेला श्रीधुंडिराजमहाराज, श्री. आईसाहेब, श्री. दत्तात्रेयशास्त्री, सौ. लक्ष्मीबाई आणि श्रीगुळवणीमहाराज मिळून गेले. माहूरला एक आठवडाभर मुक्काम होता. विधिवत कुलधर्म–कुलाचार झाले. तेथील सर्व स्थानांचे दर्शन झाले. माहुरला या मंडळींचा मुक्काम विष्णुदासबुवांच्या मठात होता. या परमार्थी मंडळींना परमार्थाशिवाय दुसरा विषय रुचत नसतो. म्हणजे या कालावधीत या सर्वांना केवढा आनंद झाला असेल! यांची यात्रा शास्त्रशुद्ध, आचार संपन्न स्थितीत झाली असेल! यानंतरही ही सर्व मंडळी, बडनेरा–श्रीसीतारामहाराजांची समाधी, कारंजा–श्रीनरसिंसरस्वतीस्वामीमहाराजांचे जन्मस्थान अशा स्थानांचे दर्शन–प्रसाद घेत मूर्तिजापूर, वाशीम इ० ठिकाणी जाऊन आलेली आहे. अशा लौकिक प्रसंगातून परस्परांच्या आत्मीयतेने दर्शन घडत जाते. श्रीगुळवणीमहाराज नूतन वधू सौ. लक्ष्मीबाईंना "सुनबाई" म्हणूनच नेहमी संबोधित असत.

## विवाह झाला तरी अध्ययन चालूच !

श्रीदत्तात्रेयशास्त्रींच्या अध्ययनाचा प्रारंभ पंडितप्रवर, विद्वत् शिरोमणी, पूजनीय पितृचरण श्रीधुंडिराजशास्त्री या गणेशस्वरूप विद्यानिधीपासून झाला. नंतर वाडीनिवासी पूर्वाश्रमीचे अहिताग्नी, वे. शा. सं. श्रीशंकरशास्त्री जेरे (संकेश्वर पीठाधीश शंकराचार्य) यांचेकडे साहित्य व्याकरण इ. विषयांचे अध्ययन झाले. नंतर सांगलीला वे. शा. सं. श्रीव्यंकटेशशास्त्री अभ्यंकर, यांचेजवळ व्याकरणाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर धारवाडला पंडित-विद्वत्कुलशेखर, विनयमूर्ती, सुप्रसिद्ध, राजमान्य पं. श्रीनागेशशास्त्री उप्पनबेटागिरी यांचेकडे तर सर्वशास्त्रांचे अध्ययन पूर्ण झाले. त्यानंतरही काही काळ काशी येथील महापंडित श्रीराजराजेश्वरी द्रवीड यांचेकडून अध्ययन झाले.

विद्वान व सदाचारसंपन्न गुणांचा लाभ सतत होत रहाणे हे फार मोठे भाग्यच

आहे. ते भाग्य अध्ययन क्षेत्रात श्रीदत्तात्रेयशास्त्रींना अखंड लाभत गेले आहे. अधिकार संपन्न मार्गदर्शक भेटले म्हणजे मूळच्या रत्नाला शास्त्रशुद्ध मर्यादांचे सुडौल कोंदण मिळाते त्या रत्नाच्या तेजाला प्रखरता येते. सौंदर्याला आकार येतो. आणि त्या रत्नाची किंमत सहस्त्र पटीने वाढते. मग सरस्वती प्रसन्नतेने जिव्हेवर नाचू लागते. असा शिष्य विद्यावाचस्पती होतो. त्याच्या मुखातून वेदान्तपारिजात सौरभ दश दिशांना पसरतो. परंतु यावरही कळस तेव्हां होतो की जेव्हां ही उच्चतम अवस्था प्राप्त होऊनही त्यासंबंधीचा अहंकारही चित्तात निर्माण होत नाही, सतत विनयाने नम्रता असते. त्यामुळे तर ती असाधारण विद्या या शिष्याच्या विनम्र वृत्तीने अधिकच शोभून दिसते इतर दिग्गज पंडित अशा विनम्र विद्यावास्पतीपुढे नतमस्तक होतात. ही विनम्रता शांत. चित्त झाले तरच निर्माण होत असते. निर्मत्सरता आली तरच निर्माण होते, निर्मम स्थिती आली तरच निर्माण होते. क्षमाशीलता आली तरच निर्माण होत असते. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी समभाव उत्पन्न झाला तरच अशी प्रगाढ विनम्रता निर्माण होत असते. अशा या दैवी असामान्य गुणांचा विनम्रता हा परिपाक आहे. तेव्हां भगवतीची आणि भगवंताची प्रसन्नता होत असते.

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**निर्ममो निरंहकारः समदुःख सुख क्षमी ॥**

हे ज्ञानोत्तर भक्ताचे लक्षण भगवंताच्या मुखातून आलेले येथे सर्वांना प्रत्ययास येते. तत्त्वज्ञान गुणातून साकार होते म्हणजे अशा गुणसंपन्न विभूति निर्माण होतात. गुणांना आश्रय मिळून ते गुण व्यक्त होणे म्हणजे सगुण आणि आश्रयविरहित गुण म्हणजे निर्गुण. अशा गुणसंपन्न विभूतींच्या वरील श्रद्धाभक्ती म्हणजे तत्त्वनिष्ठा आहे. याला व्यक्ती निष्ठा म्हणणे म्हणजे आपले अज्ञान आहे. भारतीय संस्कृतीला ललामभूत झालेल्या असंख्य विभूतींची पूजा भारतीय समाजाने डोळसपणे केली आहे. अव्यक्त आदर्शाचे अनुकरण असंभव आहे. तत्त्वस्वरुप झालेले व्यक्त आदर्शत्व अनुकरणास सुलभ होते याची जाणीव भारतीय जनमनाला आहे. म्हणून तर दिक्कालाच्या माथ्यावर पाय रोवून हे महापुरूष अमर झालेले दिसतात. या महापुरूषांचे अनुकरणीयत्व मान्य असलेला समाज जोपर्यंत पृथ्वीतलावर आहे. तोपर्यंत यांचे महानपण त्या विभूतींच्या माध्यमातून समाज मांगल्याचे कार्य करीत रहाणार आहे ही ईश्वरी योजना आहे.

## धारवाडमधील अध्ययन

धारवाडच्या श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य पाठशाळेमध्ये श्रीदत्तात्रेयशास्त्री इ. स. १९३३ ते ३७ पर्यंत होते. या पाठशाळेचे प्रधानाध्यापक, परमबुद्धिमान, परिपूर्ण विनयमूर्ति, न्यायवेदांतादि सकलशास्त्र निष्णात, ललीत संस्कृत भाषा प्रवचन चतुर, लोकव्यहारदक्ष, सर्वलोकप्रिय, म. म. विरुपाक्षशास्त्री चरण पट्टशिष्य अशा श्रीनागेशशास्त्री

उप्पिनबेट्टीगिरी पंडितराजांजवळ संपूर्ण न्यायशास्त्राचे अध्ययन श्रीदत्तात्रेयशास्त्री यांचे झाले आहे.

या पाठशाळेतील विद्यमान प्रधानाध्यापक, पं. नागेशशास्त्री यांचे सुपुत्र, श्रीदत्तात्रेयशास्त्री यांचे सहाध्यायी गुरुबंधू श्रीभालचंद्रशास्त्री एक आठवण सांगतात– "आमचे परम गुरुजी ब्रह्मीभूत कुड्डी–शृंगेरी जगद्गुरु श्रीविद्याभिनव, वाळुकेश्वर भारती स्वामीमहाराज, (पूर्वाश्रमींचे पंडित प्रवर श्रीविरूपाक्षशास्त्री हानगळ) यांनी श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांची प्रतिभा, विद्वत्ता, गांभीर्य, सात्त्विकता, सदाचार संपन्नता वगैरे गुण पाहून गौरवोद्गार काढले की—

**"आपल्या विद्यावंशामध्ये दत्तात्रेयशास्त्री हे प्रदीपक शिष्य रत्न आहे."**

हे एका प्रकांड पंडितांचे उद्गार असल्याने अतिशय चिंतनीय असून प्रत्यय देणारे आहेत. असे ते उद्गार आज पन्नास वर्षांनंतर त्याची साधार प्रचीती देत आहेत.

श्रीदत्तात्रेयशास्त्रींच्या सहवासात राहून अनुभवलेल्या त्यांच्या दैवीगुणांचे वर्णन करताना श्रीभालचंद्रशास्त्री म्हणतात–

"विद्वान माणसाने बाल्यापासून अशा प्रयत्नात रहावे की, स्वतःचा सत्वगुण सदाचरणाने वाढेल. त्याचे साधन म्हणून मनुस्मृति १२ व्या अध्यायात–

**वेदाभ्यास तपो ज्ञानं शौचमिन्द्रिय निग्रहः ।**
**धर्म क्रिया ऽऽत्म चिन्ता च सात्त्विकं गुण लक्षणम् ॥**

असे सांगितले आहे. हेच–

**अभयं सत्त्व संशुद्धिर्ज्ञान योग व्यवस्थितिः ।**
**दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवन् ॥**

इ. श्लोकांनी गीतेच्या १६ व्या अध्यायातही सुचविले आहे. या सर्व दैवीसंपत्तीच्या गुणांनी अलंकृत असे सात्त्विक महात्मे जगात फारच विरळ असतात. या वर्तमान काळात तर अत्यंत दुर्मिळच होत. पण आमच्या भाग्याने त्या सर्व दैवीगुणांनी संपन्न–परिपूर्ण अशा महाविभूतींची अंशभूत व्यक्ति आज डोळ्यापुढे आढळते, हे विशेष अभिमानास्पद होय. ती थोर व्यक्ति म्हणजेच ब्रह्मश्री पूज्य, विद्यावाचस्पति, श्रीदत्तात्रेयमहाराज कवीश्वर हे आहेत."

"येथील पाठशाळेत असताना श्रीदत्तात्रेयशास्त्री त्यावेळी विद्यार्थीवर्गाचे केवळ सहाध्यायी नसून सर्व विद्यार्थ्यांचे आवडते उपदेश-गुरूच झाले होते. त्यांच्याबद्दल सर्वांना फारच आदर होता. त्यांच्या तोंडाने कोणतेही प्रसंगी अश्लील शब्द, परद्वेष, कामक्रोधावेश, परनिंदा असे कोणतेही दोषयुक्त वाक्य चुकूनसुद्धा येत नसे. फक्त "विद्याभ्यसनं व्यसनं अथवा हरिपादसेवनं व्यसनम्" या उक्तीप्रमाणे विद्याभ्यासच यांचा मुख्य उद्देश

होता. यांचेविषयी आमचे गुरुजी (आमचे पितृचरण श्रीनागेशशास्त्री) "कवीश्वर हे ज्येष्ठाप्रमाणे सर्व गुणांनी अनुरूप असे विद्यार्थी आहेत" असे उद्गार हृत्पूर्वक पुष्कळ वेळा निघालेले आम्ही प्रत्यक्ष ऐकलेले आहेत. यांची गुरुभक्ति व विद्यानिष्ठा पहात असलेले विद्यार्थी मान खाली करीत असत. "सद्गुरुः स्वीयशिष्ये स्वीयं साम्यं विधत्ते" या न्यायाला श्रीदत्तात्रेयशास्त्री क्रमेण प्राप्त झाले म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही.

बाल्यातच शास्त्रीबोवांनी वेदाभ्यास, व्रतपोषरूप तपस्या, ज्ञान, शुचित्त्व, वगैरेंनी पावित्र्य संपादन केले होते. अर्थात् 'वेदाभ्यासस्तपो ज्ञानं' या मनुस्मृतीत सांगितलेल्या सात्त्विक गुणांची लक्षणे यांच्या ठिकाणी मध्यवयातच भासू लागली. पुढे येथे धारवाडात प्रौढ शास्त्राध्यायन करीत असतानाच अध्यापकत्त्व व विद्वत्सभांमध्ये शास्त्रचर्चा करणे सुरू झाले. यांची मुख्य शास्त्रे म्हणजे "न्याय आणि वेदान्त" ही होत. या दोनही शास्त्रांचे संपूर्ण अध्ययन येथेच झाले. पुढे त्यांनी मिमांसाशास्त्रही अवगत करून घेतले. व्याकरणशास्त्र व वेद यांचे ज्ञान तर पूर्वीच झाले होते. वास्तविक पहाता एकूण एकस्मिन जन्मनि एकमेव शास्त्र' म्हणजे एकेका शास्त्राला एकेक जन्म घालवावा तेव्हा एका जन्मात एक शास्त्र अवगत व्हायचे, अशी वस्तुस्थिती असताना, अशा या आर्यविद्यांतील नियमाला श्रीदत्तात्रेयशास्त्री अपवाद ठरले.

म्हैसूरच्या विद्वत्परीक्षेत हे जेव्हा उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले, त्यावेळी तेथील मोठमोठ्या विद्वानांना यांची बुद्धिमत्ता पाहून अचंबा वाटल्याखेरीज राहिले नाही. पुढे धारवाडहून पुण्यास गेल्यावर तेथील संकेश्वर मठात श्रीशिरोळकर शंकराचार्यमहाराजांनी श्रीदत्तात्रेयशास्त्रींची अध्यापक म्हणून ज्यावेळी नेमणूक केली, तेव्हा त्यांची नूतन ग्रंथालापनशक्ती, विशिष्ट बुद्धिमत्ता यांची वाढ होत चालली. तसेच पुढे कांचीकामकोटी, शृंगेरी, मद्रास, बंगळूर, आंध्रप्रांत या ठिकाणी झालेल्या विद्वत्सभांतून त्यांची मानमान्यता वाढू लागली. आता तर सर्व विद्या आणि सर्व सद्गुण अंगात मुरले आहेत.

प्रायः जगात विद्वान लोकांमध्ये, अहंकार, सदाचाराबद्दल अनास्था, दैन्य, धनेच्छा, अतृप्ती, विषयलोलुपता वगैरे पुष्कळ वैगुण्ये भासत असतात. पण या सर्वही अवगुणांचा स्पर्शही नसलेले हे शास्त्रीबोवा आहेत. खरोखरच या काळात दुर्लभ असलेले दैवीसंपत्तीचे गुण या सत्पुरुषात असलेले अनेकांना अनेक प्रसंगातून दिसून येतात.

श्रीदत्तात्रेयशास्त्री यांचे वैशिष्ट्य म्हणजे, "दोषातही गुणदृष्टीने वागणे," हे होय. 'ब्रह्मदृष्टिः उत्कर्षात्' या व्याससूत्राच्या शांकरभाष्यात उपासना पध्दति पुष्कळ दाखविल्या आहेत. त्यापैकी ही पण एक उपासना होते. एक आठवण उदाहरण म्हणून सांगतो.

एकदा आमच्या एका मनुष्याने एक चूक केली. त्या चुकीबद्दल आम्ही त्या मनुष्यावर रागवत होतो. त्यावेळी शास्त्रीबोवा सन्निध होते. तेव्हा ते शांतपणे आम्हास

म्हणाले की, "अहो! तुमची सहनशक्ती कितपत आहे हे पाहण्यासाठी त्या मनुष्याने चूक केली असा विचार करा म्हणजे प्रश्न मिटेल." असे म्हटल्याबरोबर आम्हास आमची चूक कळून सर्वांना लाज वाटली. दोषातही गुणदृष्टीने पहाणे ही त्यांची खरोखरच वृत्ती होती. अशा व्यक्तीला कामक्रोधादि षड्रिपूंची बाधा काय होणार ? हेच सत्पुरुष लक्षण आहे. 'कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम्' 'छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः' वगैरे गीतेतील वर्णन थासारख्या सज्जनांचेच असते.

श्रीशास्त्रीबुवांच्या वक्तृत्वामध्येही एक असा असाधारण गुण आहे तो असा की, संस्कृत असो किंवा प्राकृत असो, त्या भाषेमध्ये पांच मिनिटांपासून तीन तासापर्यंत त्यांचे वक्तृत्व गंगा प्रवाहाप्रमाणे अव्याहत चालते. दिलेल्या वेळेची मर्यादा तंतोतंत पाळली जाते. विषयाची मांडणी मुद्देसूद असते. त्यामध्ये असंबद्धता, विषयांतर किंवा शिथिलता इ. काहीच दोष काढणे शक्य नसते. कोणाचेही मनाला दुखवील असा शब्द नसतो. भाषण ऐकताना मात्र श्रोतृसमुदायाला 'वक्ता दशसहस्त्रेषु' याची प्रचीती आल्याशिवाय रहात नाही. 'स्वेषां परेषां विश्वेषां द्विषामविदुषामपि' अशा सर्वांना आनंद देणारी यांची वाक्सरणी सत्पक्षपाती, गुणग्राही लोकांचे नेहमी समाधान करीत असते.

एकंदर सर्व प्रकाराने व निष्पक्षपातपणे पहाता, असेच म्हणणे योग्य वाटते की भवभूती कवीची उक्ती श्रीदत्तात्रेयशास्त्रीमहाराजांचेविषयी अन्वर्थक ठरून निदर्शक आहे.

**"प्रिय प्राया वृत्तिर्विनय मधुरोवाचि नियमः ।**
**प्रकृत्या कल्याणी मतिरनवगीतः परिचयः ॥**
**पुरो वा पश्चात् वा तदिदमविपर्यासितरसं ।**
**रहस्यं साधूना मनुपधि विशुद्धं विजयते ॥" भवभूती.**

अत्यंत प्रिय वर्तन, विनयवृत्ती, मधुर पण संयमी बोलणे, सतत सर्वांचे मांगल्य चिंतणारी स्वभाव बुद्धी, काहीही निषिद्ध नसलेल्या सर्व आठवणी, जे आत तेच बाहेर, जे पुढे तेच मागे असा एक रस शुद्ध भाव, असे निष्कपट-विशुद्धत्व हे रहस्य सत्पुरुषांच्या जीवनाचे असते. म्हणून सत्पुरुषांचे जीवन सर्वतोमुखाने पवित्र ठरते. असे श्रीदत्तमहाराजांचे जीवन असल्याचा प्रत्यय येतो.

श्रीदत्तात्रेयशास्त्रीमहाराजांसंबंधी वास्तव नि प्रत्ययकारी धन्योद्गार पं. श्रीभालचंद्र-शास्त्री उप्पिन बेट्टीगिरी, धारवाड यांनी काढून सामान्य जिज्ञासू जनतेला श्रीदत्त-महाराजांची योग्यता दाखवून दिली आहे.

श्रीदत्तात्रेयशास्त्रीमहाराजांच्या पुढील अध्ययनासंबंधी ब्रह्मश्री पं. आत्मारामशास्त्री जेरे लिहितात,– पुणे येथील मिमांसा विद्यालयात मीमांसा कंठीरव वैद्यनाथ शास्त्रीवर्योंचे पट्टशिष्य परमविद्वान सुब्बाशास्त्रीवर्योंचे जवळ मीमांसाशास्त्राचे अध्ययन झाले. न्याय

मीमांसा अध्ययनाचे वेळी कोल्हापूर शंकराचार्यांचे मठातील आस्थान पंडित व प्रसिद्ध 'प्रवचनकार पंडित श्रीपादशास्त्री जेरे यांचे सहाध्यायित्वही यांना धारवाड व पुणे येथे लाभले. 'काणादं पाणिनीयञ्च सर्व शास्त्रोपकारकम्' अशी विद्धदुक्ती आहे. हे एकेक शास्त्रसुद्धा सर्व शास्त्रोपकारक आहे. मग पदवाक्य व प्रमाण ही संज्ञा असलेल्या व्याकरण, मीमांसा व न्याय या तिन्ही शास्त्रांचे अध्ययन झाल्यावर वेदांत अलंकार, धर्मशास्त्र इ. ग्रंथांत निष्णात होण्यास किती वेळ लागणार ? पं. दत्तात्रेयशास्त्री यांनी सर्वच शास्त्रात परिपूर्ण प्रगति करून घेतली आहे."

## पुण्यात आगमन

धारवाडच्या पाठशाळेत १९३७ पर्यंत श्रीदत्तमहाराज होते. धारवाडहून घरी वडिलांना पत्र पाठवितांना त्यांनी कित्येक पत्रे संस्कृतमधूनच पाठविली आहेत. श्रीधुंडिराजमहाराज हे स्वतःच व्युत्पन्न पंडित असल्यामुळे मुलाची उत्तम संस्कृत पत्रे वाचून त्यांना अतिशय संतोष होत असे. नंतर श्रीदत्तमहाराज पुण्यास आले. विवाह होऊन सहा-सात वर्षे झाली तरी अध्ययन चालू होते. ते सुद्धा दूर धारवाडला. पुण्यामध्ये 'शांकर विद्यापीठात' श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य विद्यानृसिंहभारती, शिरोळकरस्वामीमहाराज, यांनी श्रीदत्त-महाराजांना अध्यापनाचे कार्य दिले. येथे न्याय आणि वेदांत विषयांचे अध्यापन सुरू झाले. या विद्यापीठात येतानाच श्रीदत्तमहाराजांनी पुण्यात बिऱ्हाड करण्याचे ठरविले. सरदार नातू यांचा पूर्वपरिचय होता. सरदार नातूंना श्रीदत्तमहाराजांच्या विषयी फार जिव्हाळा होता. त्यांना कवीश्वर घराण्याबद्दलच्च अतिशय आपुलकी होती. त्यामुळे त्यांनी श्रीदत्तमहाराजांना जागा दिली. भाडे किती द्यावयाचे असे विचारता सरदार म्हणाले, "ते पुढे पाहू येऊन रहा निःशंकपणे." श्रीदत्तमहाराजांनी नातूंच्या वाड्यात बिऱ्हाड केले. सौ. लक्ष्मीबाई आणि श्रीदत्तमहाराजांच्या आजी येथे रहावयास आले.

मोठ्या घरात मोकळेपणाने वावरण्याची सवय असलेली ही मंडळी जागेप्रमाणे मनानेही संकोचून गेली. धारवाडच्या पाठशाळेचा वाडाही प्रशस्त होता. वाडीचे घरही मोठे होते. पण पुण्यातील ही जागा म्हणजे मोठ्या घराचे एक दालन. त्यात खोल्या. श्रीदत्तमहाराजांचा दिनक्रम सुरू झाला. प्रथम वीस नारायण पेठेत गेले. ती. दादांना म्हणजे श्रीगुळवणीमहाराजांना भेटून दर्शन घेऊन, पुण्यात आल्याचे सांगितले. श्रीशिरोळकरस्वामींचा आणि श्रीगुळवणीमहाराजांचा परिचय होताच. पण आता श्रीदत्तमहाराजांच्या माध्यमातून परस्परांच्या भेटीचा सहवासाचा, योग वारंवार येऊ लागला. श्रीशिरोळकरस्वामी मोठे अधिकारी शंकराचार्य होते.

सरदार नातूंच्याकडे पांडुरंग रुक्मिणीच्या सुरेख मूर्ति होत्या. सकाळच्या काकड आरतीपासून सायंकाळच्या आरती-शेजारतीपर्यंतचे सर्व सोपस्कार त्या मूर्तींना होत असे. असा शेजार चांगला लाभला. या काळात म्हणजे पुण्यात आल्याबरोबर काही विद्यार्थी श्रीदत्तमहाराजांकडे गुरुकुल पद्धतीने राहून शिकायला आले. या विद्यार्थ्यांना शिकवायचे, आचार्यांच्या विद्यापीठात जायचे असे ज्ञानदानाचे कार्य सुरु झाले. वर्षाच्या ठरलेल्या

कार्यक्रमांना म्हणजे अमरापूरच्या मठातील भागवत सप्ताह, देऊळगाव राजाकडे माता-पितांजींची भेट, वाडीला गुरुद्वादशी, श्रीमौनीस्वामींचा उत्सव इ. वेळी परगावी जाऊन येणे असे वार्षिक कार्यक्रमही ठरून गेले.

श्रीदत्तमहाराजांचा स्वभावच स्वावलंबी. हे स्वावलंबन आईवडिलांपासून दूर राहिल्याने, किंवा पाठशाळेत विद्याध्ययनास राहिल्याने वाढले. मूळचा स्वभाव स्वावलंबी म्हणजे अनपेक्ष वृत्ती. अनपेक्षपणा असला म्हणजे दुसऱ्या कोणाकडून कशाची म्हणून इच्छाच करायची नाही. आपली सारी कामे आपणच करायची. मग स्वतःला कितीही त्रास पडला तरी स्वतःच्या कामाचे ओझे दुसऱ्यावर टाकायचेच नाही. त्याचा परिणाम गरजा कमीतकमी होतात, गरजेपुरत्या गरजा राहतात. दुसऱ्याने थोडी जरी मदत केली तरी ती या अनपेक्ष वृत्तीला ती फार मोठी वाटते. पण या अनपेक्ष वृत्तीचा खरा फायदा परमार्थमार्गीयांना असा आहे की, दुसऱ्याला सेवेची संधी नसते आणि त्यामुळे साधनादि मार्गाने मिळालेली पुण्यसंपदा संरक्षित रहाते. अंतर्बाह्य संयम राखण्यास हे स्वावलंबन ही अनपेक्ष वृत्ती फार मोठी सहाय्यक असते. अनपेक्ष मनुष्य 'पाहिजे' कधी म्हणणार नाही. त्याचा 'नको' चा पाढा सारखा असतो. अनपेक्ष वृत्ती असलेल्या व्यक्तीला काय मदत करावी हे सुचणे सुद्धा महाकठीण असते. श्रीदत्तमहाराजांचा हा स्वभाव आहे. याचा अर्थ त्यांची ती जन्मजात वृत्ती आहे. म्हणजे ती पूर्वपुण्यकर्माची देणगी आहे.

सद्‌गुणांची काय आणि दुर्गुणांची काय अशी स्थिती असते की, एका सद्‌गुणाचा प्रवेश शरीरात झाला म्हणजे एका पाठोपाठ एक एक सद्‌गुण तेथे गोळा व्हायला लागतात. दुर्गुणांचे सुद्धा तसेच असते. एका दुर्गुणाने शरीरात प्रवेश केला की हळू हळू सगळ्या दुर्गुणांचा मेळावा तेथे जमतो. सद्‌गुण आणि दुर्गुण हे ऐकमेकांचे शत्रू आहेत. एका गटाचे प्राबल्य वाढले की दुसरा गट तेथून नाहिसा तरी होतो नाहीतर निष्प्रभ तरी होतो. म्हणूनच संत सत्पुरुष म्हणजे सद्‌गुणांची खाण असते. श्रीदत्तमहाराजांच्या स्वभावा-मध्ये 'संकोच' हा गुण आढळतो. हा संकोच गुण स्वतःची गैरसोय करून घेण्यात मोठा वस्ताद आहे. म्हणून व्यवहारी जगात भीड भिकेची बहीण म्हटले जाते. पण परमार्थात संकोचाचे फार फायदे लक्षात येतात. अंतर्मुखता आणणारा आणि वाढीला लावणारा संकोच गुण आहे. संकोची मनुष्य आपले बोलणे फार मर्यादित करतो. आपले मत बोलून वाया घालविण्यापेक्षा न बोललेले बरे असे त्याला वाटत असते. 'होणारे न चुके जरि ब्रह्मा तया आडवा' या ईश्वरी सूत्रावर त्याचा विश्वास असतो. म्हणून तो बोलत नाही.

आपली कॉफी बिनसाखरेची आहे हे सुद्धा बोलून दाखविण्याचा संकोच त्यांना होत असतो. या घटनेतसुद्धा कितीतरी विचार त्यांच्या मनात येतात. साखरेच्या गोडीचा संबंध जिभेशी आहे. त्या जिभेचा चोखंदळपणा कमी करण्याची ही संधी आहे. म्हणून जिभेने मनाकडे तक्रार केली तरी मन निश्चयी बुध्दीच्या ताब्यात दिले असल्याने बिचारे मन काही करू शकत नाही. 'रसं जित्वा जितं सर्वं' हे आपण सांगतो त्याचा प्रत्यय

घेण्याची ही सहज आलेली संधी का सोडायची ? असे त्यांच्या मनात येते. असा मायेचा सर्व पसारा संकोचाने आवरला जातो.

नाही तरी ब्रह्म आणि मायेचे स्वरूप काय आहे. मायेचा पूर्ण संकोच म्हणजे ब्रह्म आणि ब्रह्माचा विस्तार म्हणजे माया. म्हणजे योग्य दृष्टीकोनातून आणि सूक्ष्म चिंतनातून संकोचाचा अभ्यास म्हणजे स्वतः ब्रह्मरूप होणे आहे. श्रीदत्तमहाराजांच्या गुणांचा अंदाज या दृष्टीकोनाने स्पष्ट होणार आहे.

त्यांच्या कपड्यांचा विचार, सामान वळकुटीचा विचार, उठण्याबसण्याचा विचार केव्हांही केला तरी हेच लक्षात येते की, सर्वत्र संकोच आहे. पण ते संकोच आहेत म्हणून जीवनात एकटे पडलेत, कोणी विचारीत नाही, मान देत नाही असे कधीही आढळणार नाही. विश्वाच्या आकाराच्या मानाने सूर्य फक्त बिंदुप्रमाणे लहान आहे पण अखिल विश्वाला प्रकाश पुरविणारा फक्त एकमेव तोच आहे. पण सूर्याला आपल्या तेजाचा कधी अहंकार होत नाही. त्याच्या उष्णतेने तापलेले वाळूचे कण पायाला पोळतील पण सूर्याचे नित्याचे साधे जीवन सतत चालू आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या साधेपणाची कमाल आहे. नातूंच्या वाड्यात रहात असताना एकदा ती. सौ. लक्ष्मीबाई लग्नघरी गेल्या होत्या. श्रीदत्तमहाराज लग्नाला जाऊन आले पण तेथे थांबणे त्यांच्या दृष्टीने अस्वाभाविक होते. ते घरी आले. गुरुकुल सुरु झाले होते. विद्यार्थी घरी होते. त्यांना शिकवणे, त्यांच्यावर लक्ष ठेवणे, त्यांची सोय, व्यवस्था पहाणे हे स्वाभाविककर्म असल्याने ते घरी आले. लग्नघरून सौ. लक्ष्मीबाईंना परत यायला रात्र झाली. विद्यार्थ्यांच्या—ह्यांच्या संध्याकाळच्या जेवणाच्या व्यवस्थेचा विचार त्यांच्या मनात सारखा येत होता. पण कार्याला जमलेल्या मंडळींच्या आग्रहामुळे त्यांना उशीर झाला. आपल्याला फार उशीर झाला याची टोचणी त्यांना चांगलीच लागली होती. पण काय घरी येऊन पहातात तो विद्यार्थी आणि श्रीदत्तमहाराज यांनी मिळून पिठल भात केला. जेवण करुन सर्व आवरून विद्यार्थी झोपी गेले होते व श्रीदत्तमहाराज वाचीत बसले होते. इतका हा प्रसंग सहजपणे सुटलेला होता. सहजता म्हणजे साधेपणा.

सरदार नातूंच्या वाड्यातील जागेचा संकोच श्रीदत्तमहाराजांना होऊ लागला. जागा लहान नव्हती. गैरसोयी नव्हत्या. मालक भाडेकरू संघर्ष नव्हता. तरी श्रीदत्तमहाराजांना जागेचा संकोच होऊ लागला. जागा सोडून जाण्याचे विचार एकसारखे येऊ लागले. त्याचे असे झाले की, सरदार नातू श्रीदत्तमहाराजांकडून भाडेच घेईनात. 'रहा' म्हणायचे. श्रीदत्तमहाराजांनी म्हणावे 'आपण काही तरी भाडे सांगावे. म्हणजे बरे होईल." सरदार नातूंना कवीश्वर घराण्याबद्दल गुरुतुल्य आदर असल्यामुळे त्यांना काहीही भाडे सांगणे जीवावर येई. सौ. लक्ष्मीबाई श्रीदत्तमहाराजांना म्हणाल्या—"आपण त्यांना या ना त्या स्वरूपात भेट म्हणून काही देत जाऊ. जागा चांगली आहे. शेजार चांगला आहे."

पण हा घरातला सल्लाही श्रीदत्तमहाराजांना रूचला नाही. मग कोणाला न सांगता सदाशिव पेठेतील आगाशे यांच्या वाड्यातील जागा ठरवून आले व एक दिवशी सरदार नातूंचा निरोप घेऊन नव्या जागेत गेले. कोणत्याही कृतीमागची विचारांची बैठक लक्षात घेतली नाही तर त्या कृतीचा व ती करणाऱ्याच्या हेतूचा बोधच होणार नाही. 'अनपेक्ष-शुचि-दक्ष' या श्रेष्ठ दैवी गुणांचे दर्शन या घटनेतून झाले तरच यापासून व्यक्ति वैशिष्ठ्याचा बोध लक्षात येईल.

मुळातच शास्त्री पंडितांचे जीवन ऐश्वर्याच्या झगमगाटातून अलिप्त असते. विशुद्ध तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर, शास्त्रपूत अक्षयसूत्रांच्या कसोटीवर त्यांची जीवनइमारत उभी असते. यांना प्रतिगामी म्हणून कितीही हिणवले तरी त्यांच्या न्यायघटित तर्काच्या बुद्धिनिष्ठ शस्त्राने पुरोगामित्वाचे भ्रमाचे भोपळे बुडबुड्याप्रमाणे केव्हाच फुटलेले असतात. म्हणून शास्त्री-पंडितांचे सामान्य जीवन आणि यांचा साधा पोषाख, कृत्रीम मोठेपणाच्या झिरमाळयांचे उंच उंच झेंडे घेऊन फिरणाऱ्यांपेक्षा गज ऐश्वर्याप्रमाणे प्रभावी असते समाज जीवनात इतरांचा कोलाहल असतो, पण शास्त्रीपंडित मात्र शांत असतात. इतरांच्या दाराशी मोटारी झुलत असतात पण हे स्वतःच अनवाणी, धोतर-उपरणे परिधान करून कोणाकडेही न पहाता, रस्त्यानेही आत्मचिंतन करीत पायीच, निवांतपणे चालत असतात. त्यांचे दारिद्र्य हे याला कारण नसते तर कीर्ति, ऐश्वर्य, श्रीमंती, लोकेषणा इ. ची पूर्ण उपेक्षा हे कारण असते. हे महापुरुष याच ध्येयनिष्ठेने आपला जीवनपथ चालत असतात. याची जाणीव समाजाला जसजशी होत जाते. तसतसे यांच्या मागून मोटार येते. त्यांच्याजवळ थांबते. आतला मालक खाली उतरतो. या महापुरुषाचे पाय घट्ट धरतो. आणि काकुळतीने प्रार्थना करतो, 'महाराज, माझ्यावर कृपा करा, आपले चरण माझ्या गाडीला लागू द्या. आपल्या कृपेने माझे ऐश्वर्य वाढते आहे.' तेव्हा या महापुरुषाला दया येते आणि स्वतःसाठी नव्हे तर त्याच्यासाठी ते गाडीत बसतात." देव कधीही माझी पूजा करा म्हणून म्हणत नाही. पण ज्याला त्याची अनुभूती येते त्याला पूजा केल्याशिवाय रहावत नाही. त्याचे समाधान साध्या पुजेने होत नाही म्हणून तो महापूजा करतो. लघुरुद्र-महारुद्र-अतिरूद्र करतो, नवचंडि-शतचंडि-सहस्रचंडि करतो. देवाची उत्तुंग मंदिरे बांधतो. उत्तम मूर्तींची स्थापना करतो. हे ज्याच्याकडून घडत असते त्याची अनुभूति असते म्हणून तो सर्व स्वपणाला लावून करीत असतो. पहाणाऱ्याला अनुभव नसतो. श्रद्धा, विश्वास नसतो. व्यावहारिक कुतर्क असतो म्हणून पहाणाऱ्याला हे थोतांड वाटत असते. जगात असाच व्यवहार चालत आला आहे. देवाधर्मावर टीका करणारे कितीहि असले तरी जगातील देवाची दृश्यकार्येही कधीही संपुष्टात आलेली नाहीत. येणारही नाहीत. म्हणून संतांची प्रार्थना 'पसायदान' असते—'कृण्वतोविश्वमार्यम् ' असते.

सतत संतुष्ट असतो तो संत. म्हणजे संतांना दुःख नसतेच असे नाही. संतांचा संतोष सागरासारखा असतो. पाऊस पडला न पडला त्याने सागरात फरक पडत नाही.

सागर जसा जलाने नित्य तृप्त असतो त्याप्रमाणे संत संतोषाने नित्य तृप्त असतात. सुखदुःखांच्या तरंगाने सागरपणा नाहीसा होत नाही. श्रीदत्तमहाराजांना पहिला मुलगा झाला. कौडकौतुक झाले आणि चवथ्या वर्षी मुलगा देवाघरी निघून गेला. या दुःखाची उर्मि निर्माणच झाली नाही असे नाही. पण ही जीवनसागरावरील एक उर्मि आहे, ही जाणीव असेल तर उर्मि शांत होईपर्यंत पहात रहावेच लागते. तसा हा पुत्र निधनाचा प्रसंग वैवाहिक जीवनानंतर प्रथमच सहन करण्याचे या उभयतांचे नशिबी आले. स्वप्न हे झोपेत जसे सत्य असते त्याप्रमाणे दुःख हेही विशिष्ट कालमर्यादेत सत्यच असते. कालांतराने त्याचे स्मरणही रहात नसते.

पुढे श्रीदत्तमहाराजांना कन्या झाली. तिचे 'सुमन' नाव ठेवले. पहिला मुलगा झाला तो गेला. दुसरी मुलगी झाली. तेव्हा श्रीदत्तमहाराजांच्या मातोश्रींनी कुलस्वामीनीला नवस केला. 'आई रेणुके ! वंशाचा दिवा हवा. तुझ्या कृपेने काय शक्य नाही. आता जर नातू दिलास तर तुझ्या दारी येईन. नातवाचे जावळ काढून तुझ्या चरणी वाहीन. पूजा बांधेन. खण लुगड्याने ओटी भरेन. पुरणावरणाचा स्वैंपाक करून तुला नेवैद्य दाखवीन. ब्राह्मण सवाष्ण घालीन. पण आई कृपा कर !" सौ. सरस्वतीबाईंची श्रद्धा कुलस्वामीनी वर होती. कुलाचा वंश वाढविणारी कुलस्वामीनी असते. तिची प्रार्थना केली म्हणजे हव ते करणारी ती आदिशक्ति आहे. याची जाणीव असलेल्यांच्या प्रार्थना फळास येतात. देव-देवताही सद्भक्तांच्या प्रार्थनेची वाट पहात असतात. म्हणून तर त्यांना 'भक्तकामकल्पद्रुम' म्हटलय ना ! आजीला नातू झाला. सर्वांना आनंद झाला. एका शोकातून पार पडावे लागले म्हणून मुलाचे नाव 'अशोक' ठेवले. आता पुनः शोकाचा संबंधच नको म्हणून अशोक नाव ठेवले.

## नवस फेडायला कवीश्वर कुलात श्रीगुळवणीमहाराज !

देवाचा नवस फेडायला सुद्धा वेळ यावी लागते इ.स. १९४४ साल उजाडले. अशोक चार वर्षांचा झाला. डोक्यावर जावळ वाढलेले. या वर्षी माहुरला जाण्याचे ठरविले. आपल्या घरातील प्रत्येक गोष्ट श्रीगुळवणीमहाराजांच्या चरणी सादर करण्याची श्रीदत्तमहाराजांची नेहमीची सवय. त्याप्रमाणे जावळासाठी माहूरला जाणार आहोत म्हणून सांगितले. श्रीगुळवणीमहाराज म्हणाले, "मी येतो बरोबर, वडीलांना कळवा." श्रीदत्तमहाराजांनी वडिलांना पत्र पाठविले. श्रीगुळवणीमहाराजांची इच्छा समजली. मग श्रीधुंडिराज-महाराजांनीच श्रीगुळवणीमहाराजांना पत्र पाठविले, "आपण आमच्या बरोबर स्वतःहून येण्याची इच्छा असल्याची व्यक्त केली म्हणजे आपण आम्हास आपलेच आप्त समजत असल्याचे स्पष्ट झाले. आपल्या सहवासाने आम्हास संतोष व धन्यता वाटत आहे."

कवीश्वरांच्या कुळात नातवाचा नवस फेडायला मंडळी निघाली आणि श्रीगुळवणी कुळातील एक जण म्हणतो आहे मी येतो बरोबर हे दृश्य व्यवहारी जगात किती विसंगत

दिसणारे आहे. अशा विसंगतीमुळें तर संतसंगतीचे मोल ध्यानी येत नाही. संतांचे व्यवहार व्यवहार दृष्टीने पाहून भागत नाही. त्यांच्या अंतर्मनाच्या अंतरंगाचा ठाव घेता यावा लागतो. कोणत्या बाह्य आशे-इच्छेने श्रीगुळवणीमहाराज त्यांच्या खाजगी कार्यक्रमात सामील झाले होते ? का त्यांच्या पुढे प्रवासातील सोबतीची अडचण होती म्हणून ते त्यांच्या बरोबर गेले ? कवीश्वर परिवारातील मंडळी ईश्वरीकृपेतली आहेत. त्यांच्या संगतीने ईश्वरसान्निध्याचे समाधान लाभणार आहे. म्हणून श्रीगुळवणीमहाराज त्यांच्या बरोबर गेले आहेत. हे ऋणानुबंध जन्मोजन्मीचे असतात. श्रीदत्तमहाराजांच्या वर श्रीगुळवणीमहाराजांचे प्रेम पुत्रवत होते. अगदी लहानपणापासून हेरून ठेवलेले हे रत्न होते. म्हणून वारंवार आपल्या सहवासाचे संस्कार करून त्या रत्नामध्ये जिव्हाळा वाढविण्याचे काम श्रीगुळवणीमहाराज मिळेल त्या प्रसंगातून करीत होते. श्रीधुंडिराजमहाराज आणि सौ. सरस्वतीबाई ऊर्फ आईसाहेब हे पाहूनच कृतार्थ होत होते. श्रीगुळवणी-महाराजांसारख्या सिद्ध सत्पुरुषाच्या प्रेम छत्राखाली आपल्या 'दत्ता' ला आश्रय मिळाला आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख श्रीधुंडिराजमहाराजांनी अनेक प्रसंगी अनेकांच्या जवळ केलेला आहे. यासाठी श्रीगुळवणीमहाराज नवस फेडायला निघालेल्या कवीश्वर कुळात सामील झाले होते.

या माहुरच्या यात्रेत श्रीधुंडिराजमहाराज, श्री. सौ. आईसाहेब, सौ. लक्ष्मीबाई, श्रीदत्तमहाराज, चि. सुमन आणि चि. अशोक आणि श्रीगुळवणीमहाराज होते. तीर्थयात्रेत श्रद्धाभक्तीची मंडळी हवीत. शास्त्रविधीची माहिती असलेली मंडळी हवीत. आचारसंपन्नतेचा व्यवहार सहजतेने पाळणारी मंडळी हवीत. दानधर्मात उदारवृत्तीची मंडळी हवीत. ईश्वर नि ईश्वरी कार्यसेवा याव्यतिरिक्त अन्य गोष्टीकडे लक्ष जाऊन आपल्या कार्यात उणीव निर्माण होऊ न देणारी मंडळी हवीत. तेव्हा यात्रेचा आनंद समाधान फळ-अनुभव प्राप्त होतो. म्हणून तीर्थयात्रा संतसंगती घडणे अहोभाग्याचे लक्षण आहे. इथे कशाला कमी होते ? कर्माचे फळ मनोभावाच्या उण्याअधिक तीव्रतेप्रमाणे मिळत असते. सुमारे एक तपापूर्वी हीच मंडळी येथे ओहर यात्रेच्या निमित्ताने आली होती. आज जावळाच्या निमित्ताने आली होती. पूर्वी ज्याप्रमाणे विष्णुदासबुवांच्या आश्रमात मंडळींनी मुक्काम केला होता. त्याप्रमाणे याहीवेळी याच आश्रमात मुक्काम केला होता सर्व नवस यथासांग फेडला. सर्व दर्शने झाली आणि मंडळी तेथून परतली.

## नोकरीत आणि जागेत स्थित्यंतर

पुण्यातील नारायणपेठेत मुंजोबाचा बोळ आहे. तेथे शंकराचार्यांचा मठ आहे. श्रीशिरोळकरस्वामी त्या मठपीठाचे आचार्य होते. कोल्हापूर, सातारा इ. ठिकाणी या पीठाचे मठ आहेत. तेव्हा पुण्यातील मठात श्रीदत्तमहाराज अध्यापनाचे कार्य करीत होते. या काळात श्रीदत्तमहाराजांचेही स्वाध्यायी अध्ययन चालू होते. त्यामुळे या

विषयातील सर्व बारकावे त्यांनी आत्मसात केले. वाचन आणि चिंतन एवढा स्पर्श जरी त्या त्या विषयाशी आला तरी सर्वकाही मुखोद्गत होत असे. या काळात मधून मधून विशेषतः दक्षिण भारतात विद्वत्सभेतून श्रीदत्तमहाराजांना निमंत्रणे येत व तेही त्या त्या ठिकाणी जाऊन आपल्या विद्येचा प्रभाव विद्वत्सभेवर पाडीत असत. अशा प्रसंगांचे संकलन हा महत्त्वाचा स्वतंत्र विषय आहे.

पुण्यात आचार्यांचा सहवास आत्मीयतेचा आला. आचार्यांनी अनेक विषयांवर मन मोकळेपणे वेळोवेळी श्रीदत्तमहाराजांना ऐकविले आहे. या संदर्भात आचार्यांनी श्रीगुळवणी महाराजांचा विषय सतत काढला आहे. काशीचे विद्वान पंडित श्री. राजेश्वर शास्त्री द्रवीड हे पुण्यात आले म्हणजे आचार्यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करून जात असत. पंडित श्री राजेश्वरशास्त्रींचा आणि श्रीगुळवणीमहाराजांचाही संबंध असाच असे, एकदा आचार्य, पंडित राजेश्वरशास्त्रींना म्हणाले, ' आपल्याला वामनरावांच्या योगाच्या अधिकाराबद्दल काय वाटते !" त्यावर पंडितजी क्षणाचाही विलंब न लावता म्हणाले, "वामनराव खरे योगी आहेत. त्यांचा अधिकार फार मोठा असला तरी ओळखता येणे फार कठीण आहे. त्यांनी फार झाकून घेतले आहे. त्यांचा शब्दही व्यर्थ नसतो आणि कृति, दृष्टी फार अर्थपूर्ण असते. जो कोणी त्यांच्याकडे शिष्याची भूमिका घेऊन जाईल त्याचे पूर्ण कल्याण होईल."

यानंतर आचार्यांना इच्छा झाली की, असा अधिकारी आपल्या पीठाला उत्तराधिकारी मिळावा. एकदा श्रीदत्तमहाराजांच्यातर्फे आचार्यांनी वामनरावांना बोलावून घेतले आणि हाच विषय काढला. तेव्हा वामनराव म्हणाले "मला माझ्या गुरूंची आज्ञा झाली तरच आपली इच्छा आज्ञा म्हणून स्वीकारीन. माझी योग्यता माझ्या गुरूंना चांगली माहिती आहे. त्यांच्या स्मरणांत हे साधे जीवन शेवटपर्यंत राहो हीच माझी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे." आचार्य वामनरावांचे भाव समजले आणि आपली इच्छा मानली नाही म्हणून नाराज न होता त्यांच्या विशुद्ध ध्येयवादाबद्दल त्यांना वामनरावांच्याबद्दल आदरच वाटला. श्रीदत्तमहाराजांनी हे प्रसंग प्रत्यक्ष अनुभवले असल्यामुळे त्यांच्या चित्तांत महाराजांबद्दलची श्रद्धा पराकोटीला पोहचली. त्यांनी जे जे अनुभवले ते ते शब्दात किती प्रमाणात आणता येणार ? असे विषयही साधकाच्या विशुद्ध श्रद्धेच्या पातळीप्रमाणेच कमी अधिक होणार आहेत.

श्रीशिरोळकरस्वामीशंकराचार्यांच्या संदर्भात एक आठवण स्वतः श्रीदत्तमहाराजांनी सांगितली आहे. ती साधकांनी लक्षात ठेवण्यासारखी आहे म्हणून येथे लिहित आहे.

पुणे शहर हें विद्येचे माहेर म्हणून जसे प्रसिध्द आहे. तशी एक विलक्षण प्रसिद्धीही पुण्याची आहे. पुण्यातली विद्वान मंडळी दुसऱ्यांची मते, दुसऱ्याची प्रतिष्ठा याची शहानिशा फार काटेकोरपणे करणारी आहेत. त्यामुळे पुण्यातील विद्वानांमध्ये टिकून राहून आपला प्रभाव त्यांच्यावर पाडणे हे एक आव्हानच असते.

या काळात या शंकराचार्यांवर काही आरोप करणारे लोक पुण्यात निघाले. त्यांनी प्रत्यक्ष परिस्थिती न पाहता हे आरोप केले होते. या मंडळींनी त्या काळातील केसरीचे संपादक श्री. ज. स. करंदीकर होते, त्यांच्या अध्यक्षतेखाली एक विरोधी सभाही आयोजित केली होती. नंतर सभेचे वृत्त म्हणून केसरीत छापून येणार होते. हे वृत्त श्रीदत्तमहाराजांच्या कानावर आले. त्यांनी यामध्ये कोण कोण आहेत ? कोणते आरोप आहेत याचीही माहिती घेतली. विरोधकांचा जोर जास्त होता म्हणून त्यांनी फक्त ऐकून घेण्याचे काम केले. या वृत्ताने श्रीदत्तमहाराज फारच अस्वस्थ झाले. या खोटा अपप्रचार करणाऱ्या मंडळींची सभा होऊ देऊ नये असे त्याना वाटू लागले.

हे वृत्त आचार्यांच्या कानावर घालण्यासाठी श्रीदत्तमहाराज आचार्यांच्या मठात आले आणि अत्यंत मर्यादेने हा सर्व होणारा प्रकार आचार्यांना सांगितला. 'ही सभा ज. स. करंदीकरांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे तर मी करंदीकरांना भेटून या अपप्रचार सभेचे अध्यक्ष म्हणून आपण जाऊ नये म्हणून सर्व वस्तुस्थिती पटवून येतो.' असा आपला विचारही श्रीदत्तमहाराजांनी आचार्यांना सांगितला. अशा अपप्रचार सभेला तोंड फुटले म्हणजे धर्म–संस्कृती–आचार्यांची पीठे–आचार्य यांच्या संबंधी हवे ते आरोप आणि निंदानालस्ती करायला वक्ते मनसुराद फायदा घेतात. सत्या-असत्याचे भान रहात नाही. यामुळे जनतेची दीशाभूल होते. श्रीदत्तमहाराजांची सारी तळमळ आचार्यांच्या लक्षात आली. पण ते शंकराचार्य होते. परमार्थ मार्गाचे अधिकारी होते. व्यवहारात परमार्थ दृष्टी ठेवून वागणारे होते. त्यांनी शांतपणे श्रीदत्तमहाराजांना समजावून सांगितले.

"शास्त्रीबोवा ! तुम्ही म्हणता ते सगळे बरोबर आहे. तुम्ही प्रयत्न केला तर कदाचित ज. स. करंदीकर सभेला जाणारही नाहीत. पण निंदक हे रहाणारच. निंदा, द्वेष, मत्सर हे मनोमालिन्याचे गुणधर्म आहेत. पण त्यामुळे आपण चिंतेमध्ये का पडावे ? विरोध ही कसोटी आहे. कसोटीचे दुःख कोणाला ? स्वतःबद्दल जो साशंक आहे, ज्याला स्वतःचा विश्वास नाही त्याला त्याचे दुःख ! हे पहा आपली कोणी स्तुती केली म्हणून हुरळून जाणे जसे आपल्या सिद्धांतात बसत नाही असे कोणी निंदा केली म्हणून होरपळून जाणेही आपल्या तत्त्वाशी विसंगतच आहे. तुम्ही अस्वस्थ माझ्यासाठी झालात हे मी जाणतो. पण यात एक रहस्य आहे. ते सतत लक्षात ठेवण्यासारखे आहे. आपल्यातही जन्मजन्मांतरीची पाप आहेतच. ती सर्व पापे क्षालन होण्यासाठी ईश्वराची योजना असते. जे कोणी आपली निंदा करतात ते आपली पापे घेतात व आपले पापक्षालन होत असते. आपण जर खरे मुमुक्षु असू तर आपला हा लाभ केवढा मोठा आहे. निंदा सहन करणे हे अग्निदिव्य आहे. त्यामध्ये शुद्ध सुवर्णाचे तेजच वाढते. काय ? समजले ना माझे म्हणणे. उथळ पाण्याला खळखळाट फार असतो. ऐनवेळी काही कारण घडून सभा होणारही नाही, कुणी सांगावे ? मग मध्येच आपले म्हणणे मांडायला कोणाकडे का जा ? ती सभा झाली न झाली तरी आपल्याला त्याचे काहीही वाटण्याचे कारण नाही."

श्रीदत्तमहाराज आचार्यांना वंदन करून शांतपणे निघून आले. त्यांच्या चिंतनाला आयुष्याची शिदोरी मिळाली. आचार्यांचे हे उत्तर साधकीय आचारधर्माचे होते. कबीरदासांनीही म्हटले आहे की, निंदक हा शेजारी असला म्हणजे आपली मनोमालीन्याची वस्त्रे तो बिनपाण्याने आणि साबण न लावता रोज स्वच्छ करून आणीत असतो. आपली घाण बिनखर्चाने धुवून टाकणारा निंदकाहून दुसरा कोण आहे? श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचा विचार केला तर त्यांनी स्वतःचा दोष नसताना अनेकांच्या टीका ऐकून घेतल्या, सहन केल्या आहेत. पण कधीही कोणालाही त्याची साधी आठवणसुद्धा दिलेली नाही.

श्रीदत्तमहाराज सतत सेवाधर्म तत्पर राहिलेले दिसतात. प्रत्येक क्षेत्रात ते त्या क्षेत्राप्रमाणे सेवाव्रती भूमिकेत वावरताना दिसतात. आपण ज्ञानी आहोत, उत्तराधिकारी आहोत, कुटुंबप्रमुख आहोत, गुरू आहोत अशा भूमिकेत वस्तुस्थिती असुनही ते त्या त्या क्षेत्रात साध्या भूमिकेत दिसतात. ही त्यांची भूमिका व्यवहारीदृष्टीला न रुचणारी आहे. कारण कुठेही सत्ता असून सत्तेचा वापर त्यांच्याकडून होत नाही म्हणून रुचत नाही. मी सामान्य आहे. ईश्वर व त्याची सत्ता सर्वात मोठी आहे. जे जे काही होते-घडते ते ते त्याच्या इच्छेने होत असते. याची जाणीव श्रीदत्तमहाराजांच्या अन्तःकरणाला सतत आहे म्हणून ते स्वतःला 'मी सामान्य आहे' अशाच भूमिकेत ठेवतात. प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या एकमेव भाषणातील त्यांचे स्वतःबद्दलचे एक वाक्य असे आहे की—"या विराट विश्वाच्या पसाऱ्यात मी एक सामान्यच आहे. ही मनोभूमिका शब्दमाध्यमातून लहान वाटत असली तरी शुद्ध ज्ञानभूमिकेवरून सर्वांत महान आहे.

आचार्यांच्या ओळखीने श्रीदत्तमहाराजांना शनिवार पेठेत, कन्या शाळेसमोर, वर्तकांच्या वाड्यात, तिसऱ्या मजल्यावर तीन खोल्यांची जागा भाड्याने मिळाली. या जागेत पुढे श्रीदत्तमहाराज २५/३० वर्षे राहिले. ही जागा श्रीगुळवणीमहाराजांच्या २० नारायण पेठेच्या जागेपासून ५/७ मिनिटांच्या अंतरावर होती. येथूनच अनेकविध कार्यातून संबंधांना घनिष्ठता आली.

आचार्यांच्या पीठात तीस रुपये मासिक वेतनावर श्रीदत्तमहाराज स्वखुषीने अध्यापन करीत होते. आचार्यांचा सहवास आणि अध्यापनाचे समाधान यामध्येच त्यांचे लक्ष असे. प्रपंचाला लागणारे धान्य गावाकडून येत होते. परंतु योगायोगाप्रमाने घटना घडतात. इ. स. १९४५ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत विभागात-न्यायशास्त्र व मिमांसा या विषयांच्या अध्यापनासाठी श्रीदत्तमहाराजांना नोकरी मिळाली. पगारही एकशे साठ ठरला. विद्यापीठाची वेळ सकाळी ७ ते ११ आणि सायंकाळी ४ ते ७ अशी दोन वेळा असे. शनिवारातील वर्तकांच्या वाड्यापासून खुन्या मुरलीधराजवळच्या विद्यापीठवाड्यापर्यंत पोचायला ८/१० मिनिटे लागायची. वेळ आणि काम याबाबतीत श्रीदत्तमहाराज अत्यंत चोख असत. याशिवायही विद्यापीठ त्यांना अवांतर कामे अध्यापनाची वा

लेखनाची सोपविल असे. पण या कामाबद्दल आर्थिक अपेक्षा न ठेवता ती कामे श्रीदत्तमहाराज करीत असत.

## श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे वाङ्मय प्रकाशन

"यत्र योगेश्वर श्रीकृष्णः यत्रपार्थो धनुर्धरः" अशी जोडी जमली म्हणजे यश प्राप्त होते. असे महत्त्वाचे सूत्र गीतेचे सार म्हणून शेवटी सांगितले आहे. या सूत्राचे उत्तम उदाहरण म्हणून, श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे प्रचंड वाङ्मय प्रकाशित करणारे प. पू. श्रीगुळवणीमहाराज आणि प. पू. श्रीदत्तमहाराज या दोघांचा उल्लेख करावा लागेल. या कार्यात प्रत्यक्ष कार्य करण्याचे अर्जुनाचे सव्यसाचित्व श्रीदत्तमहाराजांचे होते. तर या प्रकाशन कार्याच्या रथाची धुरा सांभाळणारे व मार्गदर्शन करणारे योगेश्वर श्रीकृष्ण योगिराज श्रीगुळवणीमहाराज होते. दोघांनी मिळून हे कार्य करूनही दोघांच्या मुखातून 'इदं न मम' असेच उद्गार येत असत. इतकेच नव्हेतर श्रीगुळवणीमहाराजांनी म्हणावे "श्रीदत्तमहाराजांनी हे मनावर घेतले म्हणून झाले. त्यांच्यासारख्या तळमळीचे शास्त्री पंडित होते म्हणूनच १२ खंडांचे पाच हजार पृष्ठांचे वाङ्मय प्रकाशित होऊ शकले. आमचे त्यात काय आहे ?" आणि श्रीदत्तमहाराजांनी म्हणावे, श्रीमहाराजांच्या मुळेच हे कार्य घडून आले. त्यांची संकल्पाची शक्ती पाठीशी होती म्हणूनच शक्य झाले. तितके सोपे कार्य हे नव्हते. आमचे निमित्त झाले पण कारण ते होते." अशी ही भावनिक जुगलबंदी पाहिली म्हणजे शिवशक्तीच्या लीलेचे कौतुक करावे तेवढे थोडेच. म्हणून तर कविकुल शिरोमणी कालीदासांनी जगताचे मातापिता असलेल्या भवानी-शंकराच्या अभिन्नत्वाला "वाचा आणि अर्थ" हे जसे भिन्न होऊ शकत नाहीत पण भिन्न भासतात असे उदाहरण देऊन वंदन केले आहे. या दोन महापुरुषांच्या अभिन्नत्वाचे हे उदाहरण आहे.

श्रीटेंबेस्वामीमहाराजांच्या वाङ्मयाचे वैशिष्ट्य असाधारण आहे. यामध्ये प्रामुख्याने श्रीदत्तात्रेय देवतेचे स्वरूप अत्यंत विस्ताराने, वेद-पुराणे इत्यादीमधील संदर्भ-प्रमाणे देऊन, ज्ञान-कर्म-भक्ति योग या चतुर्विध शास्त्रांचा समन्वय दाखवून आणि सर्व अवतारांमध्ये आणि दत्त अवतारामध्ये जो मूलभूत फरक आणि अवतार कार्याचा उद्देश आहे तो स्पष्ट करून हे सर्व वाङ्मय निर्माण झालेले आहे. या सर्वच वाङ्मयात अद्वैत वेदांताची सुसूत्र मांडणी श्रीमद्शंकराचार्यांच्या तुलनेची झालेली आहे. हे सर्व वाङ्मय सिद्ध कोटीतील आहे. सर्वच रचना इतकी सहज, उत्स्फूर्त, स्वाभाविक, शास्त्रनिष्ठ, सर्व समन्वयाची, वेदान्त रहस्य उद्‌बोधक, निर्दोष मार्गदर्शनाची, भक्तिनिष्ठापूर्वक आचार धर्म प्रवर्तकाची अशी झालेली आहे. असे हे वाङ्मय म्हणजे, भारतीय वेदान्त तत्त्वज्ञान सारस्वताच्या भव्य प्रासादातील, बोध रहस्याचे, योग रहस्याचे, कर्म-भक्ति रहस्याचे प्रासादिक दर्शन, ओज आणि माधुर्याने परिपूर्ण असलेल्या, जगद्‌गुरू श्रीगुरुदेव दत्तात्रयांचे मंगल दर्शन घडविणारे प्रमुख दालन आहे.

श्रीटेंबेस्वामीमहाराजांचे वाङ्मय अमरेश्वर संस्थान मध्ये श्रीदीक्षितस्वामीमहाराजांच्या संग्रही बरेच होते. ते श्रीदत्तमहाराजांच्या अवलोकनातही आलेले होते. हे सर्व वाङ्मय प्रकाशित व्हावे अशी त्यांची इच्छा होती. परंतु आपल्यासारख्या निष्कांचन व्यक्तीकडून हे कार्य होणे कठिण आहे. ईश्वरी योजनेने जर कुणी ही जबाबदारी स्वीकारली तर आपण आपल्या बुद्धीशक्तीची आणि शरीरशक्तीची सर्व मदत करू असे श्रीदत्तमहाराजांनी मनाशी ठरवून ठेवले होते. पुढे योगायोगाने श्रीदत्तमहाराज पुण्यास आले. श्रीगुळवणी-महाराजांचा सहवास वाढला. त्यातून या विषयाला चालना मिळाली. श्रीगुरुमहाराजांची इच्छा हे वाङ्मय प्रकाशित करण्याची होतीच. परंतु संस्कृतशास्त्री पंडीतांच्या मदतीखेरीज हे वाङ्मय शुद्ध स्वरूपात प्रकाशित होणे अशक्य आहे. अशा चिंतेत असताना त्यांचा व श्रीदत्तमहाराजांचा सहवास आला. श्रीदत्तमहाराजांच्या न्यायवेदान्त वाङ्मयाचा लौकिक श्रीगुरुमहाराज यांना माहित होताच. ईश्वरी योजना बलवत्तर असल्याने असा हा अपूर्व योगायोग आला. मूळ साहित्य गोळा करून संकलन कार्याला प्रारंभ झाला.

इ. स. १९४९/५० मध्येच हे संकलन कार्य सुरू झाले. मूळ हस्तलिखितांच्या प्रती स्वतःच्या उत्तम हस्ताक्षरात लिहून काढण्याचे फार मोठे कार्य स्वतः श्रीगुरु-महाराजांनी केले. त्यामुळे सर्व वाङ्मय त्यांच्या परिशीलनात आले. त्या सर्व साहित्याची योग्य अशी विभागणी केली स्तोत्रासारखे विपुल वाङ्मय स्वतंत्र विभागात छापण्याचे ठरवून शेकडो विविध अलौकिक सिद्ध स्तोत्रे संग्रही आणण्याचे प्रयत्न झाले. श्रीटेंबेस्वामींच्या चातुर्मासाची, विविध आठवणींची तत्पूर्वी काही प्रकाशित झालेल्या साहित्याची जुळणी केली. प्रत्येक ग्रंथाचे वैशिष्ट्य संकलित केले. मंत्रगर्भ स्तोत्रे अभ्यासून त्यांचे वैशिष्ट्य शोधून काढले. हे बहुतेक वाङ्मय संस्कृतमध्ये असल्याने शास्त्रीपंडितांच्या समिक्षेने त्याचे मोल स्पष्ट करण्यासाठी भारतातील विविध पंडितांकडे मूळ साहित्याच्या प्रती करून त्या त्यांना अभ्यासण्यासाठी पाठवून दिल्या. त्या सर्व पंडितवर्यांशी श्रीदत्तमहाराजांनी पत्र-भेट इ. माध्यमातून संपर्क साधला. या कार्याची अपूर्वाई त्यांच्या कानावर घातली. तेव्हा उत्तम प्रस्तावना या सर्व ग्रंथांना मिळाल्या.

एक प्रकाशन मंडळ स्थापन केले. एकूण किती पृष्ठांचे, किती खंडांचे हे कार्य होईल याचा अंदाज निश्चित केला. प्रत्यक्ष किती खर्चाचे हे काम आहे त्याचाही अंदाज घेतला. उत्तम व निर्दोष छपाई, उत्तम बांधणीचे संग्राह्य ग्रंथ, कमीतकमी किती किंमतीत देऊ शकू हेही ठरविले. या प्रकाशन कार्याला देवाचा, गुरूंचा आशीर्वाद घेतला. निवेदन पत्रक काढले. १२ खंडांमधून पाचहजार पृष्ठांचे वाङ्मय फक्त एकावन्न रुपयात देण्याचा निर्णय घेतला व तसा तो जाहीर केला. अगाऊ पैसे भरून मागणी सुरू झाली. या कार्यासाठी श्रीटेंबेस्वामींच्या भक्त शिष्या इन्दोरच्या राणीसाहेबांनी मोठी आर्थिक मदत केली. अशा या कार्याचे खरे आधारस्तंभ फक्त दोघेच होते. एक श्रीगुरु-महाराज आणि दुसरे श्रीदत्तमहाराज "अधिष्ठानं तथा कर्ता" कार्याला लाभले. मग

विविध साधने-प्रयत्न इ० सुरू झाले. "दैवं चैवात्र पंचमम्" पाठीशी असल्याने हे महान कार्य यशस्वी झाले.

या बारा खंडांच्या प्रस्तावना मननचिंतन-पूर्वक वाचल्या म्हणजे या कार्याचे अंतरंग व बहिरंग स्वरूप स्पष्टपणे ध्यानी येईल. या प्रकाशनाचे प्रकाशक श्रीगुरुमहाराज होते. अध्यक्षही तेच होते. त्यामुळे प्रत्येक खंडातून प्रकाशकाचे निवेदनही विस्तृतपणे आलेले आहे. हे निवेदन म्हणजे या प्रकाशन कार्याचा हेतू, अनुकूल, प्रतिकूल परिस्थितीची कल्पना, कार्याची विविध माहिती, ग्रंथांचे वैशिष्ठ्य इ. प्रकारे प्रकाशनाचा सर्व इतिहासच वाचकांपुढे ठेवलेला आहे. हे प्रकाशकाचे निवेदन प्रकाशकाच्या नावाने त्या त्या खंडातून प्रसिद्ध झालेले आहे. परंतु यातही महत्त्वाचे रहस्य हे आहे की, ही सर्व निवेदने श्रीदत्त-महाराजांच्या लेखणीतून लिहिली गेलेली आहेत. सर्वसामान्य वाचकाला आणि व्यवहारी दृष्टीला यामध्ये श्रीदत्तमहाराज दिसणारही नाहीत. सद्गुरू हे शिष्यरूपातून क्रीडा करीत असतात तर सच्छिष्य ही क्रीडा करवून घेणारे एकमेव सद्गुरूच समर्थ असतात. या जाणीवेने दोघेही वागत असल्याने येथे परस्परांच्या अभिन्नत्वाचीच प्रचीती येते.

इतके लिहून झाल्यावर आता या प्रचंड कार्याची थोडक्यात कल्पना येण्यासाठी बारा खंड व त्याचे प्रस्तावना लेखक इ. स्थूल गोष्टींचा संक्षिप्त परिचय करून घेऊ.

१) **शिक्षात्रय**– प्रकाशनकाल-विजयादशमी १९५१, पृष्ठ संख्या ४१३, प्रथम पुष्पम् ।

प्रस्तावना– पं. राजेश्वर शास्त्री द्रवीड, वाराणसी, कुमार शिक्षा भाषांतर– पं विष्णुशास्त्री खरे, सातारा, युवा शिक्षा भाषांतर– पं. श्रीपाद शास्त्री जेरे, कोल्हापूर आणि वृद्ध शिक्षा भाषांतर– पं. आत्माराम शास्त्री जेरे, अमळनेर.

२) **स्तोत्रादि संग्रह**– प्रकाशनकाल-आषाढ शु. १ २३।६।१९५२, पृष्ठ संख्या ४५४, द्वितीय पुष्पम्, स्तोत्र संख्या ४१३.

प्रस्तावना– पं. श्रीधुंडिराजमहाराज कवीश्वर, देऊळगावराजा.

३) **सप्तशती गुरु चरित्रसार, श्रीदत्त लीलामृताब्धिसार**–

(माघ माहात्म्य, स्त्रीशिक्षा, प्राकृत मनन, नवीन मिळालेली स्तोत्रे, श्रीदीक्षित महाराज कृत स्तोत्रादि संग्रह)

प्रकाशनकाल–दत्तजयंती १ डिसेंबर १९५२, पृष्ठ संख्या ४३८, तृतीय पुष्पम्.

प्रस्तावना– पं. श्रीकल्याण श्रीपाद तथा श्री. अण्णासाहेब कुलकर्णी, इचलकरंजी.

४) **श्रीदत्त माहात्म्य**– प्रकाशनकाल गुरुपौर्णिमा १९५३, पृष्ठ संख्या ४२५, चतुर्थ पुष्पम्.

प्रस्तावना– लोकनायक श्री. माधव श्रीहरी अणे, पुणे.

याच्या ७ आवृत्ती निघाल्या असून तो स्त्री-पुरुष या सर्वांना नित्य उपासनेत

वाचनास उपयुक्त व शास्त्रसंमत आहे. याचे अनुभवही उत्तम येतात. या ग्रंथात स
विषय प्राकृत सोप्या भाषेत आलेले असून हा श्रीगुरुचरित्रासारखा सिद्ध ग्रंथ आहे.

५) **श्रीगुरुचरित्र काव्य आणि दत्तचंपू**–प्रकाशनकाल गुरुद्वादशी ३।११।१९५३
पृष्ठसंख्या ६५०, पंचम पुष्पम्.

प्रस्तावना–पं. श्रीपादशास्त्री तापस, मुळगुंद. यातील विविध भागांची भाषांतरे पं. श्रीपादशास्त्री कवीश्वर, पं. वामनशास्त्री जेरे, पं. ईश्वरशास्त्री दीक्षित, पं. रामशास्त्री जेरे पं. आत्मारामशास्त्री जेरे, पं. बापुशास्त्री कोडणीकर–यांच्या सहकार्याने प्राप्त झाली.

६ व ७) **श्रीदत्तपुराणम**–(सटीकम्) प्रकाशनकाल चैत्र शु. १, ४ एप्रिल १९५४
पृष्ठ संख्या ६९०, षष्ठं, सप्तमंच पुष्पम्.

प्रस्तावना–पं. श्री. अनंतशास्त्री फडके, काशी. पुराणवाङ्मयाच्या कसोटीचा हा ग्रंथ अभ्यासनीय आहे.

८-९) **(द्विसाहस्त्री) श्रीगुरुचरितम्**-सटीकं सचूर्णिकंच, प्रकाशनकाल अक्षय तृतीया, ५ मे १९५४, पृष्ठ संख्या २०७, अष्टमं–नवमंच पुष्पम्

प्रस्तावना पंडितवर्य श्रीहरिरामशास्त्री शुक्ल, वाराणसी.

हा ग्रंथही अपूर्व कोटीतील आहे. संस्कृत मधील कठीण शब्दातील हा ग्रंथ आहे यावर टीकाही स्वतः श्रीस्वामीमहाराजांची आहे. या ग्रंथात ज्ञान–कर्म-उपासना–भक्ति हे सर्व विषय अतिउत्तम आलेले आहेत. श्रीमदाचार्यांच्या अद्वैत वेदांताची अनेक उद्धरणे यात आली असल्याने ज्ञानी जिज्ञासूंना हा ग्रंथ अभ्यासनीय आहे.

**१०–११) (समश्लोकी गुरुचरित्र) गुरुसंहिता चूर्णिका संहिता–**

प्रकाशन–गुरुपौर्णिमा दि.१५-७-५४, पृष्ठसंख्या १०६४ (दशमं-एकादशमंच पुष्पम)

प्रस्तावना– पं. श्रीभालचंद्रशास्त्री उप्पिनबेट गिरी, धारवाड, मराठी गुरुचरित्राचा संस्कृत अनुवाद म्हणजे हा ग्रंथ आहे.

१२) **वेदनिवेदनि स्तोत्र**– श्रावण व॥ ५, शतसांवत्सरिक जयंती, १९-८-१९५४,
पृष्ठसंख्या ३१९, द्वादश पुष्पम्।

टीकेचे सुबोध भाषांतर प्रा. पं विनायकशास्त्री टिल्लू इंदोर, श्रीकृष्णा लहरी सटीक, सविवरण सभाषांतर, नवीन मिळालेली स्तोत्रे, कीर्तनोपयुक्त आख्याने.

पंचपाक्षिकाचे भाषांतर प्रा. न्यायरत्न नारायणशास्त्री वाडीकर व प्रो. हणमंतराव भिडे या अहमदाबादच्या विद्वानांनी केले.

१३) **श्रीगुरुदेव चरित्र**-शतसांवत्सारिक जयंती, प्रकाशन-श्रावण व.५, पृष्ठ संख्या ३००.

हे प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांचे चरित्र संकलन व लेखन श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी केले. बारा खंडात हे चरित्र समाविष्ट असले तरी हा स्वतंत्र ग्रंथ आहे. म्हणजे हे १३ वे पुस्तक आहे. एकुण पृष्ठसंख्या ५३६०.

वरील माहितीवरून अनेक गोष्टी प्रकाशात येतात—

१) सर्व ग्रंथांचे विषय व त्याच्या मांडणीचे स्वरूप पाहिले म्हणजे सर्व वेदांत-सूत्रांचा यात संबंध आला असल्याचे जाणवते. ज्ञानाच्या सर्व बिंदूंना स्पर्श करणारे व त्याचे मार्मिक स्पष्टीकरण असलेले हे वाङ्मय आहे.

२) परमार्थमार्गीयांना ज्ञान-भक्ति-कर्म आणि योग या चारही मार्गांचा उपयोग आहे. यांचा समन्वय हा या ग्रंथाचा विशेष आहे.

३) कर्म–आचरण–गुरुनिष्ठा–श्रद्धा व उपासना या गुणांचा साधकांच्या जीवनात प्रत्यय दिसला तरच तो परमार्थात उच्च स्थिती गाठू शकतो यावर विशेष लक्ष केंद्रित करून लिहिलेले हे मार्गदर्शक ग्रंथ आहेत.

४) श्रीदत्तात्रेय देवतेच्या अवताराचे कारण व कार्य अत्यंत मार्मिकपणे विशद करून दाखविणारे हे ग्रंथ आहेत. तसेच ही परंपराही अखंड चालू असल्याचे यामधून स्पष्ट केले आहे.

५) स्तोत्रांचा व्यापक विभाग पहाताना अनेक गोष्टी जाणवतात. सर्वत्र एक परमात्मतत्त्व असून विविध देवतांच्या कार्याचे व शक्तीचे स्वरूप व्यक्त करणारी ही स्तोत्रे आहेत. अनेकात एकत्वाची दृष्टी या स्तोत्रांतून स्पष्ट दिसते. ही स्तोत्रे सिद्ध असल्याने या स्तोत्रांचे नित्यपठण आपले लौकिक व पारलौकिक विक्षेप दूर करणारी आहेत. अनेक स्तोत्रे मंत्रगर्भ असल्याने त्या स्तोत्रांच्या पठणातून त्या त्या मंत्रांचेही लाभ मिळतात

संस्कृत स्तोत्रे, मराठी स्तोत्रे, पदे, आरत्या, भजने, अभंग इ. सर्व प्रकार यामध्ये आहेत. या काव्य रचनेत अनेक बौद्धिक चमत्कारही अनुभवास येतात. हारगर्भ मंत्रात्मक श्लोक, एकच ओळ उलट सुलट वाचल्यास तसेच शब्द येणारे श्लोक, प्रत्येक ओळीचे ठराविक अक्षर एकापुढे एक वाचित गेल्यास गीतेचा संपूर्ण १५ वा अध्याय तयार होणारी काव्यरचना, स्तोत्रातून गुंफलेले व ठराविक क्रमांच्या अक्षरांनी तयार होणारे मंत्र अशा कितीतरी गोष्टी श्रीस्वामीमहाराजांच्या अलौकिक प्रज्ञेचा व सिद्ध स्थितीचा प्रत्यय देतात.

६) श्रीदत्तात्रेयांच्या सोळा अवतारांच्या कथा, सत्य दत्त कथा, दत्तजन्माचे आख्यान, दत्तमाला मंत्र, दत्तभाव सुधारस स्तोत्र, दत्त नामावलीमध्येहि दकारादि दत्त नावे, अष्टोत्तर शत दत्त नामे, दत्तसहस्र नामावली इ. चा समावेश, दत्तकवच, दत्त प्रातःस्मरण, पंचपदी, दत्तषोडशोपचार पूजा इ. अनेक गोष्टींचा व्यापक प्रमाणावर साहित्यातून उल्लेख केल्याने श्रीदत्तात्रेयांचे स्वरूप स्पष्ट झाले आहे.

७) श्रीदत्तचंपू–त्रिशति दत्तकाव्य–सप्तशति गुरु चरित्र, गुरुसंहिता, शिक्षात्रय, द्विसाहस्री, दत्तपुराण, दत्तमहात्म्य, दत्तलीलामृताब्धिसार, कृष्णालहरी, वेदनिवेदिनी,

पंचपाक्षिक, कीर्तन आख्याने इ. सर्व साहित्य संभार, संपूर्ण जीवन, प्रवासी असून निर्माण झालेला आहे हे तर सर्वात विशेष आहे.

श्रीस्वामीमहाराजांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' ह्या महामंत्राला पुनः फार मोठी लोक जागृति दिली. दत्तस्थानांच्या उपासनेला व तेथील नित्यक्रमाला पद्धतशीर चालना दिली. इ. गोष्टीही वैशिष्टय पूर्ण आहेत.

८) या बाराखंडाच्या कार्याला प्रारंभ १९५० मध्ये झाला. आणि इ. स. १९५१ च्या विजयादशमीला प्रथम पुष्पाचे प्रकाशन झाले. त्यानंतर ७/८ महिन्यांनी दुसरे पुष्प २३।६।१९५२ ला श्रीस्वामीमहाराजांच्या पुण्यातिथीला प्रकाशित झाले. त्यानंतर तिसरे पुष्प सहा महिन्यांनी श्रीदत्तजयंतीला १ डिसेंबर १९५२ ला प्रकाशित झाले. चौथे पुष्प 'दत्तमहात्म्य' त्यानंतर सहा महिन्यांनी प्रकाशित झाले. पांचवे पुष्प ३।११।५३ मध्ये प्रकाशित झाले. सहावे व सातवे पुष्प एका खंडात ४ एप्रिल १९५४ पाडव्याच्या दिवशी प्रकाशित झाले. त्यनंतर लगेच एक महिन्यात अक्षय्यतृतीयेला ५ मे १९५४, आठवे व नववे पुष्प 'द्विसाहस्त्री' प्रकाशित झाले. त्यानंतर तीन महिन्यांनी गुरुपौर्णिमेला १५ जुलै १९५४ ला गुरुसंहिता हे एक हजार पृष्ठांचे १० वे ११ वे पुष्प प्रकाशित झाले. त्यानंतर श्रीस्वामीमहाराजांच्या जन्मशताब्दी महोत्सव प्रसंगी १९।८।५४ ला १२ वे पुष्प व 'श्रीगुरुदेवचरित्र' ही दोन पुस्तके प्रकाशित झाली. सर्व ग्रंथांची पृष्ठ संख्या पाचहजार तीनशेसाठ झालेली आहे.

म्हणजे इ. स. १९५१ मध्ये एक, इ. स. १९५२ मध्ये दोन, इ. स. १९५३ मध्ये दोन, आणि इ. स. १९५४ मध्ये ६ ते १२ खंड आणि श्रीगुरूदेव चरित्र अशी सात पुस्तके प्रकाशित झाली. १९५४ मध्ये महिना, दोन महिने, तीन महिनें इतक्या अल्पावधीत मोठमोठाले ग्रंथ प्रकाशित झाले. श्रीगुरुदेव चरित्र तर श्रीदत्तमहाराजांनी अवघ्या ३/४ आठवड्यात लिहून, छापून झाले. यावेळी या ग्रंथाचे लेखन व छपाई एकाच काळात झाली आहे. हे सर्व नियोजन, प्रुफ तपासणे, लेखन करणे, प्रेस कॉपी तयार करून देणे ही कामे श्रीदत्तमहाराजांची होती. एवढे मोठे कार्य आपल्या हातून झाले आहे याचे कधीतरी त्यांच्या मुखातून आपणास ऐकावयास मिळते का ! जणू त्यांना त्याचे स्मरणही नाही असे ते या संदर्भात वागतात. पण या साहित्यातील कोणतेही वाक्य, श्लोक, संदर्भ हा त्यांच्या जिभेवर सदैव हजर असतो. हे सर्व वाङ्मय त्यांच्या स्मृतीत अखंड आहे.

९) या ग्रंथाच्या विक्रीसाठी, प्रचारासाठी स्वतः श्रीदत्तमहाराज खूप हिंडले, खूप मोठा पत्रव्यवहार त्यांनी केला. इतकेच नव्हे तर त्यांच्या मातोश्री श्री. सौ. सरस्वतीबाई ऊर्फ आईसाहेब यांनीही श्रीदत्तमहात्म्याच्या प्रचारासाठी मराठवाड्यात खूप प्रवास केला व कार्यही केले. या कार्याला अनेकांचे सहकार्य झाल्याचे दुर्लक्षित न करताही श्रीदत्त-महाराजांच्या या कार्याचे मोल शब्दातीत आहे हेच मानावे लागेल.

१०) श्रीटबेस्वामीमहाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव मोठ्या प्रमाणात हैद्राबाद येथे झाला. त्यावेळी ब्रह्मश्री आत्मारामशास्त्री जेरे यांचे अध्यक्षतेखाली ग्रंथ प्रकाशन समारंभ झाला. या उत्सवाची सर्व महत्वाची कामे श्रीदत्तमहाराज यांचेकडे होती.

असे हे वाङ्मय तेही विराट स्वरूपात प्रकाशित करणाऱ्या श्रीसद्गुरुगुळवणी-महाराज आणि श्रीदत्तमहाराज कवीश्वरशास्त्री यांचे अन्तःकरण या कार्याशी किती समरस झाले असेल ते कोणते शब्द वापरून व्यक्त करता येणे शक्य आहे? किमान या महापुरूषांचे हे अलौकिक कार्य आहे एवढी कृतज्ञता आपल्या अन्तःकरणात निर्माण झाली तरी आपली त्यांच्या ठिकाणी विशेष श्रद्धा व भक्ती निर्माण होईल यात संशय नाही. यासाठीच हा विषय लिहिला आहे.

## श्रीधुंडिराजमहाराज व श्रीगुळवणीमहाराज यांची भैमरथशांती व अमृत महोत्सव

विदर्भ मराठवाड्यात श्रीधुंडिराजमहाराज यांचा शिष्यपरिवार फार मोठा. त्या शिष्यमंडळींनी श्रीधुंडिराजमहाराजांची इ. स. १९४६ मध्ये सष्ठ्याब्दी शांती, म. म. श्री. श्रीधरशास्त्री वारे यांच्या शुभहस्ते, नासिक येथे साजरी केली होती. त्यावेळी श्रीदत्तमहाराजही तिकडे गेले होतेच. नंतर इकडे श्रीगुळवणीमहाराजांची सष्ठ्याब्दी ही वाडीला-हैद्राबादला झाली. त्यामध्ये श्रीदत्तमहाराज होते. आता इ. स. १९५६ मध्ये श्रीधुंडिराजमहाराजांची भैमरथी शांती व अमृत महोत्सव करण्याचे ठरविण्यासाठी शिष्य-मंडळींनी श्रीदत्तमहाराजांना देऊळगावराजा येथे बोलावून घेतले. मंडळींची बैठक होऊन उत्सव मोठ्या प्रमाणात करायचे ठरले. श्रीव्यंकटेशचरणी विष्णुयाग झाला. त्या प्रसंगी श्रीशिरोळकरस्वामीशंकराचार्य यांनी श्रीधुंडिराजमहाराज यांना 'भक्त रत्न' ही पदवी अर्पण केली. इतरही धार्मिक अनुष्ठाने व विपुल प्रमाणात अन्नसंतर्पण झाले. या महोत्सवा-साठी श्रीगुळवणीमहाराज, श्रीशंकरकाका आजेगाकर, श्री. आत्मारामशास्त्री जेरे, श्री. वैद्यमास्तर, श्री विष्णुपंत पंची, श्री बापुसाहेब कुबडे ही आत्मीय मंडळी देऊळगाव-राजा येथे गेली होती. हे घरातलेच-सद्गुरु पितृदेवांचे कार्य म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या कार्यव्यापाला कुठेच उणीव नव्हती.

यानंतर इ. स. १९५७ मध्ये श्रीगुळवणीमहाराजांची भैमरथी शांती व अमृत महोत्सव व्हावा ही इच्छा श्रीदत्तमहाराजांनी श्री. कुबडे यांचे द्वारा श्रीगुरुमहाराजांच्या कानावर घालून संमती मिळविली. या निमित्ताने श्रीगुरुमहाराजांचे चरित्र प्रकाशित व्हावे आणि योगावरही शक्तिपात योगाच्या मार्गाचेंही त्यात सप्रमाण विवेचन यावे अशी योजना व तयारी करून ठेवली. या महोत्सवाचे कार्याध्यक्ष श्रीदत्तमहाराज होते. वाडीला या महोत्सवाचा एक भाग झाला. पुण्यालाही हा महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा झाला. अनेक धार्मिक अनुष्ठाने झाली. अनेक विद्वान पंडितांशी संपर्क साधला.

पंडितजी सातवळेकर, श्रीकुवलयानंदजी, श्री लोकनायक अणे, श्री. सोनोपंत दांडेकर, श्री. बाळशास्त्री हरिदास, श्री. दत्तो वामन पोतदार आदि श्रेष्ठी या समारंभात उपस्थित होते. अनेक साधक शिष्य मंडळीही आलेली होती. अनेकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. पण याचे मार्गदर्शन नियोजन कार्याध्यक्षांकडे होते हे प्रामुख्याने नजरेत भरते. 'श्रीगुरुदत्तयोग' ग्रंथाचे प्रकाशन याच समारंभात झाले.

## दुःखेषु अनुद्विग्नमना–सुखेषु विगतस्पृहा–वृत्ति

वेदांत लिहायला आणि बोलायला सोपा असतो, परंतु आचरणाला सर्वात कठीण असतो. ज्यांच्या जीवनात हे आचरण दिसते ते वंदनीय असतात. ही स्थिती संत-सत्पुरुषामध्येच आढळते. किंवा ज्यांच्यामध्ये आढळते तेच संत सत्पुरुष असतात. 'चित्ते-वाचि-क्रियायांच साधूनामेंकरुपता' असे सूत्र हेच स्पष्ट सांगते. प्रपंच, जगव्यवहार हा द्वंद्वावर चालतो आणि परमार्थ या द्वंद्वविरहित स्थितीवर चालतो. द्वंद्वाचे मुख्य मूळ-दुःखात्मक वृत्तीमधून स्पष्ट होते. याच सुख-दुःखाच्या वृत्ति, लहरी ज्याला बाधत नाहीत तो द्वद्वातीत होत असतो. संतांच्या जीवनात हे प्रसंग सतत अनुभवास येतात. सामान्यतः सर्वांना हे दिसूनही तसा बुद्धीचा दृष्टीकोन नसल्याने त्याचा मनावर प्रभाव पडत नाही. ही मंडळी सामान्य व्यावहारिक दृष्टीने त्या व्यक्तीला अस्वाभाविक प्रवृत्तीचा समजून त्यापासून दूर अलिप्त रहातात. त्यांना वाटते दुःखात दुःखी न होणे किंवा सुखात आनंदी न होणे हे त्यांच्या दृष्टीने अस्वाभाविक आहे. पण परमार्थमार्गी मनुष्याचा जीवनाकडे पाहण्याचा उद्देश सतसंगतीने तत्त्वश्रवणाने-चिंतनाने बदलत जातो. त्याला अशा प्रसंग-घटनांचे मोल अपूर्व वाटू लागते.

श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात एक अत्यंत दुःखद घटना आणि एक अत्यंत सुखद घटना अवघ्या महिना पंधरा दिवसात घडल्या असता त्यांच्या प्रतिक्रिया सहज स्पष्ट झालेल्या आहेत. इ. स. १९५७ च्या जून जुलैमध्ये घडलेल्या घटना आहेत.

श्रीदत्तमहाराज वाडीला सप्ताहासाठी गेले होते. इकडे पुण्यात 'फ्लू' ची साथ सुरू झाली. त्या साथीमध्ये श्रीदत्तमहाराजांच्या घरचे सर्वजण आजारी पडले, सौ. लक्ष्मीबाई व मुले सर्वच तापाने अंथरुणाला खिळले. हे श्रीगुरुमहाराजांना समजताच ते स्वतः त्यांच्या घरी रोज जाऊ लागले. औषधपाण्याची सोय केली. सौ. लक्ष्मीबाईंना ते सूनबाई म्हणत, त्यांना धीर देऊ लागले. पण मुलांमध्ये चि. शोभाचा ताप वाढत चालला. डॉक्टरांना बोलावून तपासणी उपचार चालू होते. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे चि. शोभाला हॉस्पिटल-मध्ये न्यावे लागले. पुण्याच्या स्टेशनपलिकडे संसर्गजन्य रोगाचे हॉस्पिटलमध्ये तिला ठेवले. श्रीगुरुमहाराज या सर्व मदतीमध्ये होते. ते इतक्या लांब रोज हॉस्पिटलमध्येही जाऊन येत होते. घरी येऊन सौ. लक्ष्मीबाईंना धीर देत होते. वाडीला श्रीदत्तमहाराज सप्ताह-पारायणात असल्याने कळवूनही उपयोग नव्हता. ते इथे नसले तरी स्वतः श्रीगुरु–

महाराज लक्ष पुरवीत होते. सौ. लक्ष्मीबाईंना काही सुचत नव्हते. फ्लूच्या तापाने थकवा फार येतो. हातपाय दुखतात. दोन पावले टाकण्याचा त्राण नसतो. अशा स्थितीत असल्याने सौ. लक्ष्मीबाई चि. शोभाला भेटायला जाऊ शकत नव्हत्या. त्याच्या मनाचा सारखा कोंडमारा होऊ लागला. घरीही मुलांच्या आजाराचे तशा स्थितीत पहातच होत्या. रोज त्या श्रीगुरुमहाराजांची वाट पहात. ते आले, त्यांनी चार धीराचे शब्द सांगितले की त्यांना थोडे हलके वाटे. पण त्यावेळी त्यांना रडू आवरत नसे. काय बोलावे ते समजत नसे. श्रीगुरुमहाराजांना सुद्धा ही परिस्थिती पाहून असह्य होत असे, असह्य दुःख ते सहन करतात म्हणून ते संत पदवीला पोचतात. हॉस्पीटलमध्ये गेल्यावर चिं. शोभाशी बोलत. ती सुद्धा आईची, भावंडांची चौकशी करी. श्रीगुरूमहाराज तिलाही धीर देत होते. शेवटी चि. शोभावर काळाने घाला घातला. त्यावेळी श्रीगुरूमहाराजांच्या पुढे फार मोठा प्रश्न पडला. तरी ते घरी गेले. सौ. लक्ष्मीबाईंना म्हणाले "आज आपण शोभाला भेटून येऊ." मग मनाचा धीर करून त्या तीन मजले उतरून खाली आल्या. श्रीगुरुमहाराजांच्या बरोबर शोभाला भेटायला निघाल्या. तोपर्यंत श्रीगुरुमहाराजांनी ही बातमी सांगितली नव्हती. आता सांगण्याशिवाय इलाज नव्हता म्हणून महाराजांनी हळुवारपणे शोभाची प्रकृती फार बिघडली आहे म्हणून तुम्हास नेत आहे असे सांगितले. सौ. लक्ष्मीबाईंना शंका आली, ती त्यांनी बोलून दाखविली. त्यावेळी महाराज गंभीरपणे गप्प बसले. सौ. लक्ष्मीबाईंना रडू आवरेना, तेव्हा महाराजांनी पुनः चार समजुतीचे शब्द सांगितले. हॉस्पिटलमध्ये आल्यावर सर्व खुलासा झाला. मातृहृदय विदीर्ण झाले, दुःखाचा स्फोट झाला. सौ. लक्ष्मीबाईंनी शोभाला कुरवाळले, मिठी मारली. मला सोडून कशी गेलीस ! अग हे वाडीहून तू सांगितलेले घेऊन येतील ! त्यांना मी काय सांगू !" महाराज सौ. लक्ष्मीबाईंना आवरत होते. पाठीवरून हात फिरवीत होते त्यांच्याही डोळ्यातून अश्रूधारा वहात होत्या. हा दुःखाचा आवेग बाहेर पडल्याशिवाय कमी होणारा नव्हता. म्हणून ते स्तब्धपणे उभे होते. थोड्यावेळाने सौ. लक्ष्मीबाईंना बाजूला घेऊन श्रीमहाराज म्हणाले "आपण आता घरी जाऊ. मी परत येतो. अशा स्थितीत शोभाला तिकडे आणणे बरे नाही. लहान मुलांना हे पाहवणार नाही. इकडेच तिचा अंत्यविधी उरकून मी घरी येतो." समजूत घालण्याचा प्रयत्न केला. जड अन्तःकरणाने सौ. लक्ष्मीबाई श्रीमहाराजांच्या बरोबर घरी आल्या. श्रीमहाराजांनी चार मंडळी बरोबर घेतली आणि तिकडची व्यवस्था पार पाडून आले.

वाडीचा सप्ताह संपला. त्याच दिवशी श्रीदत्तमहाराजांच्या हातात पत्र पडले. 'पुण्याला ताबडतोब निघून यावे.' श्रीगुरुमहाराजांचे पत्र होते. श्रीदत्तमहाराज पुण्यात आले. घरी गेले आणि हा दुर्धर प्रसंग ऐकण्याचे दुर्दैव त्यांच्यापुढे आले. पुण्याहून जाताना असे काही घडेल अशी काहीही कल्पना श्रीदत्तमहाराजांना नव्हती. अवघा एक आठवड्याचा काळ कन्येचा काळ ठरला. श्रीदत्तमहाराजांना किती दुःख झाले असेल

हे सांगणे कठीण आहे. कारण ते बाहेर दुःखस्वरूपात प्रकट झाले नाही. पण त्यांच्या मौनाने आणि प्रगाढ गांभीर्याने ते झालेले दुःख सहन करीत होते. आकाश गंभीर आहे म्हणून सर्व वायु-मेघ सहज सहन करते. सागर गंभीर आहे म्हणून सारे जलचर, लाटा इ. सहन करतो. पृथ्वी गंभीर आहे म्हणून सर्व काही सहन करते. "सहनं सर्व दुःखांना अप्रतिकार पूर्वकम्" ही तितिक्षा गांभीर्याने प्राप्त होते.

हैद्राबादला बापुभटजी म्हणून एक सत्पुरुष अलिकडच्या पन्नास वर्षांत होऊन गेले आहेत. त्यांच्याकडे ते असताना श्रीगुरुमहाराज जाऊन राहून आलेले आहेत. श्रीदत्तमहाराजांनाही त्यांच्या भेटीचा योग आला होता. हे बापुभटजी संगीतामधील 'ख्याल-टप्पा' चे विशेष गायक होते. त्यांच्या गायनाची रोजची सेवा देवापुढे होत असे. त्यांच्या संगीताचा लौकिक निजामच्या बादशहापर्यंत पोचला होता. तेव्हा बापुभटजींचा 'ख्याल टप्पा' ऐकण्यासाठी बादशहाने त्यांना दरबारात येण्याचे निमंत्रण दिले. परंतु बापुभटजीने निरोप पाठविला 'बादशहाची इच्छा आहे तर त्यांनी मंदिरात येऊन आमचे गाणे ऐकावे.' विशेष हे की बादशहाने मंदिरात येऊन गाणे ऐकले व बापुभटजींच्या गायनावर प्रसन्न झाले. बापुभटजींचा हा लौकिक दूरवर पसरला. तेव्हा त्यांचा ख्यालटप्पा ऐकायला उत्तर प्रदेशातील एक संगीत तज्ज्ञ खाँसाहेब शोध घेत घेत हैद्राबादला त्यांचेकडे आले.

सकाळची वेळ होती. ते खाँसाहेब बापुभटजींचा पत्ता शोधीत आले. बापूभटजी घराच्या ओटीवर बसले होते. खाँसाहेबांची त्यांची भेट झाली. नम्रतेने अभिवादन करून स्वतःचा परिचय खाँसाहेबांनी करून दिला आणि बापुभटजींना विनंती केली की, 'मी आपला ख्याल-टप्पा ऐकायला मुद्दाम आलो आहे. आपण सांगाल तेव्हा येईन.'' एवढ्या लांबून मोठ्या श्रद्धेने खाँसाहेब आले आहेत तर असाच गाऊया असा विचार करून बापुभटजींनी घरातून तंबोरा आणला आणि ओटीवरच आलापीला सुरुवात केली. दोन तास ख्याल-टप्प्याची चीज एकतानतेने झाली. खाँसाहेब मंत्रमुग्ध झाले. तेवढ्यात आतून निरोप आला. 'तयारी झाली आहे, चलाव' तेव्हा खाँसाहेबांना वाटले जेवणाची तयारी झाली असेल. पण प्रत्यक्षात ती तयारी फार वेगळी होती. त्याच दिवशी पहाटे बापुभटांचा मुलगा वारला होता. त्यांच्या अंतयात्रेची तयारी झाली, चलाव असा तो निरोप होता. हे खाँसाहेबांच्या लक्षात येताच ते एकदम चपापले. अधीरतेने म्हणाले, "महाराज, ऐसी अवस्थामें आपने इतने शांत चित्तसे यह इतना बढिया गाना कैसे गाया!" त्यावर बापुभटजी शांतपणे म्हणाले, "होणारे होऊन गेले. तो काही परत येणार नव्हताच. आपण इतक्या लांबून एवढ्या श्रद्धेने आलात. आपल्यासा समाधान झाले ही गोष्ट ठीक झाली.''

श्रीबापुभटजींचे स्थान हे श्रीदत्तमहाराजांच्या श्रद्धेचे स्थान आहे. तिथे ते दरवर्षी पुण्यतिथीला इतर कार्यक्रमाला जात असतात, संत संगती आणि संत परंपरा याचा

परिणाम होऊन तसे होणारे संतच असतात. समाचाराला येणाऱ्यांना श्रीदत्तमहाराजच सांगत 'एवढाच ऋणानुबंध म्हणून घडले.' 'मृत्यू मानवी प्रयत्नाने का थांबविता येणारा आहे काय ?' 'घरच्या कोणालाच तिथे काही करता आले नाही. पण श्रीगुरुमहाराजांकडून ते तिचे सर्व झाले. हे तिच्या भाग्यानेच घडले. 'तिच्या आईच्या दुःखापुढे आमचे दुःख काय ?' जाताना तिने काही आणायला सांगितले होते. घाईने येण्याच्या गडबडीत आणता आले नाही. तिने सांगितलेल्या वस्तू आणल्या असत्या तर त्या वस्तूकडे पाहूनही दुःख झाले असते म्हणून देवाने त्या आणूही दिल्या नाहीत. "ईश्वर न्यायी आहे. आपल्याला कळत नाही. म्हणून देवाला दोष देता येत नाही." अशा वाक्यातून त्यांची मनस्थिती आणि त्यावरील विवेकाचा संयम याचा चांगला बोध होतो. त्यांनी स्वतःहून हा विषय कधी कोणाजवळ काढला नाही. त्याचबरोबर आपल्या सुखाच्या–सत्काराच्या–घटनाही त्यांनी कधी कोणाला सांगितल्या नाहीत. जिथे सांगणे अनिवार्य होते तेथे सांगताना संयम होता. नम्रता होती.

याच दुःखद घटनेनंतर एक महिन्याच्या आत दुसरी विशेष घटना घडली. पण ही दुसरी घटना सुखद होती. सन्मान, सत्काराची होती. त्या प्रसंगाची ही माहिती लक्षात घेण्यासारखी आहे.

श्रीदत्तमहाराजांना याच सुमारास कांचीकामकोटीच्या श्रीजगद्गुरु शंकराचर्योंकडून पुण्याच्या पत्त्यावर सुवर्ण कटकाचे पार्सल व श्रीजगद्गुरुंचे श्रीमठनिर्वाहकांतर्फे पत्र आले. तेथील विद्वत्सभेत श्रीदत्तमहाराजांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने न्यायवेदान्तशास्त्र चर्चेत आपले अलौकित्त्व सिद्ध करून मोठमोठ्या विद्वानांना मंत्रमुग्ध केले. एवढे असूनही आपल्या विनयशील आचरणाने सर्वांच्या हृदयात स्नेह आणि आदर निर्माण केला. यामुळे प्रसन्न होऊन श्रीजगद्गुरूंनी श्रीदत्तमहाराजांचा हा सन्मान केला. ही अत्यंत सुखद वार्ता असूनही त्यासंबंधी ते किती संयमी आहेत व याचे श्रेय व व कर्तुत्त्व आपले नाही तर श्रीसद्गुरू कृपेचे हे फळ आहे हे त्यांच्याच पत्रातून स्पष्ट आढळून येते.

नुकत्याच घडलेल्या दुःखद प्रसंगात जी गंभीरता त्यांच्या चित्ताची आढळून आली, तीच गंभीरता या सुखद प्रसंगातही दिसून येते. ईशसत्तेने सर्व काही घडत असते या दृढ श्रद्धेच्या श्रीदत्तमहाराजांना दोन्ही अवस्थेत ईश्वरी न्याय आणि ईश्वराचे दयाळुत्व या ईशगुणांचेच दर्शन घडले.

श्रीजगद्गुरुंचे पत्र व पार्सल पुण्यात आले तेव्हा श्रीगुरुमहाराज सोलापूरला होते. हे वृत्त श्रीगुरुमहाराजांना त्यांनी पत्राने कळविल्यामुळे आपल्याला त्यांचे भाव सप्रमाण कळू शकतात. विशेष म्हणजे श्रीजगद्गुरुंचे पत्र व त्याला उत्तर दिलेले आपले पत्र याच्या नकला करून श्रीदत्तमहाराजांनी सोलापूरला श्रीगुरुमहाराजांकडे पाठविल्या. सर्व

बारीक सारीक घटनांचे निवेदन श्रीसद्‌गुरु चरणापुढे सादर करणे हे भाव आत्मनिवेदन भक्तीचे आहेत. ही आत्मनिवेदन भक्ती आहे हे त्यातील भावावरून ठरते.

॥ श्रीदत्त ॥

पुणे
श्रावण व॥ २ सोमवार १८७९
(ऑगस्ट १९५७)

श्रीचरण सेवेसी– साष्टांग प्रणाम, वि. वि.
इकडील सर्व क्षेम. आपले आशीर्वाद पत्र मिळाले.
आपणासारख्या तपोधन महापुरुषांच्या कृपाकूर्म दृष्टीचे हे फळ आहे.
पुण्यातील आत्तापर्यंतची जीवन यात्रा ज्या आपल्या निरुपाधिकारूण्य
छत्राखाली मला घालविता आली, तेच छत्र जीवनास पुरो.
एवढीच श्रीगुरुचरणी प्रार्थना. क. ही वि.

आपला
**दत्तात्रेय कवीश्वर**

सुमारे ५/७ दिवसांपूर्वी कांचीकामकोटी पीठाधिपत्तीकडून पार्सलने सुवर्ण कटक प्रसाद अतर्कित आला. तेथील सर्वाधिकाऱ्यांचे पत्र आले. त्याची नक्कल आपल्या अवलोकनासाठी पाठवीत आहे.
(मूळ पत्र मोठे आहे. येथे महत्त्वाचा आशय घेतला आहे.)

कांचीपुरम्
न्याय-वेदान्त विद्वान, ब्रह्मश्री ३-८-१९५७
दत्तात्रेय शास्त्री कवीश्वर महाशयानां नमांसि भूयांसी ।
एवं आदिशन्ति अन्तर्वाणि गणश्रेष्ठं, ब्रह्म अद्वैत विद्या अमृत रसिकं, भवन्तं कांची-नगरस्थाः श्रीकामकोटि पीठधिष्ठानाः आचार्याः-

**हेमाभा उमा हैमवती नभवस्था आलंब्य तत्पदम् ।**
**हेम लम्बनभस्यंग हेम लम्ब करो भव ॥**

नमांसि । श्रीमठनिर्वाहकः

[अर्थ–
कांचीपुरम्
३–८–५७

न्याय आणि वेदान्त शास्त्रातील विद्वान ब्रह्मश्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर महाशयांना अनेकवार नमस्कार.

अद्वैत वेदांत शास्त्रविद्येच्या ज्ञात्यांच्या समुहामध्ये श्रेष्ठ, मोक्ष, विद्यारूपी अमृताचा

सानुभ घेणारे आपणास, कांचीनगरातील श्रीकामकोटि पीठाधीश्वरांनी पुढील आदेश दिला आहे.

"सुवर्णाच्या तेजस्वी कांतीने दैदिप्यमान असणाऱ्या, ज्ञानशक्तिरूपी जगन्माता उमा हैमवतीच्या चरण कमलांचा आश्रय करून, 'हेमलंब' संवत्सरामधील श्रावण मासात, तिच्या सुवर्ण प्रसादभूषणाचा स्वीकार करून आपले करकमल सुवर्णभूषित होवोत."

आपणांस पुनः वंदन करणारे
'श्री' च्या मठाचे व्यवस्थापक

वरील पत्रास श्रीदत्तमहाराजांनी संस्कृतमध्ये पाठविलेले उत्तर–

श्रीमस्तु, नैक जन्म सत्संचित परिपाक लभ्य अमोघ अनुग्रहशालिषु, श्रीचरण चरण दिव्य परिसरेषु, सभक्ति उन्मेषं साष्टांगं प्रणमन्, विज्ञापयति–

संयमीन्द्राः! अतर्कित उपनतं हेमभूषणात्मकं भगवत्पाद प्रसादं पत्रस्थाशीस्सहितं समुपलभ्य कृतार्थतायाः परांकिल काष्ठां उपगतः अयं पृथक जनः! क्व वा मादृशः कलेवर अभिमानी मितल्प च मतिर्जन्तुः? क्वा वा जगन्निर्मातृपुरुष धौरेय रूपाणां सदा शिवमद्वैतं चतुर्थं मन्यमानानां महात्मनां अतुलनीयः प्रसादः? एवं त्वेपि यदीदृगास्थान विद्वद्भूषण विश्राण न भाजनतु एनास्य जनस्य संकल्प विषयतां ननु निर्व्याज वात्सल्यं श्रीचरणानां एव अविष्करोति अत्र न अस्ति संशीति लेशः अपि! प्रसाद चिन्हानि पुरः फलानि इति उक्त दिशा संप्राप्तः अयं दंभ दंभोलिभूतः श्रीप्रसाद. अविनयनपनय विष्णो: इत्यादि षट्पदी प्रदर्शित दोषापनयन गुणाधान रूपेण निरंतरा यमस्मन मानसं संस्करोतु, समुत्पादयतु च क्रमशः आवृत चक्षुष्कतां अग्र्यांच बुद्धिं संपादयन् कास्मिन अपि जन्मनि चिदानन्द रूप शीवपद साक्षात्कार योग्यतां इति एव अन्ते प्रसार्य वस्त्रांचलं प्रार्थना इति!

श्रीचरण संदर्शनाकांक्षी शिष्य परमाणुः
कवीश्वरकुल जनुर्दत्तात्रेय शर्मा

वरील संस्कृत पत्राचा मराठी अनुवाद–

अनेक जन्मांच्या पुण्याईच्या परिपाकाने प्राप्त होणाऱ्या, कधीही निष्फळ न होणारी अनुग्रहशक्तीची कृपा करणाऱ्या स्वभाव असलेल्या, ज्या श्रीचरणांमध्ये अनेक देवतांचा दिव्य परिसर आहे अशा श्रीस्वामी चरणांना भक्तीच्या उन्मेषाने युक्त होऊन, साष्टांग नमस्कार करुन, आपणांस अशी विनंती करीत आहे.

यतिश्रेष्ठगणामधील अग्रणी यतिशिरोग्रणी! किंचिन्मात्र कल्पनाहि नसतांना, आपलेकडून आलेला सुवर्णभूषणासहित आपला श्री प्रसाद व आशीर्वाद पत्रहि मिळाले. खरोखर, आपला श्रीप्रसाद व आशीर्वाद पत्र पाहून, मला-सामान्यमनुष्याला-कृतार्थतेच्या पराकाष्ठेची परिसीमाच गाठली, असे वाटते. माझ्यासारखा जडदेहाभिमानी, अल्पमतिचा

हा क्षूद्र जीव कोठे ? आणि सृष्टी निर्माण करणाऱ्या मधील अग्रगण्य शिवशंकराशी अभेद रूप असणाऱ्या, चतुर्थाश्रमाला सन्मानाने मानणाऱ्या, सदैव अविरत तूर्यावस्थेत कल्याणस्वरूप अद्वैत भावमग्न असलेल्या माहात्म्यांचा अतुलनीय महाप्रसाद कुठे ! असे असूनही कांचीपीठाचा विशेष विद्वत्सन्मान मला प्रदान करण्यासाठी आपण मला योग्य समजलात हा यतिराजांचा सहज अकृत्रिम वात्सल्यभावच प्रकट करीत आहे. यात तीळमात्र संशय नाहीं.

'प्रसाद चिन्हानि पुर फलानि' या न्यायाने हा प्रसाद भावी सौभाग्यफलाचे चिन्हच आहे. आपला हा 'श्री-प्रसाद' (श्री म्हणजे सुवर्ण आणि श्री म्हणजे मांगल्य) म्हणजे अहंकाराचा नाश करणारे वज्रच आहे. तसेच 'अविनयमपनय विष्णो' इ. षट्पदीमध्ये (आचार्यांनीं) सांगितल्याप्रमाणे दोषनिवृत्ती करून गुणाधान (गुणांचे तेज वाढविणे) होणारे संस्कार माझ्या मनावर निरंतर होत राहो. आणि क्रमाक्रमाने अज्ञान आवरणाने झाकलेल्या चक्षूंचे उन्मीलन होऊन श्रेष्ठतम बुद्धी प्राप्त होवो. त्यामुळे पुढील कुठल्यातरी जन्मात चिदानंद रूपी शिवपदाचा साक्षात्कार होण्याची योग्यता प्राप्त होवो ही श्री स्वामीचरणी पदर पसरून प्रार्थना आहे.

श्रीचरणदर्शनेच्छू

शिष्यपरिमाणू

कवीश्वर कुलोत्पन्न दत्तात्रेयशर्मा

(पुनः श्रीगुरुमहाराजांना पत्र पुढे चालू)

पंडितराज श्रीराजेश्वरशास्त्रीजी यांना २५ रु. व 'श्रीगुरुदत्तयोग' पुस्तक दिले. त्यांनी आपल्याबद्दल आस्थापूर्वक चौकशी केली. अमृतमहोत्सवाचे वेळी कार्य बाहुल्यामुळे उत्तर देऊ शकलो नाही, असे ते म्हणाले. त्यांची व्याख्याने अनुपम झाली. विद्वत्ता विनीतता, सदाचार, शास्त्रश्रद्धा, जीवनविषयी निश्चितता, निर्मिकता, इ. सर्वच गुण त्यांचे ठिकाणी असामान्य आहेत. त्यांचे ब्रह्मतेज पाहून अत्यंत लाज वाटून, मन अस्वस्थ झाले. 'यच्चतवेष्ट तत्कुरु' अशी सर्वेश्वराजवळ प्रार्थना करीत राहूनच या जन्मी कसे तरी समाधान मिळविणे भाग आहे. असो.

श्री. वैद्यमास्तरांच्या सारख्या पुण्यपुरुषाच्या वियोगाने विषाद वाटतो. आपले प्रकृतिमान वारंवार समजावे. क. ही. वि.

आपला

**दत्तात्रेय कवीश्वर**

पहिले दुःख असतानाच हे सुवर्ण कटक आले. त्यावेळी त्याच्या मुखातून शब्द निघाले. "ईश्वराजवळ जसा न्याय आहे तशी दयाही आहे. त्या दुःखावर फुंकर घालण्यासाठी हे दिले. त्याच्या सत्तेने सर्व काही घडत असते."

श्रीदत्तमहाराजांच्या या 'सुख दुःखे समे कृत्वा' 'लाभा लाभो जयाजयो' या द्वंद्वात्मक स्थितीत समवृत्तीत रहाण्याचे आणखी एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. पुण्यातील नामवंत वकील श्री. एल. आर. गोखले यांनी "गीताकोश" लिहिण्याचा संकल्प केला. या कामासाठी वकीलसाहेबांनी दोन शास्त्री मंडळी हाताशी घेतली. गीतेवरील विविध टीका वाचून कोश तयार करण्याचे काम सुरू झाले. अर्थात या कामासाठी वकीलसाहेब आर्थिक मोबदला देणार होते. दत्त महाराजांनी 'आपण द्याल ते घेईन' असे म्हटले होते. दुसरे गृहस्थ व्यवहारचतुर होते. त्यांनी तासाला पाच रूपये प्रमाणे आपला मोबदला सांगितला. वकीलसाहेबांनी या गोष्टीचा उच्चार न करता त्या गृहस्थाचा मोबदला मान्य केला. श्रीदत्तमहाराजांनी त्या गृहस्थांना तुम्हाला काय मोबदला मिळणार म्हणून रोज भेट गाठ होऊन कधीही चौकशी केली नाही. "यद् यद् कर्म करोमि तद् तद् अखिल शंभो तव आराधनम् ।" या वृत्तीने वागणारे श्रीदत्तमहाराज आपले काम करीत होते. नोकरी संभाळून प्रपंचासाठी द्रव्यार्जन म्हणून त्यांनी हे काम स्वीकारले होते. तीन चार महिन्यात काम संपले. वकीलसाहेबांनी श्रीदत्तमहाराजांना एकूण सर्व कामाचे रुपये तीस दिले. क्षणभर ते स्तंभित झाले. पण मनात 'ईशेच्छा' मानून ते मानधन स्वीकारले व एक अक्षर न बोलता निघून आले. दुसऱ्या गृहस्थांनी आपल्या कामाच्या तासांचा हिशेब पुढे ठेवून पाच रुपयांच्या हिशेबाची रक्कम वकीलसाहेबांकडून घेतली तेव्हा निघून गेले. श्रीदत्तमहाराजांनी याचा उल्लेख किंवा यावर टीका कधीही केली नाही.

पण ईशेच्छेला प्रमाण मानणाऱ्याला येणारे अनुभव ही ईशकृपेचे येत असतात. यानंतर श्रीदत्तमहाराजांची नागपूरला दत्तमंदिरात प्रवचने ठरली. तेथेही मोबदल्याचा विषय काढला नाही. पण अवघ्या आठपंधरा दिवसांच्या या कार्यक्रमाचे मानधन अडीचशे रुपये मिळाले. समतोल वृत्ती असली म्हणजे अशा दोन्ही टोकांचे अनुभव येताना मनाचा तोल सांभाळला जातो. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनात योगाभ्यास किंवा योगशास्त्र याचे बाह्यस्वरूप अनुभवाला येत नाही असे बाह्य दृष्टीला वाटते. परंतु योगाचे फळ किंवा योगी पुरुषाचे जे लक्षण सांगितले आहे. 'चित्तवृत्ति निरोध' किंवा 'समत्वं योग उच्चते' याचा प्रत्यय श्रीदत्तमहाराजांच्या वृत्तीत स्पष्टपणे दिसतो. म्हणून ते द्वंद्वामध्ये सापडत नाहीत.

## श्रीदत्तमहाराजांना शक्तिपात दीक्षानुग्रह

श्रीदत्तमहाराजांना स्वतःसंबंधी बोलावेसे किंवा सांगावेसे कधीही वाटत नाही. आपल्या आवडी, निवडी, नापसंती, मान-सन्मान निंदा-टीका वगैरे कोणत्याही बाबतीत ते कधिही बोलल्याचे आढळत नाही. दुसऱ्याबद्दलही अनुकूल व प्रतिकूल चर्चा त्यांच्या मुखातून कधी ऐकण्यात येत नाही. त्यांना आपल्याकडून मंत्रदीक्षेचा अधिकार मिळून त्यांनी त्याचा कधीही उच्चार केला नाही. फार काय वडीलांच्या परंपरेतून आलेला

दीक्षाधिकार त्यानी कधी व्यक्तही केला नाही. त्यांचा फार मोठा शिष्यपरिवार विदर्भ मराठवाड्यात आहे. तिकडे त्यांचे फार मोठाले कार्यक्रम होतात. पन्नास पन्नास हजारांचे अन्नदान होते इत्यादि गोष्टींची कल्पना पुण्यामुंबईकडील, महाराष्ट्रातील शिष्य परिवाराला बिलकूल नाही ही फार मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. त्यांच्या मातापित्यांना देव मानणारे हजारो भक्त तिकडे आहेत आणि तीच श्रद्धा त्या सर्वांची श्रीदत्त-महाराजांच्यावर आहे हे एकदा कोणीही त्यांच्या बरोबर वा अप्रत्यक्षपणे जाऊन येऊन खात्री करून घ्यावी. एवढी प्रचंड स्थिती असूनही प्रसिद्धीपराङ्मुख राहून साधेपणाने रहाण्याचे असामान्यत्व श्रीदत्तमहाराजांचे ठायी पूर्णपणे आहे. म्हणून त्यांच्या जीवन चरित्राचे सहजासहजी आकलन होऊ शकत नाही.

श्रीगुळवणीमहाराजांनी अनेकांना संकल्पाने दीक्षा दिलेल्या आहेत. दीक्षा घेणारा समोर नसताना, दूरगावी असताना दीक्षा झालेल्या आहेत. इतकेच नव्हे तर ही शक्तिपात दीक्षा देण्याघेण्यातली वस्तू नाही, होणारी आणि मिळणारी वस्तु आहे. येथे प्रयत्नाचा प्रश्न नसतो आणि उपयोगही नसतो. संकल्पशक्ती, इच्छाशक्ती काम करीत असते. हा संकल्प ईशेच्छेने निर्माण होत असतो. दीक्षा देणाऱ्याला असे अनुभव येत असतात. श्रीलोकनाथतीर्थस्वामींनी श्री. नारायणराव ढेकणे यांना प्रथम दीक्षेचे नाकारले होते. पण शक्तिदेवतेने स्वामींना प्रेरणा देऊन घेतलेला निर्णय रात्रीतून बदलायला लावला. दुसरे असेही अनुभव या संदर्भात आहेत की, येणाऱ्या साधकाला केवळ दर्शनाने क्रिया होऊ लागतात. दूरस्थ साधकांना कल्पना नसतानाही स्मरणाने, फोटोच्या दर्शनाने, एखाद्या अनुग्रहीत साधकाच्या सानिध्याने किंवा सिद्धस्थानात जाण्याने वा एखाद्या सिद्ध सत्पुरुषाच्या दर्शन सहवासानेही शक्तिजागृतीचा अनुभव आल्याची अनेक उदाहरणे आहेत. अन्य साधन अनुग्रहात विधी विधानांची बंधने असू शकतात. पण शक्तिपात साधन अनुग्रहात विधि विधानांचे बंधन नसते. ही साधना ईश्वरकृपेने मिळणारी आहे. ईश्वरकृपा पात्र व्यक्तीला तर सहजपणे मिळणारी साधना आहे. ज्याच्या अन्तःकरणात निर्मळ भक्ति असते त्यांच्या बाबतीत तर ही साधना स्वतः प्रकट होते. असे या साधनेचे स्वरूप आहे. हे लक्षात घेऊन श्रीदत्तमहाराजांच्या दीक्षेचा प्रसंग पाहिला म्हणजे त्यांच्या अनुग्रहाबद्दलचा गैरसमज नष्ट होईल. श्रीदत्तमहाराजांसंबंधी श्रीगुरूमहाराजांच्या मनात निश्चित योजना होत्या. म्हणजे संकल्प होते. योजना आखणे आणि पार पाडणे यामध्ये मानवी बुद्धी प्रयत्न येतात. तर संकल्पामध्ये ईश्वरेच्छेला प्रार्थना असते. यामुळे श्रीगुरू–महाराजांचे सर्व संकल्प पूर्णपणे यशस्वी झालेले आहेत.

श्रीदत्तमहाराजांची वृत्ति अनन्य श्रद्धेची आणि भक्तीची आहे. या वृत्ती मुळे ते शरणागत स्थितीत म्हणजे अत्यंत सामान्याहून साधे रहातात. त्यांना आपल्या उच्चभूमिकेचे भानही नसते. त्यामुळे जाणकारानाही भ्रम होतो. हे सर्व अन्तस्थ जाणीवेतून होत असते. म्हणून ते ईश्वरनिष्ठेपासून कधीही ढळत नाहीत. त्यांच्या बुद्धीचा तोल जात नाही. त्यांनी

ही कठीणस्थिती पूर्णपणे अंगात मुरवली आहे. त्यांच्या प्रवचनातून, विवेचनातून, प्रश्नोत्तरातून त्यांची निसंदिग्ध ज्ञानभूमिका अत्यंत विशुद्ध–उच्चतम असल्याने सहजपणे व्यक्त होते. म्हणूनतर श्रीशंकराचार्यांपासून, मोटमोठ्या विद्वान पंडितांपासून तो सामान्य माणासापर्यंत त्यांच्या संबंधीचा आदर दिसतो. त्यांची ही स्थिती लक्षात न घेता त्यांच्या भूमिकेचे मोल दुर्लक्षित करणे म्हणजे आत्महानी करून घेण्यासारखे आहे. त्यांनी कसे रहावे, कसे वागावे, कसे बोलावे हा विचार इतरांनी करणे याचा अर्थ ही दोषैक दृष्टी आहे. ही दृष्टी बदलल्याखेरीज त्यांच्या बोलण्यावागण्याचे अर्थ लक्षात येणे अशक्य आहे. श्रीदत्तमहाराजांना सर्वार्थाने श्रीगुळवणीमहाराजांनी ओळखले होते म्हणून त्यांना वगळून श्रीगुरुमहाराजांनी काहीही केले नाही. उलट त्यांना आयुष्यभर सन्मानाने, आदराने आणि आत्मीयतेने वागवले. श्रीदत्तमहाराजांच्या विरुद्ध कोणी बोललेले त्यांना खपत नसे. त्यांनी अशापैकी कांहीना श्रीदत्तमहाराजांची क्षमाही मागायला लावली होती. श्रीगुरुमहाराजांना गुणांचे मोल होते म्हणून त्यांनी श्रीदत्तमहाराजांना आपले सर्वस्व दिले आहे. अशा श्रीगुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना दीक्षा न देता आपले उत्तराधिकारी केल्याचे लेखी लिहून ठेवले. ही अक्षम्य विसंगति श्रीमहाराजांच्या पदरी त्यांच्याच शिष्यांनी बांधावी हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. हे सारे श्रीदत्तमहाराजांनी मौन स्वीकारून सहन केलेले आहे.

कांचीकामकोटीच्या जगद्गुरूंना लिहिलेल्या संस्कृत पत्रातून श्रीदत्तमहाराजांची लीनता किती पराकोटीची होती हे अगदी स्पष्ट दिसते. त्यात ते शेवटी म्हणतात– "आपल्या कृपेने सर्व दोष निवृत्ती होऊन क्रमशः दैवीगुण वृद्धी होऊन, कोणत्या तरी जन्मामध्ये चिदानंदस्वरूप शिवपदाची प्राप्ती होवो ही पदर पसरून श्रीचरणी प्रार्थना आहे." वास्तविक ज्यांचा अधिकार 'याचि देही याचि डोळा' ही प्राप्ती प्राप्त झालेली अशी आहे त्यांचे हे उद्गार आहेत. अशी अत्यंत लीन वृत्ती असल्याने श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरुमहाराजांच्या जवळ दीक्षेसाठी कधीही शब्द टाकलेला नाही. तरीही श्रीमहाराजांनी त्यांना स्वतःहून केवळ संकल्पाने दीक्षा दिलेली आहे. 'न मागे त्याची रमा होय दासी' ही संतोक्ति संतांच्या अनुभवाची आहे. सामान्याना मागावे लागते. मागूनही मिळेलच याची ही खात्री नसते. पण मागितल्याशिवाय मिळत हीनाही.

श्रीगुरुमहाराजांना सोलापूरचे श्री. वैद्यमास्तर एकदा म्हणाले होते, 'वामनराव ! आपल्या या शक्तीपात विद्येला आपल्यानंतर श्रीदत्तमहाराज कवीश्वरशास्त्रीच योग्य अधिकारी दिसतात. मुळापासूनच त्यांची वृत्ती तयार झालेली आहे. त्यांना तयार करण्याचा प्रश्नच नाही. या मार्गात दुसऱ्याला किती तयार करणार ? स्वतःची तयारी स्वतःच करावी लागते. तसे कवीश्वर आहेत. आपण त्यांना गेली २५/३० वर्षे पहात आलो आहोत. साधनचतुष्टय संपन्न, विवेक, वैराग्ययुक्त ज्ञानी पंडितही आहेत. पण त्याहीपेक्षा त्यांच्या विनयशील स्वभावाला तोड नाही. श्रीस्वामीमहाराजांच्या ग्रंथ

प्रकाशनाचे कार्य त्यांच्यामुळे तडीस गेले. त्यावेळेपासून हा विचार माझ्या मनात होता. माझी इच्छा आपणास सांगितली. जशी आपली योजना असेल तसे होईल."

श्री. वैद्य मास्तरांच्या या विचारांनी श्रीगुरुमहाराजांच्या अन्तस्थ संकल्पांना चालना मिळाली. ही १९५७ मधली घटना आहे. गुरुपौर्णिमेसाठी श्रीमहाराज प्रतिवर्षाप्रमाणे सोलापूरला गेले होते. त्याच वेळी श्री.वैद्यमास्तरांच्या भेटीत हे निर्वाणीचे त्यांचे विचार ऐकण्यास मिळाले. आणि महाराजांचे दर्शन घेत घेत वैद्यमास्तरांचे महानिर्वाण झाले. यासंबंधीचे पत्र श्रीमहाराजांनी पुण्याला श्रीदत्तमहाराजांना पाठविले होते. त्यावेळी त्यांना सुवर्ण कटकाचे पार्सल व पत्र आले होते. ते वृत्त महाराजांनी सोलापूरला कळविले. त्यातील श्रीदत्तमहाराजांचे विचार, विनम्रता आणि कृतज्ञता पाहून श्रीमहाराजांचे अन्तः-करण प्रसन्नतेने भरून आले. वैद्यमास्तरांची इच्छा पुरी करण्याची महाराजांची इच्छा प्रबल झाली.

पुढे याच वर्षी दोन महिन्यांनी महाराज पुण्याला आल्यानंतरची घटना आहे.

सज्जनगडावर श्रीधरस्वामींचा मुक्काम होता. श्रीधरस्वामींचे आणि श्रीदत्त-महाराजांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. गडावर दासनवमीचा उत्सव चालू होता. श्रीधर-स्वामींनी श्रीदत्तमहाराजांना गडावर येण्याचे निमंत्रण एका शिष्याला पाठवून केले. श्रीदत्तमहाराजांची प्रकृति तितकीशी ठीक नव्हती. तरी स्वामींचा निरोप आला म्हणून श्रीदत्तमहाराज २० नारायण पेठेत जाऊन श्रीगुरुमहाराजांना भेटले. काय करावे म्हणून सल्ला मागितला. श्रीगुरुमहाराजांनी सांगितले, "स्वामींचा निरोप आला आहे तर या जाऊन. गडावर समर्थांच्या समाधीजवळ पहाटे बसलात की बरे वाटेल." श्रीदत्तमहाराजांचे आई-वडील पुण्यातच होते. तेही म्हणाले "संतांचे बोलावणे आले आहे तर जरुर जा."

आलेल्या मनुष्याबरोबर, मातापित्यांची आणि श्रीगुरुमहाराजांची आज्ञा घेऊन, प्रकृती ठीक नसतानाही, श्रीदत्तमहाराज समर्थ स्थानाकडे निघाले. सज्जनगडाच्या पाय-थ्याशी आल्यावर गड चढण्याची चिन्हे त्यांना दिसेनात. तेथूनच त्यांनी समर्थांना वंदन केले व बरोबरच्या मनुष्याबरोबर श्रीधरस्वामींना निरोप पाठविला. "आपल्या आज्ञेप्रमाणे पायथ्यापर्यंत आलो आहे. प्रकृती ठीक नाही. तेव्हा काय करू?" यावर स्वामींचा निरोप आला. "डोली करून वर यावे." इतका आग्रहाचा निरोप ऐकून डोली न करता श्रीदत्तमहाराज तसेच हळू हळू गडावर गेले. डोलीतून वर जाणे त्यांच्या वृत्तीला रुचले नाही. रात्री विश्रांती झाली. निघताना महाराज म्हणाले होते पहाटे समर्थांच्या समाधी-जवळ बसावे म्हणजे बरे वाटेल. ते त्यांना आठवले. हे शब्दही समर्थांचेच होते. गुरूंचा शब्द होता तो. * त्याप्रमाणे पहाटे श्रीदत्तमहाराज तशाही स्थितीत स्नान करून समर्थ रामदासांच्या समाधीजवळच्या निवांत, प्रशस्त, सिद्ध स्थानात बसले. त्यांच्याही मनात येऊन गेले की श्रीगुरुमहाराजांनी आपल्याला पहाटे बसायला सांगितले यामध्ये त्यांचा काही हेतू असला पाहिजे. 卐

卐 त्याच रात्री पहाटे उठण्यापूर्वी त्यांना स्वप्न पडले. श्रीगुरुमहाराज आले व म्हणाले "बसा". श्रीदत्तमहाराज नमस्कार करून बसले. महाराज त्यांच्याजवळ आले व त्यांनी श्रीदत्तमहाराजांच्या भ्रूमध्याला स्पर्श केला व ते अदृश्य झाले. स्वप्नातच क्रिया सुरु झाल्या तेव्हा ते जागे झाले. एकूण ईश्वर इच्छा लक्षात आली.

卐 पहाटेच्या स्वप्नाने ही दीक्षा आहे हे निश्चित केले होते. श्रीगुरुमहाराजांचा सहवास अनेक वर्षांचा त्यांना होता. शक्तिपात योगमार्गाची त्यांना चांगलीच माहिती झालेली होती. नुकत्याच झालेल्या अमृतमहोत्सवातील अनेक कार्यक्रम त्यांनी जवळून पाहिलेले होते. श्री. वैद्यमास्तर, श्री. बापुसाहेब कुबडे, श्री. नाना भालेराव यांच्यासारख्या आचारविचारांची प्रगल्भता असलेली शक्तीपातयोगाचा अनुग्रह घेतलेली त्यांची स्नेही-मंडळी चांगल्या सहवासाची होती. पंडितजी सातावळेकरांसारखी पंडितप्रवर श्रीगुरु-महाराजांचे अनुग्रहीत होते आणि श्रीमहाराजांपेक्षा वयाने मोठे असून, वेदांत अभ्यासात विद्वान असून श्रीमहाराजांचे शिष्य म्हणवून घेण्यात भूषण मानीत होते. हे सारे श्रीदत्तमहाराज जवळून अनुभवीत होते. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराजांचे दर्शन व सहवासही त्यांना अनेकदा लाभला होता. तरीसुद्धा आपल्या सामान्यत्वाच्या भूमिकेने आणि संकोचाने ते त्याच क्षेत्रात वावरत होते. परंतु ईश्वरी योजना अनाकलनीय असतात. श्रीदत्तमहाराजांची दीक्षा कोणालाही कल्पना न येता झाली. त्यांच्या समर्थांच्या व ईश्वराच्या साक्षीने दीक्षा झाली. दीक्षा किंवा नंतर मिळालेला दीक्षेचा अधिकार या दोन्ही प्रसंगांबाबत श्रीदत्तमहाराज मौन पाळून होते. म्हणूनही समीक्षकांना प्रश्न निर्माण करणे शक्य झाले. जीवन-चरित्राच्या अभ्यासातून अशा अनेक प्रश्नांना वास्तव स्थिती दर्शनाने उत्तरे मिळतात.

श्रीदत्तमहाराज सज्जनगडावर, समर्थांच्या समाधीजवळ पहाटे दीक्षा अनुग्रहासाठी श्रीगुरुमहाराजांचा आदेश व दृष्टांत म्हणून बसले. त्यांना शक्तिसंचाराचा अनुभव त्या पहिल्या दिवशीच्या बैठकीत आला. त्यांनी स्वतः अनुभव सांगितले, ही हकीकत सांगितली म्हणून लिहिणे शक्य झाले. तरी श्रीदत्तमहाराजांनी हे सारे फार संकोचाने सांगितले आहे. श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराजांच्या चरित्र लेखन प्रसंगी श्रीगुरुमहाराजांनी होशंगाबादेचा सर्व प्रसंग दीक्षेची, स्वप्नाची माहिती फारच मोकळेपणाने सांगितल्यामुळे ते प्रकरण तसेच लिहिणे शक्य झाले. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव खरोखर संकोची, मितभाषी, स्वतःबद्दल न बोलणारा असाच आहे. ते मोकळेपणाने बोलतात ते वेदांतावर, प्रवचनातून ! व्यक्तिगत विषय मोकळेपणे बोलताना कधी आढळले, ऐकले नाही. तरीही त्यांनी स्वमुखाने त्यांच्या दीक्षेची माहिती दिली हे खरोखर आपले भाग्यच आहे. बैठकीतील अनुभव त्यांनी पुढीलप्रमाणे सांगितला.

"मांडी आवळली जाऊन रुंद झाली. पाठीचा कणा ताठ झाला. शरीरात कंप निर्माण होऊन, पूरक रेचक (श्वासोच्छ्वास) जोरात होऊ लागले. नंतर कुंभकही होऊ लागला. कुंभक होताना व त्या स्थितीत राहिल्यावर अत्यंत सुखद स्थिती आली.

प्राणायामाच्या आठ प्रकारांपैकी उज्जाई प्राणायामाचा विशेष अनुभव आला. पूरक-कुंभक-रेचक अत्यंत शांतपणे होऊ लागले. तसतशी प्रकृतीही चैतन्यमय झाली. अशक्तपणा नाहिसा झाला. ताप पुनः आलाच नाही. गडावरील उत्सवाच्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेता आला. या साधनेने मनाला शांतता व स्थिरता येते तसे शरीरातील दोष नाहिसे होऊन शरीर हलके-उत्साही बनते. या अनुभवाचे गडावरून पुण्याला श्रीगुरुमहाराजांना पत्र पाठविले होते. त्यांचेही ताबडतोब उत्तर आले की श्रीस्वामी-महाराजांची आपणावर कृपा झाली आहे."

श्रीदत्तमहाराज या साधनेचे पुढील अनुभव सांगतात तेही महत्त्वाचे आहेत. प्रवासातील दगदग, छातीत दुखणे इ. गोष्टी नित्य उपासनेत बैठक होऊन कुंभक होतो आणि प्रकृतीला आराम पडतो. कितीही दगदगीचे कार्यक्रम असले तरी शक्ती सर्व निभावून नेते. आमचे असे काहीच नाही. होते घडते ते ईश्वरेच्छेने असे पूर्वी वाटत होते पण हल्ली प्रत्येक क्षणी हाच अनुभव येतो. म्हणून आम्हीही देवावर सोपवून देतो. आमच्याकडून काय किंवा कोणाकडून काय त्याला हवे तसे घडवून घेतले जाते. हे बघत रहातो. एकूण हे जे एवढे सगळें घडून येते आहे ते सामान्य मनुष्यशक्तीतले खास नाही. दोषनिवृत्ती होईपर्यंत साधक अवस्था असते. त्यानंतर ईशेच्छेने पूर्ण कृपेचा लाभ होतो. आमची ही श्रीचरणी प्रार्थना आहे. "पूर्ण कृपेचा लाभ होण्याची पात्रता निर्माण होईल अशी कृपा व्हावी."

ही अनन्यभक्ती असल्याने अशा भक्तांच्या मागेपुढे सर्व देवांची संरक्षण शक्ती आणि कार्यपोषण शक्ती असते. हे अद्वैती असून द्वैतात रहातात. श्रीमदाद्यशंकराचार्य आपल्या उपास्य शारदंबेच्या मूर्तीपुढे नतमस्तक झाले असता मूर्तीतून आवाज आला "आपण अद्वैती ! आणि आमच्या समोर द्वैत ?" त्यावेळी आचार्यांनी देवीला उत्तर दिले "आई तुझ्या मंदिरात आहे तोपर्यंत तुझ्यापुढे मी पुत्र आणि तू माता याच नात्याने- द्वैताने रहाणार. आमचे अद्वैत तुझ्या मंदिराचा उंबरठा ओलांडल्यावर आहे"

आचार्यांचे हे उत्तर आहे. याचा हा खुलासा आपणास झाला पाहिजे. देहसंबंध आहे म्हणून द्वैत आहे. तोपर्यंत द्वैत व्यवहारतः रहाते. 'काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल', 'देह देवाचे मंदिर' ही आंतरिक जाणीव आणि बाह्य व्यवहार यात अंतर रहाणार. आचरणाचा संबंध जगत व्यवहाराशी आहे. हे सांभाळले तर जगत् स्थिती समतोल रहाते. हे टिकविण्यासाठी-शिकविण्यासाठी महापुरुषांना अद्वैत स्थितीचा अनुभव असूनही त्यांचा सर्व व्यवहार द्वैतावर चाललेला असतो.

## 'श्रीवासुदेवनिवास' आश्रम निर्माण

या अल्पचरित्राची मर्यादा संभाळून लेखन करताना खूप संक्षेप करण्याची आवश्यकता आहे याची जाणीव असूनही या चरित्रातील घटना प्रसंग व त्यावरील

स्पष्टीकरण करणे अनिवार्य वाटल्याने संक्षेप करणे अवघड झाले. तरी चरित्राचा फार मोठा विस्तार आहे त्या दृष्टीने हे संक्षिप्तच म्हणावे लागेल. यापुढे मात्र हे बंधन कटाक्षाने ठेवून थोडक्यात पुढील चरित्रभाग लिहिणार आहे.

श्रीगुळवणीमहाराजांचे वास्तव्य २० नारायण पेठेत दोन खोल्यात होते. कार्याचा व्याप, शिष्यपरिवार खूप वाढला होता. जागा मोठी व स्वतःची असावी ही अनेकांची इच्छा होती. पण महाराजांची संमती नव्हती म्हणून हे घडू शकले नाही. इ. स. १९६१ मध्ये पानशेत धरण फुटून जो महापूर आला त्यामध्ये २० नारायण पेठेला मोठा धोका निर्माण झाला. ग्रंथांचे अपरमित नुकसान झाले. तेव्हा नवीन जागेच्या प्रश्नाला चालना देण्याची परिस्थिती निर्माण झाली. श्रीदत्तमहाराजांनी मनावर घेतले. आणि महाराजांची संमती मिळवून आश्रम निर्माणकार्याला प्रारंभ झाला. समिती नेमली. त्या समितीचे कार्यवाह श्रीदत्तमहाराज होते. अनेक शिष्य निधी गोळा करण्याच्या उद्योगाला लागले. जागा पहाण्याचे सुरू झाले. होता होता कर्वे रोडवरील जागा ठरली. खरेदी झाली. भूमिपूजन झाले. बांधकाम सुरू झाले. १९६५ मध्ये वास्तू तयार झाली. वास्तूशांतीचा कार्यक्रम मोठा आखला. विविध यज्ञयाग-धार्मिक अनुष्ठाने झाली. या कार्याचे नेतृत्व श्रीदत्तमहाराजांचे होते. कार्याला स्थान मिळाल्याने संबंधितांची वर्दळ वाढली.

श्रीदत्तमहाराजांचे दौरे सुरू झाले. भागवत सप्ताह ठिकठिकाणी होऊ लागले. आश्रमामध्ये प्रौष्ठपदीला भागवत सप्ताह श्रीदत्तमहाराजांचा झाला. हा सप्ताह दरवर्षी औरवाडला होत असे. तो आता येथे सुरू झाला.

आश्रम निर्माण होण्यापूर्वी श्रीगुरुमहाराजांची काशीयात्रा झाली. त्यामध्ये श्रीदत्तमहाराजही होते. यावेळी महिनाभर काशीत मुक्काम झाला. श्रीनारायणस्वामींची पुण्यतिथी येथे सुरू केली. श्रीदत्तमहाराजांनी सप्ताह केला. काशीतील विद्वान शास्त्रीमंडळी, पं. राजेश्वरशास्त्री द्रवीड, श्रीहरिरामशास्त्री शुक्ल, पं. अनंतशास्त्री फडके यासारखे विद्वान त्यामध्ये होते यांची शास्त्र चर्चा घडवून आणली. चारवेदांचे मंत्रजागर केले. वसंतपूजा केली. रोज ब्राह्मण भोजन घालून अन्नदान केले. या सर्व कार्यक्रमात श्रीदत्तमहाराजांचा संबंध व वाटा मोठा होता.

या पूर्वीही श्रीदत्तमहाराज काशीला गेले होते. त्यावेळी या शास्त्रीमंडळीकडून महाराजांच्या आरोग्यप्रीत्यर्थ भृगसंहितेत आलेले विशेष अनुष्ठान केले होते. अशा कार्यक्रमांना वैशिष्ट्य असे.

## 'वेदांत पारिजात सौरभ' अनुवादाचे अपूर्व कार्य

श्रीभगवन्निम्बार्क विरचित 'वेदांत पारिजात सौरभ' अर्थात् ब्रह्मसूत्रावरील निम्बार्क भाष्याचा मराठी अनुवाद, विवरण, सूचि असलेला हजार पानांचा ग्रंथ निर्माण करण्याचे

अपूर्व कार्य श्रीदत्तमहाराजांकडून झालेले आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे हा ग्रंथ जून १९६५ मध्ये प्रकाशित झाला. निम्बार्क भाष्याचा मराठी अनुवाद, विवरणासह तयार करून तो मूळ संहितेसह संपादित करण्याची सर्व जबाबदारी मंडळाने श्रीबालमुकुंद संस्कृत महाविद्यालयातील न्याय वेदांताचे अध्यापक पं. द. धुं. कवीश्वर यांचेकडे दिली होती. ती त्यांनी पूर्ण केल्याबद्दल मंडळाने संतोष प्रकट केला.

या ग्रंथाच्या अनुवाद कार्यासंबंधी श्रीदत्तमहाराजांनी 'भूमिका' प्रकरण प्रारंभी विस्ताराने लिहिले आहे. ही भूमिका ११८ पानांची आहे. हे प्रकरण म्हणजे श्रीदत्तमहाराजांच्या विविध दृष्टीकोनांचे दर्शन मार्मिकतेने घडविणारे आहे.

'भूमिका' प्रकरणातील काही चिंतनीय विचार–

"या विश्वात्मक देवाचे दर्शन ज्या साधनांनी होऊ शकते ती साधने 'दर्शन' या नावानी प्रसिद्ध आहेत. यानाच शास्त्र अशी दुसरी संज्ञा आहे. 'हित शास्तीति शास्त्रम्' या व्युत्पत्तीप्रमाणे, दर्शनशास्त्र कोणतेही घेतले तरी ते हितोपदेशकच आहे. या दृष्टीने सर्व शास्त्रांचा मूलतः अत्यंत विरोध नसून त्यांचा समन्वयच आहे हे सिद्ध होते. फक्त तशी दृष्टी बाळगून विचार झाला पाहिजे."

"विश्वात दिसून येणाऱ्या चेतन व अचेतन अशा विभागापैकी चेतनप्रधान दृष्टीने जे विचारशास्त्र प्रवृत्त होते त्याला "**दर्शन**" म्हणतात आणि अचेतनप्रधान दृष्टीने प्रवृत्त होणाऱ्या विचारशास्त्राला "विज्ञान" अशी परिभाषा आहे."

दर्शनिक आणि वैज्ञानिक या दोघांचे उद्देश दुःखनिवृत्ति व सुखप्राप्ति हेच असले तरी दोघांचे मार्ग भिन्न आहेत.

"भौतिक साधनांचा अभाव असतानाही मनुष्याचे जीवन शांतीने चालू शकते. पण अध्यात्मिक सामर्थ्यावाचून मात्र जीवन अशांतिमय होत असलेले आजही अनुभवास येत आहे. कोणताही समाज किंवा राष्ट्र अध्यात्मिक शक्तीशिवाय स्थिर राहू शकत नाही. म्हणून दार्शनिकांच्या मार्गाने आत्मोन्नति करून घेणे यातच जीवनाचे खरे साफल्य आहे. विज्ञान हे जीवनाचे गौण साधन आहे.'

"भारतवर्ष हे एकच राष्ट्र, अनादिकालापासून अध्यात्मिक प्रवृत्तीचं दिसून येते. "अध्यात्म विद्या विद्यानाम्" अशा श्रेष्ठ अध्यात्म विद्येची आवड भारताच्या रोमरोमातून भरलेली आहे. अध्यात्म विद्येचे प्रकाशन करणारे वेद हे भारताचे अविनाशी अमूल्य धन आहे. वेदांमध्ये संपूर्ण विश्वाचे ज्ञान भरलेले आहे. भारतीय श्रौतदर्शनकार वेदांची उत्पत्ति व नाश कधीच मानीत नाहीत, तर त्यांचा कालपरत्वे अविर्भाव व तिरोभाव मानतात."

"तपःपूत महर्षींच्या अन्तःकरणात वेदज्ञानाचा आविर्भाव ईशकृपेने झाला म्हणून त्या ऋषींना मंत्रद्रष्टे म्हणतात. कोणत्याच पदार्थाचा नाश होत नसून रूपांतर

होते हे मत आजच्या विज्ञान युगातही मान्य आहे. वैदिक महर्षींनी हा सिद्धान्त तर हजारो वर्षांपूर्वीच व्यक्त करून ठेवला आहे. प्राकृतिक वस्तूंचाही नाश वैदिक ऋषींच्या मताने नसून फक्त रुपांतर परिणामच त्यांच्या मते आहे. "सूर्या चन्द्रमसौ धाता यथा पूर्वमकल्पयत्" या वचनावरून सिद्ध होते."

"वेद संपूर्ण दिव्य ज्ञानमय आहे. पण त्यातही वेदांचा शिरोभाग अशा उपनिषदांमध्ये ज्ञानाचा पूर्ण विकास झालेला आहे. विश्वातील सर्व मानवसमाजाला नवचेतना देऊन आत्यंतिक शांतीच्या मार्गाकडे नेण्यास समर्थ, फक्त उपनिषदातील सिद्धान्तच आहेत."

"उपनिषदे हा वेदाचा रहस्यबोधक अंतिम भाग असल्याने यांना "वेदान्त" असेहि म्हणतात. हे ग्रंथ सरल, सुबोध भाषेने गंभीर तत्वाचे प्रतिपादन करीत असून अध्यात्म विद्या प्रकाशक सर्व दर्शनांना आधार आहेत."

"भारतीय प्राचीन महर्षींनी प्रथम स्ववर्णाश्रमधर्मानुष्ठान, तप, इंद्रियसंयम, श्रद्धा, ईश्वरप्रेम, गुरुनिष्ठा इ. साधनांचे पालन कटाक्षाने करून अन्तःकरणशुद्धि करून घेतली. त्यातून 'सर्वेऽपि सुखिनः सन्तू सर्वे सन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥ असे पवित्र संकल्प उद्घोषित झाले. केवळ राष्ट्रभावना सुद्धा या उदात्त भावनेपुढे संकुचित ठरेल".

"या ऋषींच्या अन्तःकरणात पावित्र्यद्योतक असीम सद्वासनाशक्ती, मेधा-धारणाशक्ती, प्रतिभाशक्ती, फलभूत समत्वशक्ती इ. अलौकिक शक्ती पूर्णपणे उद्भूत झाल्या आणि त्यातून स्वयंप्रकाशी अध्यात्म विद्या शब्दरूप झाली."

या भूमिका प्रकरणात सर्व दर्शनांचे सामान्यस्वरूप स्पष्ट केले आहे. यामध्ये १ – चार्वाकदर्शन, २ – बौद्धदर्शन, ३ – जैनदर्शन, ४ – वैशेषिकदर्शन, ५ – न्यायदर्शन, ६ – मीमांसादर्शन, ७ – सांख्यदर्शन, ८ – योगदर्शन इ. चा परामर्ष घेऊन शेवटी वेदांत दर्शनही सांगितले आहे.

यानंतर प्रमाणप्रमयांचा विचार, जीवविचार, सृष्टीच्या उत्पत्तीचा विचार यांचे मंडन केले आहे. श्रीनिम्बार्काचार्य व द्वैताद्वैत सिद्धान्त भूमिका विशद करताना भागवत धर्म व त्याचे प्रवर्तक आचार्य यासंबंधी विस्तृत लेखन आहे. आचार्योपासना परिच्छेदात "मोक्ष प्राप्ती करता साधकाला सद्गुरूंचा आश्रय आवश्यक आहे." याचे विवेचन आहे. "वैष्णवमत व ख्रिस्तमत" हा विषय घेऊन भक्तीचा प्रभाव अन्य धर्मावर कसा आला आहे हे दाखविले आहे. श्रीनिंबार्क परंपरेतील संतांची माहिती पुढे दिली आहे. मोक्षसाधन विचार, भक्तियोग यावर विवेचन या नंतर आले आहे. उपास्य-स्वरूप रागात्मिका भक्तीचे चार प्रकार–हिततत्त्व- हितोपासना व बौद्ध- उपसंहार आदि अनेक विचारमूल्ये या भूमिकेतून आलेली आहेत.

मूलतः ही भूमिका सर्व दृष्टीने अत्यंत मार्मिकपणे तत्त्वज्ञान भूमिका विशद करणारी आहे.

यानंतर ब्रह्मसूत्रावरील विवेचन हा मूळ ग्रंथ भाषांतरासाठी घेतला आहे. या अनुवादासाठी तर हे बृहदकार्य श्रीदत्तमहाराजांकडून झालेले आहे. या कार्याची कल्पना 'भूमिका' प्रकरणातून स्पष्ट येते म्हणून ते महत्त्वाचे समजून त्याचा संक्षेपाने उल्लेख केला. मुख्य कार्य म्हणजे "वेदान्त पारिजात सौरभ' या ग्रंथाचा मराठीत अनुवाद हेच आहे.

असें हे कार्य श्रीदत्तमहाराजांचेकडून होऊन त्याचा उल्लेखही त्यांचेकडून कधी ऐकण्यात येत नाही. त्यांच्या स्वभावाचा स्थायीभाव स्पष्ट करण्यास हे प्रमाण सबल आहे.

## प्रपौत्र दर्शन समारंभ

श्रीदत्तमहाराजांच्या थोरल्या पुत्राचे–अशोकचे भाग्य विशेष दिसते. त्याच्या जन्म–जावळापासून–मुंज–शिक्षण–विवाह आणि त्याचा पहिला मुलगा म्हणजे श्रीधुंडिराजमहाराजांचा पणतु त्याच्या डोक्यावर सोन्याची फुले उधळण्यापर्यंतचे सर्व कार्यक्रमास श्रीधुंडिराजमहाराज आणि श्रीगुळवणीमहाराज यांची उपस्थिती होती. अशोक एस. एस. सी. झाला. त्यादिवशी तो सकाळी श्रीगुरुमहाराजांच्या दर्शनाला गेला होता. त्यावेळी कॉलेजात प्रवेश घेण्यासाठी पाचशे रुपये काढून श्रीगुरुमहाराजांनी अशोकच्या हातात ठेवले व म्हणाले 'सायन्सला प्रवेश घे. आजच जा. म्हणजे प्रवेश मिळेल.' हा प्रसंग अशोकच्या निमित्ताने घडला आहे. पण यामागे श्रीगुरुमहाराजांच्या अन्तःकरणात कवीश्वर घराणे व श्रीदत्तमहाराज यांच्याबद्दल किती आत्मियता होती हे स्पष्ट होते.

अशोकच्या विवाहच्येवेळी सुद्धा घडलेली हकीगत लक्षात घेण्यासारखी आहे. अशोककरिता मुलींच्या पत्रिका येऊ लागल्या. वैरागला थोरल्या मुलीकडे सौ. सुमनकडे मुलगी पाहण्याचा कार्यक्रम ठरला हे श्रीगुरुमहाराजांना समजले. त्यांना सुर्डीला जायचे होते. पण श्रीगुरुमहाराजांनी सुर्डीचा कार्यक्रम पुढे ढकलला व ते अशोकचे लग्न ठरवायला, मुलगी पसंद करायला वैरागला गेले. तेथे देऊळगावराजाहून श्रीधुंडिराजमहाराजही आलेले होते. श्रीदत्तमहाराज होते. आपल्या या घरगुती कार्यक्रमाच्या बैठकीसाठी श्रीगुरुमहाराज आल्याने सर्वांनाच फार आनंद झाला. मुलगी पाहिली. सर्वांना पसंत पडली. आणि बैठक होऊन कार्य ठरले. आणि साखरपुडा आश्रमात झाला.

पुढे अशोकला मुलगा झाला. तेव्हा प्रपौत्र दर्शनाचा व सुवर्णपुष्प उधळण्याचा कार्यक्रमही आश्रमात झाला. त्यावेळी श्रीधुंडिराजमहाराज आले होते. सोन्याची चोवीस फुले केली होती. बारा फुले श्रीधुंडिराजमहाराजांनी आणि बारा फुले श्रीगुळवणीमहाराज यांनी प्रपौत्राच्या मस्तकावर उधळली. वैदिक मंत्राचे आशीर्वाद झाले. देवाला अभिषेक, नैवद्य झाला. सर्वांचे भोजन झाले. सुवर्ण पुष्पांचे दान केले. हे ऋणानुबंध गुणानुबंधातून निर्माण झाल्यामुळे उत्तरोत्तर ही अत्मिंयता विकसित होत होती.

यानंतर श्रीगुरुमहाराज व श्रीधुंडिराजमहाराज यांचे सहस्त्रचंद्र दर्शन, शांती महोत्सव, रौद्रीशांती महोत्सव इ. मोठमोठाले समारंभ झाले. त्यामध्ये श्रीदत्तमहाराजांचे सर्व मार्गदर्शन होते. प्रत्यक्ष कार्यातही ते होतेच. इ. स. १९६७ नंतरचे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनचरित्रातील अनेक घटना प्रसंग 'जीवनगंगा' या श्रीगुरुमहाराजांच्या चरित्रात आलेले आहेत. या अल्पचरित्रात त्याच समावेश विस्तार भयास्तव केलेला नाही.

याशिवाय श्रीदत्तमहाराजांच्या जीवन चरित्रामध्ये अलिकडच्या काळातील त्यांच्या विविध कार्यशक्तींचा भरगच्च उल्लेख करावा लागेल. त्यांनी अनेक भक्त, शिष्य जिज्ञासूंना पत्रे पाठविली आहेत. ती संग्रह करण्याचे कार्य सुरू आहे. त्यांच्या दैवीशक्तीच्या सामर्थ्याचे अनुभव गोळा करण्याचे कार्यही सुरू आहे. त्यांच्या प्रवचनादिंचे संकलन चालू आहे. ईश्वरकृपेने हे सर्व संकलन झाल्यानंतर ईश्वरइच्छेप्रमाणे तो चारित्रभाग प्रकाशात येईल.

प्रस्तुतचे अल्पचरित्र त्यांच्या अलौकिकत्वाची, महानतेची, दैवीगुण संपदेची, गुरूत्वाची, जाणीव समाजाला होण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरेल असा विश्वास वाटतो. ही जाणीव जागृत होण्याने त्याच्यासंबंधीचा आपला दृष्टीकोन विशाल होऊन त्यांच्या संबंधीच्या श्रद्धा भक्ति दृढ होतील व आपल्याला त्यापासून जीवन साफल्याचा बोध घेता येईल. वास्तविक एवढ्या माहितीतून आपल्या अपात्रतेची जाणीवच तीव्रतेने होत आहे. तरीसुद्धा भावभक्तीने मनन चिंतन तरी घडत आहे. त्यांच्याच कृपेने केव्हातरी पात्रता निर्माण होईल या श्रद्धेने ही बाल बुद्धीची धडपड आहे. मातृ-पितृ-गुरु स्वरूप असलेले श्रीदत्तमहाराज यातील न्यूनाधिकाकडे वात्सल्यदृष्टीने पहातील या विश्वासाने हा प्रयत्न केला आहे.

**त्वयि भक्तिं मे वर्धय दुर्हृत्तम ईश नाशयाशेषम् ।**
**यच्च तवेष्टं तत्कुरु मयि भोः सर्वज्ञ वक्तुमसमर्थः ॥**

॥ **तत्सत् श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु** ॥

* * *

**दि. ४ नोव्हेंबर १९८७ रोजी येऊर येथे श्री सद्गुरू सेवा मंदिरात प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे हृद्य स्वागत करतांना,**

हे कवीश्वर, हे वागीश्वर, हे ज्ञाननिधे, हे वाचस्पते–

पुनितं इमं तवैव सदनं आगतोऽसि त्वम् ।
तव पदारविंदमिलिंदा धन्या वयम् ।
तव दर्शनेन प्रमुदितमनसा तव स्वागतम् ।
स्वागतं व्याहरामः शुभ स्वागतं स्वागतं अस्तु ते ॥

तव स्तवनं कुर्यामः । तव चरणौ प्रणमामः ।
ॐ गुरुदेव । त्वं गुरुदेव
जय गुरुदेव । नमो गुरुदेव ॥
अधीत-व्युत्पन्नकुले जातः त्वं खलु धन्यः ।
संसार स्थितोऽपि त्वया सम विरक्तो नान्यः ।
संसारतापत्रस्तानां नः खलु त्वमेव शरण्यः :
अस्मान् तारय तारय त्वमेव गुरुवदान्यः ॥

तव स्तवनं कुर्यामः । तव चरणौ प्रणमामः ।
येन त्वया लोकहितार्थमेव भ्रमणं कृतम् ।
ज्ञानार्जन-ज्ञानदान कार्ये तव मनः सदैव निरतम् ।
श्रीवासुदेवानंदसरस्वती चरितं त्वया विरचितम् ।
शरणार्थिनं भक्तं त्वया पितेव वात्सल्यं कृतम् ॥

तव स्तवनं कुर्यामः । तव चरणौ प्रणमामः
तुष्टि पुष्टि मुक्त्यर्थं नः तव आशिषः इच्छामः ।
जगद्हिताय निरामयं त्वां चिरजीवनं वाञ्छामः ।
सत्कर्मरता बुद्धि देहि इत्येव त्वां याचामहे ।
तव चिर जीवनार्थं कृपामयं भगवन्तं प्रार्थयायहे
जीवेत् शरदः शतम् । जीवेत् शरदः शतम् ।
जीवेत् शरदः शतम् ॥

**सौ. शुभदा दाते**



जे पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेऊनी आपुले हाती ।
रिगाला भक्ती पंथी । जगा देतु ॥२१९॥

कैवल्याचा अधिकारी । मोक्षाची सोडी बांधी करी ।
की जळाचिये परी । तळवटू घे ॥२२०॥

म्हणोनिया नमस्कारु । तयाते आम्ही माथा मुकुट करु ।
तयाची टांच धरु । हृदयी आम्ही ॥२२१॥

—ज्ञानेश्वरी, अध्याय १२

भगवंताने आपल्या श्रेष्ठ भक्ताचे वर्णन वर केले आहे. या वर्णनाचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराज यांचेमध्ये येतो.

**प्रवचनाचा संदर्भ—**

डिसेंबर १९८० मध्ये मुंबईस माटुंगा येथे झालेले प्रवचन.

दत्ता मजला प्रसन्न होसी । जरी तू वर देसी
तरी मी आन न मागे तुजसी । निर्धारूनी मानसी ॥१॥

या प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज विरचित पदाचा अर्थ विशद करणारे हे प्रवचन आहे.

पदाचा सारांश 'देवाजवळ काय मागावे ?' या भावार्थाने स्पष्ट होतो म्हणून हे शीर्षक दिले आहे.

प्रवचनाची अपूर्वाई प्रवचन वाचूनच प्रचितीला येईल.

# प्रवचन पहिले

# देवाजवळ काय मागावे ?

**मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ॥**
**यत्कृपा तमहं वन्दे परमानंद माधवम् ॥**

आपलीसर्व ही दुःखे दूर व्हावीत व पूर्ण सुख आपल्याला मिळावं, ही सर्वांचीच इच्छा आहे. मोक्ष मोक्ष म्हणतात तो हाच आहे. दुःखाची कायमची निवृत्ती व्हावी. पुन्हा कधीही दुःख उत्पन्न न होता पूर्ण आनंद प्राप्त होणे म्हणजेच मोक्ष. त्या पूर्णं आनंदात कमी जास्तपणा काहीही नसतो. यासाठीच भगवत् भक्त महात्मे अखंड ईश्वर चिंतन करण्याचा प्रयत्न करीत असतात.

आनंदाचे अनेक प्रकार उपनिषदामध्ये सांगितले आहेत. मनुष्याचा आनंद, गंधर्वाचा आनंद, देवाचा आनंद अशी एकापेक्षा एक अधिक आनंदाची सीमा उपनिषदकारांनी दाखविलेली आहे. पण हे सर्वही आनंद, एक जो महात्मा, महत् श्रोत्रीय म्हटलयं त्याला, ते मिळतात असे सांगितले आहे. हा जो महत् श्रोत्रीय महात्मा असतो त्याच्या मनात कोणतीही इच्छा राहिलेली नसते. त्याचे अन्तःकरण निष्काम झालेले असते आणि त्याला पूर्ण ज्ञानही झालेले असते. अज्ञान काहीही शिल्लक नसते. अहंकारादि विकार पूर्ण दूर झालेले असतात. असा जो ज्ञानी महात्मा असतो त्याला हे सर्व आनंद मिळतात. त्याच्या आनंदामध्ये सर्वही आनंदाचा अंतर्भाव होतो. असे उपनिषदात सांगितले आहे.

तर ही मोक्षाची म्हणजे पूर्ण आनंदाची इच्छा सर्वांनाच आहे. मनुष्य, गंधर्व, देव फार काय पशु-पक्षी देखील यातून सुटलेले नाहीत. या मोक्षाचे-पूर्ण आनंदाचे साधन म्हणून महात्मे भक्तिमार्गाकडे वळले आहेत. ईश्वराच्या भजनाने, सेवेने हा मोक्ष—पूर्ण आनंद मिळतो.

आता असा प्रश्न निर्माण होतो की, ईश्वराची सेवा म्हणजे काय ? मोक्षा-करता-या पूर्ण आनंदाकरता-काय कराव ? कोणती साधना करावी ? याबद्दल सद्‌गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचे एक पद आहे. भजनाच्यावेळी, पंचपदीनंतर म्हणतात हे पद !

**दत्ता मजला प्रसन्न होसी-जरी तू वर देसी ।**
**तरी मी आन न मागे तुजसी-निर्धारूनि मानसी ॥**

पदाची अशी सुरुवात आहे. देवा ! तू मला प्रसन्न झालास तरी मला दुसरं काहीही मागायचे नाही ! म्हणजे या मागण्यात जाणतेपणा आहे. नेमकेपणा आहे म्हणून दुसरं काहीही मागण्याची इच्छा होत नाही. म्हणतात–

**स्मरण तुझे मज नित्य असावे । तव गुण भावे गावे ॥**

तुझं स्मरण अखंडित राहिलं पाहिजे. तुकाराममहाराज सुद्धा हेच मागणं मागतात. "तुझा विसर न व्हावा !" तुझे कधीही विस्मरण होऊ नये. अन्तःकरणात अखंड स्मरण रहायचं म्हणजे चित्तातली संसाराची आस कमी झाली पाहिजे.

सर्व भक्तिमध्ये 'स्मरणभक्ति' श्रेष्ठ म्हणून सांगतात. श्रवण, अर्चन, वंदन, दास्य, आत्मनिवेदन असे भक्तीचे अनेक प्रकार आहेत. शरीराने केली जाणारी, वाणीने होणारी, मनाने होणारी-भक्ती असते. यामध्ये 'स्मरण' ही मोठी भक्ती आहे. चित्ताला ईश्वराचं स्मरण रहाणं फार महत्वाचे आहे.

ईश्वराची अनंत नावे आहेत. ही सर्व नावे त्याच्या गुणावरून उत्पन्न झालेली आहेत. गोविंद म्हणतो आपण, म्हणजे गाईंचा इंद्र-श्रीकृष्ण आहे. गाईंवर संकट आले होते. इंद्राने पाऊस पाडायला सुरुवात केली. सर्व गोकुळाचा नाश करायचा ठरविला. त्यावेळी श्रीकृष्णाने हातावर पर्वत धारण करून त्याच्याखाली गायी, गोकुळवासी लोक यांचे संरक्षण केले. म्हणून त्या कामधेनूने कृष्णाला म्हटले, "आमचा तू इंद्र आहेस" गायीचा इंद्र म्हणून गोविंद हे नाव दिले. अशा या लीला आहेत. त्यांचे स्मरण करून देणारी ही नावे आहेत. यांना "गौण" नांवे म्हणतात. गुण प्रवृत्त नाव. नावातून ईश्वराच्या गुणाचे–ऐश्वर्याचे–सामर्थ्याचे स्मरण होते. म्हणून त्याच्या नावाचे स्मरण म्हणजे त्यापाठीमागे घडलेल्या सर्वही लीलांचे, चरित्राचे स्मरण हे त्यावेळेला अनायासे घडते.

त्याचप्रमाणे अनंत कर्मे ईश्वराची आहेत. म्हणजे कितीतरी लीला झाल्या आहेत. ईश्वराला काल मर्यादा नाही. म्हणून त्याच्या लीला अनंत आहेत. आपलं आयुष्य ठरलेलं आहे. ते सुद्धा सगळं पदरात पडत नाही. ब्रह्मदेवालाही काल-मर्यादा आहे. इतरांच्या पेक्षा तो जास्ती काळ राहू शकेल, परंतु त्याचाही काल मर्यादित आहे. देव पुण्य करून स्वर्ग लोकात जातात. पण "क्षीणे पुण्ये मर्त्य लोकम् विशन्ति" हे त्यांनाही आहेच. पुण्य संपलं की तिथं राहता येत नाही.

ही कालमर्यादा ईश्वराला नाही. तो कालातीत आहे. अनेक जीवांच्याकरिता, भक्तांकरिता, संतांकरिता, पुष्कळ लीला-चरित्रे भगवंताकडून घडत असतात.

ईश्वराची अनंत नामे आहेत, अनंत कर्मे आहेत आणि अनंत रूपेही आहेत. अनेक अवतार आहेत. अशा सर्वही ईश्वरासंबंधी नाम, रूप, कर्म या सर्वांचे स्मरण करणे हा मोठा भक्ति विषय आहे. किती वेळ स्मरण भक्ति करायची ? वेळच पुरा पडत नाही ! अनंताच्या स्मरणाला अंत कसा चालेल ?

**स्मरण तुझे मज नित्य असावे । तव गुण भावे गावे ॥**

असा हा चित्ताला व्यापक विषय मिळावा. अखंड भगवंताचे स्मरण घडावं ! आणि वाणीने तुझ्या गुणांचे वर्णन करावे. वाणीला हा विषय मिळाला म्हणजे व्यवहारात वाणीचाही दुसरा काही विनियोग नाही आणि मनाचाही विनियोग नाही. हे सगळं घडण्याकरता महाराज पुढे सांगतात–

**अनासक्तीने मी वागावे । ऐसे मन वळवावे ॥**

मन जर संसारामध्ये आसक्त झालेले असेल तर ईश्वराचे स्मरण, भक्ति वगैरे कशी घडणार ? मन तिकडेच जाणार ! म्हणून ही प्रार्थना आहे. स्मरण भक्ति अतिशय कठीण आहे. वाणीने एखादे वेळेला काही भजन वगैरे करणे, मन दुसरीकडे गेले तरी, चाललेले असते. पण अखंड स्मरण घडायचे म्हणजे मन दुसरीकडे जाऊन उपयोगी नाही. इतकी मनाची भूमिका होण्याकरता 'अनासक्ती'- मनातली विषयांची आवड- कमी झाली पाहिजे. 'तया सत्कर्मी रति वाढो' ही 'रति' उत्पन्न होण्याकरता अनासक्ती हे एक साधन मागितले आहे.

हे देवाजवळ का मागितले ? याचा देवाशी काय संबंध ? असा प्रश्न उपस्थित होतो. पण महाराज पुढे लगेच सांगतात.

**सर्व इंद्रिये आणि मन हे । तुझे हाती आहे ॥**

श्री वासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराज सांगतात, प्रयत्न मी करू शकणार नाही. इंद्रिये आणि मन हे माझ्या सत्तेने काही करू शकणार नाहीत. तरी मी ते माझे कर्तृत्त्व समजतो. तो कर्तृत्त्वाभिमान, तो अहंकार तुझे अखंड स्मरण होऊ देत नाही. प्रयत्नांनी कदाचित बाकीच्या गोष्टी मिळतील. अभ्युदय ज्याला म्हणतात, उन्नति ती कदाचित प्रयत्नाने साधेल. एका पेक्षा एक पदार्थ आपल्याला जगात दिसतात. संपत्ति आहे. त्यामध्ये सुद्धा श्रेणी आहेत. लक्षाधीश, कोट्याधीश !

किंवा मंत्री, प्रधानमंत्री ! कीर्ति आहे. या गोष्टी मिळविण्याकरता नाना प्रकारची कर्मे करून म्हणजेच प्रयत्न करून त्या त्या भूमिका मिळू शकतात. प्रयत्न हा मनाने, शरीराने, इंद्रियांने होऊ शकतो. त्याचे कर्तृत्त्व, आपले आहे असे आपण समजतो. कदाचित् हे ग्राह्य धरताही येईल. संसारात सुद्धा कर्तृत्त्व आपलं आहे असे मान्य केले तरी त्या कर्तृत्त्वाचा, प्रयत्नांचा या मार्गात उपयोग होईल की नाही, हे सांगता येत नाही. मन विषयातून बाजूला काढायचं ! इंद्रियावर ताबा मिळवायचा ! आणि ईश्वराचे स्मरण करायचे हे आपल्या प्रयत्नाने होणारे नाही. ईश्वरीकृपेनेच ही गोष्ट घडून येणारी आहे म्हणून महाराज सांगतात-

**सर्व इंद्रिये आणि मन हे तुझे हाती आहे ।**
**यास्तव आता तू लवलाहे स्वपदी मन रमवावे ॥**

कर्तृत्वशक्ति खरी ईश्वराची आहे. तिथं अहंकार काहीही चालत नाही. मी करणारा आहे-करू शकेन-वृथा कर्तृत्वाभिमान आहे, अहंकार आहे. तो चालणार नाही.

**परि मने वाचा देहे । ऐसा तो व्यापार नोहें ।**
**तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे ॥**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी तरी हेच मुद्दाम सांगितले आहे. मन-वाणी आणि शरीर यांचे व्यापार मी करीत आहे असे म्हणू नकोस. मी करतो या अहंकाराचा, कर्तृत्वाभिमानाचा काहीही उपयोग नाही. इंद्रियांचा अधिपति परमेश्वर आहे. "हृदयस्थ" म्हणतात त्याला ! "अंतर्यामी" म्हणून उपनिषदातही सांगितले आहे.

पंचमहाभूतांना शास्त्रकारांनी केवळ जड पदार्थ मानले नाही. त्यांच्या देवता मानल्या आहेत. त्यांचा नियामक वेगळा आहे. पृथ्वीचे नियमन करतो, जडाचे नियमन करतो, तेजाचे नियमन करतो, वायुचे-प्रकाशाचे नियमन करतो, सूर्यचंद्राचे नियमन करतो. पण हा सर्वांचा नियामक सर्वांच्याही अंतर्यामी आहे' त्यांच्याहून वेगळा पण त्यांच्यातच असलेला आहे. परंतु हे मात्र कोणीही त्याला जाणू शकत नाहीत. आपला कोणी नियामक आहे याचे ज्ञान त्यांना नाही. ही ईश्वराची मोठी शक्ति आहे. ज्ञान शक्ति तर मोठी आहेच. तो सर्वज्ञ आहे आणि त्याची नियामक शक्तीही सर्वात मोठी आहे. हृषिकेश म्हणतात ईश्वराला. हृषिक म्हणजे इंद्रिय. ईश म्हणजे स्वामी. इंद्रियांचा तो स्वामी आहे. म्हणून त्याने

आमची इंद्रिये, मन आपल्याकडे लावावे ही सुद्धा प्रार्थना केली आहे. महाराज यासाठी आणखी साधन सांगतात.

**विवेक आणि सत्संगती हे । नेत्र द्वय बा आहे ॥**
**वासुदेवा निर्मल देहे । जेणे त्वत्पदीं राहें ॥**

विवेक आणि सत्संगती ही मोठी साधना आहे. काही मिळविण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे साधना. विवेक आणि सत्संगती दुर्लभ आहे. संतांची संगती होणे कठीण आहे. संत संगतीमधून काय घ्यायचे, याची जाणीव झाली पाहिजे. संतांच्याबद्दल मनात अनादर असेल तर त्यांच्या गुणांची कल्पनाही येणार नाही. शारीरिक सहवास घडेल पण अंतरंगामध्ये त्याचा काही परिणाम होणार नाही. अशा मानसिक अवस्थेत संतांची संगती घडणार नाही आणि घडली तरी त्याचा उपयोग होणार नाही.

तर हा जो अज्ञानाचा पडदा आहे तोच अविवेक आहे. अविवेक म्हणजे मोह. गुण ग्राहकतेपेक्षा दोषैक दृष्टीचा मोह जास्त. हा मोह चित्तात असल्यामुळे संतांच्या गुणांचे, अवस्थांचे ज्ञान होत नाही. आपल्याला कुठे संतच दिसत नाहीत, कुठे आहेत संत ? असे आपण म्हणतो आणि योगायोगाने संत भेटले तरी त्यांच्यापासून आपला फायदा होईल असे काही सांगता येत नाही. दुर्योधनाकडे पुष्कळ ऋषीमुनी येत होते की, तो त्यांची पूजा अर्चाही करीत होता ! पण काय ? त्याच्या दोषैक दृष्टीच्या मोहामुळे त्याच्या मनावर कोणाचाही काहीच परिणाम झाला नाही. त्याने श्रीकृष्णाचे सुद्धा ऐकले नाही.

ईश्वरशक्तीबद्दल विश्वास नाही. ईश्वराचे सर्व कर्तृत्त्व आहे ही जाणीव नाहीशी झाली म्हणजे अभिमान हा जास्तीजास्त वाढीस लागतो. पण त्या अभिमानाने आपल्या मनाप्रमाणे सर्वकाही घडून येते असे मात्र नाही. अशावेळी मनाविरुद्ध झाले, आपले प्रयत्न निष्फळ झाले तरी सुद्धा मनावर परिणाम होत नाही. स्वकर्तृत्त्वाभिमान अधिक उफाळतो आणि पुन: तेच करण्याची बुद्धी होते. आपले काही चालत नाही ही जाणीव येत नाही. हा अभिमान आहे. अहंकार आहे.

म्हणून तर विवेक पाहिजे. नित्य काय अनित्य काय याचा विवेक पाहिजे. जगात स्थिर काय आहे, अस्थिर काय आहे, याचा विवेक पाहिजे. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ याचा विवेक पाहिजे. शरीरादिक पदार्थ आणि त्यांचा द्रष्टा-आत्मा-जीवात्मा मी वेगळा आहे हे विवेकाशिवाय समजत नाही. शरीर म्हणजे मी नाही. हा मी

वेगळा आहे. हा विवेक पाहिजे. म्हणजे काय सोडावे आणि काय घ्यावे हे समजते. हे समजले पाहिजे. ही बुद्धीची तयारी इतकी झाली पाहिजे. हे सगळे विवेकाचे प्रकार जर बुद्धीजवळ असतील म्हणजे बुद्धी विवेक संपन्न असेल तर तो जीवात्मा सर्वत्र सुखी आहे.

यासाठी सत्संगती हवी. संत विवेक सांगणारे, विवेक दाखविणारे असे महात्मे असतात. ते भेटले पाहिजेत. त्यांच्या संगतीत राहिले म्हणजे आपोआप ज्ञान होते. त्यांचे आचरण पाहून-ते कसे बोलतात-काय करतात त्यावरून तो विवेक आपल्याला मिळतो. पण त्यालाही जिज्ञासा लागते. म्हणून सत्संगती आणि विवेक हे ज्ञानदृष्टीचे दोन नेत्र आहेत. हे नेत्र मिळाले म्हणजे जीव आपल्या ठिकाणी स्थिर होईल. ईशभक्ती त्याच्या चित्तामध्ये निर्माण होईल. म्हणून महाराजांनी ईश्वराचे स्मरण असावे इथून सुरुवात केली. या स्मरणासाठी विषयांचे स्मरण, विषयांची आसक्ती सुटावी ही दुसरी प्रार्थना केली. अनासक्त व्हावं, इंद्रियावर ताबा मिळावा, कारण इंद्रिये विषयांकडे जाणारच! विषयांचे स्मरण सुटावे, विषयसंग सुटावा. यासाठी ईश्वराने आपल्या कृपाशक्तीचा उपयोग करावा म्हणून प्रार्थना आहे. म्हणजे इंद्रिये आपल्या ताब्यात येतील. बुद्धीमध्ये विवेकाची उत्पत्ती व्हावी आणि सत्संगती मिळावी हे मुख्य मागणे आहे. देवा-जवळ काय मागायचे हे कळले पाहिजे. मागणी समजली पाहिजे.

यामुळे संसार सुखाचा होतो. परमार्थाचे फळ तर आपल्या पदरात पडतेच. ज्ञानेश्वरमहाराज संसारी नव्हते. तरीसुद्धा सर्व विश्वाचा संसार त्यांनी केला. जीवाला मार्गाला लावले. विश्वाला मार्गदर्शन केले. एकनाथमहाराज तर अगदी गृहस्थाश्रमी होते. पण संसार हा ईश्वराचा आहे, आपले काहीही नाही, अशी त्यांची भूमिका होती. विवेकसंपन्न असल्यामुळे त्यांची संसाराची आसक्ती गेली होती. संसार बंधनकारक नाही तर आसक्ती बंधनकारक आहे हे विवेकाने स्पष्ट होते. असे महात्मे ईश्वराजवळ हे गुण मागतात आणि त्या गुणांनी संपन्न होऊन ईश्वराची त्यांच्यावर कृपा झाली असल्यामुळे त्यांना भगवंताचे अखंड स्मरण घडते.

विवेकाने पूर्ण सुख मिळते, दुःख निवृत्ती होते, याचा अर्थ दुःख होतच नाही असा नाही. तुकाराममहाराजांना दुःखे नव्हती. असे पाहणाऱ्याला तरी वाटणार नाही. त्यांच्या घरामध्ये काहीही नव्हते. हे शिवाजीमहाराजांना कळल्यावर त्यांनी सोन्यानाण्यांनी भरलेली ताटे तुकाराममहाराजांच्या घरी

पाठविली. तुकाराममहाराजांनी ती परत पाठवून दिली, 'नको' म्हणाले. सुखाची साधने म्हणून जी जी समजली गेली आहेत, ती खऱ्या सुखाची साधने नाहीत. याचा विवेक तुकाराममहाराजांचा पक्का होता. म्हणून घरात काहीही नसतांना-सुद्धा त्याचा स्वीकार केला नाही. हेच तुकाराममहाराज म्हणतात "चित्ती असू द्यावे समाधान" म्हणजे चित्ताची आसक्ती संपली की सुख असते. हा उपदेश ते करतात. हा उपदेश त्यांनी कुठे वाचून केलेला नाही. त्यांचा स्वतःचा तो अनुभव आहे.

विवेक मनात असेल तर अन्तःकरणात पूर्ण समाधान आहे. म्हणजे सुख आहे. सुखाची साधने पुष्कळ आहेत पण मानसिक स्वस्थता नसेल तर त्या साधनांचा काय उपयोग ? सुबत्ता असून काहीही त्या सुबत्तेचा उपयोग नाही. सुखाची साधने नसतानाही विवेकाने जीव सुखी राहू शकतो. समाधान मानू शकतो. साधने असतानाही विवेक नसला म्हणजे असमाधान आहे, दुःख आहे. व्यवहारिक दृष्टीने सुखदुःखाची कल्पनाच वेगळी आहे. त्यामुळे चित्ताचा संतोष रहात नाही.

म्हणून विवेक-सत्संगती ही जी साधना आहे. याने अनासक्ती प्राप्त होते. इंद्रियावर ताबा मिळतो. मन ताब्यात येते. अशा मनाला एक भगवंताचे अखंड स्मरण हा विषय मिळाला की झाले ! तो पूर्ण आनंदरूप होतो. तेथे दुःख राहतच नाही. या ठिकाणीच मोक्ष मिळाला ! मोक्ष म्हणजे ही जागा सोडून दुसऱ्या जागेत जायचे असा याचा अर्थ नाही. स्वामीमहाराजच एका ठिकाणी म्हणतात.

**मोक्ष नाही पृथ्वीवरी । अथवा तो स्वर्गावरी**
**जो अहंकारा ठार मारी । त्याचे हृदयी मोक्ष वसे ॥**

ही स्थिती आपल्याला मिळावी म्हणून महाराजांनी ही प्रार्थना केली आहे. हे महत्त्वाचे पद आहे. पंचपदीनंतर मुद्दाम म्हणायची पद्धत सांप्रदाया-मध्ये आहे. देवाजवळ हे मागणे मागायचे आहे. तशी स्थिती आपल्याला प्राप्त व्हावी. मग आपल्याला संपत्ती मिळते आहे. खर्च होतो आहे. चाललं आहे सगळं काही ! त्या संपत्तीचा काहीतरी विनियोग ईश्वराप्रीत्यर्थ जितका होईल तितका करण्याचा प्रयत्न करायचा आहे. तर हे सर्व भगवंताने आपल्याला द्यावे. व करून घ्यावे.

शास्त्रकारांनी भागवतात अविस्मरणाचे-सतत स्मरणाचे म्हणजे तुझा विसर न व्हावा या स्थितीचे फल सांगितले आहे—

ईश्वराच्या केवळ स्मरण भक्तीने इतके गुण मिळतात. सर्व अभद्रांचा नाश होतो. सर्व पापक्षय होतो. अहो हृदयस्थ हरि असल्यावर पापे राहतीलच कशी ? मनच शुद्ध होऊन जाते. मन शुद्ध झाल्यावर मग शरीर-वाणी यांचेकडूनही पाप-कर्मे घडणारच नाहीत. ही क्रियमाण शुद्धी झाली. पूर्व पातकांचाही नाश झाला. अशी शुद्धता आल्यावर कर्मच शिल्लक रहात नाही. कर्म संपल्यानंतर पुनः जन्माचा संबंधही उरला नाही. म्हणून तर विवेक संपन्न महात्म्यांनी हेच मागणे मागितले आहे.

**पहा ते पांडव अखंड वनवासी । परि त्या देवासी आठविती ॥**

या अनन्य स्मरण भक्तीचे प्रतिपादन संतशिरोमणी तुकाराममहाराज करतात—

**प्रल्हादासी पिता करीतो जाचणी । परि तो स्मरे मनी नारायण ॥**
**सुदामा ब्राह्मण दरिद्रें पीडिला । नाही विसरला पांडुरंगा ॥**
**तुका म्हणे तुझा न पडावा विसर । दुःखाचे डोंगर झाले तरी ॥**

हीच मागणी आपण ईश्वराजवळ करावयाची आहे. प्रार्थना करावयाची आहे. त्याची कृपाशक्ती मोठी आहे. आमची कर्मे कितीही असली, मन कितीही दुर्दम्य असले— तरीसुद्धा —ते त्याच्या कृपेने अनुकूल होऊ शकते. मनाचे दमन होऊ शकते. आपल्याकडून सत्कर्म घडावे. केवळ सद्वासनेने भागत नाही. सद्-वासना असणे आणि त्याप्रमाणे सत्कर्म घडणे यातही अंतर आहे. इच्छा तरी चांगली असावी. इच्छाच नसली तर कर्म तरी कसे घडणार ? सदिच्छा असली म्हणजे तरी सत्कर्म घडतील. 'काशीस जावे नित्य वदावे' अशी इच्छा असली की घडेल कधीतरी.

**किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होउनी तिन्ही लोकी ।**
**भजी जो आदि पुरुषी । अखंडित ॥**

ही ज्ञानेश्वरमहाराजांनी केलेली प्रार्थना करून हे निवेदन संपवू.

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त !

***



जीवु परमात्मा दोन्हीं । बैसोनि ऐक्यासनी ।
जयाचा हृदय भुवनी । विराजती ॥५३॥

ऐसा योग समृद्धी । होऊनी जो निरवधी ।
अर्पि मनोबुद्धी । माझ्या ठायी ॥५४॥

अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढिये ॥५५॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १२

भगवंताने आपल्या श्रेष्ठ भक्ताचे वर्णन वर केले आहे. या वर्णनाचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराज यांचेमध्ये येतो.

## प्रवचनाचा संदर्भ–

हे प्रवचन एप्रिल १९८० मध्ये 'श्रीसद्गुरू सेवा मंदिर', येऊर, जि. ठाणे येथील आश्रमात झाले. या प्रवचनाचा विषय 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा', या महामंत्राचा अर्थ याच मंत्राची आरती, प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी केलेली आहे. त्या आरतीच्या अर्थ स्पष्टीकरणाने केलेला आहे.

व्यापक नि मार्मिक चिंतन-दृष्टी देणारे हे प्रवचन आहे.

# प्रवचन दुसरे

# "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा"
# या महामंत्राचे माहात्म्य

**ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।**
**द्वंद्वातीतं गगन सदृशम् तत्त्वमस्यादि लक्ष्यम् ।।**

दिगंबराची धून चालू असताना तन्मय अवस्था प्राप्त होणे ही ईश्वराची मोठी कृपा आहे. 'मद्भक्ताः यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद' असे भगवंतच म्हणतात. तेव्हां जिथे अस ईश्वराचे भजन म्हणा, गायन म्हणा चालू असते. त्या ठिकाणी ईश्वराचा निवास असतो.

या महामंत्राचा अर्थ विशद करण्याकरिता सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती-स्वामी महाराजांनी एक आरती केली आहे. त्या आरतीचा विचार आज यथामती थोडासा करावयाचा आहे. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' हे शब्द मूळ संस्कृतामध्ये आले असल्याने मंत्ररूप आहेत. मराठी आणि संस्कृतमध्ये या शब्दांचा उच्चार सारखाच होतो.

ती मूळ आरती येथे देत आहे–

दिगंबरा ! दिगंबरा ! श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।
आरती हे तव चरणी राहो नति तति गुरुवरा ।।ध्रु०।।

दिग्भिरवेष्टित अम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ।
खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति–खंब्रह्मेतिश्रुतिरपिवदति दिगम्बराचेति ।।१।।

दिग्वत् चाम्बरमेव व्यापक पूर्ण ब्रह्मेति ।
सच्चित्सुख घन मायातीतं–सच्चित्सुख घन मायातीतं दिंगबरा वदति ।।२।।

श्रीपादवल्लभ नाम प्रापहि नक्रगजेन्द्रमिव ।
द्रौपंद्यबरीषचारे–द्रौपद्यंबरीषचारे ग्रसित द्विजमेव ।।३।।

दिगंबरा गुरु वासुदेव दत्त सत्वं ब्रह्म ।
काम क्रोध ग्रसितं मां लभ-काम क्रोध ग्रसितं मां लभ सदैव झटितिवह ।।४।।

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।।

वेदांत शास्त्राप्रमाणे दृकतत्त्व आणि दृश्यतत्त्व असे दोनच पदार्थ जगात दाखविलेले आहेत. ज्ञात होणारे, प्रकाशित होणारे असे एक दृश्यतत्व आहे आणि दुसरे दृक्-परमात्म तत्त्व आहे. बहिर्मुख चित्तवृत्ती ज्यावेळेला असते तशी सर्वदाच असते. स्वभावच आहे तो चित्ताचा, इंद्रियांचा, त्यावेळेला म्हणजे सर्वदा दृश्यतत्त्व प्रकाशित होत असते आणि ती चित्तवृत्ती ज्यावेळेला अंतर्मुख होईल त्यावेळी प्रकाशमान होणारा तो, 'प्रत्यग्मात्मा' म्हटले आहे, त्याला त्याची अनुभूति येते.

बाहेरचे पदार्थ जसे भासतात त्याच्या उलट आतले आहे. दुःखरूप आपल्याला बाहेर दिसते तर तो आतला आनंदस्वरूप आहे. बाहेरच्या जगात विनाशी पदार्थ दिसतात तर आत हा अविनाशी आहे. बाहेर अशुद्ध पदार्थ सर्वत्र आहेत तर आत हा शुद्धच आहे. परप्रकाशी सर्व पदार्थ आहेत तर हा स्वयं-प्रकाशी आहे. बाहेरचे सर्व पदार्थ विकारी आहेत तर हा निर्विकारी आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत षड्विकार प्रत्येक बाह्य पदार्थास आहेत तर हा परमात्मा 'भावातीतम्' म्हणजे भावपदार्थाच्या उलट आहे.

तर असा हा जो परमात्मा आहे त्याचे अनुसंधान करावयाचे आहे. इंद्रियांची बहिर्वृत्ति असल्यामुळे देहत्रयाशिवाय दुसरं काहीही आपल्याला प्रकाशित होत नाही. देहत्रयामध्ये शास्त्रकारांनी पंच कोषांची रचना केलेली आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पांच कोष आहेत. स्थूल देह हा अन्नमय कोष म्हटलेला आहे. आत्म्याची ओळख करून देताना स्थूल देहालाच आत्मा म्हणून त्यांनी सांगितलेले आहे. तिथून सुरुवात करायला सांगितले आहे. हाच अन्नमय कोष म्हणजे आत्मा आहे. त्याच्यानंतर प्राणमय कोष आहे. प्राणवायू, कर्मेंद्रिये हा जो विभाग आहे हा प्राणमय कोष म्हणून सांगितलेला आहे. त्याच्यानंतर मनोमय आणि विज्ञानमय असे दोन कोष आहेत. ज्ञानेंद्रिये आणि बुद्धी व ज्ञानेंद्रिये आणि मन असे दोन विभाग म्हणजे हे दोन कोष आहेत. शेवटी आनंदमय कोष आहे. चित्ताचा संबंध इथे संपलेला आहे. त्या ठिकाणी केवळ अज्ञान म्हणून आहे. मूळ अज्ञान शक्ती ईश्वराची आहे. कर्मशक्ति ईश्वराची आहे आणि कार्यशक्तिही ईश्वराची आहे आणि शक्तींच्या द्वारा सृष्टीच्या नियमनाचे कार्य चाललेले आहे.

तर स्वयंप्रकाशी असा जो आत्मा आहे. ज्याला प्रत्यग्आत्मा म्हणतात तो आपली प्रवृत्ती बाहेर आहे म्हणून तो आत आहे असे म्हणतात. नाहीतर

तो आत आहे, म्हणजे बाहेर नाही असे म्हटले तर सिद्धांत भंग होईल. तो सर्व व्यापी आहे. देशाची-कालाची-कशाचीही त्याला मर्यादा नाही. असे ते परम तत्व आहे.

ज्ञानी भक्तांनी नामदेवांना या तत्वदृष्टीने कच्चे ठरविले. पांडुरंगाच्या जवळ गेल्यावर त्यांनीही ज्ञानी भक्तांच्या म्हणण्याला संमती दिली. 'हो कच्चे आहे' असे देव सुद्धा म्हणाले. तेव्हा नामदेव देवाला म्हणाले "देवा ! माझ्याशी तुम्ही बोलता. माझ्या घरी येता. माझ्या हातचे जेवता. माझी कामे सुद्धा करता तरी मी कच्चा ?" यावर देव म्हणाले "नामदेवा मी फक्त राऊळामध्येच आहे हे समजणे कच्चेपणाचे लक्षण आहे. पांडुरंग सर्व ठिकाणी आहे. सर्व स्वरूप आहे. हे ईश्वरदर्शन पूर्ण दर्शन आहे." तर या प्रमाणे अंतरात्मा प्रत्यग्‌आत्मा प्रत्यग ब्रह्म, या पूर्ण स्वरूपाचे दर्शन होण्याकरता, ज्या मनाचं, बुद्धीचं सहाय्य घ्यायचं ती बुद्धी त्याच्या पर्यंत जाऊ शकत नाही. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पांच कोषापर्यंतही त्या बुद्धीची झेप पोहचत नाही आणि तो तर आनंदमय कोषाच्याही पलिकडे असलेला ! स्वयंसिद्ध आनंद-मय कोष म्हणजे तरी काय ? सुषुप्तीच्या वेळी जो आनंद मिळतो, त्याची कोणतीही इंद्रिये नाहीत, ज्याला केवळ अज्ञान म्हणतात, असा तो अज्ञान संमिश्रीत जो आनंद मिळतो, तो आनंदमय कोष. परमात्म स्वरूप शुद्ध आनंद-रूप आहे म्हणजे बाहेरून मन ज्यावेळी परावृत्त होईल, त्यावेळेला कोषाचे अनुसंधान करता करता, आनंदमय कोषाच्याही पलिकडे एक स्वयंसिद्ध निर्विकार आत्मतत्त्व आहे, हे मनाला समजून येते. त्या साक्षी स्वरूपाचं अनुसंधान तितकंच उत्कटतेने होत राहिलं पाहिजे. साक्ष म्हणजे दिसणारे दृश्य. ते तटस्थपणे पाहणारा म्हणून साक्षी.

**मात्रा स्पर्शास्तु कौन्त्येय शीतोष्ण सुखदुःखदाः ।**
**आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ गीता २/१४**

(अर्थ– हे कौन्त्येय (अर्जुना) शीत-ऊष्ण व सुख दुःख देणारे, इंद्रिय व विषय ह्यांचे संयोगांना उत्पत्ती व नाश आहेत. म्हणून ते अनित्य आहेत. हे भारता ! (अर्जुना) ते तूं सहनच केले पाहिजेस.)

ही उच्च भूमिका अर्जुनाला सांगितली आहे. वेदांत श्रवण, मनन, निदि-ध्यासन करणे, समाधी व साक्षात्कार त्या बुद्धीतत्त्वाला करून घेणे इतकी बुद्धीची

योग्यता झाली पाहिजे. यासाठी ती योग्यता येण्यापूर्वी ते अनुसंधान इथून सुरु करावयाचे आहे.

सर्व ही विश्व हे आगमा-बाह्य आहे आणि अनित्य आहे. या करिता तितिक्षेचा अभ्यास शास्त्रकारांनी सांगितला आहे. इष्ट-अनिष्ट कोणत्याही घटना घडल्या तरी समचित्त रहाणे हा तितिक्षेचा अभ्यास आहे. 'सहनं सर्व दुःखांनां अप्रतिकार पूर्वकम् सा तितिक्षा !' हे साधून मग स्वरूपानुसंधान करायला सांगितले आहे. याचे स्पष्टीकरण महाराजांनी 'आत्मानात्म-विवेक' मध्ये केले आहे. हे स्वरूपानुसंधान ज्या बुद्धीने किंवा मनाने करावयाचे आहे ते समचित्त-स्थिर पाहिजे.

निर्विकार जे स्वरूप आहे, तो 'दिगंबर' शब्दाचा अर्थ आहे. साक्षीस्वरूप सूर्याच्या उदय व अस्तानुसार आपण पूर्व पश्चिम वगैरे दिशा समजतो. सूर्य-नारायणाच्या (मूर्त स्वरुपानुसार) उदयाप्रमाणे पूर्व दिशा समजतो आणि जो मूर्त पदार्थ त्या सूर्यनारायणापासून दूर असेल त्याला पश्चिम दिशा समजतात. सूर्य-नारायणापासून आमच्या पाठीमागे असलेल्या पदार्थापेक्षा आम्ही जवळ आहोत म्हणून सूर्य नारायणापेक्षा दूर असलेल्या पदार्थाला पश्चिम दिशा असे समजतात. व्यवहारामध्ये दृकतत्त्वाप्रमाणे विभाग केले जातात. तेव्हां येथे अंबर म्हणजे आकाशाप्रमाणे सर्वव्यापी परमात्म तत्त्व आहे. दिक् तत्वाप्रमाणे मूर्त पदार्थ अन्नमय. प्राणमय-मनोमय-विज्ञानमय आणि आनंदमय कोषांनी वेष्टीत असतात. किंवा स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन देहांनी वेष्टीत झाले आहे, आवृत्त झाले आहे. त्या आवरणांना काढावयाचे आहे. त्यासाठी बुद्धीचे सहाय्य घ्यायचे आहे. शुद्ध प्रकाशमान आत्मतत्वाचं अनुसंधान करावयाचे आहे.

मी बसलो, मी उठलो- हे सगळे देहाचे धर्म आहेत. मी पहातो, मी ऐकतो हे सर्व इंद्रियांचे धर्म आहेत. मी संकल्प करतो. माझ्या मनात राग आहे-माझ्यात दोष आहेत-हे सगळे मनोधर्म आहेत. हे सगळे धर्म 'मी'च्या ठिकाणी आपल्याला भासतात. ही सर्व आवरणे काढून टाकीत शेवटी त्या 'अहम्'ची शुद्धी होता होता देहत्रयातील देहत्रयाने होणारे सर्वही व्यवहार आपण पाहू शकतो. या व्यवहाराची उत्पत्ती-नाश मला सर्व दिसतो आहे. त्यामुळे मी असंग आहे. माझा याच्याशी काहीही संबंध नाही. हे जे अनुसंधान तो 'दिगंबर' या पहिल्या शब्दाचा अर्थ आहे. हे जे आत्मतत्व आहे ते सर्व वेष्टित झालेले आहे. त्याचे

अनुसंधान करून, बुद्धीने हे वेष्टन दूर करून, विश्लेषण करून, तसा मी आहे अशी धारणा करावी लागते. आकाशतत्वाप्रमाणे 'खम्' हे आकाशाचे नाव आहे. ब्रह्माचेही नांव आहे पण 'खम्' म्हणजे आकाशाप्रमाणे असंग आहे आणि आकाशाप्रमाणे देश मर्यादा रहित आहे. आकाशाला श्रीदत्तात्रेयांनी गुरु केले आणि या आकाशापासून असंग हा बोध घेतलेला आहे. सर्वांतर्यामी असलेल्या प्रत्यग ब्रह्मापर्यंत आपली बुद्धी नेणे हे दिगंबर पदार्थाचे अनुसंधान करणे आहे.

प्रत्यग ब्रह्मापर्यंत आपली बुद्धी नेणे फार कठीण आहे असे म्हणतात. तार्किकांना हे सापडणार नाही, असे आचार्य महाराजांनी स्पष्ट सांगितले आहे. तिथे तर्काला आतमध्ये प्रवेश नाही. कारण साक्षी म्हणून जो आहे तो जगात कुठे अनुभवाला येत नाही. निर्विकारी आणि स्वयंप्रकाशी आत्मतत्वाचा अनुभव बुद्धीने ठरवून घ्यावयाचा आहे. त्याकरता योगमार्ग किंवा भक्तिमार्ग सांगितला आहे. तर त्या स्वरुपानुसंधानापर्यंत बुद्धी आली म्हणजे मी साक्षी आहे. इथे सुखदु:ख वगैरे काही नाही असा अनुभव येतो. 'द्वंद्वातीतम्'पर्यंत बुद्धी येऊन पोहोचली असा याचा अर्थ आहे.

ज्या तत्त्वाला कशाचाही संबंध नाही. सुखदु:खादि होणारी द्वंद्वे हा फक्त पहातो आहे. त्या सर्वांचा मी साक्षी आहे. जसा मी साक्षी आहे तसा दुसरा एखादाही साक्षी आहे. व्यापक दृष्टीने हे आहे. सर्व साक्षी, सर्व व्यापी एकच आहे. जसे जीव अनंत आहेत तसे साक्षीही अनंत होतील. साक्षीस्वरुप अद्यापि मर्यादित राहिलेले आहे. आत्मस्वरुपाचे जे निरनिराळे विभाग आहेत, अंश आहेत, कल्पनेने दाखविलेले ते सगळे अंश अजून लक्षात आलेले नाहीत. केवळ निर्विकार-असंग एवढच ठरलेलं आहे. याकरता अनंत जन्मांचा अभ्यास आहे, सुकृत आहे, महात्म्यांची कृपा आहे. त्यामुळें बुद्धी येथपर्यंत येऊन पोचली आहे.

आणि साक्षीस्वरूप समजल्यानंतर ते अनेक आहे. साक्षी जो आहे तो सर्वत्र व्यापक आहे. काल मर्यादा असेल पण देश मर्यादा त्याला नाही. 'सर्वगत:' एवढेच समजूत घ्यावयाचे आहे.

ते पूर्ण ब्रह्म आणि हे प्रत्यग् ब्रह्म !

साक्षी ब्रह्म पूर्ण आहे. सर्व व्यापी आहे. सर्वत्र एकच आहे. हे दुसऱ्यांदा 'दिगंबर' शब्दाच्या अर्थात त्यांनी सांगितले आहे. दिशा एक तत्त्व

आहे, काल एक तत्व आहे, आकाश एक तत्व आहे. परंतु उपाधीमुळे त्यांच्यात भेद दिसतो. भांड्यातले, खोलीतले, ताटातले आकाश निराळे दिसते. हा जो भेद दिसतो, तो उपाधीमुळे दिसतो. जसे काल हे एक तत्व असताना कालाची उपाधी क्रियेवरून त्यांनी मानलेली आहे. आणि त्या क्रियेवरून कालाचा भेद शास्त्रकारांनी मानला आहे. साठ सेकंदाला एक मिनिट, साठ मिनिटे म्हणजे एक तास. ही नांवे जरी आपण दिली असली (म्हणजे काल भेद केला असला) तरी कालतत्व एकच आहे. त्याच प्रमाणे एक दिक्‌तत्व मानून ते जसे सर्व व्यापी वस्तूत: आहे त्याप्रमाणे पूर्ण ब्रह्म आहे.

साक्षी भाव जो आहे तो सुद्धा नाहीसा झाला पाहिजे. मी साक्षी आहे आणि साक्ष निराळे आहे. पुन्हा हा भ्रम अद्यापि शिल्लक राहिला आहे तो ही जायला पाहिजे. तर साक्षीस्वरूप सर्वव्यापी व पूर्ण आहे. हे कळण्याकरता "सच्चित् सुखघनमायातीतम्" म्हटले आहे. सच्चिदानंद स्वरूप जे आहे ते सत् स्वरूप याचा अर्थ अविनाशी आहे. आणि चित् स्वरूप म्हणजे स्वयं प्रकाशी आहे. दुसऱ्याच्या प्रकाशाची आवश्यकता नाही. सूर्य चंद्रादिकांना देखील त्याच्यामुळे प्रकाश आला आहे.

**"यदादित्य गतं तेजो जगत् भासयतेऽ खिलम् ।**
**यच्चंद्रमसियच्चाग्नौ तत् तेजो विद्धि मामकम् "॥**

असे भगवान म्हणताहेत. असे सर्व प्रकाशी एक तत्त्व आहे आणि ते आनंद रूप आहे. तो आनंद सर्व सिद्ध आनंद आहे. आणि "मायातीतम्" म्हणजे मायेने निर्माण झालेल्या भौतिक पदार्थांच्याही पलिकडचा तो आहे. हे दुसऱ्या 'दिगंबर' शब्दाने सांगितले आहे. आणि ही दोन्ही तत्त्वे एकच आहेत हे दुसऱ्या दिगंबर शब्दाने सांगितले आहे.

श्रीपादवल्लभ हेही त्याच्यामध्ये घातलेले आहे. निर्गुण निराकार असे जे आत्मतत्त्व आहे ते परमतत्त्व साक्षीरूपाने आधी दाखवले गेले ! पुन: सर्वसाक्षी सर्वव्यापी अशा परिपूर्ण रूपाने त्याचे प्रगटीकरण केलेले आहे. अगोदर साक्षीचे अनुसंधान केले. अहंब्रह्म म्हणजे अहं साक्षी असा मनाचा अभ्यास होण्याकरिता मनाच सहाय्य फार पाहिजे. आणि हे मनाच सहाय्य होण्याकरिता शास्त्रकारांनी बाकीची साधने सांगितली आहेत. त्यासाठी भक्तीयोगाचा पुरस्कार महाराजांनी या ठिकाणी केला आहे. श्रीपादवल्लभ हे जे सगुण स्वरूप व्यक्त झालं.

श्रीपादवल्लभ ज्या स्थानामध्ये राहिले त्या स्थानात राहाणाऱ्यांची ही इष्टसिद्धी होते. श्रीपादवल्लभ ज्या स्थानात राहिले त्या स्थानात जर साधकाने निवास केला तर यज्ञ, तप, दान इत्यादिकरून मिळणाऱ्या फलापेक्षा कितीतरी अधिक पट फल त्याला मिळते. त्याची प्रगति जास्त लवकर होते. श्रीपादांचे स्वरूप हे फक्त भौतिक शरीर नसून ज्ञानमय सगुणरूप त्यांनी धारण केले आहे. असा परमेश्वर स्वरूपाचा अवतार ज्या ठिकाणी राहिला ते स्थानही पवित्र होऊन जाते, असे स्थानाचे महत्त्व आहे. ज्ञानेश्वर महाराज सातशे वर्षे समाधी लावून बसले आहेत. तिथे जाणाऱ्या-येणाऱ्यांची कार्यसिद्धी कशी होते ? त्यांना बातमी कोण पोचवितो ? सिद्धपुरुषांच्या या स्थानामध्येच असं काही वैशिष्टय निर्माण झालय की तिथे जाणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात.

आत्मानुसंधान करणाऱ्या साधकांना निरनिराळ्या विघ्नांना तोंड द्यावे लागते. पहिले विघ्न म्हणजे झोप. स्वरूपानुसंधानास बसल्यावर जर झोप आली तर मनाचा लय होतो. मग कसे काय अनुसंधान करायचे ? त्यासाठी आहार विहाराचे कटाक्षाने पालन व्हावयास पाहिजे. हिताहार-मिताहार इत्यादि पाळले पाहिजेत. म्हणजे हा लय-दोष उत्पन्न होत नाही. त्यानंतरचा मोठा दोष म्हणजे अनेक प्रकारच्या वृत्ती मनात निर्माण होतात. आणि त्या वृत्तीतच माणूस रमून जातो. वृत्ती निर्माण होणं हा संसार आहे. आणि वृत्ती नाहिशी होणं हा मनोनाश आहे. वृत्ती निर्माण होऊन स्वरूपानुसंधानात विक्षेप उत्पन्न करतात. आपल्या अन्तःकरणात षड्विकारादि दोष किती प्रबळ आहेत याचा पत्ता आम्हाला लागत नाही. प्रत्यक्ष ते विकार प्रगट झाल्यानंतरही ते जाणवत नाहीत. यानंतर रसास्वाद हा एक मोठा भयंकर दोष आहे. ज्यांना प्रगति साधावयाची आहे ते रसास्वादाच्या मागे लागत नाहीत. आपली प्रसिद्धी आपणच आपल्या तोंडाने करायची. व्यवहारात जरी हे उपयोगी असले तरी परमार्थात हा दोष म्हणून मानला आहे. मला असा अनुभव आला आहे. माझी एवढी प्रगति झाली आहे असे स्वतःच सांगत सुटायचे. आपल्याला जो कांही थोडा फार चांगला अनुभव आला त्याची आपल्या मुखानेच प्रसिद्धी करावयाची. प्रगति शब्दाचा काय अर्थ करायचा तर साधन व्यवस्थित चालले आहे. ती ईश्वराची कृपा आहे असे समजायला काय हरकत आहे ? आपल्याकडे त्याचे कर्तृत्त्व घ्यायची काय गरज आहे ? या रसास्वादातच सर्व काल निघून जातो. रसास्वाद हा घात

करणारा आहे. या रसास्वाद दोषामुळे साधनेत प्रतिबंध निर्माण होतो. असे अनेक दोष आहेत.

आत्मस्वरूपाचे जे अनुसंधान की, मी साक्षीरूप आहे, मी पूर्ण ब्रह्म आहे याचा निदिध्यास व्हायला हवा. निदिध्यास म्हणजे साक्षात्कार नाही. पण साक्षात्काराच्या जवळ जवळ असलेली ज्ञान भूमिका आहे. श्रवण हे सुद्धा ज्ञान भूमिका आहे. मनन-चिकित्सा करणे ही सुद्धा ज्ञान भूमिका आहे. त्याच्यानंतर मनाचा लय झाल्यावर आत्मस्वरूपाचं अनुसंधान करणे ही तिसरी भूमिका आहे. याच्यातून आपले अन्तःकरण अखंड त्या परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर होत गेलं तर मग ती समाधी अवस्था आहे. आणि समाधीतून पुढे साक्षात्कार होतो.

तर या अवस्थेमध्ये पोहोचण्यात येणारी जी असंख्य विघ्ने आहेत त्याचे निरसन कसे होणार ? ही मोठी अडचण आहे. आपण समजतो बुद्धी-मन-इंद्रिये माझी आहेत. पण तसे नाही. शरीराला वेदना होतात तेव्हा तिकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. देहापासून मन बुद्धी इंद्रिये ही परावृत्त होत नाहीत. सर्पदंश झाल्यावरही मोठे महाराज (श्री. टेंबे स्वामी) समाधी लावून बसत असत. एकदा तर आठ तास बसले होते म्हणे शरीर वेदना असताना– तिकडे दुर्लक्ष करून– समाधी लावणे सोपे आहे का ? तसे आम्हाला कुठे जमतेय ? काशीचे पं. राजेश्वर शास्त्री द्रवीड एकदा ग्रंथालयात जाऊन बसले की दोन दोन दिवस बसत असत. अन्नपाणी-झोप-कशाचीही आठवण सुद्धा येत नसे त्यांना. आनंद आहे तो. विद्यानंद ! स्वतंत्र आहे. इंद्रियानंदाहून मोठा. इंद्रियानंद लोकांना मोठा वाटला तरी तो अल्प व अस्थिर आहे. विषयापासून-देहापासून मन परावृत्त करण्याची तयारी पाहिजे.

ईश्वर दयाळू आहे. भक्तांचे कल्याण करण्यासाठी निरनिराळे अवतार झाले आहेत. नक्र आणि गजेंद्राची कथा सर्वांना माहित आहे. नक्राने गजेंद्राचा पाय धरून त्याला आत चालविले आहे. गजेंद्राने खूप प्रतिकार केला आहे. त्याच्या शरीरातील सामर्थ्य संपत आले आहे. गजेंद्राला कळून चुकले की आपण आता पाण्याच्या बाहेर येऊ शकत नाही. मग पूर्व जन्मात त्याचेकडून जे काही आत्मानुसंधान घडले होते त्याचेच स्मरण करून तो परमेश्वराला शरण गेलेला होता. परमेश्वराची मोठी स्तुती त्याने केली. ती गजेंद्रस्तुती म्हणून भागवतात प्रसिद्ध आहे. त्यात परमात्म्याच्या स्वरूपाचे वर्णन त्याने

(गजेंद्राने) केले आहे. आमच्या सारख्या बुद्धीवाद्याला वाटेल की हत्ती कधी स्तुती करतो काय ? पण चंद्र लोकापर्यंत बुद्धी (मानव) जाऊ शकते हे अगोदर कोणी मान्य केले होते का ? शक्ती ही आधी मान्य करावी लागते. आपल्यामध्ये असलेल्या शक्तीचा विकास कसा करून घ्यायचा ती साधना आम्हाला मान्य नाहीं-किंवा-सांगणाऱ्यावर विश्वास नाही. वास्तविक हा आपल्या बुद्धीचा दोष आहे. पण तो दोष न समजता आपण ते अशक्य आहे अशी समजूत करून बसतो. असंभावना हा फार मोठा दोष आहे.

ही असंभावना- हे अशक्य आहे. ही समजूत, हा दोष बुद्धीतून गेल्या-शिवाय परमार्थ साध्य होणे शक्य नाही. संभावना- हे शक्य आहे असे वाटले पाहिजे. शक्यतेची भावना निर्माण झाली पाहिजे. म्हणजे मग संशय कमी होतो. संशय दोन असतात. एक असेल असे वाटणे हा ही संशयच आणि एक नसेल असे वाटणे हा ही संशयच. बुद्धीवाद्याला यातले काहीच मान्य नसते. आहे ही मान्य नाही आणि नाही असेही म्हणत नाही. त्यामुळे अर्धवट स्थिती होते. "संशयात्मा विनश्यति" । होईल. असे असू शकेल. असे घडणे शक्य आहे. हे संभावनात्मक ज्ञान आहे. निश्चितपणा नाही. शक्यतेचाही अर्धवटपणा, अशी स्थिती, ही संशयाच्या वरची पायरी आहे.

याच्या नंतर निःसंशय बुद्धी-त्याच्यावर निर्णयात्मक बुद्धी, या निर्णयात्मक बुद्धीनंतर निश्चयात्मक बुद्धी. असा हा बुद्धीचा विकास करावयाचा आहे. अशा विकसित बुद्धीचे संस्कार कायम राहू शकतात. मागच्या जन्मीचे, पश्वादिक योनीमध्ये असतानाही ते पूर्वजन्माच्या बुद्धीचे संस्कार कायम असू शकतात. मागच्या जन्मामध्ये केलेले साधन- त्या साधनेचा आलेला अनुभव, त्या साधन संस्कारांचे महत्त्व इतके आहे की, या पशूच्या (गजेंद्राच्या) जन्मात आलेला असताना सुद्धा त्या बुद्धीवर ते संस्कार कायम असू शकतात.

बुद्धी तत्त्व हे अगदी अविनाशी आहे. जीवन मुक्ती होईपर्यंत बुद्धीतत्त्व बरोबर राहाणार आहे. शास्त्रकार सुद्धा, बुद्धीनेच आत्म तत्व दिसू शकते, म्हणून बुद्धी तत्वाचा पुरस्कार करतात. त्या गजेन्द्राचे सुद्धा शुकाचार्य महाराजांनी कौतुक केले आहे. त्या गजेन्द्राने म्हणे सर्वव्यापी जे ईश्वर तत्व आहे त्याची प्रार्थना केली. सर्व जग ज्याने निर्माण केले, सर्व जीवांच्या बुद्धीला जो प्रेरणा करणारा आहे. ज्या शक्तीने या सर्व विश्वाचे कार्य चालले आहे त्याला मी शरण

आलेलो आहे अशी त्या गजेंद्राने प्रार्थना केल्यानंतर मुद्दाम शुकाचार्य वर्णन करतात की, देवादिकांना सुद्धा आपल्या नावाचा अभिमान आहे. पशु जन्माला येऊन सुद्धा गजेंद्राची बुद्धी इतकी शुद्ध झालेली होती की, सर्व ठिकाणी एकच परमात्म तत्व आहे याची त्याला जाणीव होती. बुद्धी बरोबर असली म्हणजे ती अशा रीतीने कोणत्याही जन्मामध्ये उपयोगी पडते.

तर याप्रमाणे श्रीपादवल्लभ जे नाव प्राप्त झालेले आहे ते नक्र आणि गजेन्द्र या उदाहरणावरून झालेले आहे. नाव आणि रूप धारण करून भगवान येतात. द्रौपदीचे आणखी उदाहरण दिलेले आहे. द्रौपदीसारखी साध्वी स्त्री, गृहस्थाश्रमी पुरुषाचा धर्म म्हणजे देवपूजा इ० पंचयज्ञ करणे हा आहे. अन्नवस्त्र कोणाला हवं असल्यास देणे, त्याचे रक्षण करणे, गुरु सेवा, वेदाध्ययन इ० धर्मराजांनी सूर्यनारायणाची प्रार्थना करून वनवासातसुद्धा गृहस्थाश्रमाचेच पालन करण्यासाठी ते 'पात्र' (थाळी) मिळवलं. द्रौपदीचे जेवण झालं की ते पात्र अन्न देणार नाही. म्हणजे द्रौपदीला सर्वात शेवटी जेवलें पाहिजे. कर्म करायचे तेसुद्धा किती कठीण असते ! सत्वपरीक्षा असते ती. ध्येय पूर्ण करण्याकरिता मनाचा निर्धार किती पाहिजे ? भक्तिमार्ग-ज्ञानमार्ग हे तर कर्मानंतरचे आहेत. पण कर्म मार्गातही निश्चित दृष्टी (बुद्धी) पाहिजे. दुर्योधनाने दुर्वास ऋषींना प्रसन्न करून घेतले आणि पांडवांचे सत्व-भंग करण्यासाठी, द्रौपदीचे जेवण झाल्यावर, अतिथी म्हणून तिथे जेवायला पाठविले. म्हणजे दुर्योधनासारखी माणसे ही सत्संग करतात पण त्याचा असा दुरुपयोग करतात. वास्तविक दुर्वास ऋषींना प्रसन्न करून घेणे काही सोपी गोष्ट नाही. दुर्योधनाला मनाचा निग्रह करावा लागला. पण त्याने ते सर्व केले तेव्हां दुर्वास ऋषी प्रसन्न झाले. ही आसुरी प्रवृत्तीची मंडळी असली तरी त्यांच्याजवळ मनोनिग्रह आहे. इंद्रियांचा संयमही आहे. तितीक्षा इ. सर्व साधने आहेत. दुर्वास ऋषी प्रसन्न झाले. काय हवा तो वर माग म्हणाले. दुर्योधनाने असा वर मागितला की द्रौपदीचे जेवण झाल्यावर सर्व शिष्यांसह तुम्ही पांडवांच्या आश्रमात जा. म्हणजे पाहुण्यांच्या हातून साप मारायचा. पाहुणा मेला तरी चालेल, साप मेला तरी चालेल. त्यामुळे दुर्वास ऋषींना नाईलाज म्हणून जावे लागले. पांडव योग्य आहेत. धर्मनिष्ठ आहेत. हे दुर्वास ऋषींना माहीत नव्हते असे नाही. ऋषी त्यांच्या आश्रमात गेले. धर्मराज मोठा धर्मज्ञ

आहे. धर्मराज अरण्यातही अतिथीधर्माचे पालन करीत होता. पण आता द्रौपदीचे जेवण होऊन गेलं असल्यामुळे दुर्वास ऋषी आणि त्यांच्या शिष्य समुदायाला जेवण कसे देणार ? न द्यावं तर दुर्वासांचा कोप होऊन ते शाप देणार !

पण द्रौपदी काही कमी नव्हती. सर्व भगवंताचीच शक्ती आहे अशी तिची पक्की खात्री होती. "त्वमेव सर्वम् मम देव देव" ही जी फार कठीण भूमिका आहे ती द्रौपदीला जमली होती. वास्तविक पहाता "त्वमेव सर्वम् मम देव देव" ही भूमिका उत्पन्न होणे कठीण आहे. साधनेवर विश्वास असल्यानंतर, मी साधना करतो असा स्वतःचा विश्वास वाटतो व वाढतो, पुढे याचे रूपांतर अभिमानामध्ये होते. पण द्रौपदीचे तसे नव्हते. साधनेतून देवावर विश्वास दृढ झाला पाहिजे. द्रौपदीने तळमळीने श्रीकृष्णाचे आवाहन केले. भगवान आले. आणि पात्राला लागलेले भाजीचे पान भक्षण केले. 'पत्रं पुष्पं फलं तोयं' हे स्वतः आचरून दाखविले आणि द्रौपदीच्या प्रेमाला-भक्तीला-महत्त्व दिले. मग त्या थाळीने-पात्राने परत अन्न दिले. याप्रमाणे द्रौपदीच्या भक्ति भूमिकेमुळे पांडव संकटातून मुक्त झाले आहेत. भक्तीभावासाठी भगवान वाटेल त्या वेळेला येऊन संकटातून मुक्त करतात. अंबरीष राजालाही भगवंतानेच दुर्वासाच्या शापातून मुक्त केले आहे.

एक सकाम भक्त आहे. श्रीपाद वल्लभांचा नवस फेडून सहस्र ब्राह्मण भोजन घालण्यासाठी कुरूगड्डीला निघाला आहे. वाटेत चोरांनी गाठून त्याचा फसवून वध केला आहे. परंतु भगवंताची वात्सल्यपूर्ण शक्ती अशी आहे की भगवान त्या ठिकाणी येऊन, त्या चोराला मारून, ब्राह्मणाला जिवंत केले आहे आणि त्याचा तो संकल्प त्याच जन्मात पूर्ण करून घेतला आहे. मेलेला आहे हे पाहिल्यावर देवांना तत्वज्ञान सांगता आले नसते काय ? जा बाबा तुझे आयुष्य संपलेले आहे, वगैरे उत्तर त्यांना देता आले असते.

निर्विकार ब्रह्मरूप समजणे. त्याचप्रमाणे सर्व व्यापक ब्रह्म जे आहे तेही समजून घेणे, त्याचे अनुसंधान करणे, सगुण कनिष्ठ किंवा निर्गुण श्रेष्ठ असा भेदभावच तिथे नाही. भक्तकार्य करणारा भगवानच साक्षात् ब्रह्मरूप आहे. निर्गुण निराकार तोच आहे. त्याची प्राप्ती मला व्हावी. अनंत विक्षेप (काम-क्रोधरूपी) चित्तामध्ये उत्पन्न होताहेत. चित्त स्थिर करण्याचे सामर्थ्य मजजवळ नाही. साधन मिळालं तरी त्या साधनावरती माझा तितका पूर्ण विश्वास कुठे

आहे ? त्यामुळे त्या साधनाचाही उपयोग मी करून घेऊ शकत नाही. याकरता तुमचे साहाय्य मला व्हावं, तुमची प्राप्ती मला व्हावी. ही प्रार्थना या आरतीत शेवटी केली आहे. अशा रितीने सामान्यतः एकंदर तत्त्वानुसंधान, वेदांतसिद्धांत, यांत मांडले आहेत. त्या सिद्धांतापर्यंत आपली बुद्धी जाण्याकरिता भगवत्भक्तीचे महत्वही या ठिकाणी वर्णन केले आहे.

आपण जर कृपा केलीत तरच मला आपले स्वरूप समजून येणार आहे. माझे कर्तृत्व काहीही नाही अशी अनन्यभावाने शेवटी प्रार्थना केली आहे. याचे नित्य अनुसंधान करीत राहून या आरतीचे पठण अर्थाकडे जर लक्ष देऊन झाले तर त्याचे फळ आपल्याला मिळणार आहे. हे एक वाङ्मय तपच आहे. अर्थानुसंधान नाही घडलं तरी जितके वाणीने होईल तेवढे करावे. त्या वाङ्मय तपाचेही महत्व काही कमी नाही. वाङ्मय तपाचे पर्यवसान मानस तपापर्यंत होत आहे. हेच महाराजांनी त्यामध्ये सांगितले आहे.

या अष्टाक्षरी मंत्रातले पहिले दोन शब्द 'दिगंबरा ! दिगंबरा !' ही दोन संबोधने आहेत. तशी सगळीच संबोधने आहेत. पहिल्या दिगंबरा शब्दाने साक्षी स्वरूपाचे अनुसंधान आहे. आत्म्याचे जे साक्षीरूप आहे म्हणजे शुद्ध 'अहम्' पदार्थ, जीवाचे शुद्ध स्वरूप याचे अनुसंधान पहिल्या दिगंबर शब्दातील अर्थाने आहे आणि दुसऱ्या 'दिगंबरा' या शब्दाने सर्वव्यापी परब्रह्म, सर्व विश्वाला अधिष्ठान असे जे ब्रह्म त्या अर्थाने आहे. प्रत्यगब्रह्म आणि परब्रह्म ! अहम् आणि ब्रह्म दोन्ही एकच आहेत. व्यापक ब्रह्माचे म्हणजे परब्रह्माचे स्वरूपाचे दुसऱ्या दिगंबरा संबोधनाने अनुसंधान केलेले आहे.

तेच ब्रह्म स्वरूप भक्ताचं संरक्षण करण्याकरता आहे. रक्षण याचा अर्थ भक्तांची बुद्धी शुद्ध करून आपल्या ठिकाणी स्थिर करणे. हे संरक्षण आहे. त्या करता "श्रीपाद वल्लभ' हे तिसरे संबोधन आहे. 'श्रीपाद' आणि 'वल्लभ' असे दोन शब्द याच्यात आहेत. "श्री पादेयस्य" ज्याच्या चरणाजवळ 'श्री' आहे. लक्ष्मीयुक्त परमात्मा, शक्तियुक्त परमात्म्याचे स्मरण श्रीपाद या शब्दाने केले आहे.

तेव्हां सर्व 'श्री'-लक्ष्मीदेवी-ज्याच्याजवळ आहे आणि म्हणून तो सर्वांना वल्लभ आहे, म्हणजे प्रिय आहे. सर्वांना संकटातून मुक्त करून कल्याण

करणारा आहे म्हणून तो वल्लभ म्हणजे प्रिय आहे. तेव्हां सर्व श्री-मायाशक्ती ज्याच्या जवळ आहे आणि सर्व ही भक्तांना जो अत्यंत प्रिय आहे. तो प्रिय कसा आहे ? भक्तांची संकटे कशी दूर करतो ? हे पुढे सांगितले आहे.

**श्रीपादवल्लभनामप्रापहिनक्रगजेंद्रमिव ।**
**द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव ॥**

चार भक्तांची उदाहरणे या ठिकाणी दिलेली आहेत. नक्र-गजेंद्र. नक्राने गजेंद्राला धरलेले आहे. अत्यंत आर्त होऊन तो भगवंतांना बोलावतो आहे. त्यावेळी भगवान त्या ठिकाणी येऊन त्यांनी त्या नक्राचा नाश करून गजेंद्राला मुक्त केलं. नक्रापासून तर सोडवलेच पण गजयोनीतूनही मुक्त केले. तो वैकुंठाला राहणाऱ्या भगवद् भक्ताचे रुप मिळून, वैकुंठ लोकाला गेला.

द्रौपदीचेही उदाहरण आहे. द्रौपदीची विटंबना करायची ठरवली दुःशासनाने ! त्यावेळी आर्त झालेल्या द्रौपदीने श्रीकृष्णाला हाक मारल्यानंतर तिथे येऊन तिला वस्त्र पुरवून भगवंतांनी तिचे रक्षण केले.

अंबरीष राजा दुर्वास ऋषींचा शाप होणार पण त्याने प्रार्थना केल्यावरून, स्मरण केल्यावरून भगवान त्या ठिकाणी आले आणि त्यांनी त्यांचा शाप स्वतःवर घेतला. अंबरीषाचेही रक्षण केले.

आणि- चोरग्रसित द्विज ! श्रीगुरुचरित्राच्या दहाव्या अध्यायात जी कथा सांगितली आहे. श्रीपादवल्लभांचा मोठा भक्त नवसाप्रमाणे अन्नसंतर्पण करायला कुरवपुरला निघाला. वाटेत चोरांनी त्याचा नाश केला. त्यावेळी श्रीपादवल्लभांनी त्या ठिकाणी येऊन त्या चोरांना मारले आणि त्या द्विजाला जिवंत केले. त्या ब्राह्मणाचा नवस त्याच जन्मात फेडला गेला आहे.

तर अशा आर्त झालेल्या भक्तांना सुरक्षित ठेवले— “न मे भक्तः प्रणश्यति” या आपल्या प्रतिज्ञे प्रमाणे या लीला भगवंतानी केल्या. भक्त संरक्षण केले. “श्रीपाद वल्लभ” या संबोधनामध्ये हे सर्व सुचविले आहे. आणि शेवटी अशी प्रार्थना केली आहे.

**दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वं ब्रह्म ।**
**काम क्रोध ग्रसितम् माम् लभ सदैव झटिति वह ॥**

हे दिगंबरा ! "श्रीपादवत् लभ" असा एक अर्थ केला आहे. श्रीपाद ज्याप्रमाणे विष्णुरूपाने त्या गजेंद्राला, द्रौपदीला, अंबरीषाला प्राप्त झाले त्या द्विजाला स्वरूपात प्राप्त झाले— लभ म्हणजे प्राप्त होणे— त्याप्रमाणे मलाही आपली प्राप्ती व्हावी. कारण मीहि कामक्रोधादि ग्रसित आहे. चौथ्या दिगंबराचा अर्थ सांगताना आपण गुरुस्वरूप आहात, वासुदेवरूप आहात, दत्तरूप आहात, असे म्हटले आहे.

म्हणजे ही तीनही रूपे एकच आहेत-गुरु-वासुदेव आणि दत्त हे तीनही ब्रह्मस्वरूपच आहे. सर्वही अनुसंधान एक रुपाने या ठिकाणी केले आहे.

'वासुदेव' याचा अर्थही शास्त्रकारांनी केला आहे. 'वस' धातूचा अर्थ 'अच्छादन' असा आहे. सर्वही भूतांना काही दिसत नाही. आणि स्वतः तो प्रकाशमान आहे. झाकून जरी टाकलेल असल तरी आत्मरूप प्रकाशमान आहे. अशा हे वासुदेवा ! दत्तः त्वं ब्रह्म ! आपणे गुरुर्ब्रह्मा वसुदेवा दत्तात्रेय आहात सर्वही आपण ब्रह्मस्वरूपच आहात. याप्रमाणे मूळ ब्रह्मरूपाने अनुसंधान करून प्रार्थना केली आहे.

**"काम क्रोध ग्रसितं माम लभ"**

मला आपण प्राप्त व्हा कारण कामक्रोधांनी मी अगदी ग्रासलेलो आहे. या सर्व विकारांनी पीडलेलो आहे. म्हणून आपण मला प्राप्त व्हा आणि त्याचप्रमाणे लवकर मला आपल्याकडे न्या ! अशी शेवटी प्रार्थना केली आहे.

तर या मंत्रामध्ये 'दिगंबरा' अशी संबोधने तीन वेळा आलेली आहेत.

१ ल्या दिगंबरा संबोधनाने—साक्षीस्वरूप—शुद्ध अहम्—सर्वसाक्षी निर्विकार अहम्.

२ ऱ्या दिगंबरा संबोधनाने—सर्वव्यापी—सच्चिदानंद रूपी—गुरुवर—ज्याच्या अधिष्ठानावर विश्व भासत आहे.

३ ऱ्या दिगंबराने—ते आणि हे अहम् एकच आहे—त्याची प्राप्ती होण्याकरता मनातले सर्व विकार जाण्यासाठी.

४ थ्या दिगंबरा संबोधनाने— श्रीपादांनी म्हणजे लक्ष्मीयुक्त—शक्तीयुक्त परमेश्वर स्वरूप—सगुण रूपाची प्रार्थना करून मला लवकर आपल्या जवळच्या—मला आपले स्वरूप प्राप्त होऊ द्या—माझा देहभाव नाहिसा होऊ द्या अशी प्रार्थना आहे.

असा हा एक महामंत्र आहे. याचे सगुण–निर्गुण–व्यापक–अव्यापक अशा सर्व स्वरूपांचे ऐक्य कसे आहे. ते ऐक्य ज्ञान आपल्याला व्हावे आणि आपण कृतार्थ व्हावे अशी प्रार्थना शेवटी केली आहे. या आरतीच्या साहाय्याने या महामंत्राचे स्पष्टीकरण ही महाराजांनी या सांप्रदायात केले आहे.

"श्रीगुरुदेव दत्त !"

* * *



जो आत्मलाभासारिखे । गोमटे काहीच न देखे ।
म्हणोनि भोग विशेखे । हरिखेजेना ॥१९०॥

ऐसा बोधाचि केवळु । जो होवोनि असे निष्कळु ।
त्याहीवरी भजनशीळु । माझा ठायी ॥१९५॥

तरी तया ऐसे दुसरे । आम्हा पढियंते सोयिरे ।
नाही गा साचोकारे । तुझी आण ॥१९६॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १२

भगवंताने आपल्या श्रेष्ठ भक्ताचे वर्णन वर केले आहे. या वर्णनाचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराज यांचेमध्ये येतो.

**प्रवचनाचा संदर्भ–**

मार्च १९८४ मध्ये, माटुंगा (मुंबई) येथे झालेले प्रवचन. 'तो पूर्ण आनंद गुरु समर्थ' या प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती विरचित गुरुस्तुती स्तोत्रातील 'अखंड आत्मा अविनाशी दत्त' या एका श्लोकावरील प्रवचन.

**परमात्मतत्त्व व श्रीसद्गुरु माहात्म्य विशद करणारे विशेष प्रवचन.**

# प्रवचन तिसरे

# "तो पूर्ण आनंद गुरु समर्थ"

सद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी 'गुरुस्तोत्र' म्हणून एक स्तोत्र केलेले आहे. गाणगापूर क्षेत्रामध्ये त्याची रचना झाली आहे. त्यात त्यांनी शेवटी दिले आहे. "गाणगापूर क्षेत्री उदेले हे स्तोत्र हारी हरी आधी व्याधी कुधी" एक ब्राह्मण त्या ठिकाणी अनुष्ठान करीत असताना त्याला हे स्तोत्र करून दिलेले आहे. गुरुस्तुती याला म्हणतात. आठ श्लोकांपैकी आज एका श्लोकाचा विचार करावयाचा आहे.

**अखंड आत्मा अविनाशी दत्त ।**
**तया पदीं लाविती जे स्वचित्त ॥**
**वित्त-भ्रमा सोडिती ते कृतार्थ ।**
**तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ॥**

सद्गुरु दत्तात्रेय, श्रीपाद श्रीवल्लभ, नरसिंह सरस्वती स्वामी हे तिन्ही अवतार एकच आहेत. दत्तात्रेयांचे हे अवतार आहेत. हे सद्गुरु अवतार आहेत. ईश्वर अवतार निराळे आणि सद्गुरु अवतार निराळे. शंकराचार्य महाराज हे सद्गुरु स्वरूप अवतार आहेत. ईश्वर अवतार दैत्यांना शासन करण्याकरता झाले. गुरुस्वरूप अवतार हेही ईश्वरांचेच आहेत. अज्ञान् दूर करावयाचे आहे.

अन्तःकरण म्हणून जे काही तत्त्व ईश्वराने निर्माण केले आहे, त्याला मन किंवा बुद्धी असे म्हणतात. ती अवस्थाभेदाप्रमाणे नावे आहेत. प्राथमिक अवस्थेत निर्णय काही नाही त्याला 'मन' म्हणतात. संदेहात्मक बुद्धी आहे. पण निर्णयात्मक अवस्थेला बुद्धी म्हणतात. निर्णय चांगला वा वाईट कसाही असो, निश्चय झाला म्हणजे त्याला बुद्धी म्हणतात. काही तरी निश्चय आहे. बुद्धीने ठरविलेल्या मार्गापासून ते मागे सरत नाहीत. सद्बुद्धी, असत्बुद्धी हा वेगळा विचार आहे. पण निश्चय हे बुद्धीचे लक्षण आहे. आणि निश्चयात्मक बुद्धीचे सहाय्य घेऊन मनाचे चांचल्य दूर करावयाचे आहे, अमूक मार्गाने जावयाचे आहे, अमुक अनुष्ठान करावयाचे आहे ते बुद्धीचे स्वरूप आहे. संदिग्ध स्थिती मनाची असते. निर्णय होत नाही. बुद्धीच्या सहाय्याने निर्णय निश्चय होतो. याचा जास्तीतजास्त उपयोग करून घेता येईल.

मनोनाश यासाठी सांगितला आहे. चांचल्याचा नाश. चांचल्यातून अन्त:करण पुढे न्यावयाचे आहे. योगाचा उपदेश करतांना भगवंताने अर्जुनाला हेच सांगितले आहे. योग म्हणजे उपाय-साधन. हे साधन निश्चयाने केले पाहिजे. म्हणजे बुद्धीचे सहाय्य पाहिजे. साधनेच्या वेळेला एक निश्चय पाहिजे आणि मनामध्ये निराशा उपयोगी नाही. उत्साह कायम टिकला पाहिजे. ही दोन साधने, निश्चय आणि उत्साह योगाभ्यासाला आवश्यक, पोषक म्हणून भगवंतांनी सांगितली आहेत.

निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ ।। निश्चय असला की फळ मिळाले म्हणून समजायला हरकत नाही. "देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।।" नामदेवांचा असा निश्चय होता. देह राहिला तरी हरकत नाही आणि गेला तरी हरकत नाही. ही निश्चयात्मक बुद्धी त्यांना ईश्वरकृपेने मिळाली आहे. ईश्वराच्या दृढ भक्तीसाठी निश्चयात्मक बुद्धी हवी. निश्चय पाहिजे. पण चांगला पाहिजे.

ही स्थिती जेव्हां जीवाला प्राप्त होईल त्यावेळी साधक दशा मिळणार आहे. साधक दशेत संदिग्ध अवस्था चालत नाही. काही दिवस हे साधन करावे. पुन: त्याच्याबद्दल संशय यावा आणि दुसरे साधन करायला घ्यावे किंवा साधन करूच नये. अशी जर साधकाची स्थिती असेल तर साधना होणार कशी ? निश्चयात्मक बुद्धी असेल तर नि:संदिग्ध स्थिती राहून साधना होईल.

साधकात योग्यता निर्माण करायची आणि मग त्याच्याकडून साधनाभ्यास करून घ्यावयाचा हे कार्य सद्गुरु अवताराकडून सतत चालले आहे. सद्गुरूंची अनंत चरित्रे आहेत, अमर्याद शक्ति आहे. अमूक एका विशिष्ट देशामध्येच कार्य चालले आहे असे नाही. संपूर्ण विश्वामध्ये योग्यतेला पोचलेले भक्त असतील किंवा जे अधिकारी बनवता येणे शक्य आहे त्यांच्याकडे आधी लक्ष द्यायचे. तसे भक्त तर अनेक ठिकाणी असणार, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांचे प्रतिबंध दूर करणे, त्यांची वृत्ति निश्चय बनविणे ही कार्ये करण्याचे काम सर्व ठिकाणी चालू आहे, सर्वत्र ईश्वरशक्ति आहे म्हणून अशा अनेक जीवांच्या उद्धाराचे कार्य चालू आहे.

सद्गुरु कार्यात मनुष्य एवढेच जीव नाहीत. गजेंद्राचे आख्यान आपण ऐकतो. पुढच्या कोणत्याही जन्मात पहिल्या जन्माचे संस्कार राहू शकतात. मागच्या जन्मात अपूर्ण राहिलेला अभ्यास पुढच्या जन्मातही चालू रहातो. हा

बुद्धीचा निश्चय असला पाहिजे. ही अवस्था त्या राजाने भगवत् भक्ति करून मिळविली आहे. त्याचा योगाभ्यास झाला आणि ऋषीच्या काही शापामुळे त्या राजाला हत्तीचा जन्म आला. तरी त्याची भगवत् भक्ती कायम राहिली. बुद्धीचे हे वैशिष्टय आहे. हा खरा बुद्धीवाद आहे.

भक्तांना उत्कर्षाची साधने मिळवून द्यायची आणि मग इतर कार्ये त्यांचे-कडून करवून घ्यायची, हे गुरुशक्तीचे कार्य आहे. भगवंताला अर्जुनाच्या मनाची तयारी करावी लागली. गीताज्ञान तेवढ्यासाठीच आहे ना ?

तेव्हा महाराजांनी या स्तोत्रात दत्तात्रेयांचे वर्णन केले आहे. सद्गुरूंचे स्वरूप वर्णन करताना महाराज म्हणतात-ते पूर्ण रूप आहे. पूर्ण आनंदरूप आहे आणि समर्थ आहे. दत्तात्रयांचे सगुण रूप षट्भुज आहे, चतुर्भुज आहे, द्विभूज आहे. पण मुख्य रूप अखंड आहे. त्याच्यामध्ये काहीही भिन्नता नाही. अभिन्न अशाप्रकारचे जे स्वरुप आहे त्यालाच अखंड आत्मा म्हणतात. आणि ते अविनाशी आहे. त्याला विनाश नाही. सर्वत्र आणि सर्व कालात असणे म्हणजे अभिन्न व अविनाशी असणे, असे रूप ते आहे. हे आत्मस्वरूपाचे वर्णन आहे. परमात्मा कसा आहे? तर सर्वत्र व सदैव आहे. ईश्वराची उपासना करणाऱ्याला किती सुलभ नि गम्य आहे हे महाराजांनी दाखवून दिले आहे.

सर्व ठिकाणी असणाऱ्या ईश्वराची उपासना करणाऱ्याला काय कठीण आहे ? पण मनाची तयारी नाही ना ! ईश्वर सर्व ठिकाणी कसा असू शकेल ? असे शक्य तरी आहे का ? हा पहिला प्रतिबंध निर्माण झाला. सर्वत्र असणारा जगात कोणताही पदार्थ नाही. देशमर्यादा आणि काल मर्यादा आली. आपण पुढच्या जन्मात गेलो तरी त्या कालातही ईश्वर आहेच. उपासकाला उपासना मार्ग सोपा आहे हे पटवून देण्यासाठी हे वर्णन केले आहे. पण उपासकाला उपासनेत, साधनेत दोष दिसतो. असे कसे असू शकेल ? सर्वत्र असणारा जगात कोणताही पदार्थ नाही म्हणून ईश्वरही सर्वत्र असू शकणार नाही. हे आपण कसे ठरवायचे ?

म्हणून महाराज म्हणतात "तया पदीं लाविती स्वचित्त" आपल्याला जे मिळवावयाचे आहे, ते मिळावे अशी उपासना घडली पाहिजे. परमात्म स्वरूपाचे चिंतन अखंड घडले पाहिजे. पण त्याचे स्वरूप अखंड व अविनाशी आहे अशी

आपली वृत्ती निश्चित झाली पाहिजे. पण संदिग्ध अवस्था झाली, हे आहे किंवा नाही असे वाटले तर, निश्चयही उलट, नाही असाच होतो.

केवळ दृष्टांतावरून किंवा बाह्यस्वरूपावरून जर ईश्वराचे तत्त्वरूप आपण ठरवायला गेलो तर ठरवू शकणार नाही. एक तर संशयात पडावे लागेल नाही तर ईश्वर नाहीच या भ्रमात पडावे लागेल. ईश्वराचे स्वरूप निश्चित ठरल्याशिवाय त्याची उपासना कशीं होणार ? उपासनेला तर अस्तित्व पहिल्या प्रथम मान्य आहे. मग चिंतन तरी कसे करायचे ?

म्हणून सर्वत्र व सदैव असणारे जे आत्मरूप आहे. त्याच्या ठिकाणी निश्चयाने 'लाविती जे स्वचित' असे हे ईश्वर स्वरूप आहे याची चित्ताला जाणीव होणे म्हणजे तेथे चित्त स्थिर होणे. असा चित्ताला अभ्यास झाला म्हणजे अगोदर ईश्वराचे अस्तित्व पटले पाहिजे आणि त्या स्वरूपाचे ज्ञान आपल्याला करून ध्यावयाचा उत्साह व आशा निर्माण झाली पाहिजे.

चिंतनाची चित्ताला योग्यता येण्याकरता ईश्वराने सगुण साकार रूपे धारण केली आहेत. सगुण साकार म्हणजे मर्यादित स्वरूप आहे. मर्यादित स्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर होणे म्हणजे निश्चय होणे, संदेह जाणे. असे एकदा चित्त स्थिर झाले म्हणजे मग त्या चित्ताचा विकास जस जसा होत जाईल तस तसे ईश्वर सर्वत्र आहे हे ध्यान चिंतन करता येईल. चित्ताचा विकास व्हायला पाहिजे "वासुदेवः सर्वम्" हे पूर्ण सर्वरूप आहे. त्यात कमी जास्त पणा-भेद काहीही नाही. ही तिसरी अपरिच्छिन्नता सांगितली आहे.

अखंड पूर्ण स्वरूपाला पाहाण्याकरिता बुद्धीची योग्यता फार वाढली पाहिजे. मनाची अवस्था निघाली पाहिजे समर्थांनी 'मनोबोध' केला आहे. निश्चयात्मक बुद्धी झाली पाहिजे. मन बुद्धी रूप व्हावे आणि मग बुद्धीरूप झालेल्या मनाला हे सर्व करता येते. बुद्धी विकसित होऊ शकते. असे करता करता सर्वस्वरूप व एकरूप तोच आहे हे ज्ञान होते, 'जे जे भेटीले भूत ते ते मानिले भगवंत' हे जे ज्ञानेश्वर महाराज सांगतात ते नुसते लेखन नाही त्यांचे ! भगवंतांचे असे अखंड ध्यान घडणे आणि याच रूपाने दर्शन होणे हा साधना अभ्यास आहे. अशी द्वंद्वातीत अवस्था ग्रहण करणारी निश्चित बुद्धी बनविणे ही शेवटची अवस्था आहे.

असे ईश्वर दर्शन होण्यासाठी नामदेवांना देखील मानहानी पत्करावी लागली. कच्चे मडके म्हणून सर्व संतांनी ठरविले. नामदेवांने ही तक्रार पांडुरंगाकडे केली. पांडुरंग म्हणाले खरं आहे. नामदेवांनी विचारले "माझ्याशी तुम्ही नेहमी बोलणं चालणं करता, मी आणून दिलेले जेवण करता. साक्षात्कार झालाय मला तुमचा, आता राहिले काय ? तरी मी कच्चा कसा ?" पांडुरंग म्हणाले "तू समजतोस पांडुरंग फक्त राऊळातच आहे. सर्व ठिकाणी अजून तुला पांडुरंगाचे दर्शन व्हायचं आहे." म्हणून ते कच्चे म्हणाले. त्याकरिता ज्या महात्म्याची बुद्धी अशी विकसित झाली आहे. "वासुदेवः सर्वम्" हे ज्ञान ज्यांना झालेले आहे, अशा महात्म्याकडे, विसोबा खेचराकडे नामदेवाला पाठवून दिले.

हे पांडुरंगाचे स्वरूप आहे. एवढे सांगून नामदेवांच्या बुद्धिला निश्चितपणा आला नाही. विसोबांच्याकडे पाहिल्यावर नामदेव पुनः खालच्या भूमिकेवर आले. "हे गुरु ? शिवलिंगावर पाय ठेवून झोपणारे ! हे कसे गुरु असतील ? नामदेव पुन्हा संदेह अवस्थेत आले. त्यांनी विसोबांना विचारले. विसोबांनी सांगितले "म्हातारा झालोय मी. मला काही समजत नाही. जिथे देव नाहीत तिथे माझे पाय ठेव बाबा." पाय उचलताच सर्वत्र शिवलिंगेच दिसू लागली. नामदेवांना ! शिवलिंगावर पाय ठेवला म्हणजे चूक झाली हे कोणी ठरवायचे ? पायही तोच आहे, डोकही तोच आहे, दृष्यही तोच आहे. पहाणाराही तोच आहे सर्वच तो आहे. सर्वच ब्रह्म आहे. ही भावना ज्या महात्म्याची झाली आहे त्याने पाय ठेवले काय नि डोके ठेवले काय ? नामदेवांना सगुण साक्षात्काराचे फळ मिळून बुद्धी तत्क्षणीच विकसित झाली, पण तो निश्चय कायम टिकत नाही. त्यासाठी ईश्वराची, महात्म्यांची कृपा व्हावी लागते म्हणजे बुद्धीला पुनः कधी चांचल्य येत नाही.

दुर्योधनाने द्यूतात सर्व जिंकून घेतले. मुळातच चांगली बुद्धी नसल्याने, विजय मिळाल्याची संधी साधून, पांडवांची मानहानी करण्याचे त्याने ठरविले. त्यांच्या पत्नीची प्रतिष्ठा घालविण्याचे समाधान त्याला हवे होते. अशा बुद्धीला कोणीही सुधारु शकणार नाही. शेवटपर्यंत त्याची ती बुद्धी (दुर्बुद्धी) टिकली. अगदी मृत्यूच्या वेळेसही दुर्योधन म्हणाला "जा तुम्ही करा राज्य ! युद्धात मृत्यू आल्याने मी निश्चित स्वर्गाला जाणार आहे. शेवटपर्यंत तुम्हाला राज्य करू न

देण्याचे माझे ध्येय मी मिळविले आहे, बुद्धी निश्चयात्मक आहे– पण दुर्बुद्धी आहे ती!"

द्रौपदीला दु:शासनाने ओढून दरबारात आणले. भीष्माचार्य, द्रोणाचार्या-सारखे अतिरथी - महारथी वीर तिथे बसलेत. पण सगळे स्वस्थ बसलेत. राजाची संमती आहे असे समजून दुर्योधनाच्या आज्ञेने दु:शासनाने द्रौपदीचे वस्त्रहरण करायला सुरुवात केली. तिला कोणाचाही आता आधार नाही. अशा वेळी अनन्य भक्ति निर्माण होऊन ती श्रीकृष्णांना हाक मारते आहे. "गोविंद-द्वारका-नाथ! हे कौरव माझ्या अब्रूवर उठलेत, माझे रक्षण करा.'' हाक मारणाऱ्या द्रौपदीची बुद्धी निश्चित आहे. श्रीकृष्ण द्वारकेत आहेत-येथे ते कसे येणार? असे तिला वाटले असते तर तिने हाक मारली असती का? आणि इतक्या लांब त्यांना हाक पोचणार कशी? एका पाठीमागे एक संशय उत्पन्न होतात. आता काहीही उपाय नाही. माझा मृत्यूच जवळ आला आहे असे वाटून निराश झाली असती ती! परंतु भगवंताचे स्वरूप सर्वत्र आहे. त्याची शक्ती फार मोठी आहे, अशी तिला खात्री असल्यामुळे ती हाक मारते आहे. दुर्योधन - दु:शासनाला काहीही वाटले नाही! कृष्ण कुठे असणार? आला तरी काय करणार? असेच त्यांना वाटले. पण द्रौपदीच्या मनाची खात्री पटलेली आहे, की सर्वत्र भरून राहिलेला परमात्मा माझे संरक्षण करणार आहे. ईश्वराचे नुसते अस्तित्व मान्य करून भीति जात नाही. तिथे मान अपमान सर्व सोडावे लागते. अनन्यता यावी लागते तेव्हां अनुभव येतो.

द्वारकाधीश जसे तेथे आहेत तसे येथेही आहेत. भगवान दत्तात्रेय जसे गाणगापुरात आहेत तसे वाडीतही आहेत. स्मर्तृगामी त्यांना म्हणतात. देशपरिछिन्न रूप मानले तरी केवढी योगशक्ती आहे! स्मरण केल्याबरोबर त्या ठिकाणी हजर राहू शकतात. द्रौपदी भावासक्तीमध्ये मग्न आहे. निर्भय होऊन अखंड चिंतन चालले आहे. एक वस्त्र त्याने ओढतानाच दुसरे वस्त्र तेथे येत आहे. शेवटी तो दमून आपल्या जागेवर जाऊन बसला!

आता धृतराष्ट्राच्या मनावर परिणाम झाला. त्याने द्रौपदीला बोलावले व म्हणाला पाहिजे तो वर मागून घे. तिने मागितले की, पांडव दास्यातून मुक्त व्हावेत. त्यांची जिंकलेली शस्त्रे परत करा. बाकी आम्हाला काही नको. आम्ही कुठेही जाऊ, कुठेही राहू. कुठेही गेलो तरी परमेश्वर आमच्याबरोबर आहे. "आमचे राज्य

आम्हाला परत द्या," असा तोंडातून शब्दही तिने काढला नाही. एवढा बुद्धीचा निश्चितपणा तिचा होता. सर्व विश्वास परमेश्वरावर होता. द्रौपदीमुळे अशारितीने पांडव सुटले.

धृतराष्ट्राला ही चांगली बुद्धी त्यावेळेपुरती, प्रसंगापुरती मिळाली. ती पुनः परत गेली कारण ती निश्चयात्मक नव्हती. दुर्योधनादिक पुनः धृतराष्ट्राकडे येऊन आणखी एक डाव खेळण्याची परवानगी मागितली. ती धृतराष्ट्राने दिली. तो डाव शेवटचाच ठरला. याने पांडवांच्या नशीबी १२ वर्ष वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास आला. एक वर्ष अज्ञातवासाची अट इतकी भयंकर आहे की, अज्ञात-वासात पांडव उघडकीला आले की पुनः १२ वर्षे वनवास ! दुर्योधनाची दुर्बुद्धी शेवटपर्यंत तशीच आहे. पांडवांना आपण केव्हांही शोधून काढू असे त्याला वाटले. त्याप्रमाणे पांडवांच्या मागे सतत हेर होते. दुर्योधनाने त्याला मिळालेल्या निश्चयात्मक बुद्धीचा असा दुरुपयोग करून आपले भौतिक वैभव वाढविले.

ईश्वराने दिलेल्या बुद्धीचे संरक्षण करावयाचे आहे. मनाच्या अवस्थेत जायचे नाही. ही बुद्धी निश्चयात्मक ठेवायची आहे. ईश्वराला कालमर्यादा नाही ब्रह्मदेवाला कालमर्यादा आहे. चार हजार युगे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस. आणि चार हजार युगे म्हणजे एक रात्र आहे. अशी त्याची शंभर वर्षे आहेत. पैकी पन्नास झालीत पन्नास उरलीत. वैभव किती ? किती स्थिर आहे ! ज्ञानशक्ति केवढी ? पण त्यालाही शेवट आहे. ब्रह्मदेवाचे सुद्धा आयुष्य संपणार आहे ! परंतु ईश्वर मात्र कालातीत आहे. असे अनेक ब्रह्मदेव त्याच्या सृष्टीत होऊन गेलेले आहेत, होणार आहेत.

ही निस्सीम भावना, निश्चित बुद्धी द्रौपदीने अनेक जन्मांच्या पुण्यकर्माने मिळवलेली आहे. भक्तीने, सुकृताने आणि भगवत्कृपेने मिळालली आहे. म्हणून वनवासातही ती बुद्धी सांभाळून घेत आहे. विचलीत होत नाही. आपली बुद्धी सांभाळण्याकरता वनातही तिने स्वतः उपाशी राहून अन्नदान केले आहे. सत्कर्माने बुद्धी स्थिर रहाते. दुर्योधनाची बुद्धी कितीही भयंकर असली तरी ईश्वरीकृपा विलक्षण आहे ! धर्मराजाला यमधर्माचे दर्शन झालेले आहे. भगवती दुर्गादेवीचे दर्शन झालेले आहे.

वित्तभ्रम मोठा कठीण आहे. विद्या उपासनेलाही "दैववित्त" असे म्हणतात. सगुण असो किंवा अन्य कोणतीही उपासना असो, त्या उपासनेबद्दल

भ्रम निर्माण होतो. हा वित्ताचा म्हणजे साधनेचा, उपासनेचा भ्रम गेला पाहिजे. असा मुद्दाम महाराजांनी उल्लेख केलेला आहे. ईश्वराच्या स्वरूपाचे चित्तात अखंड चिंतन करणे, तो सर्व ठिकाणी आहे आणि सर्व कालात आहे हे चिंतन त्याच्या स्वरूपाचे आहे. म्हणजे कोणत्याही जन्मात मी गेलो तरी ईश्वर आहे. स्वर्ग-नरक इ. सर्व देशात तो आहे अशी भूमिका असूनही जर तो वित्तभ्रम निर्माण झाला तर साधक त्याच्या निश्चयापासून ढळतो. त्याला मिळालेली बुद्धीअवस्था जाते.

द्रव्याचा भ्रम आहे. मानुष्य द्रव्य तर प्रसिद्धच आहे. अनेक रुपांनी द्रव्य आहे–स्थावर–जंगम इ. सर्व द्रव्यच आहे. त्या द्रव्याबद्दलही अधिकाधिक मिळावं, मिळालेलं सुरक्षित रहावं, हे संपतच नाही. योग आणि क्षेम, मिळावं आणि टिकावं ! अप्राप्याची प्राप्ती व्हावी. प्राप्तीचे संरक्षण व्हावे. हा सगळा भ्रमच आहे, संरक्षण आम्ही करतो. अशीही एक भ्रांती आहे.

संतांच्या अन्त:करणामध्ये हा भ्रम नाही. संपूर्ण संसार याला आपण वित्त समजतो. हे एकत्र जमलेले मानुष वित्त आहे. याची उत्पत्ती कोणी केली ! नाश कोण करणार आहे, हे काही आपल्याला माहित नाही. जड असो. चेतन असो, जे काही आपले समजले गेले आहे, त्याची उत्पत्ती आपण केली नाही किंवा त्याचा नाशही आपण करू शकत नाही. पण संरक्षण मात्र आम्ही करतो हा एक भ्रम आहे. तो गेला पाहिजे. कड्या-कुलपात, इतर बंदोबरतात आम्ही धन सुरक्षित ठेवू शकतो हे खरे आहे का ? रोज वर्तमानपत्रात आपण बातम्या वाचतो. या बँकेतून त्या बँकेत पैसे ठेवायला नेताना मधल्यामध्ये पैसे जातात. उत्पत्ती आणि विनाश करणारी शक्ती वेगळीच आहे. एवढे आम्हाला ईश्वराचे अंशिक ज्ञान आहे. पूर्ण नाही, संरक्षण करणारा ईश्वरच आहे ही जर निश्चित बुद्धी झाली की मग सर्व संपले. मग भीति नाही. पण हे अर्धवट आहे. संरक्षणाचा अहंकार आम्ही आमच्यावर घेतल्यामुळे आम्हाला भ्रांती निर्माण होते. हा वित्तभ्रम गेला पाहिजे.

तुलसीदासजींच्या घराला म्हणे कड्या–कुलपे नसायची. त्यांचे दरवाजे नेहमी उघडेच ! देवांना उत्तम सुवर्णालंकार असायचे. चोरांना हे समजले. त्यांनी जाऊन देवाचे सगळे दागदागिने काढून घेतले. गाठोडी बांधली, आणि परत निघाले. पहातात तो दोन धनुर्धारी वाटेत बसलेले दिसले. चोरांना वाटले मागच्या दरवाजाने जाऊ. तिकडून जाताना तिकडेही वाटेत दोन धनुर्धारी बसलेले ! चोर

परत फिरले. तोपर्यंत पहाट झाली. तुलसीदासजी काकड आरतीसाठी उठले. त्या चोरांची वृत्ती बदलली. त्यांनी तुलसीदासांची क्षमा मागितली, तुलसीदासजी म्हणाले "तुम्हाला पाहिजे ते घेऊन जा." चोर म्हणाले वाटेत पहारेकरी आहेत. त्यामुळे आम्हाला घेऊन जाता येत नाही. "तुलसीदासजी म्हणाले "दरवाजे जेथे उघडे असतात तिथे पहारेकरी कसे असतील ? बरं कसे आहेत ते पहारेकरी ते तरी सांगा." 'तरुणौरूप संपन्नौ सुकुमारौ महाबलौ' हे वर्णन ऐकून तुलसीदासजी म्हणाले "केवढे भाग्य आहे तुमचे ! तुम्हाला देवाचे दर्शन झाले ! "तेव्हां ईश्वरशक्ती सर्वत्र रक्षण करणारी आहे हे तर्कदृष्ट्याही त्यांनी मांडले आहे. माता जरी बालकाचे पोषण करणारी असली तरी दुधाची उत्पत्ती कोणी केली ? "न मातुः पर दैवतम् " हे शास्त्रकारही मानतात. ती कितीही वंद्य असली तरी आपल्या पुत्रासाठी दुधाची उत्पत्ती करू शकत नाही.

तर गर्भापासून जी शक्ती जीवाचे रक्षण करते ती बाहेर आल्यानंतर नसते असे कसे म्हणता येईल ? ज्या ठिकाणी दुसरा कोणीही संरक्षण करू शकणार नाही, अशा ठिकाणी संरक्षण करण्याची ज्याची शक्ती आहे, तो बाहेर संरक्षण करू शकत नाही का ? तोच रक्षण करणारा आहे ही तुलसीदासांची पक्की धारणा आहे. संरक्षण करणारा आणि नाश करणारा एकच आहे, ही निश्चयात्मक बुद्धी असल्याने कोणत्याही परिस्थितीत त्यांना भीति वाटत नाही "ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान " यात म्हटल्याप्रमाणे त्यांना समाधानी अवस्था आलेली आहे, तर हा एक बाह्य वित्तभ्रम आहे.

साधनाकालामध्ये आपल्याकडून काही तरी साधना होत आहे त्याबद्दल. भ्रांती मनामध्यें उत्पन्न होते. माझ्या साधनेत मला असे असे अनुभव येतात. माझी अशी अशी प्रगती झाली. अशी माझी चांगली तयारी झाली आहे, असे विकल्प होतात. परंतु हाही भ्रम गेला पाहिजे. ईश्वराच्या उपासनेने खरे ईश्वर दर्शन होते. तो ईश्वर सर्वत्र आहे. सर्व कालात आहे. उत्पत्ती स्थिती आणि लय करणाराही तोच आहे. सर्व स्वरूपी तोच आहे. त्याच्या खऱ्या दर्शनाने कोणत्याही परिस्थितीत टिकेल असे समाधान मिळते. पण साधनाभ्यासाचेवेळी मात्र जर आपल्या मनात भ्रांती निर्माण झाली की मी मोठा उपासक आहे, माझी उपासना अशी चालू आहे. प्रगती आहे. तर ते बरोबर नाही. हा भ्रम आहे आणि तो गेला पाहिजे.

ईश्वराची साधना करणे हे आपले कर्तव्य आहे. कशी का घडेना-कमी घडेल, जास्ती घडेल, तिकडे लक्ष द्यावयाचे नाही. कारण आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांना, मनाला, बुद्धीला प्रेरणा देणारी एकच ईश्वरीशक्ती आहे. हे जर का पटले असेल तर, म्हणजेच निश्चित बुद्धी झाली असेल तर, साधन कमीजास्त चालले आहे, याचा विचार तरी कशाला करावयाचा ? साधकाचे स्वरूपही परमात्म स्वरुपाप्रमाणे अनादि अनंत आहे. "वासुदेवः सर्वम्" हे शेवटी कळावयाचे आहे. आरंभाला साधक दशा आहे. शेवटी सिद्धावस्था-परमात्म दशा आहे. पण साधकदशेत सुद्धा जर ईश्वरच सर्व आहे हे पटलेले असेल आणि तशी बुद्धी निश्चित झाली असेल तर, खरे ईश्वर दर्शन होऊ शकते आणि त्या ईश्वरदर्शनापर्यंत जो महात्मा गेलेला आहे तो ईश्वरापेक्षा भिन्न राहिलाच नाही. अहम् पूर्ण गेलेला आहे, 'तो पूर्ण आनंद गुरु समर्थ' ही त्याचीच अवस्था आहे. सर्वांचे हित करण्याकडे त्याचे लक्ष आहे. कारण तो समर्थ बनलेला आहे. स्थितप्रज्ञ अवस्था मिळालेली आहे. तिथून बुद्धी आता खाली येणारच नाही. सगळा मनोभाव गेला आहे. मनाने निर्माण केलेला द्वैतभाव निघून गेलेला आहे. ईश्वराने निर्माण केलेले द्वैत तितके बाधक नाही. आम्हीच मनाने द्वैत निर्माण करतो. पांच भौतिक शरीर एकच आहे. ईश्वराने निर्माण केलेले आहे. एकाच स्वरुपाच्या ठिकाणी प्रत्येकाने निरनिराळे रुप तयार केले आहे.

आईला वाटते ही माझी कन्या आहे. बंधूला वाटते ही माझी भगिनी आहे. पांच भौतिक ईश्वराचे स्वरुप एकच आहे. पतीला वाटते ही माझी पत्नी आहे. अशा तऱ्हेने मनाने निर्माण केलेले मनोमय द्वैत फार वेगळे आहे आणि त्या मनोमय द्वैताच्या पाठीमागे जाणारे मन हे तर जास्तीच वेगळं आहे. मनोनाश व्हावा लागतो म्हणतात. त्या मनाच्या सर्व अवस्था बंद होणं म्हणजे बुद्धीअवस्था प्राप्त होणं, स्थिरता येणं हे आहे. म्हणजे स्थितप्रज्ञ अवस्था मिळाली. त्याशिवाय दृढ–ज्ञान होत नाही. तशी बुद्धी आपल्याला मिळाली म्हणजे आपण कृतार्थ झालो, असे म्हणतात महाराज.

आपण मनाच्या अवस्थेमध्ये किती काळ असतो ? बुद्धीच्या अवस्थेत किती काळ असतो ? ईश्वराचे मूळ एकच असलेले रूप निरनिराळ्या रुपाने सर्व देशात सर्व कालात आहे. सर्व वस्तूस्वरूप तो आहे. अशा विविध रूपामध्ये आपले चित्त किती काल राहू शकते ? त्यावरून आपल्याला मिळालेल्या बुद्धीची

अवस्था किती टिकणारी आहे हे कळून येतं. कोणत्याही काळामध्ये जर मनाची ही अवस्था कायम राहिली तर तशी ठेवणारे, तशी मिळवणारे, तेच मागणारे आहेत— "बुद्धि दे रघुनायका" ही निश्चयात्मक बुद्धी आम्हाला द्या. भ्रांति आमच्या मनातली सगळी काढून टाका. आपल्या स्वरुपाबद्दल आमच्या मनाची वृत्ती करा. एवढेच मागणे आहे समर्थांचे !

तर यापैकी आपली मनोवृत्ती आहे की बुद्धिवृत्ती आहे हे आपले आपण तपासायचे. मनोवृत्तीमध्ये आपला काल किती जातो, बुद्धिवृत्तीमध्ये किती असतो. बुद्धीवृत्ती ईश्वरस्वरूपाबद्दल कशी असते ? बाह्य प्रपंचाबद्दल आपली निश्चयात्मक बुद्धि असू शकेल. असं वागायचं, तसं वागायचं, प्रयत्न करायचा. हे आपण करू शकतो. ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल, त्याच्या शक्तीबद्दल आपली निश्चयात्मक बुद्धी किती टिकते हे पाहिले पाहिजे. तशी प्रार्थना त्या ईश्वराजवळच करावयाची आहे. ती बुद्धी ईश्वराने आपणाला द्यावी. पण ईश्वराच्या कृपेने ही बुद्धी मिळ-ण्यासाठी पुष्कळ काळ जातो. हा अभ्यास किती तरी काळ चालतो. अशा प्रकारची किती तरी साधने जमवावी लागतात. भगवत्‌गीतेच्या तेराव्या अध्यायात ही साधने सांगितली आहेत. या वीस साधनांची प्राप्ती होऊन त्या साधनावस्थेत स्थिर रहाणं, त्या बुद्धीचा विकास करणं ही साधना आहे. हा सर्व साधनाभ्यास आपला मनोभाव कमी करून करायचा. बुद्धीवृत्तीने—निश्चयात्मक बुद्धीने करावयाचा. आपला प्रयत्न कितीसा पुरा पडणार ? पण निश्चयाने अभ्यास केला पाहिजे असे महाराज सांगतात.

ईश्वराची प्रार्थना त्याकरिताच आहे. अशा बुद्धीवृत्तीमध्ये ईश्वराने आपल्याला न्यावे, अशी तळमळ लागली म्हणजे निर्भयता प्राप्त होणार आहे. स्वर्गाचा राजा इंद्र त्यांच्यापासून ते राष्ट्रपती, पंतप्रधानापर्यंत सर्वांना भीति आहे. त्यांना किती भीति असते याची आपल्याला कल्पना आहे. भीति उत्पन्न झाली की उत्साह, आशा वगैरे सगळं निघून जाते आणि दौर्बल्य उत्पन्न झालं की, की सर्व संपलं ! आपण जर एवढ्या लोकांना मारलं तर नरकात जाऊ अशी अर्जुनाला भीति वाटू लागली. सामर्थ्य जवळ असूनही मला काही युद्ध करावयाचे नाही असे सांगून तो मोकळा झाला. परंतु त्याने मोकळेपणाने सांगितले, बाबा, माझ्या मनात भ्रम निर्माण झाला आहे. काही निर्णय घ्यायची माझी अवस्था राहिली नाही.

ही अहंकाररहित बुद्धी आहे. मनोभावामध्ये जर अर्जुनाचा अहंकार मिसळला असता तर केवढा अध:पात झाला असता? कौरव जाणार होतेच. कौरवांना शासन होणारच होतं! विश्वरूप दाखविल्यानंतर श्रीकृष्णाने त्याला बजावले आहे "तुला जायचंय का अर्जुना? जा, सर्व लोकांचा संहार करायचा संकल्प माझा कधीच झाला आहे, आणि तू निघून गेलास तरी हे कोणीही जिवंत राहाणार नाहीत. माझ्या संकल्पाप्रमाणे तुला वागायचं असेल तर कर. तुझ्या दयेचा काहीही उपयोग नाही."

एक शक्ति विलक्षण आहे हे त्यानं पाहिलं आणि मग त्याचा मोह गेला. मनोभावातच तो गुंतलेला होता. हे चांगलं ते वाईट हे त्याने आपल्या मनानेच ठरवून टाकल होतं! पण केवळ अहंकारातून मोकळा होता म्हणून वाचला तो! हे सद्गुरूंचे कार्य आहे. सगळ्यांचा संहार होणार आहे. तू युद्धातून गेलास काय किंवा राहिलास काय, तरी हे कोणी जिवंत राहणार नाहीत. "पण त्याची बुद्धी सुधारावयाची आहे. त्याच्या बुद्धीची स्थिरता करावयाची आहे. त्याचा मोह दूर करावयाचा आहे. इतकी त्या सद्गुरु स्वरूपाच्या ठिकाणी दया आहे. अर्जुन सुद्धा मोठा महात्मा आहे. सद्गुरुरूपाने मार्गदर्शन करून त्याचा मोह दूर केलेला आहे. शेवटी अर्जुनाने कबूल केले की "तुम्ही होतात म्हणून मला माझ्या कर्तव्याची जाणीव झाली. माझा निश्चय मला कळला आहे. निश्चयात्मक भूमिका मला मिळाली आहे. संदेहात्मक माझा मनोभाव गेला आहे. चांगलं–वाईट हिंसा-अहिंसा याचा विचार करायचा माझा अधिकार नाही, तुमची आज्ञा आहे. मी तयार आहे."

अर्जुनाला झालेला मोह दूर करून त्याच्या बुद्धीला जेव्हां निश्चयात्मक अवस्था प्राप्त करून दिलेली संजयने पाहिली त्यावेळी तो धृतराष्ट्राचा मंत्री असुनही त्याने निर्णय दिला आहे–

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः। तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

तुम्हाला विजय मिळणार नाही हे त्याच्याच मंत्र्याने सांगितले. तर असा एक अभ्यास झाला पाहिजे. मनामध्ये दृढ विश्वास निर्माण झाला पाहिजे. चिंतन अखंड झालं पाहिजे. त्याची प्रार्थना अखंड झाली पाहिजे. आपल्याला जर फळ पाहिजे असेल तर किती दिवस प्रार्थना करायची याचा विचार कशाला करायचा? साधना करीत राहायचे! " अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त "



**तयाचिया गुणांची लेणी । लेवूं आपुलिये वाणी ।**
**तयाचि कीर्ति श्रवणी । आम्ही लेऊ ॥२२२॥**

**तो पहावा हे डोहळे । म्हणूनी अचक्षुसी मज डोळे ।**
**हातीचेनि लीला कमळें । पुजूं तयाते ॥२२३॥**

**दोवरी दोनी । भुजा आलो घेऊनी ।**
**आलिंगावया लागूनी । तयाचे अंग ॥२२४॥**

**ज्ञानेश्वरी, अध्याय १२**

हे भगवंताने आपल्या प्रिय भक्ताबद्दल आपणास काय वाटते व त्याच्यासाठी आपण काय करतो हे वरील ओव्यातून सांगितले आहे. प. पू. श्रीदत्तमहाराज हे भगवंताचे प्रियभक्त आहेत हे म्हणणे म्हणजे ते त्यापासून विभक्त नाहीत असेच आहे.

## प्रवचनाचा संदर्भ–

एप्रिल १९८१ मध्ये हरेश्वर येथे झालेले हे "रसज्ञावशा" या स्तोत्रावरील प्रवचन आहे. 'हे दयार्द्रचित्त दत्तप्रभो माझ्या अपराधांची क्षमा कर.' ही या स्तोत्रातील प्रार्थना आहे.

उत्तम भाव परिपोष करणारे हे स्तोत्र आहे आणि हे प्रवचनही तसेच आहे.

# प्रवचन चौथे

# हे क्लिन्नचित्त प्रभो ! क्षमस्व अपराधम् !!

प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी केलेले हे स्तोत्र आहे. 'द्विसाहस्री' गुरूचरित्र ग्रंथाच्या प्रारंभी आलेले आहे. ते स्तोत्रादिसंग्रहात घेतले आहे. आणि नित्योपासनेत त्याचा अंतर्भाव केला आहे. फार चांगले भावपूर्ण स्तोत्र आहे.

**रसज्ञावशा तारकं स्वादु लभ्यम् ।**
**गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।**
**क्षमस्वापराधम्-क्षमस्वापराधम्-क्षमस्वापराधम्- प्रभोक्लिन्नचित्त ॥१॥**

ईश्वराजवळ या स्तोत्रात अपराधांची क्षमा मागितली आहे. अपराध कोणता तोही सांगितला आहे. हे दत्त प्रभो ! मी तुझे नाव कधीही घेतले नाही. मला तुझे सतत विस्मरणच झाले आहे. हाच माझा सर्वांत मोठा अपराध आहे. आपलं नाव तारक आहे. उद्धार करणारं आहे. माझेकडून नामस्मरण जर झालं असत तर त्याच्या योगाने मी सर्व दुःखातून सुटलो असतो. पण तसे घडले नाही. हे दत्तात्रेया ! आपलं नाव 'स्वादु' म्हणजे अत्यंत मधूर आहे. समाधान देणारे आहे. 'रसज्ञावशा' म्हणजे माझ्या ताब्यात जीभ आहे. मी वाटेल ते बोलू शकतो. पण आपलं नाव तेवढं घेऊ शकत नाही. हा अपराध झाला आहे. वाणीही माझ्या ताब्यात आहे. वाणीने पुष्कळ बोलणे होते. पण ईश्वराचे नाव तेवढे घेतले जात नाही. हा फार मोठा अपराध माझ्याकडून झालेला आहे. याची आपण क्षमा करावी. 'क्षमस्वापराधम्' ! हे दत्तात्रेया ! आपण 'क्लिन्नचित्त' म्हणजे अत्यंत दयाळू अहात. आपले अन्तःकरण दयेने भरलेले आहे. म्हणून या अपराधाची आपण क्षमा करावी.

या पहिल्या श्लोकात ईश्वराच्या नावाचे माहात्म्य सांगून असे 'तारक' आणि 'स्वादु' नाव मी घेतले नाही. आपले कधीच नामस्मरण केलेले नाही. असा उल्लेख केलेला आहे. आता, पुढच्या श्लोकांत ईश्वराचे नाव केव्हां केव्हां घेता आले नाही व कां घेता आले नाही ते सांगून या अपराधाची पुनः पुनः क्षमा मागितली आहे.

**वियोन्यन्तरे दैव दार्ढ्याद्विभो प्राग्गृहीतं**
**कदाचिन्न ते नामदत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥२॥**

हे दत्तप्रभो ! तुझे नाव या जन्मात केव्हांही घेतले नाही. या पूर्वीच्या जन्मात, मी दुसऱ्या योनीत गेलो होतो, तेव्हांही माझ्याकडून नामस्मरण झाले नाही. दैव इतके बलवत्तर आहे की, ईश्वराचे नाव घ्यावे म्हणजे आपला उद्धार होईल, अशी त्यावेळेस कल्पनाही आली नाही. त्या अज्ञान योनीत असताना, असे कधीही वाटले नाही. पण, तेंव्हां नामस्मरण घडले नाही. ही सबब सांगण्याचे कारण तरी काय ? माझे दैव तरी कोणी तयार केले ? मीच ना ? म्हणून हा अपराध माझाच आहे. प्रभू ! त्या अपराधाची मला क्षमा करावी.

**मया मातृगर्भस्थितिप्राप्तकष्टाद् गृहीतं**
**कदाचिन्न ते नामदत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥३॥**

मी गर्भवासात असताना मला फार कष्ट झाले. पण त्या अवस्थेची सध्या जाणीव नसल्यामुळे त्या कष्टांची कल्पना येत नाही. गर्भवासासारखे दुसरे दुःख नाही असे म्हणतात. पण त्यावेळीही माझ्याकडून नामस्मरण घडले नाही. त्यावेळी कष्टामुळे तरी नाव घ्यायला पाहिजे होते. कारणे असतील त्याची, पण तो अपराधच आहे. वेदनेमुळे, दुःखामुळे नाही झाले म्हणून म्हटले तरी दुःखात ईश्वराचे स्मरण करणारे भक्त आहेत म्हणून ही सबब बरोबर नाही. तो अपराधच घडला आहे यात शंका नाही. तर तू या अपराधाची क्षमा असावी.

**मया जात मात्रेण संमोहितेनं गृहीतं**
**कदाचिन्न ते नाम दत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ।४॥**

जन्माला आल्यानंतर मी मोहात पडलो. गर्भामध्ये असताना जीव ईश्वराची स्तुती करतो म्हणतात. अतिशय वेदना झाल्यावर विस्मरणही होते. पण जन्माला आल्यानंतर मोहात पडल्याने सगळे ज्ञान गेले ! त्यामुळे ईश्वराचे नामस्मरण घडले नाही. हा जन्माला आल्यानंतरचा अपराध आहे. पूर्वीच्या जन्मी ज्यांनी चांगली ईश्वराची भक्ती केलेली असते. अशा ज्ञानी जीवांना जन्माला आल्यावरही विस्मरण घडत नाही. पण मी तितका भाग्यवान नसल्याने इतर सामान्य लोकांप्रमाणे मी मोहात पडलो आणि विस्मरण घडले. तरी या अपराधाची क्षमा असावी.

**मया क्रीडनासक्त चित्तेन बाल्ये गृहीतं**
**कदाचिन्न ते नाम दत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥५॥**

बाल्यावस्थेत खेळातच माझे मन आसक्त झाल्याने नामस्मरण कोठून

घडणार ? प्रल्हाद-ध्रुवा सारखे एखादेच असतात. लहान वयात सुद्धा बालक्रीडा करण्याकडे त्यांचे लक्ष नाही. लहानपणापासूनच 'ईश्वराची भक्ती करा.' असे प्रल्हादजींचे सांगणे असे. त्यांनी आपल्या सवंगड्यांना, भगवंताच्या नामाचे माहात्म्य, आत्मानात्मविचार, समजावून सांगितला आणि त्याही मुलांना तो पटला. ती मुलेही नामस्मरण करू लागली. मला मात्र खेळाच्या आसक्तीने बालवयात नामस्मरण घडले नाही. या अपराधाची आपण क्षमा करावी.

**मया यौवनेऽ ज्ञानतो भोगतोषाद् गृहीतं**
**कदाचिन्न ते नाम दत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥६॥**

यौवनात तर विषयभोगाकडेच लक्ष गेलेले. विषयभोगाचाच आनंद मिळवावा असे वाटून, त्या आनंदात अज्ञानाने सापडलो. त्यामुळे तारुण्यातही नामस्मरण घडले नाही. विषयभोग प्राप्तीसाठी द्रव्यार्जन केले पाहिजे. त्या द्रव्यार्जनात आयुष्य जाते. म्हणजे द्रव्यार्जन आणि विषयभोग यामध्ये संपूर्ण यौवन गुरफटल्यामुळे नामस्मरणाचे स्मरण राहिले नाही. तारुण्यातही ईश्वराची भक्ती करणारे भरतासारखे आहेत. त्याच्या आईने त्याला राज्य मिळवून दिले. पण भरत ते रामराज्य घेत नाहीत. कर्तव्य पालन म्हणून रामांना चौदा वर्षे वनात रहावे लागले आणि रामांच्या आज्ञेमुळे भरताला राज्य करावे लागले. हेही कर्तव्य पालनच आहे. पण भरताने अगदी ऐन तारुण्यात सर्व भोग सोडून दिले. ईश्वरनिष्ठा व ईश्वरप्रेम यामुळे भरताचा सर्व इंद्रियावर ताबा आहे. पण माझे यौवन अज्ञानाने विषयभोगात रमल्यामुळे मी आपले नांव घेतले नाही. हा अपराधच आहे. याबद्दल आपण दयाळू अन्तःकरणाने मला क्षमा करावी.

**मया स्थाविरेऽनिम्न सर्वेन्द्रियेण गृहीतं**
**कदाचिन्न ते नाम दत्त । क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥७॥**

'स्थाविर' म्हणजे वृद्धावस्था ! या वृद्ध अवस्थेत, म्हातारपणात, इंद्रियांची शक्ति गेलेली आहे. ती इंद्रिये ताब्यातही राहिली नाहीत. मानसिक शक्ति, शारीरिक शक्ति, सगळच कमी झालं ! जेव्हा या शक्ती होत्या तेव्हा नाम घेतले नाही आणि आता तर शक्तीच गेली. पूर्वी शक्ती असताना तशी तयारी करून ठेवली नाही. प्रल्हादजींच्या उपदेशाप्रमाणे बालपणापासूनच नामस्मरण करण्याचा अभ्यास केला असता तर वृद्धावस्थेतही ते घडले असते. पण पहिल्यापासूनच सगळं चुकलेलं आहे. म्हणून याबद्दल आपण क्षमा करावी.

**हृषिकेश मे वाङ्मनः कायजातम् ।**
**हरेऽ ज्ञानतो ज्ञानतो विश्वसाक्षिन् ॥ क्षमस्वापराधं-प्रभो क्लिन्नचित्त ॥८॥**

आतापर्यंत 'गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त' हाच अपराध पुढे मांडला होता. नामस्मरणाचे विस्मरण हा अपराध. हे ईश्वराचे स्मरण बाल्यावस्थेत नाही, तारुण्यावस्थेत नाही, वृद्धावस्थेत नाही, दुसऱ्या योनीत नाही, पशूपक्षांच्या जन्मात घेतलं नाही असे म्हटले होते.

आता या श्लोकामध्ये नामस्मरण न घडणे म्हणजे हा वाणीचा अपराध आहे ही कल्पना महाराज स्पष्ट करीत आहेत. हा अपराध वाणीने-मनाने-आणि शरीराने—या तिघांकडून झालेला आहे. हे अपराध बुद्धीपूर्वक (ज्ञानतः) घडलेले आहेत आणि अज्ञानतःही अपराध घडलेले आहेत. ते सगळे अपराध मी केलेले नाहीत असे म्हणून काही भागणार नाही. कारण आपण विश्वसाक्षी अहात. त्यामुळे सर्व अपराधांची नोंद आपल्याकडे आहे. आपले अपराध आपण कबूल करायचे आहेत. हे स्तोत्र अपराध कबूलीचेच आहे म्हणून पुनः पुनः क्षमाही मागितली आहे.

शिवाय त्यांनी देवाला 'हृषिकेश' म्हणून संबोधन केले आहे. 'हृषिक' म्हणजे 'इंद्रिय'. आपण हृषिकेश अहात म्हणजे शरीराच्या सर्व इंद्रियांचे स्वामी अहात. असे असताना माझे हातून अपराध घडले आहेत. म्हणजे महाराजांना असे सुचवायचे आहे की, हे दत्तप्रभू ! आपले जर माझेकडे लक्ष असते तर कदाचित् माझ्याकडून अपराध घडलेही नसते. तरीसुद्धां मी असेच म्हणेन की, माझ्या पूर्व दुष्कर्माने माझ्याकडूनच खरोखर हे अपराध घडले आहेत. माझी वाणी, मन आणि शरीर या तिघांकडून घडलेल्या अपराधाबद्दल आपण क्षमाच करावी.

**स्मृतो ध्यात आवाहितोऽस्यर्चितो वा**
**न गीतः स्तुतो वंदितो वा न जप्तः । क्षमस्वापराधं-प्रभो क्लिन्नचित्त ॥९॥**

आपले विस्मरण झाल्यामुळे कोणकोणते अपराध झालेत ते या श्लोकात सांगितले आहेत. मनाने स्मरण केलं नाही, ध्यान केलं नाही, आपले कधी साधे आवाहनही केलं नाही आणि अर्चनही (पूजा) घडले नाही. आपले गुणानुवादही मी गीतांच्या माध्यमातून वर्णन केले नाहीत. स्तुतीही केली नाही. वंदनही केले नाही. जप म्हणजे नामस्मरणही केले नाही. यापैकी काहीही माझ्याकडून घडले नाही.

बार्शीला जोगा परमानंद म्हणून मोठे भगवद्भक्त होऊन गेले. बार्शीच्या भगवंत मंदिराजवळ त्यांची समाधी आहे. त्यांचा एक नियम होता. रोज भगवंता-समोर उभे राहून भगवद्गीतेतला एक श्लोक म्हणायचा व एक साष्टांग नमस्कार घालायचा. असे रोज सातशे श्लोक आणि सातशे नमस्कार ते घालीत असत. कोणाकडे काहीही मागायचे नाही, अशी त्यांची वंदनभक्ती चालू होती. एकदा कोणी एकाने त्यांना नेसायला पितांबर दिला. ते नेसले आणि त्या दिवशी नमस्कार घालताना त्यांचे लक्ष पितांबराकडे सारखे जाऊ लागले. एवढा उत्तम पितांबर ! साष्टांग नमस्कार घालताना पितांबराला माती तर लागणार नाही ना ! असा विचार मनात आला आणि मन विचलीत झाले. त्यामुळे नमस्कार घालायला वेळ लागला, त्यांच्या लक्षात ही चूक आली. म्हणून त्यांनी स्वतःला शिक्षा करून घ्यायचे ठरविले.

सकाळची वेळ होती. एक शेतकरी बैल घेऊन शेतावर निघाला होता. जोगा परमानंदांनी त्या शेतकऱ्याला बोलावून सांगितले, "मी तुला हा पितांबर देतो पण माझे एक काम करायचे ! बैलाच्या दोरीला माझे पाय घट्ट बांध आणि बैलाला चाबुक मार." त्या शेतकऱ्याला पितांबर मिळणार म्हणून तो कबूल झाला. शेतकऱ्याला पितांबर मिळाला आणि त्या शेतकऱ्याने जोगा परमानंदांचे दोन्ही पाय बैलाच्या दोरीला घट्ट बांधून बैलाला चाबूक मारला. बैल उधळला. पळू लागला तसे जोगा परमानंद फरफटत गेले. सार शरीर रक्तबंबाळ झालं. देवाने त्यांना सोडवलं. शरीराने सुद्धा ते इतकी सेवा करीत होते. पितांबरासाठी शरीराने नमस्कारात कुचराई केली म्हणून अशी शिक्षा त्यांनी शरीराला दिली. देवासाठी इतकं करणारे भक्त आहेत म्हणून अशांची समाधी देवाजवळ बांधतात. लोक त्यांना वंदन करतात.

नरसोबावाडीला एक सेवेकरी होते. त्यांना पिशाच्च बाधा होती. ते रोज देवाला फुले आणून घालायचे. फुलासाठी ते रात्री बाहेर पडत. ५/१० मैलावरच्या आसपासच्या गावात जाऊन पुष्कळ फुले घेऊन यायचे. अंधार, काटेकुटे, पाऊस, कशाचा विचार नाही. आणलेल्या फुलांचे रात्रीच हार करायचे. देवाला हार घातले नि फुले वाहिली की त्यांना समाधान मिळायचे. दुसरे काही नाही. माधुकरी मागून आणायची, एकदा भोजन करायचे. कुणी दिला तर चहा वगैरे घ्यायचा अशी त्यांची भक्ती होती.

तेव्हा, हे दत्तात्रेया ! अशा तऱ्हेची माझ्या हातून कोणतीच भक्ती घडली नाही. हे मी प्रांजलपणे कबूल करतो. या स्तोत्रामध्ये सगळा पश्चात्ताप व्यक्त केला आहे. मनुष्य जन्माला आलेलो असल्याने अशी सेवा घडण्याचा योग असताना हातून अशी सेवा घडली नाही; याबद्दल मनाला अत्यंत व्यथा होत आहेत. याचा पश्चाताप होऊन क्षमा मागितली आहे.

**दयाब्धिर्भवाद्दङ्न सागाश्च माद्दग्**
**भवत्यात्तमंतोर्भवान्मे शरण्यः ।**
**यथालंबनं भूर्हि भूनिःसृतांघ्रेरिति**
**प्रार्थितं दत्त शिष्येण सारम् ॥१०॥**

शेवटी प्रार्थना करतात. हे दत्त प्रभो ! आपल्यासारखे दयासागर दुसरे कोणी नाही. आपल्याकडे दयेला काही कमी नाही. माझ्यावर जर आपण दया केलीत तर दया संपून जाईल असे नाही आणि माझ्यासारखा अपराधी कोणी नाही. मी दयेला पात्र आहे, असे या श्लोकात म्हटले आहे.

माझ्यासारख्या अपराध्याला आपणच संरक्षण देणारे आहात ! जमिनीवरून चालताना पाय घसरला तर त्याला जमिनीशिवाय दुसरा कोणाचा आधार आहे ? आपल्या आश्रयाने राहणारा मी या संसारात चुकलो तर मला आपल्या शिवाय दुसरा कोणाचा आधार आहे ? मी आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाकडे जाणार ? मला आपलाच आधार आहे. आपणच माझे सर्व काही आहात.

आपल्या अपराधाची जाणीव होऊन पश्चात्ताप झालेला आहे, म्हणून अत्यंत तळमळीने ही प्रार्थना केली आहे. ईश्वरानेच आमचे रक्षण करावयाचे आहे. आमचे रक्षण दुसरा कोणीही करू शकणार नाही. आम्हाला आमचे रक्षण करता आले असते तर असे अपराध घडलेच नसते. आमची सगळी इंद्रिये वाटेल तशी दुसरीकडे जाऊ शकतात. आम्ही त्यांना रोखून धरू शकत नाही. त्यांना हवे तिकडे जाऊन देतो. पण देवाचे वंदन-अर्चन इ. मात्र आमच्येकडून घडत नाही. आम्ही स्वतः आमचा उद्धार करू शकत नाही. आपण सर्वज्ञ आहात, हृषिकेश आहात आणि दयासागर आहात. म्हणून आपणच माझा उद्धार करावा अशी तळमळीने प्रार्थना आहे.

**"अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त"**

* * *



तया संगाचेनि सुखाडे । मज विदेहा देह धरणे घडे ।
किंबहुना आवडे । निरपमु ॥२२५॥

जे मी प्रीति करी । कां मनी शिरसा धरी ।
येवढी थोरी । जया स्थितीये ॥२२९॥

तया लागी मज रूपा येणे । तयाचेनि मज येथे असणे ।
तया लोण कीजे जीवप्राणे । ऐसा पढिये ॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १२

भगवंत भक्ताच्या परमभक्तीमुळे त्या भक्तरूपानेच देहधारण करीत असतो. परम भक्तीची ही स्थिती आहे. यामुळे भगवंत भक्ताभिमानी, भक्तवत्सल, भक्तरूपच असतो. हे स्वतः भगवंतच सांगत आहेत.

## प्रवचनाचा संदर्भ–

एप्रिल १९८१ मध्ये हरिहर येथील सप्ताहातील हे प्रवचन आहे. 'घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते या स्तोत्रातील 'पापं तापं' या एका श्लोकावर हे विवेचनात्मक प्रवचन आहे.

# प्रवचन पाचवे

# घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते -१

स्तोत्रामध्ये ईश्वराची स्तुति व ईश्वराला प्रार्थना असते. म्हणून स्तोत्रे ही नित्यपाठासाठी असतात. सद्गुरू श्रीवासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी भगवान दत्तात्रयांची स्तुती आणि प्रार्थना करण्यासाठी अनेक उत्तमोत्तम स्तोत्रे केली आहेत. अशा उत्तम स्तोत्रांपैकी हे एक स्तोत्र आहे.

सर्व जीवांनी देवाजवळ काय मागावे हे या स्तोत्रात सुचविले आहे. जीवांना त्याची आवश्यकता आहे. असेच हे मागणे आहे. ज्याच्याजवळ मागायचे त्याचीही योग्यता मोठीच आहे. आपल्याला जे मागावयाचे ते देणारा ईश्वरच आहे. म्हणून इतरांजवळ मागण्यापेक्षा ईश्वराजवळच मागावे. असे मागणे देवाजवळ मागावे असे महाराजांचे म्हणणे आहे.

सकामभक्ती आणि निष्कामभक्ती असे भक्तीचे प्रकार आहेत. प्रल्हादजी सारख्या निष्काम भक्ताला नृसिंहांनी पुष्कळ सांगितले. "काहीतरी वर मागून घे बाबा !" त्यावर प्रल्हादजी म्हणाले, "देवा ! मी अकाम आहे. काहीही न मागणारा मी भक्त आहे." देवांनी फारच आग्रह केल्यानंतर प्रल्हादजींनी "माझ्या मनात कोणतीच इच्छा उत्पन्न होऊ नये हा वर द्या !" असे शेवटी मागून घेतले. म्हणजे प्रल्हादजींची इतकी भूमिका तयार झाली होती. अभ्यास होता त्यांचा. प्रत्यक्ष बाप जीवावर उठलेला असतानासुद्धा त्यांनी देवाजवळ कधीही काही मागितले नाही. "मला वाचवा" असे प्रल्हादाने म्हटले असते तर देवाने वाचविले असते. पण काही न मागताच देवाने त्याला वाचविले. म्हणजे जीवनाबद्दल सुद्धा आसक्ती नाही, असे फार मोठे भक्त होते, प्रल्हादजी ! अशी भूमिका तयार व्हायला अनेक जन्मांचा अभ्यास पाहिजे, सदगुरुची कृपा पाहिजे. भगवंताची भक्ती घडण्याकरता या स्तोत्रात मागणे मागितले आहे.

**पापं तापं व्याधिमधिंच दैन्यं ।**
**भीतिं क्लेशं त्वं हराऽशु त्वदन्यम् ॥**
**त्रातारं तो वीक्ष ईशास्त जूर्तं ।**
**घोरात्कष्टादुद्धरा स्मान्नमस्ते ॥३॥**

हे सर्व आपण दूर करा अशी प्रार्थना यामध्ये केली आहे.

पापं हर! सर्व दुःखांचे मूळ पाप आहे. जी जी दुःखे आपल्याला भोगावी लागतात. त्याचे कारण आपल्याकडूनच घडलेली पापे. दैवयोग म्हणतो आपण त्याला. सुख–दुःख दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ आपल्याकडून घडलेली पूर्व-कर्मे. दैव आणि प्रयत्न वेगळे आहेत असं नाही. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म असे म्हणतात. ते जे घडलेले कर्म आहे. पुण्य किंवा पाप, त्याचे फळ निश्चित मिळते. ईश्वरानेच त्या कर्माची शक्ती निर्माण केली आहे. किंवा कर्म करणाऱ्याच्या 'मी करतो' अशा अहंकारानेही कर्मात शक्ती निर्माण होते आहे. त्याचे फळ निश्चित आहे. तेव्हा दुःखाला कारण पाप आहे.

ताप म्हणजे दुःखच. अध्यात्मिक, अधिदैविक, अधिभौतिक असे तीन प्रकार त्या तापात-दुःखात आहेत. अध्यात्मिक दुःख म्हणजे शरीरामध्ये काही-तरी रोग उत्पन्न होणे, त्यामुळे निर्माण होणारी दुःखे मनाच्याविरुद्ध घडले तरी ते दुःखच आहे. ही दुःखे जायची असतील तर शरीरामध्ये काहीही रोग उत्पन्न होता कामा नये. पण असं तर प्रपंचात होत नाही. इंद्रासहित सर्वांना ही दुःखे-ताप आहेत. दैत्यांनी युद्ध करायचे, देवांचे राज्य काढून घ्यायचे, देवांनी निर्वासित म्हणून स्वर्गातून निघून जायचे. इत्यादी गोष्टी मनाच्याविरुद्ध घडतातच आहेत. शरीरामध्ये काहीच विकार उत्पन्न व्हायचा नाही म्हणजे अध्यात्मिक ताप (दुःख) नाही. पण शरीरामध्ये काहीही विकृती न होणे हे कसे शक्य आहे? कफ–वात –पित्त यांनी शरीराचे साम्य बिघडते. साम्य म्हणजे आरोग्य! आणि वैषम्य उत्पन्न झाले म्हणजे अनारोग्य! शरीर नेहमी आरोग्यसंपन्न राहिले म्हणजे रोगा-मुळे उत्पन्न होणारा ताप दूर होतो. पण हे शक्य नाही.

योगशास्त्रकारांनीसुद्धा ईश्वराची भक्ती करायला सांगितली आहे. योग म्हणजे प्रयत्न आहेत. प्रयत्नांनी सर्व काही मिळवता येते! अनेक सिद्धी त्यांनी सांगितल्या आहेत. मानसिक शक्तींचा विकास म्हणजे या सिद्धी आहेत. अभ्यासाने मानसिक शक्तींचा विकास करता येतो. पण त्यांना सुद्धा ईश्वराची उपासना आवश्यक आहे, असे त्यांनीच मान्य केले आहे. अभ्यास करून वज्रासारखे शरीर करणे, वगैरे सिद्धी मिळवता येतात. पण तो अभ्यास पूर्ण व्हावा लागतो. मध्येच विघ्ने येतात ती कशी दूर करणार? त्याकरिता ईश्वराची उपासना आवश्यक आहे. असे त्यांनीही मान्य केले आहे.

शरीरामध्ये विकृति उत्पन्न होणे, आळस निर्माण होणे, नैराश्य येणे, काय उपयोग आहे साधना करून असे वाटणे, एखादा दिवस साधना नाही केली तर काय होणार आहे, इत्यादि प्रतिबंध निर्माण होतात. त्यामुळे साधनाभ्यास नियमाने आणि दीर्घकाळ होत नाही. आणि अभ्यास नियमाने आणि निरंतर न झाल्याने मानसिक व शारीरिक आरोग्य राखता येत नाही. त्यामुळे ताप होतो. अध्यात्मिक दुःखे सर्वांनाच अपरिहार्य आहेत. ती दूर करावी अशी प्रार्थना प्रथम केली आहे. पाप-ताप-व्याधि-आधि इत्यादी सात दोष ईश्वरानेच दूर करावेत. कारण तो या दोषांपासून अलिप्त आहे. त्यामुळे या दोषांनी जर्जर झालेल्या जीवांचे दोष तो ईश्वरच दूर करतो. म्हणून ही प्रार्थना प्रथम केली आहे. आमच्या हातून जी काही पापे घडलेली आहेत, जे पूर्वीचे प्रतिबंधक दैव आहे, ते आपण नाहिसे करावे.

'आशु हर' लवकर सोडवा म्हणतात. कर्म तर होऊन गेलेले आहे. आता त्या पूर्वकर्माचे फळ भोगणे, कर्माचे फळ मिळायला सुरुवात झाली म्हणजे त्यावेळी काही त्याचे हरण होत नाही. फळ देऊनच कर्म मोकळे होणार. तुरुंगवासाची शिक्षा होण्यापूर्वी वकिलाने बचावाचा प्रयत्न केला तर अपराध्याला निर्दोषी ठरवता येऊ शकते. पण एकदा न्यायाधिशाने निर्णय दिला आणि त्याप्रमाणे तो तुरुंगात जाऊन शिक्षा भोगायला लागला म्हणजे मग काय करणार? शिक्षा संपल्यावरच बाहेर यायचे.

त्याप्रमाणे आता ताप सुरू झाला आहे. पण पूर्वीचे संचित कर्म भोगणे सुरू होण्यापूर्वी तरी ती आपण दूर करा. फळ देण्याची शक्ती ईश्वरानेच कर्मामध्ये निर्माण केलेली आहे. पूर्वीच्या पाप कर्मामुळे दुःख-ताप हा सुरू झालेला आहे. आता ते दुःखरूपी कर्माचे फळ नाहीसे करायचे म्हणजे ते भोगायचे, म्हणजे त्या कर्माची शक्तीच नाहिशी केल्यासारखे होणार आहे. पण या प्रार्थनेत महाराजांनी ईश्वराजवळ अशीही प्रार्थना केली आहे की, 'त्या प्रारब्धकर्माचीही शक्ती कमी करा.' संतांनी अशी प्रार्थना केलेली आहे- आणि विश्वासही दिला आहे.

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।**
**हरिकृपे त्याचा नाश आहे ॥**

हरिकृपेमध्ये अशी फार मोठी शक्ती आहे. पूर्वी केलेली कर्मेही नाहिशी

होऊ शकतात. की ज्याचा अजून फळाच्या दृष्टीने विचार व्हावयाचा आहे. आणि ज्या कर्माच्या फळाचा विचार झालेला आहे व त्याचे फळ भोगायला सुरुवातही झालेली आहे, तेही हरि कृपेने नाहीसे होते. त्याकरता तीही प्रार्थना केली आहे. ईश्वराची शक्ती अमर्याद आहे.

"व्याधिम्-आधिम्-च-दैन्यम्" ही सगळी पाप कर्मांची फळे आहेत. "तापम् हर" यात ताप म्हणजे पाप असाच अर्थ आहे. व्याधिम् म्हणजे रोग. व्याधीमुळे ताप होतो. हे प्रभो ! पाप कर्म भोगायला सुरुवात झाल्यानंतर ज्या व्याधी होतात त्याही दूर करा अशी प्रार्थना आहे.

'आधिम्' म्हणजे मानसिक व्यथा ! मनाविरुद्ध घडल्याने निर्माण होणारे क्लेशदायी विचार मानसिक व्यथा निर्माण करतात, मनाविरुद्ध घडल्यानंतर तेच विचार सारखे मनात येतात आणि त्यांचे मनात येणे आपण थांबवू शकत नाही. त्यामुळे होणारा मनस्ताप आपण सहन करू शकत नाही.

"दैन्यम्" म्हणजे दारिद्र्य ! आणि मनाची अत्यंत निराशाजनक अवस्था की ज्या अवस्थेत, आपल्या हातून चांगले काही घडत नाही, "माझ्या हातून काय घडणार ? नशीबच माझ्याविरुद्ध आहे." असे म्हणून मनुष्य निराश होतो. हे नैराश्यही दारिद्र्यच आहे. केवळ सांपत्तिक दारिद्र्य नव्हे.

ध्रुवासारखा प्रयत्नवादी काही निराश झाला नाही. आईने सांगितल्यावर लगेच त्याने वनाचा रस्ता धरला. इतक्या लहान वयात सुद्धा ! "काय नशीबच आमचं असं आहे ! राजेसाहेबांची आमच्यावर कृपाच नाही.' असं म्हणत तो बसला नाही ! नारदांनी त्याच्या मनाची परीक्षा पाहिली. ते म्हणाले, "तुला सिंहासनावर बसविण्यासाठी मी राजाला सांगतो." पण ध्रुव निश्चयाने म्हणाला, "नाही, मी आता येणार नाही. ईश्वराच्या कृपेने मला स्वतंत्र स्थान पाहिजे. म्हणून मी तप करण्यासाठी निघालो आहे."

तेव्हा ते नैराश्येचे मनोदैन्य उत्पन्न झाले तर व्यवहारही होत नाही. परमार्थही होत नाही. ते दैन्य मनातून दूर होऊन उत्साह निर्माण झाला पाहिजे.

"भीतिम्– क्लेशम्" ही सगळी पापाची फळे आहेत. भीति अनेक प्रकारची आहे. देवादिकांना सुद्धा भीति आहे. हातात सत्ता असतानाही, ती टिकेल की नाही ही भीति आहे. मग काय त्या

सत्तेचा उपयोग ? भीति असताना सुख कसे मिळणार ? इंद्रादि सर्वही जीवांना, सुख प्रत्यक्ष भोगत असतानाही जर, 'हे आपलं सुख जाणार तर नाही ना ?' असे वाटले की संपलच सगळं ! तर अशी कुठलीही भीति नसणे हे दैवी प्रकृतीचे, ईश्वरी कृपेचे लक्षण आहे. "भीतिम् हर" म्हणजे माझी मन:स्थिती निर्भय करा. भगवद्गीतेच्या सोळाव्या अध्यायात दैवी संपत्ती वर्णन केली आहे. त्यात "अभय" हे प्रथम वर्णन केले आहे. निर्भय असणं, आजारी असतांना, पैसा नसताना, इतर कोणतीहि अनुकूलता नसताना, निर्भयता असणे म्हणजे ते उत्तम सात्त्विक दैवी प्रकृतीचे लक्षण आहे. ते मागणे यात मागितले आहे.

क्लेश आणि ताप याचा अर्थ एकच आहे असे वाटते. पण तसे नाही. क्लेश शब्दाचा अर्थ योगशास्त्रात थोडा निराळा केला आहे. वेदांत शास्त्राप्रमाणे पुण्याला सुद्धा पाप असेच नाव आहे. पापाचे जसे बंधन होते. तसे पुण्याचेही बंधन होते. पूर्वीच्या पुण्यकर्माप्रमाणे सुख भोगण्याचे बंधन आहे आपल्याला. ध्रुवाने ४/५ महिने खडतर तपश्चर्या केली, आणि भगवंताच्या कृपेने त्याला सर्वोच्च स्थान मिळाले. नंतर त्याला पश्चात्ताप झाला. म्हणाला "मी काय मागीतलं ?' आता या सर्वोच्च स्थानात राहयचं म्हणजे इतर हेवा करणारच ! पुण्य असेल तोपर्यंत ईश्वराच्या कृपेने ते सुख भोगायला मिळेल म्हणा. पण द्वेष करणारी ही मंडळी असणार. त्यांचा विरोध झाला म्हणजे पुन: मनात शंका येणार, हे सुख टिकेल की नाही ?" असे हे जे प्रतिबंध असतात ते क्लेश असतात. या क्लेशांमुळे निर्भेळ सुख कसे मिळणार ? शिवाय याच्यामध्ये अर्थ तरी काय ? ते अक्षय टिकणारे कुठे आहे ? ध्रुव म्हणाला "अपमान तर धुवून निघाला ना !" बरं ! सर्वोच्च स्थान मिळालं ! पण त्यामुळे अहंकारही होण्याचा संभव आहे. इतरांपेक्षा मी मोठा असे वाटू लागणार ! म्हणजे ईश्वराकडे लक्ष कमी होणार ! ज्याच्या कृपेनें आपल्याला हे मिळाले त्याची आठवण राहील किंवा नाही हा पुन: एक प्रश्न आहेच. असे अनेक दोष ध्रुवाच्या लक्षात आले. त्याला पश्चात्तापही झाला. चुकलो म्हणाला. पण आता काही इलाज नाही. पुण्य केले आहे. फळही मागून घेतले आहे. आता ते भोगत राहिले पाहिजे.

म्हणून सकाम कर्म नको म्हणतात ते याच्यासाठी. पण आपली तशी भूमिका एकदम होत नाही. क्लेश म्हणजे मनात सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, द्वेष, अज्ञान ! हे सर्व दोषच आहेत, देह म्हणजे मी आहे, ही गैरसमजूत

करून बसलोत ना! भ्रांती आहे ती! त्यामुळे ही पुढची सर्व दुःखे निर्माण होतात. देहात्मवादाने सर्व ज्ञानी पंडितही ग्रासलेले आहेत. ते पांडित्य दाखवितात! पण मी देह आहे ही बुद्धी काही जाता जात नाही. मी काळा आहे, मी गोरा आहे, मी सुंदर आहे—असे—मी म्हणजे शरीर! तो शरीराला उद्देशूनच हे सर्व समजतो. असा हा देहात्मभाव बळावला की, इतर कोठेही लक्ष जात नाही! फार काय घरातल्या माणसाकडेही लक्ष जात नाही. तो फार मोठा अभिमान उत्पन्न होतो. मी मिळवणारा आहे. मी कुटुंब प्रमुख आहे. माझ्या आज्ञेत सर्वांनी राहिले पाहिजे. ज्यांचे पालन पोषण करतो त्यांचाही आपल्याला अभिमान आहे. त्यांनी जरा आपल्या मनाविरुद्ध केले की आपल्याला राग येतो. मग ईश्वर, संत बाजूलाच राहिले. हे स्वाभाविक क्लेश मानले आहेत. यामुळे सगळी कर्मे दोषी होतात. कर्तृत्त्वाभिमानरहित शुद्ध कर्म होत नाही. या सगळ्याला कारण, मी देह आहे ही भ्रांती! अज्ञान! देहापेक्षा मी निराळा आहे, मी अजरामर आहे, आत्मा अविनाशी आहे अशी सतत भावना पाहिजे. असे अनेक देह मी धारण केले आहेत. देहाचा आणि माझा संबंध काही काळापुरता आहे. अशी जर भावना असेल तर कोणी मान-सन्मान केला तर त्याच्याबद्दल मैत्री वाटणार नाही. कोणी निंदा केली तर त्याच्याबद्दल शत्रुत्त्व वाटणार नाही.

मुळामध्येच अविद्या—भ्रांती आहे. देहात्मवाद सुटत नाही. म्हणून अविद्येचा नाश होत नाही वा भ्रांती नष्ट होत नाही. भ्रांती आहे म्हणून भीति आहे. यालाच क्लेश मानले आहे. देहात्मवाद सुटल्या शिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही. आपल्या कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. देहात्मवादापुढे दैववादाला काही थारा नाही. आपण कर्म करायचं आणि आपण सुखी व्हायचं हा देहात्मवाद! आपण सुखी व्हायच म्हणजे देहाला सुखी करायचं.

पूर्वीच्या कर्मांचा, पाप पुण्याचा, नीति-अनीतीचा, कशाचा म्हणून विचार नाही का संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. या भावनेने भारलेले असल्या-मुळे न्याय—अन्याय काही पाहिले जात नाही. म्हणजे हवी तशी कर्मे होऊन जातात. एकाला असे कर्म करताना पाहून दुसराही काही विचार करीत नाही. तोही देहाच्याच सुखासाठी धडपडणारा असतो. तो तसेच कर्म करतो. एकाला जर या अशा वागण्याने सुख मिळते तर मग मीही तसेच का करू नये? अशा-

मुळे सामुदायिक दुरितें-पापे- तयार होतात. वैयक्तिक दुरितें तर आहेतच, त्यात आणखी सामुदायिक दुरितें तयार झाली की, त्याचा एकदम परिणाम होतो. सत्तर-हजार वस्तीचे हिरोशिमा शहर एक बॉम्ब पडल्यावर भस्मसात झालं की नाही ? सगळ्यांचे दुरित एकवटून आले. अशी दुरितें तयार झाली तर समाजात, राष्ट्रात व शेवटी विश्वात सुख शिल्लकच रहात नाही. म्हणून श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**" दुरितांचे तिमिर जावो "**

वैयक्तिक–सामुदायिक इत्यादि सर्वही दुरितांचा क्षय व्हायला पाहिजे. त्याशिवाय काही नाही. ही दुरितें–राग-द्वेष–मत्सर–शत्रुत्व इत्यादि दुर्गुणांमुळे घडतात. ते दुर्गुण नष्ट झाले पाहिजेत. त्याकरिता ईश्वराला प्रार्थना केली आहे.

मग बुद्धी शुद्ध व्हावी, निर्भय व्हावी म्हणून पुढची प्रार्थना केली आहे. ती अशी झाली म्हणजे प्रपंचकाय–परमार्थकाय सुखाचा होतो.

**त्वं हर आशु, त्वद् नो त्रातारम् नो वीक्ष**
**ईशात्सजुर्ते ॥ घोरात्कष्टात् उद्धरअस्मान् नमस्ते ॥**

पाप तापव्याधि इ. आपण लवकर दूर करा, आपल्या शिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. हे सर्व दूर करण्याची शक्ती आपल्या शिवाय कोणाच्यातच नाही. लौकिक जगातला-राष्ट्रपति, सेनापति, पंतप्रधान, इ. कोणीही सर्वोच्च पदाचा अधिकारी असला तरी, त्याच्याकडेही ही शक्ती नाही. चालू झालेलं दुःख दूर करणे हे डाक्टरला सुद्धा शक्य नाही. औषध देईल तो-पण-थांबावे लागेल त्याला ! रोग कोणता आहे हे जाणणे, औषधात कोणती शक्ती आहे हे जाणणे- हे ज्ञान डॉक्टरला आहे. पण त्यामुळे तो तात्काळ दुःख- वेदना दूर करू शकेल असे नाही.

श्रीगुरुचरित्रातल्या कथेत सांगितल्याप्रमाणे नुसत्या कृपादृष्टीने पाहिल्या-वरच राजाचा रोग तात्काळ बरा झाला. त्यापूर्वी केलेले सर्व मानवी उपाय, प्रयत्न असफल ठरले होते. अशा या शक्तीवर ज्यांचा विश्वास आहे, ज्यांना या शक्तीचा महिमा पटलेला आहे. ते म्हणतात आपण हे दुःख लवकर दूर करा. त्यांच्या मनाची खात्री आहे म्हणून ही प्रार्थना आहे.

भक्तांची सर्व दुःखे, पीडा दूर करण्याचे ईश्वराचे सामर्थ्य आहे म्हणून महराज म्हणतात.

**"घोरात्कष्टादुद्धारास्मान्नमस्ते"**

अशी ही भावना नम्रपणे, या प्रार्थनास्तोत्रात केली आहे. या एकाच जन्मात नव्हे तर अनेक जन्मांमध्ये या सर्व गोष्टी आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या आहेत. पशुच्या योनीत गेल्यावर चाबकाचे फटके खाल्ले तरी चालायचे ! कारण त्या वेळी काही जाणच नाही. हे दुःख आहे अशी सुद्धा कल्पना नाही. पण मनुष्य किंवा देव योनीत आल्यावर, विचारशक्ती प्राप्त झाल्यावर, हे सर्व अनंत जन्मांच्या कर्मांचे दुःख घालवणं आपल्याला शक्य नाही हे जाणवते. यज्ञयाग तीर्थयात्रा इत्यादीं सारखी पुण्यकर्मे करून पाप जातं. पण ती पुण्यकर्मे मध्येच बंद पडली तर ? काय करायचे ?

साधना सुरू झाल्यावर साधनेत जी विघ्ने येतात, त्यापासून सर्व बाजूंनी आमचे रक्षण करा अशी प्रार्थना केली आहे. त्यातूनही साधना झाली, तिचे फळ मिळाले तर मी हे केले असा अहंकार उत्पन्न होतो. ईश्वर बाजूलाच राहतो. पहिल्यापासून शेवटपर्यंत जीवाची बुद्धी निर्दोष ठेवणारा, फळ मिळाल्यानंतरही त्याचा अभिमान उत्पन्न होऊ न देणारा, हे दत्तात्रेया आपल्याशिवाय कोणीही नाहीं. खऱ्या भगवद्भक्तांनीच हे जाणले आहे. त्यांच्या जवळ हे ज्ञात आहे. भगवंताच्या शक्तीची जाणीव आहे. म्हणून त्यांना कधीही अहंकार उत्पन्न होत नाही.

**अहंकाराचा वारा न लागो । माझिया विष्णुदासा ॥**

नामदेवांनी ही प्रार्थना मुद्दाम केली आहे की, भाविक भक्तांना, अहंकाराचा वारा कधी लागू देऊ नका. नाहीतर अहंकारामुळे केलेली भक्ती, साधना फुकट जाते. अहंकारातून वासना निर्माण होतात. अहंकारच वासनेला पोसत असतो. व्यवहारात समजले जाणारे सत्तेचे–संपत्तीचे–कीर्तिचे–सन्मानाचे जे सुख समजले जाते ते तात्कालिक आहे. किंवा असे सुख असताना तशाच प्रकारचा अधिक सुख असलेला माणूस बघितला की पुनः वैषम्याचे दुःख आहेच. प्रांताचा मंत्री झाल्यावर केंद्राचा मंत्री कधी होईन अशी इच्छा असतेच. त्यासाठी पक्ष बदलायची सुद्धा तयारी असते. अशा सगळ्या वासना नाहिशा करणे आहे त्या परिस्थितीत सुख मानणे, मनशांत ठेवणे हे सर्व ईश्वराच्या कृपेने जमते.

या सर्व भावना लक्षात घेऊन महाराजांनी ही प्रार्थना केली आहे. पाचच श्लोक आहेत पण फार महत्त्वाचे श्लोक आहेत. रोज त्याचे पठण केले पाहिजे. यातल्या त्यात हा श्लोक फारच महत्त्वाचा आहे.

**" अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त "** ❋ ❋ ❋



जो निंदेते नेघे । स्तुति न श्लाघे ।
आकाशा न लगे । लेपु जैसा ॥२०७॥

तैसे निंदे आणि स्तुति । मानु करुनि एके पांती
विचरे प्राणवृत्ती । जनीं वनीं ॥२०८॥

साच लटिके दोन्हीं । बोलोनि न बोले जाहला मौनी ।
जे भोगिता उन्मनी । आरायेना[१] ॥२०९॥

([१]पुरे वाटत नाही)

ज्ञानेश्वरी, अध्याय १२

ज्ञानीभक्त हा द्वंद्वाच्या पलिकडे गेलेला असल्याने 'तुल्य-निंदास्तुतिर्मौनि' ही स्थिती जगून दाखवित असतो अशी भगवंतांनीच ग्वाही दिलेली आहे. याचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्यामध्ये येतो.

## प्रवचनाचा संदर्भ-

"धर्मे प्रीतिं सन्मतिं देव भक्तीं" या श्लोकावर जालना येथे, ऑगस्ट १९८४ मध्ये झालेले हे प्रवचन आहे. एकच विषय श्रोत्यांच्या दृष्टीने कसा मांडला जातो हे या प्रवचनावरून लक्षात येते आणि विषयाचे व्यापक व मार्मिक स्वरूप मनावर ठसते.

# प्रवचन सहावे

# घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते -२

**धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तीं । सत्संगाप्तिं दे हि भुक्तिंच मुक्तिम्**
**भावासक्तिं चाखिलाऽनंद मूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥५॥**

ईश्वराजवळ काय मागावे हे या श्लोकात महाराजांनी सुचविले आहे. ईश्वरच ते देऊ शकतो. यात 'धर्मे प्रीतिम् ' ही मागणी त्यांनी प्रथम मागितली आहे. धर्माबद्दल प्रेम असावे. आपला जो काही आचार विचार आहे तो प्रेमाने आपण केला पाहिजे. लोकांना दाखविण्याकरता किंवा लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून करायचा नाही.

धर्मराज धर्माचा आदर्श म्हणून प्रसिद्ध होते. धर्माचरणाचे फळ मिळो वा न मिळो पण जसे ईश्वराने सांगितले तसे वागायचे. बारा वर्षे वनात व एक वर्ष अज्ञातवासात रहायचं कबूल केलं त्यांनी. पराजय झाला होता त्यांचा. त्याप्रमाणे ते वनात रहायला गेले. आपण जे कबूल केले आहे ते सत्य आपण शेवटपर्यंत पाळले पाहिजे. असे धर्माबद्दल अत्यंत प्रेम मनात ठेवून धर्माचरण केले म्हणून ईश्वराची कृपा त्यांच्यावर झाली. श्रीकृष्णांनी सुद्धा पांडवांचा पक्ष घेण्याचे कारण हेच आहे. पांडव हे धर्मशील होते.

धर्मराजांची एक गोष्ट महाभारतात दिलेली आहे. धर्मराजांना तहान लागली म्हणून भीम पाणी आणायला गेला. मोठा तलाव होता. भीमाला पण तहान लागली होती. तो पाणी पिणार इतक्यात समोर एक मोठा धिप्पाड पुरुष आला. तो म्हणाला "हा तलाव माझा आहे. प्रथम माझ्या प्रश्नांची उत्तरे दे आणि मग पाणी पी." भीमाने त्याचे ऐकले नाही. भीम पाणी पिताच गतप्राण होऊन पडला. भीमाचा शोध घेत घेत अर्जुन-नकुल-सहदेव आले. त्यांचीही तीच अवस्था झाली. नंतर भावांना पहाण्यासाठी धर्मराज आले. त्यांनी पाहिले तो आपली चारही भांवडे मरून पडलेली. त्यांना वाईट वाटले. तो धिप्पाड पुरुष यक्ष होता तिथेच उभा होता. त्या यक्ष पुरुषाने काय झाले ते धर्मराजाला सांगितले व धर्मराजालाही तेच प्रश्न विचारले. चारही बंधू मरून पडले असतांनाही धर्मराजांनी मन शांत ठेवून सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. हे 'यक्षप्रश्न' म्हणून एक प्रकरणच महाभारतात आहे. ते यक्ष म्हणजे साक्षात्

यमदेवच होते. उत्तरे ऐकून समाधान झाल्यावर ते म्हणाले, "माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे तू बरोबर दिलीस म्हणून मी प्रसन्न झालो आहे. आता या चौघांपैकी कोणत्या तरी एका भावाला मी जिवंत करीन. कोणाला करू?"

धर्मराजांनी नकुलाला जिवंत करायला सांगितले. यमराज म्हणाले, "नकुलाचा काय उपयोग होणार तुला ? लहान मुलगा आहे तो. भीम किंवा अर्जुन जिवंत झाला तर तुझ्या उपयोगी पडेल. तुला पुढे राज्य मिळवायचं आहे. तर नकुलाला जिवंत करा असे कां म्हणतोस ?"

धर्मराज म्हणाला, "मला कुंती आणि माद्री अशा दोन माता आहेत. कुंतीचा मी मुलगा जिवंत आहे. त्याप्रमाणे माद्रीचा मुलगा नकुल जिवंत झाला तर तिला समाधान मिळेल. म्हणून त्याला जिवंत करा."

धर्माने वागावयाचे हा नियम आहे. कोणत्या भावाचा उपयोग होईल आणि कोणत्या भावाचा उपयोग होणार नाही हा व्यावहारिक विचार धर्मराजांनी न केल्याने यमदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी चौघांनाही जिवंत केले. धर्मराजांची अशी मोठी धर्मनिष्ठा होती. धर्माबद्दल अत्यंत प्रेम होतं त्यांचं ! म्हणून महाराजांनी देवाजवळ पहिलं 'धर्मे प्रीतिम्' हे मागणं मागितलं आहे.

त्याच्यानंतर सन्मति ! उत्तम बुद्धी पाहिजे. भीम, अर्जुन इ. भावंडांना कौरवांनी दिलेला त्रास पसंत नव्हता. कौरवांबरोबर युद्ध करून आपण राज्य घेऊ असे ते म्हणत. धर्मराज वावगे कधीही वागत नसत. ही धर्मबुद्धीही त्यांना ईश्वराच्याच कृपेने मिळालेली होती. बाकीचे पांडव म्हणत " काय उपयोग तुमच्या धर्माचरणाचा ? अधर्माने वागणारे कौरव राजे झाले. तुम्ही धर्माने वागून राज्य घालविले. तुम्हाला वनवास मिळाला. पण शेवटी धर्मराजांच्या धर्मबुद्धीचा सर्वांवर परिणाम झाला. ते धर्मराजाच्या इच्छेला मान देऊ लागले. 'सन्मति' हे देवाजवळ मागणे मागितले आहे. कारण, आपण प्रयत्न करून तशी 'सन्मति' होईलच असे नाही. ईश्वरकृपेनेच शुद्ध न्यायाने जाण्याची बुद्धी मिळते.

तिसरे म्हणजे 'देवभक्तिम् !' ईश्वराची भक्तीही ईश्वराजवळच मागितली आहे. आपल्या प्रयत्नाने भक्ती-प्रेम करू म्हटलं तरी होत नाही आणि झालंच तर त्याला व्यापारी स्वरूप येते. रावणाने, हिरण्यकश्यपूने तपश्चर्या केली. देव प्रसन्न झाले. वर दिला. परंतु देवांबद्दल भक्ती-प्रेम नसल्याने आपलं काम झाल्यावर

त्यांनी तपश्चर्या वगैरे सोडून दिली. आपल्या तपश्चर्येचेच फळ देवाने दिले. स्वतःचे असे काही दिले नाही, अशी त्यांची बुद्धी होती. ही खरी भक्ती नाही. व्यापारी व्यवहार झाला. त्यात प्रेम नसते. म्हणून ईश्वराजवळ त्याची भक्ती मागावी लागते. तरच उत्तम बुद्धी-प्रेम आणि भक्ती मिळते.

चौथी मागणी आहे. 'सत्संगातिम्' संतांची संगत घडावी. ज्यांच्याजवळ सद्बुद्धी आहे, धर्माचरण आहे, जे देवाची खरी भक्ती करतात, त्यांची संगती धरली की, आपोआप सर्व दैवी कृपा मिळते. ईश्वराच्या कृपेने सत्पुरुषांची संगती घडून येते. मार्गदर्शन होते आणि त्याप्रमाणे वागण्याची बुद्धी होते. म्हणून आम्हाला नेहमी सत्संग घडावा हे मागणं मागितलं आहे.

आणि शेवटी 'देहि भुक्तिं च मुक्तिम्' हेही मागितले आहे. भुक्ति म्हणजे संसार ! संसारही मागा म्हणाले. हरकत नाही, पण देवाजवळ मागा. मुक्ती तर हवीच आहे. सर्व दुःखांची निवृत्ती हाच मोक्ष आहे. हा मोक्ष मागायचा परंतु त्यापूर्वी आपलं मन जे विषयभोगाकडे जात असते, त्यासाठी विषयभोगही मागायला हरकत नाही. पण देवाजवळ मागा. अढळपद मिळविण्यासाठी ध्रुवाने उग्र तपश्चर्या करून ते पद प्राप्त करून घेतले आणि देवाच्या कृपेने त्यातून तो सुटलेला आहे.

आधी जरी संसारातील वासना उत्पन्न झाली आणि त्यासाठी देवाकडे मागणी केली तरी त्याच्या कृपेने ती पूर्ण होते आणि हळूहळू वासनाही कमी कमी होतात. हीसुद्धा ईश्वराचीच कृपा व्हावी म्हणून महाराजांनी मुद्दाम या स्तोत्रामध्ये मुक्ती हेही मागणे देवाजवळ मागून घेण्यास हरकत नाही असे सांगितले आहे.

मुक्ती तर मागून घ्यावयाची आहेच. ती ईश्वराशिवाय कोणीही देऊ शकत नाही. सर्वही दुःखे कायमची जाणे याला मोक्ष म्हणतात. आमची व्याधीरुपी दुःखं औषधाने जरी बरी झाली, तरी ती पुन्हा, कधीही होणार नाहीत असे सांगता येणार नाही. पुढे केव्हांही दुःख उत्पन्न न होणे याचे नाव मुक्ती आणि केव्हांही दुःख उत्पन्न होणार नाही असे हवे असेल तर, जन्म कायमचा बंद झाला पाहिजे. देहाचा संबंध सुटला पाहिजे. देह म्हटला की दुःखे आलीच ! बरं देहाचा संबंध सुटायचा म्हणजे कर्म संपली पाहिजेत.

आपल्या कर्माचं फळ म्हणून देहाचा संबंध, देहाचा संबंध म्हणून जन्म येतो! याकरिता सर्व पापपुण्यकर्मांचा ईश्वरकृपेने क्षय झाला म्हणजे जन्म-मृत्यू व दुःखं कायमची संपली. ही अवस्था अनेक जन्मानंतर मिळते.

अनेक जन्म साधना करून, ईश्वराची कृपा संपादन करावयाची आणि ईश्वराचे दर्शन, आत्मज्ञान झाले की, कर्मांचा क्षय होतो. पण तेही देवानेच घडवावयाचे आहे.

सर्वात शेवटी भावासक्तीम् मागणं मागितले आहे. भाव म्हणजे प्रेम, ते अधिकाधिक वाढत जावे हीही प्रार्थना केली आहे. पण 'भावासक्तिम्' म्हणून स्वतंत्र मागणं मागितलं त्यांनी श्रीगुरुचरित्रातल्या ४० व्या अध्यायात जी कथा सांगितली आहे, त्यात आपल्याला भावासक्तीचे दर्शन घडते. ही भावासक्तीसुद्धा त्याच्याच कृपेने मिळते. म्हणून या सातही गोष्टी ईश्वराने आपल्याला दान कराव्यात म्हणून ही प्रार्थना (स्तोत्र) केली आहे.

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

❋ ❋ ❋



परि माते परम करून । इथे अर्थी प्रेम धरून ।
हेचि सर्वस्व मानून । घेती जे पैं ॥२३३॥
पार्था गा जगी । तेचि भक्त तेचि योगि ।
उत्कंठा तयालागी । अखंड मज ॥२३४॥
ते तीर्थ ते क्षेत्र । जगी तेचि पवित्र ।
भक्तिकथेसी मैत्र । जयां पुरुषां ॥२३५॥
आम्ही तयाचे करू ध्यान । तो आमुचे देवतार्चन ।
ते वाचून आन । गोमटे नाही ॥२३६॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १२

भगवंताच्या ठिकाणी अनन्य भक्तीची स्थिती आली किंवा असली म्हणजे काय होते हे यामध्ये भगवंतच सांगत आहेत. असा भक्त योगी असतो. पुढे तर असा योगी हा संन्यासीच असतो असे सांगितले आहे. या अवस्थेतील भक्त-योगी-संन्यासी हे भगवंताचे देवतार्चन असते. यांना भेटण्याची उत्कंठा भगवंताला असते. या स्थितीचा प्रत्यय प. पू. श्रीदत्तमहाराजांमध्ये येतो. परंतु प्रत्ययासाठी पात्रतेची गरज असते.

## प्रवचनाचा संदर्भ–

प. पू. श्रीरंगावधूतमहाराजांच्या नारेश्वरस्थानी मार्च १९८५ मध्ये झालेले हे प्रवचन आहे. प्रवचनाचा विषय–"धर्मे-प्रीतिम् सन्मतिं देवभक्तीं" या श्लोकावर विवेचन.

"श्रीपाद-श्रीवल्लभत्वं सदैव" हे अत्यंत महत्त्वाचे सिद्ध स्तोत्र असल्याने यावरील प्रवचने ही तितकीच महत्त्वाची आहेत.

# प्रवचन सातवे

# घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते – ३

**धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं । सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ॥**
**भावासक्तिं चाखिला नंदमूर्ते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ॥५॥**

मागील प्रवचनात आपण याच स्तोत्रातील एका श्लोकाचा विचार केला. त्यात आपण असे पाहिले की, क्लेश जीवाला नको असले तरी त्यांचा त्याग जीव काही करु शकत नाही. जीवाला ते भोगावे लागतात. म्हणून सदगुरूमहाराजांनी देवाजवळच मागितले आहे की, "त्वं हर आशु" म्हणजे "लवकर या क्लेशातून मुक्त करा." "त्वदम् नो त्रातारम् वीक्षे" म्हणजे आपल्याशिवाय जीवांचा त्राता संरक्षक दुसरा कोणीही दिसत नाही. ईश्वराशिवाय दुसरा कोणीही त्राता नाही. आपणच सर्वेश्वर आहात. सर्व नियामक आपणच आहात. आणि भक्तांच्या सर्वही पीडा आपण दूर करता आहात केलेल्या आहेत. म्हणून आपल्याशिवाय कोणीही त्राता नाही. याकरता सर्व हेय दुःखाचा परिहार आपण करावा ही प्रार्थना केली आहे.

आता उपोदय म्हणजे दोषांचा परिहार करून गुणांचा संग्रह करावयाचा हा बुद्धीचा संस्कार देवाजवळ मागितला आहे. जे जे दोष आहेत ते सर्वही गेले पाहिजेत आणि गुणांचा संग्रह झाला पाहिजे. प्रथम पाप तापादि क्लेशमुक्त, दोषमुक्त करण्याची प्रार्थना केली. आता या शेवटच्या श्लोकात विशेष गुणांची मागणी केली आहे. प्रार्थना केली आहे.

'धर्मे प्रीतिं' हे एक प्रथम उपादेय आहे. मनात धर्माबद्दल अत्यंत प्रेम उत्पन्न व्हावे, प्रेमपूर्वक धर्माचे आचरण व्हावे म्हणजे त्याचे फळ शुद्ध बुद्धीरूपाने मिळेल. 'सन्मतिम्' या शब्दाने दुसरे उपादेय मागितले आहे. धर्म प्रेम आणि सन्मति. धर्म प्रेम ही सन्मतिच आहे. तरीसुद्धा बुद्धीचे जे शुद्धीकरण चालू आहे ते आरंभाचे आहे. बुद्धी जास्तीतजास्त आणखी चांगली होत जावी म्हणून 'सन्मतिम्' हे उपादेय मागितले आहे.

त्याचप्रमाणे 'देवभक्तिं देहि' अन्तःकरणामध्ये ईश्वरभक्ती उत्पन्न व्हावी हे मागणे देवाकडेच मागावे लागते. जीवाच्या प्रयत्नाने हे साध्य होत नाही.

धर्मे प्रीतिम्-सन्मतिम् आणि देवभक्तिम् हे उत्पन्न होण्यासाठी 'सत्संगाप्तिम्'

पाहिजे. संतांची संगती आम्हाला मिळावी. संत हे व्यक्त अवस्थेमध्ये असेपर्यंत ज्यांना संगती झाली त्यांना त्यांच्या सुकृतानुसार वरील सर्व उपादेय वस्तूंचा लाभ होतो. पण कदाचित् संत अव्यक्त अवस्थेमध्ये असले तरी सुद्धा त्यांच्या तपाचा असा प्रभाव आहे की, त्यांचं स्थानही अत्यंत पवित्र होते. ते स्थानच संत स्वरूप होऊन जाते. त्यामुळे त्या स्थानाच्या दर्शनाने, त्या स्थानात निवास करण्याने, तशा श्रद्धेने या सर्वही उपादेय वस्तूंचा लाभ होतो. म्हणून सत्संगाप्तिम् देहि असं मागणे मुद्दाम मागितले आहे.

तसेच 'भुक्तिं च मुक्तिं च देहि' हेही मागितले आहे. म्हणजे भोग आणि संसारही मागितला आहे. कारण 'संसार दूर करा' असे देवाजवळ मागायचे म्हणजे तितका अधिकार पाहिजे. संसार नको असे अपाततः म्हटले जाते. परंतु संसार सोडायची खरी इच्छा अन्तःकरणामध्ये उत्पन्न होत नाही. रजकाला श्रीपादांच्या जवळ राहून श्रीपादांची संगती घडलेली आहे. पण कुठ-पर्यंत ? यवनराजाचे ऐश्वर्य पाहिले नाही तोपर्यंत ! श्रीपादवल्लभांची संगती असावी असे त्याला वाटत होते. परंतु यवनराजाचे ऐश्वर्य पाहून अन्तःकरणामध्ये असणाऱ्या वासना प्रबल झालेल्या आहेत आणि श्रीपादवल्लभांच्या सान्निध्यांत असतांनासुद्धा त्या यवनाच्या वैभवाचे चिंतन चालू आहे.

भोग नुसत्या तपाने मिळेल. नाही असे नाही. परंतु तपाने मिळालेल्या भोगाने अहंकारही उत्पन्न होतो. त्यापेक्षा देवाजवळच मागावे असे महाराज म्हणतात. जे हवे वाटते ते देवाजवळ मागून घ्या. भोग हाही उपादेय आहे. अर्थात कोणता भोग उपादेय आहे ? ईश्वराजवळ मागून घेतलेला भोग उपादेय आहे. कारण देवाजवळ शुद्ध बुद्धीने जर मागितले की 'देवा माझ्या वासना काही जात नाहीत. मला भुक्ती पाहिजे' तर भुक्ती सुद्धा त्याला त्याच्यातून मुक्ती देणारी होते. रजकाची कथा हेच स्पष्ट दाखविते. सुदामजींनी मागितलं नाही, त्यांच्या पत्नीने मागितले. परंतु तेही त्यांना गोपालकृष्णांनी दिलेले आहे. पण त्या भोगात असताना सुद्धा सुदामजींचं अखंड गोपालकृष्णांच चिंतन चालले आहे. त्यांची भावना हे देवाचे देणे आहे. म्हणून अहंकारादि विकार उत्पन्न झालेले नाहीत. यासाठी महाराजांनी "भुक्तिंच देहि—मुक्तिंच देहि" असे मागणे मागितलं आहे.

त्या मुक्तीच्याही पुढचे मागणे म्हणजे 'भावासक्तिं' हे आहे. अन्तःकरणात

ईश्वरासंबंधी नितांत प्रेम उत्पन्न होणे म्हणजे 'भावासक्ती'. भक्तीपेक्षाही अत्यंत श्रेष्ठ उपादेय वस्तू भावासक्ती मानली आहे. ही भावासक्ती जर अन्त:करणात उत्पन्न झाली तर सर्व काही कल्याण होतं. मुक्ती आली काय आणि गेली काय दोन्ही सारखच. तेव्हा महाराजांनी शेवटी भावासक्ती मिळावी म्हणून प्रार्थना केली आहे.

नवविधा भक्ती ही आरंभाला साधनात्मक आहे. नवविधा भक्तिला अपरा भक्ती म्हटले आहे आणि पराभक्ती ही साध्य आहे. या पराभक्तीमुळे सर्वही क्लेश दूर होतात. संसारातून मुक्ती मिळते. सर्वही कष्टांचे निवारण होते. या पराभक्तीमध्ये भावासक्ती हे श्रेष्ठ उपादेय म्हणून सांगितले आहे. हेय आणि उपादेय हे वैयक्तीक व्यक्तिकरता मागितलेले नाही. सर्वांसाठी मागितलेले आहे. कारण सर्व संत 'हितेरत:' असतात, म्हणून जगाचे कल्याण होते. याप्रमाणे सद्‌गुरू महाराजांनी 'हेयोपादेय' विवेक मांडलेला आहे, तीच प्रार्थना आपण करायची आहे.

प. पू. रंगावधूतमहाराज परमहंस आहेत. सर्व संकल्प संन्यासी. परंतू भूतांचे कल्याण होण्याकरिता म्हणून अव्यक्तरूपाने आहेत. मूर्ति हा सुद्धा भगवंताचा अवतारच आहे. मूर्तिरूपाने महाराजांचा निवास इथे आहे. आमच्या सारख्या अज्ञानी जीवांच्या अन्त:करणात हेयोपादेय विवेक ठसावा, हेय दूर होऊन त्यांच्या कृपेने उपादेयाची प्राप्ती व्हावी अशी ही प्रार्थना करून ही वाङ्मय सेवा त्यांच्या चरणी समर्पण.

**''अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त''**

* * *



पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नामकावी ।
हा अमुका ऐसी नोहावी । से चि लोका ॥१८८॥

तेथ सत्काराची गोठी । कें आदरा देईल भेटी ।
मरणेंसी साटी । नमस्कारिता ॥१८९॥

वाचस्पतीचे नि पाडे । सर्वज्ञता तरी जोडे ।
परि वेडिवे माजी दडे । महिमे येणे ॥१९०॥

चातुर्य लपवी । महत्त्व हारवी ।
पिसेपण मिरवी । आवडोनि ॥१९१॥

जगे अवज्ञाचि करावी । संबंधी सोयचि न धरावी ।
ऐसी ऐसी जीवी । चाडबहु ॥१९३॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १३

भगवंतांनी ज्ञानी भक्ताच्या गुणाचे वर्णन केले आहे. या गुण वर्णनाचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराजांमध्ये येतो.

**प्रवचनाचा संदर्भ—**

एप्रिल १९८१ मध्ये, हरेश्वर येथील सप्ताहातील हे प्रवचन आहे. श्रीमद्‌भगवद्गीतेवर केलेले चिंतन हाच प्रवचनाचा विषय आहे. एका आमोलिक ग्रंथावरील हे आमोलिक चिंतन आहे. तत्त्वज्ञान व्यवहारात उतरविण्याचे मार्गदर्शन म्हणून ही प्रवचने असल्याने तत्त्वाची उकल तशा दृष्टांताने केलेली आहे.

# प्रवचन आठवे

# श्रीमद्भगवद्गीता - एक चिंतन

श्रीमद्भगवद्गीता हा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यात अनेक विषय भगवंतांनी अर्जुनाला सांगितले आहेत. अर्जुनाच्या मनामध्ये मोह निर्माण झाला होता. ज्याला अविवेक म्हणतो तो उत्पन्न झाला होता. भगवंताला वाटले त्याचा मोह आणि त्यामुळे उत्पन्न झालेला अविवेक हा दूर झाला पाहिजे. म्हणजे त्याचे कर्तव्य तो बरोबर करू शकेल. या उद्देशाने सर्व उपदेश स्वतः भगवंतांनी केलेला आहे. त्यामध्ये आत्मज्ञान-भगवद्भक्ती-कर्तव्यकर्म हे तीन उपाय आणि चौथा अष्टांग योग त्यांनी सांगितला आहे.

सर्वही कार्यात बुद्धीची तयारी करावयाची आहे. संसारातही बुद्धीचे साहाय्य आवश्यक आहे. बुद्धीच जर ठिकाणावर नसेल आणि स्थिर नसेल तर संसारही व्यवस्थित होऊ शकणार नाही. या दृष्टीने शास्त्रकारांनी बुद्धितत्त्व फार श्रेष्ठ मानले आहे.

तेव्हा बुद्धीची तयारी करावयाची आहे. ती स्थिर करावयाची आहे. तिची योग्यता वाढवावयाची आहे. ईश्वरदर्शन किंवा आत्मदर्शन हे बुद्धीने होणारे आहे. पण त्यासाठी बुद्धी सुसंस्कृत झाली पाहिजे. संस्कार म्हणजे बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करणे आणि विशेष गुण तिच्यामध्ये उत्पन्न करणे, हा संस्कार शब्दाचा अर्थ आहे. त्या योगाने बुद्धीची योग्यता अधिकाधिक वाढत जाते.

आपल्या डोळ्यांनी आपण फार लांबचे पाहू शकत नाही. आपल्या दृष्टीला मर्यादा आहेत. समुद्राच्या पलिकडे काय आहे हे आम्हाला दिसणार नाही. पण घारी, गिधाडे वगैरेंची दृष्टी दूर-दर्शन करू शकते. निसर्गतःच ईश्वराने त्यांचे दृष्टीमध्ये तशी योग्यता दिली आहे. लांबचा पदार्थ सुद्धा ते पाहू शकतात. आम्हाला लांबचे तारे वगैरे पदार्थ नुसत्या डोळ्यांनी दिसू शकत नाहीत. त्याकरिता माध्यम म्हणून एक दुर्बिण निर्माण झाली आहे. त्या माध्यमाचे साहाय्य घेतले म्हणजे याच दृष्टीने दूरचा पदार्थ सुद्धा आपण पाहू शकतो. त्याच-प्रमाणे बुद्धीमध्ये योग्यता निर्माण होण्यासाठी आणखी काही साहाय्य घ्यावे लागते बुद्धीने विचार करायचा झाला तर महात्म्यांनी करून ठेवलेले ग्रंथ, त्यांचा उपदेश यांचे साहाय्य घ्यावे लागते.

भगवानही सांगतात की शास्त्राचे साहाय्य घ्यावे. नुसत्या बुद्धीने विचार होऊ शकत नाही. बुद्धीला योग्य विचारांची दिशा आणि योग्य निर्णय शास्त्र देत असते. शास्त्र प्रमाण आहे. म्हणून शास्त्राचे साहाय्य घेतले पाहिजे. मानवाची बुद्धी अतिशय मर्यादित आहे. व्यवहारात सुद्धा आपल्याला बुद्धीने योग्य निर्णय घेता येत नाही. एका कोर्टाने घेतलेला निर्णय पुढच्या कोर्टात फिरवला जातो. म्हणजे एकाची बुद्धी कमी पडली, दुसऱ्याची बुद्धी जास्ती झाली. पुन्हा त्यांच्यावर सुप्रीम कोर्ट आहेच. तर जसजसे बुद्धीला शास्त्राचे साहाय्य मिळत जाईल तशी तशी ती बुद्धी सूक्ष्म तत्त्वाचे विवेचन, स्पष्टीकरण, निर्णय करू शकते. म्हणून प्राचीन सर्व ऋषि-मुनी आपल्या बुद्धीची योग्यता वाढविण्याच्या प्रयत्नात होते.

चंद्रलोकापर्यंत जाणे हीसुद्धा बुद्धीची योग्यताच आहे. त्यालासुद्धा बुद्धीची स्थिरता पाहिजे, मनात निराशा उपयोगी नाही इतके प्रयत्न केले, पण काही साधत नाही, अशक्य आहे अशी निराशा उत्पन्न झाली असती तर हे कार्य शक्य झालं नसतं !

शास्त्र म्हणून शास्त्राचे जे सिद्धांत आहेत ते सिद्धांत भौतिक शास्त्रानेही अगोदर मान्य केले आणि मग ते त्या कार्याला लागले. त्याबरोबर चिकाटी, धैर्य उत्साह अशा गुणांनी युक्त होऊन विचार आणि प्रयत्न केल्यावर, चंद्रलोकापर्यंत जाणे अशक्य नाही हे सिद्ध झाले.

तेव्हा बुद्धीची योग्यता वाढावी म्हणून शास्त्रे करून ठेवली आहेत. अशा- पैकी योगशास्त्र, मंत्रशास्त्र ही ऋषींनी करून ठेवलेली शास्त्रे आहेत. त्या सगळ्या प्रयोगांनी बुद्धीचा विकास करून घ्यावयाचा आहे. सिद्धी तरी काय आहेत ? मानसिक शक्तीचा विकासच आहे. सूक्ष्म ग्रहण करण्याची शक्ती बुद्धीत आहे. तिचा विकास होऊ शकतो. शास्त्राच्याविरुद्ध वागल्याने बुद्धीतली असलेली शक्तीही नाहिशी होते. उन्नति किंवा अधोगति दोन्हीही आपण आपल्या वर्तनावरूनच मिळवून घेतो.

श्रीमद्भगवद्गीतेसारख्या ग्रंथात ही सर्व अमोल साधने भगवंताने सांगितली आहेत. सांगणारे प्रत्यक्ष भगवंतच आहेत म्हणून हा प्रमाण ग्रंथ मानतात. ऐकणारा अर्जुन थोडासा गोंधळलेल्या मन:स्थितीत होता. काय करावं ? काय करू नये ? याबद्दल त्याची मन:स्थिती फार बिकट झाली होती. अशी स्थिती संसारामध्ये सर्वांचीच होते. आपले चित्त प्रतिकूल परिस्थिती निर्माण

झाल्यावर गोंधळून जाते. यातून मार्ग कसा काढायचा यासाठी अर्जुनाला गीता सांगितली. अर्जुनाच्या निमित्ताने ती सर्वांनाच सांगितली आहे. भगवद्गीतेचा विचार शंकराचार्यांनी थोडक्यात सांगितला आहे.

**गेयं गीता–नाम सहस्त्रं, ध्येयं श्रीपति रूपमजस्त्रम् ।**
**नेयं सज्जन-संगे चित्तं, देयं दीन जनाय च वित्तम् ॥**

अशी ही चार साधने थोडक्यात सांगितली आहेत. बुद्धीची सुधारणा व्हावी, ईश्वराचा प्रसाद व्हावा, यासाठी गीतेचाही विचार व्हावा, गीतेवर चिंतन व्हावे असे मुद्दाम सांगितले आहे.

उपास्य देवतेच्या स्वरुपाचे ध्यान व्हावे, हा बुद्धीला एक संस्कार आहे. तो एकाग्रतेचा अभ्यास आहे. जोर-बैठका काढल्या की लगेच शक्ती थोडीच येते ? काढणारे काढत असतात. शरीर हळूहळू कार्यक्षम होत असते. तसे बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करण्याकरिता ध्यानाचा अभ्यास सांगितला आहे. तसेच सज्जनांची संगती सांगितली आहे. किंवा त्यांनी केलेल्या ग्रंथाचे वाचन. हे वाचन सुद्धा त्यांचीच वैचारिक संगती आहे. 'देयं दीन जनायच वित्तम्' हे सांगितले आहे. वित्त म्हणजे द्रव्य ! धनधान्य ! ईश्वराने आपल्याला जे दिलेले असेल त्यातला काहीतरी भागाचा त्याग आपल्याकडून झाला पाहिजे. 'नमम' हा अभ्यास झाला पाहिजे.

आत्मरूप जे आहे ते असंग आहे. त्याचा कशाशीही संबंध नाही. अगदी निर्विकार आहे ते. निर्विकार अशा आत्मस्वरूपाचा असा मी हे जर कळले तर सुखही नाही आणि दुःखही नाही. मानापमान नाही. त्यासाठी हा एक त्यागाचा अभ्यास आहे. आसक्ती कमी करण्याचा अभ्यास आहे. पण आपल्या मनात ममता आहे. हे माझं म्हणून प्रत्येक लहान मोठ्या वस्तूवर ममता आहे. फाटकं वस्त्र असलं तरी ममता आहे ते सुद्धा आपल्याला सोडवत नाही. ही ममता कमी करण्याचा, आसक्ति कमी करण्याचा त्यागाचा अभ्यास आहे. या अभ्यासाने 'देयं दीन जनाय च वित्तम' होणार आहे. आसक्ति–ममता असेल तर होणार नाही. त्याग अल्प होवो किंवा जास्त होवो त्याला महत्व नाही. त्याग किती करावा, दान किती करावे हे काही शास्त्रकार सांगत नाहीत. पण मनाने जी वस्तू 'मम' म्हणून मानली आहे त्याबद्दल शास्त्रकारांनी 'इदं न मम' हे विचारसूत्र दिले आहे. आता याच्यामध्ये 'माझे' महत्त्व नाही. ही मनातून

स्वत्ववृत्ति संपूर्ण गेली पाहिजे. स्वत्व निवृत्ती झाली पाहिजे. दान किंवा त्याग याला म्हणतात. एकेक ममता सोडण्याचा जर आपला अभ्यास झाला तर कशाशीही आपला संबंध नाही हे आपोआप कळून येते. ही मनाची तयारी होण्यासाठी भगवान श्रीशंकराचार्यांनी 'देयं दीन जनाय च वित्तं' हे सांगितले आहे.

संन्यासाश्रम तर अगदी त्यागाची मूर्तीच आहे. संन्याशाने सर्व सोडलेले आहे. अगदी देहाची सुद्धा आसक्ती नाही. संन्याशाने सारखे फिरावे. असे शास्त्रानेच सांगितले आहे. त्यामुळे एका ठिकाणी कोठेही जास्त राहवयाचे नाही. फक्त चातुर्मासात मात्र पाऊस पडतो. किडे-प्राणी निर्माण होतात. त्यांची चालताना हिंसा होऊ नये या दृष्टीने एका ठिकाणी राहण्याची आज्ञा आहे. हा अभ्यास मानव धर्मामध्ये करायचा आहे. त्यापैकी गीता ही आचार्य प्रथम सांगतात.

भगवद्गीतेमध्ये अनेक विचार मांडले आहेत. अनेक सिद्धांत सांगितले आहेत. ती प्रत्यक्ष भगवंतांनीच सांगितलेली आहे. त्यामुळे ती खरी की खोटी वगैरे संशोधन करायची गरज नाही. सर्वही ईश्वराच्या मुखातून आलेले आहे.

अर्जुनासारखा ग्राहक मिळाला. जितेंद्रिय आहे. श्रद्धाळू आहे. भगवद्भक्त आहे. त्याला हे सर्व भगवंतांच्या मुखातून ऐकायला मिळाले. आज आपणास सर्व मिळून थोडे फार चिंतन करावयाचे आहे.

श्रीशंकराचार्यांनी जो महत्त्वाचा अद्वैत सिद्धांत मांडला आहे. तो ऐकल्यावर एकदम मोठमोठ्या विचारी माणसांना सुद्धा तो सिद्धांत बरोबर नाही असे वाटते. सर्वसामान्य विचाराच्या प्राथमिक अवस्थेत तो बरोबर नाही असे वाटते. पण बरोबर वाटणारेच बरे वाटते असेच सांगितले म्हणजे तो सिद्धांत असतो असे थोडेच आहे. रोग्याला वाटते डॉक्टरांनी आपल्याला पाहिजे तसे गोड औषध द्यावे. सर्व खाण्यापिण्याची परवानगी द्यावी. पण डॉक्टर रोग्याच्या इच्छेप्रमाणे करू शकत नाही. उलट रोग्याच्या इच्छेविरुद्ध डॉक्टर सांगतात. हे खायचे नाही, ते खायचे नाही !. डॉक्टरांना रोग्याच्या हिताकडे लक्ष देऊन उपाययोजना केली पाहिजे. प्रिय निराळे आणि हित निराळे. आम्हाला वाटते ते प्रिय आहे. पण हिताचा विचार करण्याची सवय मनाला व्हावी. असा सर्वांच्या हिताचा विचार महात्मे नेहमी करीत असतात. त्याप्रमाणे त्यांचा हितोपदेश-क्रियोपदेशही आहे.

खरे जे ज्ञानी-तत्त्वदर्शी महात्मे आहेत ते म्हणतात, उपास्य आणि उपासक यांच्यात मुळातच अद्वैत आहे. ते दोन नाहीत-एकच आहेत. 'अहं ब्रह्मास्मि' हा सिद्धांत आहे ते समजून घ्यावयाचे आहे. पण या सिद्धांतापर्यंत बुद्धी एकदम जाऊ शकत नाही. त्याकरता आरंभाला भेदच आहेत. आपण किती तरी जीव आहोत आणि प्रत्येकाची बुद्धी निरनिराळी आहे. ईश्वर जर एक आहे आणि हे जीव तर अनेक आहेत. मग ईश्वर नि मी एक कसा ? तसेच ईश्वर जर सर्वज्ञ आहे आणि मी तर अज्ञानी आहे. मग ईश्वर नि मी एक कसा ?

त्या करिता मुख्य सिद्धांत असा आहे की, आपल्याला ईश्वरदर्शन व्हावे म्हणून प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी भक्तिमार्ग आहे. साधन भक्ती, साध्य भक्ती असे प्रकार आहेत. उपासना मार्ग आहे हा. उपासना करणारा हा भक्त आणि ज्याची उपासना करायची ते उपास्य म्हणजे ईश्वर. अशा भेदातूनच म्हणजे भेद आहे या संशयातून उपासना सुरू होते. आरंभाला संशय येतो. त्या स्थितीत तो संशय बरोबर आहे. संशयाला भ्रम म्हणतात. त्याकरिता हे सगळे संशय दूर व्हावेत. बुद्धीमध्ये तशा प्रकारची योग्यता निर्माण व्हावी, म्हणून ही सर्व साधने-उपासना सांगितली आहेत. आपण साधन-उपासना करीत रहायचे. कर्म मार्ग आहे हा. पूजा वगैरे तरी काय, कर्म मार्गातच येते. ही साधन-भक्ती आहे. ईश्वराला गंध-फूल-धूप-दीप-नेवैद्य सर्व समर्पण केले जाते. हे ही कर्मच आहे. पण हे असे कर्म आहे की, यामध्ये ईश्वराने आवाहन करायचे-ईश्वराचे सान्निध्य मानून मनाने, भावनेने हे सर्व कर्म करावे लागते. अशा ईश्वर प्रीत्यर्थ केलेल्या कर्मांनी, साधन भक्तीने, मनाला समाधान लाभत जाते.

संसार तरी काय आहे ? भावनाच ना ! खरं काय आहे ? आमच्या बुद्धीची जी काही कल्पना म्हणा, भावना म्हणा, आहेत त्या भावना हाच संसार आहे. वास्तविक तत्त्वविचार यादृष्टीने स्त्री-पुरुषांचे भौतिक शरीर पंचमहाभूतां-पासून तयार झालेले आहे. तरी भौतिक शरीर एकाच तऱ्हेने बनले असताना त्या शरीराच्या ठिकाणी भावनेने मात्र वेगवेगळी रूपे तयार झाली आहेत. त्या स्त्रीच्या मातेला ती आपली कन्या म्हणून आहे, पतीला ती भार्या आहे, पुत्राला ती माता आहे, भावाला बहीण वाटते आहे. वास्तविक शरीर पंचभौतिक एकच आहे. पण एकाच शरीराच्या ठिकाणी, प्रत्येकाने आपले एक भावनात्मक रूप वेगवेगळे तयार केले आहे. असा भेद आहे म्हणून संसार चालला आहे. भावने-

स्वत्ववृत्ति संपूर्ण [illegible] आपल्या मनाची भावना ही तशी व्यवस्थित ठेवली याला म्ह[illegible] आहे. प्रेमामुळे मनाला काहीतरी समाधान लाभते आहे. क[illegible] काय ?

[illegible] स्वरूपे अनेक आहेत. जीवांची स्वरूपे अनेक आहेत. [illegible] भावनेप्रमाणे त्याला प्रिय वाटणाऱ्या ईश्वराच्या रूपाची तो [illegible]मिक भूमिकेवर हीच भावना होते. अशा या वेळेला आपण आहोत [illegible]कित काय करावयाचे आहे ? आपल्यात कोणती भावना निर्माण व्हावी आणि कोणती भावना वाढावी ? याकरिता आपले प्रयत्न आहेत.

रावणानेही पुष्कळ अभ्यास केला. योगाभ्यास केला, मंत्र शास्त्राचा अभ्यास केला, वेदाभ्यास केला; पण तरीसुद्धा त्याच्या भावनेची सुधारणा झाली नाही. त्याने शंकराची मोठी उपासना केली. पण एक तपस्वी पुरुष राम, अरण्यात राहणारा ! ह्या रामाच्या स्त्रीचे हरण रावणाने केले ! त्याच्या बुद्धीवर चांगले संस्कार झाले नाहीत. उलट हे बाकीचे कुसंस्कार मात्र वाढत राहिले. रावणाने तिकडे लक्ष दिले नाही. बिभीषणाने त्याला सांगितले "अरे ही परस्त्री आहे. तिला तू आणू नकोस. देऊन टाक !" बिभीषणाला रावणाने उत्तर दिले, "परस्त्री आम्हाला कोणतीच नाही. जगातल्या सर्व स्त्रिया आमच्याच आहेत." ही रावणाची भावना होती. पण ही भावना जगाला घातक ठरली. ही भावना धर्मानुकूल नाही. धर्माचे पालन व्हायला पाहिजे. धर्मपालनाने समाजाचे–जगाचे रक्षण होत असते. रावणाची भावना व त्या भावनेचे अनुयायी वाढत राहिले तर सगळ्या जगाचा नाश होईल. कुणालाही कुठेही सुरक्षितपणा राहणारच नाही. म्हणून रामरायांना तो रावण जरी ब्राह्मण होता, ऋषिकुमार होता, विविध शास्त्रांचा अभ्यासक होता तरी त्याला मारावे लागले. त्याच्या अनुयायांना मारावे लागले. ती शक्ती त्यांनी मिळविली आहे. आपल्यामधील धर्मभावना सुरक्षित ठेवली पाहिजे. अशी ही धर्मभावना वाढत जाऊन शेवटी ईश्वराची कृपा होऊन ईश्वर दर्शन होते. मग चित्ताच्या सर्व वृत्तींचा लोप होतो. सर्व भावना संपतात.

आपणास असे दिसते की, लोकांमध्ये भावना आहेत पण त्या धर्माला प्रतिकूल अशा भावना आहेत. ते लोक म्हणतात 'काय करावयाचे आहे धर्म, पालन करून ? आता लोक चंद्रावर गेले आहेत ! कशाला हवयं धर्माचरण ?

धर्माचरण हे व्यक्तीच्या उन्नतीकरता आणि समाजाच्या भल्याकरता केले पाहिजे. सगळं धर्मशास्त्र याकरिताच आहे.'

समाजामध्ये धर्मानुकूल भावनांची वृद्धी करणारे जे महात्मे असतात त्यांना धर्म प्रतिकूल भावनांचे जे दुरात्मे असतात, त्यांचेकडून अतिशय त्रास, छळ, असुरक्षितपणा सोसावा लागतो. समाजाचाही समतोल ढासळतो. म्हणून धर्मानुकूल भावनांची वृद्धी करणाऱ्या महात्म्यांच्या संरक्षणासाठी ईश्वराचे अवतार होतात. धर्म शास्त्राचे पालन नेहमी कल्याणकारी असते. जर दहावीतला मुलगा म्हणाला, "मला दहावीचा अभ्यास नको, मी एकदम बी. ए. चा अभ्यास का करू नये ?" काय उत्तर देणार आपण ? त्याला समजावूनच सांगितले पाहिजे ! या ऐवजी त्या मुलाला जर म्हटले की 'आत्ता अभ्यास सोडून दे. तुझ्या इच्छेप्रमाणे काय वाटेल ते कर' तर काय होईल ? धर्मशास्त्र कर्तव्य करायला सांगते. अकर्तव्यापासून परावृत्त करते. म्हणून धर्मशास्त्र पालन वृत्ती पाहिजे. धर्मानुकूल भावना असेल तरच धर्मशास्त्र पालनाची वृत्ती होणार !

समाजाच्या आणि व्यक्तीच्या सुसंगत विकासाचे आणि समाज जीवन आणि व्यक्ति जीवन यांच्या स्थैर्याची ईश्वर निर्मितशास्त्र, धर्मशास्त्र आहे. या विकासाचे आणि स्थैर्याचे स्वरूप संस्कारित भावनांप्रमाणे सुसंगत क्रमाने चतुर्विभागात शास्त्रशुद्ध मांडले आहे. भावना अवस्थांप्रमाणे धर्मशास्त्राचे व्यापकत्व ही उत्तरोत्तर विशाल होत गेले आहे. त्या त्या भूमिकेवर राहणाऱ्या लोकांना तो तो धर्म आहे. ही भावना दृढ करून त्याप्रमाणे, धर्मानुकूल वृत्ती ठेवून, धर्मशास्त्र पालन करीत वागायचे आहे. एका भावनाभूमिकेवरून पुढच्या भावनाभूमिकेवर जायचे आहे. हे धर्मभावनांचे परिवर्तन हा धर्माचा त्याग आहे. आपल्या भावना भूमिकेप्रमाणे वागणे हा स्वधर्म आहे. तर ज्या भूमिकेत जे करणे कर्तव्य आहे ते न करणे हा अधर्म आहे. परंतु या आचरणात भूमिका बदलल्यावर परिवर्तन करणे हा अधर्म नसून धर्माचा त्याग म्हटले आहे. संन्याशाश्रमात भावनांचे परिवर्तन आहे. तसेच पूर्व धर्माचा त्यागही आहे. विकासात परिवर्तन असते आणि पूर्व अविकसित गोष्टींचा त्यागही असतो. ईश्वराचे दर्शन घ्यायचे झाले म्हणजे आरंभाला एक मूर्ति करूनच आपल्याला भक्ती करावयाची आहे. ईश्वर सर्वत्र आहे हे आपल्याला कळत नाही, जाणवत नाही, नुसते सांगणे सोपे आहे.

नामदेवांसारखे महान भक्त की ज्यांच्या चित्तात ईश्वराबद्दल विलक्षण प्रेम आहे. त्यांना सुद्धा ईश्वराच्या व्यापक स्वरूपाचे दर्शन होण्यास सद्‍गुरूंच्या कृपेची आवश्यकता लागली. संतांच्या सभेमध्ये त्यांना कच्चे ठरवले गेले. नामदेव पांडुरंगांच्याकडे आले. पांडुरंग नामदेवांबरोबर बोलत होते, जेवत होते. नामदेवांची भक्ती फार मोठी होती. म्हणून त्यांना कमीपणा वाटला. पांडुरंगांनीही त्यांना सांगितले "बाबा, खरं आहे. मी येथे राऊळामध्यचे आहे, एवढेच तुला माहित आहे. राऊळाच्या बाहेर सर्व ठिकाणी पांडुरंग आहे हे तुला माहित नाही. म्हणून तुला कच्चे म्हणाले." त्यासाठी पांडुरंगांनी नामदेवांना विसोबा खेचरांकडे पाठविले. आणि तिथे त्यांना ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. बुद्धींचा विकास अगदी तयार झाला होता. त्यामुळे एकदम ज्ञान झाले.

तेव्हा ईश्वराचे दर्शन म्हणजे ईश्वर सर्वत्र आहे अशी भावना होणे. पूर्वीच्या भावनेत परिवर्तन हा विकास. "वासुदेव सर्वम्" सर्वत्र-सर्व दिशांना-वासुदेव आहे. सर्व ठिकाणी ईश्वर आहे. त्याचप्रमाणे सर्वकाळातही ईश्वर आहे. काल मर्यादा ईश्वराला नाही. जीवांना आयुष्य मर्यादा आहे. पण परमात्मा कालमर्यादारहित आहे म्हणून त्याचे महत्त्व आहे. पूर्ण शक्ती त्याची आहे. अनेक ब्रह्मांड उत्पन्न होतात, जातात, नाहिशी होतात. त्याचे त्याला काही नाही चाललय सारख! त्याला काही धक्का नाही.

याच्याही पुढची भावना म्हणजे 'वासुदेवः सर्वम्' ईश्वर सर्व देशात नि सर्व कालात आहे एवढेच नव्हे तर सर्वरूपच तो आहे. 'आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे" असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. देव विश्वात्मक आहे. ज्ञानेश्वरीचा कर्ताही तोच आहे. म्हणजे विचार करणारा 'अहम' जीव ही तोच आहे. शेवटी विलीन होऊन गेला म्हणजे सर्वत्र एकरूप झाला.

अद्वैत ज्ञान झाले म्हणजे पूर्ण शांती आहे. श्रीसद्‍गुरु वासुदेवानंद-सरस्वतीमहाराजांनी आचार्य महाराजांच्या सिद्धांताप्रपाणे सर्व विवेचन आपल्या ग्रंथातून केले आहे.

'सकलं इदं अहं च वासुदेवः' हे जे ज्ञान आहे, दृश्य दिसणारे, मग ते चेतन असो वा अचेतन असो हेच एकमेव सत्य आहे. मी पाहणारा आहे, हे काहीच नाही. इतकी बुद्धी विशाल झाली पाहिजे.

आमची बुद्धी अतिशय लहान आहे. संकुचित आहे. ती विशाल होण्याकरिता ही सर्व साधने अनंतकालापर्यंत करावी लागतात. किती काळ करायची याला उत्तर नाही. ते फळ मिळाले की साधना संपली. बुद्धी विशाल होते—विकसित होते हे आपण अनुभवाने पाहू शकतो. त्याकरिता भगवंतांनी हा सगळा विवेक तेराव्या अध्यायात मांडला आहे. 'क्षेत्र–क्षेत्रज्ञ विवेक' म्हणून त्या अध्यायाचे नाव आहे.

देहादिक जे सगळे पदार्थ आहेत त्यांना क्षेत्र असे नाव दिले आहे. शरीर–इंद्रिये यापेक्षा आत्मा वेगळा आहे. आत्मा हा क्षेत्रज्ञ आहे. हे समजून घ्यावयाचे आहे. हे समजण्यासाठी बुद्धी शुद्ध झाली पाहिजे, शुद्ध बुद्धी विशाल होते. यासाठी आचार विचाराकडे लक्ष द्यावे लागते. आचारांनी-चांगल्या आचारांनी बुद्धी शुद्ध होते. शुद्ध बुद्धीत चांगले विचार रहातात.

तेव्हा शरीरापेक्षा मी वेगळा आहे हे समजून घेणे याला क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक त्यांनीच म्हटले आहे. हेच तर कळत नाही. हे समजून घेणे आणि समजणे फार कठीण आहे. आपण शरीराशी इतके तादाम्य होऊन गेलो आहोत की, शरीर म्हणजेच मी असेच समजून आहोत. त्यामुळे शरीराच्या जन्माच्या पूर्वी काही नाही आणि नंतरही काही नाही अशीच आपली बुद्धी संकुचित होऊन रहाते. शरीराचा नाश झालेला आपण पहातो. प्रत्यक्ष डोळ्यांनी ते दिसते म्हणून मान्यही करावे लागते. म्हणजे शरीर विनाशी आहे मानावेच लागते. तरीसुद्धा शरीर मी आहे ही भावना काहीही कमी होत नाही.

ही भावना कमी होण्यासाठी त्यांनी 'शरीरापेक्षा मी वेगळा आहे'. ही दुसरी भावना सांगितली आहे. हा तत्व सिद्धांत आहे. हे विचारांती बुद्धीला पटू शकते. पण हा सैद्धांतिक विचार बुद्धीमध्ये स्थीर राहू शकत नाही. काही क्षण हा विचार स्मशान वैराग्यासारखा बुद्धी मान्य करते. पण दुसऱ्या क्षणी याचा विसर पडतो. शरीर म्हणजे मी नाही असे म्हटल्यानंतर शरीराचा संबंधही आपल्याला सोडायला लागतो. हे पटल्याशिवाय आणि पटूनही पक्के झाल्याशिवाय बुद्धीचा निश्चय होत नाही. शरीरापेक्षा आपण वेगळे आहोत. काही कालानंतर आपल्याला शरीराचा संबंधसुद्धा तोडणे अपरिहार्य आहे. हे जे नित्य स्मरण असावे लागते त्याचा विसर पडतो. अर्थात् एवढ्या विचार चिंतनाने एक सामान्य कल्पना येते की, कोणती तरी विलक्षण शक्ती कार्य करणारी आहे.

या कल्पनेतूनच जिज्ञासा वाढीस लागते. ही सगळी व्यवस्था करणारा कोण आहे ? शरीरात आणून सोडणारा कोण आहे ? शरीरातून बाहेर घालविणारा कोण आहे ? कोणती तरी अज्ञात शक्ती आहे याची सामान्य कल्पना आल्यानंतर ती समजून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते. ही जिज्ञासा उत्पन्न झाली की, साधनेला आरंभ होतो. त्यातही शरीर म्हणजे मी आहे अशी बुद्धी जास्त वाढू लागली, तर तो आरंभ झाला तरी त्याचे फळ लवकर दृष्टीस पडत नाही. कारण शरीरापेक्षा निराळे काही नाही ही भावना त्या शरीराच्या सुखाकरिता प्रयत्नास लागते. तो प्रयत्न चांगला की वाईट म्हणायचे कारण नाही. कारण प्रत्येकजण आपल्याला सुख होण्याकरताच प्रयत्न करतो. अशाप्रकारे शरीराच्या सुखाची दृष्टी व त्यासाठी प्रयत्न असले म्हणजे त्यात पाप-पुण्य, नीती-अनीती इ. विचार करण्याचे कारण तरी काय ? असे विचार केवळ शरीर मी आहे. शरीराच्या सुखासाठी म्हणजे माझ्या सुखासाठी, अशी भावना असली म्हणजे तसेच विचार वाढत जातात. शरीराच्या आसक्तीबरोबर हे विचारच वाढत जातात. आपण 'येन केन प्रकारेण' सुखी व्हावं एवढीच भावना असते. येथे विचार, विवेक संपलेला असतो.

शरीरामध्ये नियंत्रण करणारी, सर्वांचे नियंत्रण करणारी कोणी शक्ती आहे याची कल्पना आल्यावर, त्याचे दर्शन व्हावे, त्याची कृपा व्हावी अशी तळमळ लागली पाहिजे. अशा तळमळीने मग प्रयत्न करावा लागतो. हा प्रयत्न जास्तीत जास्त होत आहे इकडे लक्ष द्यायला पाहिजे. यासाठी मनाचे व बुद्धीचे सहाय्य फार महत्त्वाचे आहे. त्या मनाचे नियंत्रण करण्यासाठीही त्या शक्तीची आपल्याला प्रार्थना करावी लागते. तरच खरे ज्ञान होते आणि ते ज्ञान मनामध्ये स्थिर होते. आणि अज्ञान मोह–आसक्ती वगैरे हळू हळू कमी होतात.

या १३ व्या अध्यायात 'क्षेत्र क्षेत्रज्ञ विवेक' हा फार मोठा विषय भगवंतांनी अर्जुनाला समजावून सांगितला आहे. अर्जुनाला सुद्धा शरीर आणि आत्मा वेगळा आहे ही कल्पना नाही. आपल्याला सुद्धा आपण म्हणजे शरीर असेच वाटत असते. पुस्तक समोर आहे आणि मी पुस्तक आहे. असे कसे म्हणायचे ? हे पुस्तक म्हणून जर मी पहातो तर पहाणारा वेगळा आणि ज्याला पहातो तो पदार्थ वेगळा हे सिद्धच आहे, तसे माझा देह, माझे हात–पाय आहेत आपण ते पहातही आहोत. तर त्यालाच मी कसे म्हणायचे ? पण असं होतय

खरं ! शरीराचा द्रष्टा मी असून मी शरीर आहे असे कसे म्हणायचे ? हे बरोबर नाही. मी शरीर आहे अशी कल्पना दृढ आल्यामुळे फुलाची माळ शरीराला घातली तर वाटते 'मला माळ घातली !' आणि या कल्पनेने समाधानाही होते. आपल्याला कोणी अपशब्द बोललेले तर ते देहाला बोललेले असतात. पण समजतो तो मलाच अपशब्द बोलला आणि आपण लगेच असंतुष्ट होतो. ही देहात्म बुद्धी पक्की असल्याने असे वाटत असते. हे शरीराशी तादात्म्याचे लक्षण आहे. शरीराला उद्देशून स्तुती झाली की माझी स्तुती झाली. निंदा झाली की माझी निंदा झाली, असं सारखं चालू असते. मनाचा क्षोभ–प्रसन्नता इ० होणे यावर अवलंबून आहे.

पण ज्यांना 'क्षेत्र-क्षेत्रज्ञ विवेक' झाला आहे त्यांचे अशा गोष्टीकडे लक्षही जात नाही. "मानापमानयोस्तुल्य:" असे ते रहात असतात. आपल्याला हे अशक्य वाटते. कारण ही विवेक दृष्टी आपल्याला आलेली नसते. शरीर हे टिकाऊ असते तर त्याच्याबद्दल आसक्ती बाळगायला हरकत नव्हती. टिकणारे आहे ते–राहू दे; पण नाही, शरीर अस्थिर आहे. शरीर हे दृश्य वस्तूंप्रमाणे विनाशी आहे. कोणत्या वेळी शरीर जाईल याचे ज्ञान शरीरशास्त्रज्ञांनाही नाही. अंदाजाने, कल्पनेने, बुद्धीने ठरवितात झाले !

अशा इतक्या अस्थिर शरीरामध्ये सुद्धा स्थिरता निर्माण करणे शक्य आहे. अभ्युदय–भौतिक उन्नतीसुद्धा शास्त्रमार्गाने करता येते. शरीर इतके अस्थिर असतानासुद्धा चांगदेवांनी १४०० वर्षे शरीर टिकविले की नाही ? पण त्याही पेक्षा 'ज्ञानशक्ती' वेगळी आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

ही ज्ञान–शक्ती समजून घेण्यासाठी चांगदेव, श्रीज्ञानेश्वरमहाराजांना शरण गेले. ज्यांनी योगबलाने १४०० वर्षे शरीर टिकविले. त्यांनाही शरीरापेक्षा मी वेगळा आहे हे ज्ञान झाले नाही. श्रीज्ञानेश्वरमहाराजांना पत्र लिहितांना नमस्कार लिहू का आशीर्वाद लिहू ? या संशयात कोराच कागद पाठविला त्यांनी ! मी मोठा असल्यामुळे ज्ञानेश्वरमहाराजांना नमस्कार कसा लिहायचा ? बर आशीर्वाद तरी कसा लिहायचा ? ते गुरु म्हणून त्यांना शरण जावयाचे आहे. त्यांचेकडून ज्ञान मिळवावयाचे आहे. ज्ञानेश्वरमहाराज लहान आहेत की मोठे आहेत हा निर्णय त्यांनाही घेता आला नाही. मोठेपणा किंवा लहानपणा हा शरीराचा धर्म आहे.

मी वयाने मोठा किंवा तू लहान आहेस ही भावना आहे. वय वगैरे हे शरीराचे आहे. ज्या शरीराला जास्ती कालाचा संबंध आला असेल ते मोठे आणि ज्या शरीराला कालाचा संबंध कमी आला असेल ते लहान आहे ही भावना आहे. सगळा भावनेने भरलेला व्यवहार ! वास्तविक पंचमहाभूतांपासून उत्पन्न झालेले शरीर, लहान किंवा मोठे ठरविणार कसे ? चांगदेवांच्या मनात हाच भ्रम निर्माण झाला. ज्ञानेश्वरमहाराज लहान आहेत, वीस वर्षांचे वय आहे आणि १४०० वर्षांचा मी! म्हणजे शरीर ही कल्पना दृढ असल्यामुळे शरीर १४०० वर्षांचे आहे. ज्ञानेश्वरमहाराजांचे शरीर वीस वर्षांचे आहे. पण या दोन्हीही शरीरात राहणारा शरीराधारी ज्ञानी आत्मा हा एकच आहे. तो काही जन्माला आला नाही किंवा विनाशही पावणार नाही. वय शरीराचे मोजले जाते. आत्माचे नाही. म्हणून एकाच्या शरीरातील आत्मा लहान व एकाच्या शरीरातील आत्मा मोठा असे म्हणताच येणार नाही.

कोणतही आपलं आयुष्य एक सेकंदाने वाढवावयाची शक्ती नाही. वेळ आली की तो जाणारच! मग तो राष्ट्रपती असो वा पंतप्रधान असो ! लौकिक सत्ता मोठी असेल पण त्यांचा येथे काही उपयोग नाही. चांगदेवांनी मात्र शास्त्राने सांगितलेले प्रयोग करून, तपश्चर्या करून, अभ्यास करून, अथवा आपल्या कर्तृत्वाने म्हणा आयुष्य वाढविले. पण त्यांना सुद्धा आपल्या बुद्धीमध्ये न्यूनता असल्याची, आपण शरीरापेक्षा पलिकडे गेलो नाही याची जाणीव झाली. १४०० वर्षे फुकट गेली ! म्हणून किती अभ्यास केला पाहिजे हे सांगणे कठीण आहे. काय विलक्षण आहे हे ? श्रद्धा ठेवून करत राहायचं एवढंच आपलं काम !

तर शरीर हे क्षेत्र आहे. इंद्रिये-मन-बुद्धी ही शरीरात राहणारी तत्वे आहेत. वेदांत शास्त्राप्रमाणे या शरीरात एक सूक्ष्म शरीर त्यांनी मानले आहे. स्पर्शज्ञान करून देणारे त्वचेंद्रिय आहे. रसांचे ज्ञान करून देणारे रसनेंद्रिय आहे इ. या प्रमाणे क्रियाकरणारी कर्मेंद्रिये आहेत. आणि जिच्यामुळे सर्व हालचाली क्रिया इ. होतात. ती क्रियाशक्ती म्हणजे प्राणशक्ती आहे. शरीराच्या निरनिराळ्या भागात राहणारे पंचप्राण आहेत. वास्तविक एकच वायू आहे. पण एकएकाचे ठिकाणी निरनिराळी कार्ये कल्पिल्याने निरनिराळी नावे वायूला दिली आहेत. मन आणि बुद्धी तत्त्व एकच आहे पण कार्य भिन्नत्त्वाने वेगवेगळ्या रूपाने ही नावे दिली आहेत.

पंचज्ञानेंद्रिये, पंचप्राणेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, मन व बुद्धी असे १७ पदार्थ साधनरूप आहेत. वेदांतशास्त्राप्रमाणे या सगळ्या साधनवर्गाला मिळून सूक्ष्म शरीर म्हणतात. हे टिकणारे आहे. स्थूल शरीरापेक्षा जास्त टिकणारे आहे. शेवटी जाणार आहे. स्थूल शरीरात सूक्ष्म शरीर येऊन राहिले की, चेतना-संवेदना सुरू झाली. जीवदशा असेपर्यंत त्यांचे कार्य चालते.

आपले प्रयत्न कांही वेळा अशस्वी होतात, कारण पूर्वकर्म आड येतात. पुनर्जन्म किंवा त्याचे नियंत्रण करणारा कोणी तरी आहे असे मानावेच लागते. पूर्वीची कर्मे तरी आम्हीच केली. तरी ती आम्हाला दूर का करता येऊ नयेत? तर त्या त्या कर्माप्रमाणे फळ देणारी नियात्मक कोणी तरी शक्ती आहे. ऑफिसमध्ये वेळच्यावेळी जातो. चांगले काम करतो. रजा कधी घेत नाही. पण त्याच्या कर्माने प्रमोशन मिळत नाही. त्याचा व्यवस्थितपणा जाणणारा वरचा अधिकारी ज्ञाता आहे. त्याच्या दृष्टीला आल्यानंतर हा योग आहे असे समजून प्रमोशन मिळते आहे. कर्म हे अचेतन आहे. सेवा चेतन नाही. सेवेला जाणणारा चेतन आहे. त्याची बुद्धी ही अचेतन आहे. बुद्धीने निर्णय होतो. म्हणून आपले सगळे प्रयत्न नेहमी यशस्वी होत नाहीत. म्हणजे आमच्या प्रयत्नांनी आम्हाला सगळे करता येईल असे म्हणता येणार नाही. डॉक्टर सगळ्यांना बरे करू शकत नाही. त्याची ज्ञानशक्ती कमी आहे. असा याचा अर्थ नाही. डॉक्टरला उत्तम ज्ञान आहे. त्याने रोगी बरोबर जाणला आहे. औषधही योग्य आहे, तरी रोगी वाचेलच अशी खात्री नसते. रोगी दगावतो. हजार हजार रुपयांची औषधे, इंजक्शने परदेशातून आणतात, ती दिल्यानंतर एकाचा रोग बरा झालेला आहे. उत्तम आरोग्य प्राप्त झालेले आहे. पण तोच रोग दुसऱ्याला झाल्यानंतर औषध देणाराही तोच आहे. औषधही तेच आहे तरी याला ते लागू पडले नाही. डॉक्टर चुकला किंवा त्याची ज्ञानशक्ती कमी पडली असा त्याचा अर्थ नाही. पण यावेळेला मानवी बुद्धी शक्तीच्या पलिकडे काहीतरी घडते म्हणून कर्माचे फळ भोगायला लावणारा कोणीतरी आहे. असे मानावे लागते.

तर स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर इत्यादींबद्दलचे वेदांत सिद्धांत मधून मधून ऐकावयाचे आहेत. त्याच्यावर विचार करायचा. मराठीत संतांनी ग्रंथात हे विचार लिहून ठेवले आहेत. हे सिद्धांत ज्याच्या मनात बरोबर ठसले आहेत, त्यांना कधीही मोह होत नाही.

मी व... ...ची आज्ञा झाल्यावर त्यांना काही त्रास झाला शरीरा... ...झाली. वसिष्ठ ऋषींचे बोलावणे आले. तिकडेही ...त रामचंद्र ! तत्त्वज्ञानी आहेत. मोह नाही त्यांना ! ...नात निघण्याचा प्रसंग त्याच वेळी आला. पण ...क नाही. तिथे गेल्यावर आपली काय सोय होणार ? ...हेत का ? असले विचार मनान नाहीत. तेव्हाही निश्चिंत अवस्था ! ...र अवस्था हे ज्ञानाचे महत्व आहे. हे ज्ञान मिळविण्याकरिता कितीतरी जन्म घालवावे लागतात. कितीतरी जन्म साधनेचा अभ्यास करीत राहिले पाहिजे. साधन मार्गात निरंतर राहिल्याने हळू हळू आपली बुद्धीही दोष-रहित होते. विशिष्ट गुण संपादन करता येतात. एखाद्या ज्ञानी महात्म्याची गाठ पडून जास्तीतजास्त मार्गदर्शन मिळून विकास होतो.

तेव्हा हे ज्ञान संपादन करण्याकरता कोणत्या गुणांची आवश्यकता आहे ? कोणते दोष घालविले पाहिजेत हा विचार या अध्यायात केला आहे. दोष कोणते टाकायचे, गुण कोणते घ्यायचे याला त्यांनी ज्ञानच म्हटले आहे. ज्ञान, ज्ञान दुसरे काय ? हेच ज्ञान आहे. ज्ञानाची साधना हेच ज्ञान आहे. ही साधना पक्की झाली पाहिजे. मनात-बुद्धीत मुरली पाहिजे. त्या बुद्धीत पूर्ण समाधान आहे. ज्ञानाने जे मिळवावयाचे असते ते मिळूनच गेलेले असते. त्याकरता साधन आहे. आपल्याला या साधनांचा विचार करावयाचा आहे.

**"अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त"**

* * *



तरि अदंभित्व ऐसे । लोभियाचे मन जैसे ।
जीवु जावो परि नुमसे । ठेविला ठावो ॥२०२॥

तयापरि किरीटी । पडिलाही प्राण संकटी ।
परि सुकृत न प्रकटी । आंगे बोले ॥२०३॥

परोपकारू न बोले । न मिरवी अभ्यासिले ।
न शके विकू जोडिले । स्फीती साठी ॥२०८॥

किंबहुना स्वधर्मी थोरू । अवसरी उदारू ।
आत्मचर्चे चतुरू । एऱ्हवी वेडा ॥२११॥

ज्ञानेश्वरी, अध्याय १३.

भगवंतांनी दैवीगुणसंपदेमध्ये 'अमानित्व' या गुणाचे सर्वोच्च स्थान आहे हे दाखविले आहे. या विशेष गुणाचा प्रत्यय आपणास प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्यामध्ये येतो.

## प्रवचनाचा संदर्भ–

जुलै १९८६ मध्ये बोरिवली (मुंबई) येथे केलेले हे प्रवचन आहे. भगवान् श्रीमच्छंकराचार्य यांनी 'षट्पदी' म्हणून सहा श्लोकांचे एक अपूर्व स्तोत्र केलेले आहे. यातील फक्त पहिल्याच श्लोकावर विवेचन यामध्ये केलेले आहे. परंतु आचार्यांनी सर्वेश्वराजवळची विशेष प्रार्थना या प्रवचनातून स्पष्ट केलेली आहे. दुर्गुण दोषांचे निर्मूलन आणि सद्गुणांची प्रखर तेजस्वी प्राप्ती हा मुख्य विषय आहे. सर्व मुमुक्षुंनी याचा विचार केलाच पाहिजे असा हा प्रवचनाचा विषय आहे.

# प्रवचन नववे

# भगवान् श्रीमच्छंकराचार्य यांच्या 'षट्पदी'मधील पहिल्या श्लोकावर

**ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।**
**द्वंद्वातीतं गगन सदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ॥**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षीभूतम्**
**भावातीतं त्रिगुण रहितं सद्गुरुं तं नमामि ।**

भगवान शंकराचार्यमहाराज भारतवर्षामध्ये जगद्गुरु म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" हा वेदांत-शास्त्राचा महत्त्वाचा सिद्धांत आणि उपनिषदाचा अभिप्राय हा त्यांनी व्यक्त केला. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी किंवा इतरही सर्व संतांनी 'भाष्यकाराते वाट पुसतु' म्हणून आचार्यांच्या या सिद्धांताप्रमाणे म्हणजे वेदमान्य असे सर्वही ग्रंथ लिहिले आहेत. आचार्यांची अनेक स्तोत्रे, देवतांची स्तोत्रे ही प्रसिद्ध आहेत. सारी स्तोत्रे भक्तिरसपूर्ण आहेत. त्या स्तोत्रांमधून शास्त्रीय सिद्धांतही त्यांनी आणले आहेत. ती स्तोत्रे संस्कृतमध्ये आहेत. पण ही सर्व लोकांना ती म्हणता यावीत अशी आहेत. प. पू. श्रीनानामहाराज तराणेकर, इंदोर, यांच्या सान्निध्यात रोज करुणात्रिपदी नंतर महिषासुरमर्दिनीचे स्तोत्र म्हटले जाते. शंकराचार्यांचे स्तोत्र आहे ते !

आचार्यांनी केलेल्या अनेक स्तोत्रात एक भगवान विष्णुंचे स्तोत्र त्यांनी केले आहे. 'षटपदी' स्तोत्र त्याला म्हणतात. सहा श्लोकांचे म्हणून षटपदी ! त्यापैकी प्रथम श्लोकात त्यांनी ईश्वराची प्रार्थना करून काय मागायचे ते ईश्वराजवळ सांगितले आहे. कारण 'योगक्षेमं वहाम्यहम्' असे स्वतः भगवानच सांगतात—

**अनन्याश्चिन्तयन्तोमां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्यभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

आपल्या भक्ताची सर्व जबाबदारी ईश्वराने घेतलेली आहे. मी भक्ताचा सगळा योगक्षेम वहातो. योगक्षेम शब्दाचा अर्थ आपण समजतो की संसारामध्ये सगळी अनुकुलता ईश्वर करून देतो. पण खरा अर्थ असा आहे की, योग

म्हणजे आपल्याजवळ जे नाही ते मिळवून देणे. आणि क्षेम म्हणजे त्याचे संरक्षण करणे. संसारात आपल्याला पुष्कळ पाहिजे असते, तेही मिळते. परंतु खरा पारमार्थिक योगक्षेम वेगळा आहे. परमार्थात आपल्याला काय पाहिजे ? आपल्यात पुष्कळ दोष आहेत. त्या दोषांची निवृत्ती ही परमार्थात् अपेक्षित आहे. चांगले सद्गुण अपेक्षित आहेत. या सद्गुण संपत्तीचा परमार्थात उपयोग आहे. चित्ताच्या शांतीला या गुणसंपत्तीचा परमार्थात उपयोग होणार आहे. दोषनिवृत्ती करून गुणसंपत्ती भक्ताला मिळवून द्यायची हा योग आहे. आणि या गुणांचे संरक्षण करणे हा क्षेम आहे. भक्ताला दैवीगुण संपत्तीमध्ये स्थिर करावयाचे कार्य भगवंताचे आहे. हे जीवाच्या प्रयत्नाने मिळत नाही आणि टिकतही नाही. कितीही प्रयत्नवादी असला तरी दैवीगुणसंपत्ती मिळणार नाही त्याला ईश्वराची-सद्गुरूची कृपाच लागते. तरच ही संपत्ती मिळते आणि टिकते.

या ईश्वराने दिलेल्या गुणांचे रक्षणही आपल्या हातात नाही. काही काळ पारमार्थिक दृष्टीने चांगला जातो आपला. त्यावेळी बरं वाटतं. सेवा घडती आपल्या हातून. सगळं चागलं चाललेलं असतं. पण पुनः सगळं विसरून जातो आपण. नाही टिकवता येत आपल्याला. म्हणून आचार्यांनी षट्पदीच्या पहिल्याच श्लोकात त्यांनी म्हटलं आहे.

**"तारय संसार सागरतः"**

या संसार सागरातून मला आपण तारावं ! हे तारण्याकरता म्हणून काय जरूर आहे तेही सांगितलं आहे.

**अविनयम् अपनय विष्णो । दमय मनः शमय मृग तृष्णाम् ।**
**भूत दयां विस्तारय । तारय संसार सागरतः ॥१॥**

या श्लोकात चार प्रार्थना केल्या आहेत. प्रथम त्यांनी 'अविनयं अपनय' आमच्या मनामध्ये अ विनय म्हणजे उद्धटपणा, अहंकार, अभिमान—असं ज्याला आपण समजतो तो अविनय—अभिमान हा चित्तात उत्पन्न होणारा मोठा दोष आहे. तो अगोदर दूर व्हायला पाहिजे. ही पहिली प्रार्थना आहे. अविनय चित्तातून जाण्याला महत्व आहे. हा दोष गेला तर अमानित्व हा गुण येईल. अमानित्व, विनय, अहिंसा, शांती, हे सगळे गुण आहेत. हे गुण आपल्यात 'अ विनय' असल्याने येत नाहीत.

अमानित्व म्हणजे निरभिमान वृत्ती होणं आहे. या अमानित्व गुणाचं वर्णन श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी इतकं पराकोटीचं केलं आहे की—

**पूज्यता डोळा न पहावी । स्वकीर्ति कानी न ऐकावी ।**
**हा अमुका ऐसी न होआवी । से चि लोका ॥**

से म्हणजे सय म्हणजे आठवण असे अमानित्व आले पाहिजे. आपल्याला मनातून असे वाटले म्हणजे अविनय गेला, अभिमान गेला. कोणीही आपली आठवण करून देणं की हा असा अमूक मनुष्य आहे. अशी समाजात आठवणही न राहील इतके सामान्य होऊन रहाणे. आपली आठवण काढण्यासारखी परिस्थिती असूनही आपला सामान्यपणा, आपला साधेपणा पराकोटीचा पाहिजे. हे खरे अमानित्व. आपल्याला कोणी विचारणार नाही. सगळ्यांनीही आपल्याला विसरून जावं अशी मनाची वृत्ती आणि वागण्याची हातोटी याचे नाव अमानित्व. निरभिमान वृत्ति याला म्हणतात. आचार्य—महाराजांना हीच वृत्ती हवी आहे. म्हणून प्रार्थना 'अविनयं अपनय' अभिमान हा मोठा दोष आहे. अभिमानाचे स्थान असुरी संपत्तीमध्ये आहे.

**दम्भो, दर्पो, अभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।**
**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदं आसुरीम् ॥**

ही सगळी असुरी संपत्ती आहे. याला गुण म्हणत नाहीत. हे सगळे दोषच आहेत. तर, अभिमान हा दोष आहे. दुर्योधनाचा अभिमान शेवटपर्यंत होता. अभिमान असला म्हणजे स्वतःकडून होणाऱ्या दोषांची जाणीवच होत नाही. उलट अभिमान असल्यामुळे मी नेहमी उत्तमच वागतो, आमच्या हातून कधीही चुका होतच नाहीत, असंच सारखं वाटत असतं. म्हणून तर दुर्योधनाने पांडवांना इतका त्रास दिला. शेवटी अगदी त्याचा नाश झाला तरीसुद्धा शेवट-पर्यंत त्याचं मत बदललं नाही. असा हा अभिमान आहे.

युद्धात मरताना दुर्योधन धर्मराजाला म्हणतो— "आता करा राज्य. आमचा विनाश युद्धात झाला आहे म्हणून आम्ही स्वर्गाला जाणार, तेथे राहणार आहोत. तुम्ही राज्य करा आता ! युद्धात सगळे लोक गेलेले आहेत. हा गेला, तो गेला, करीत बसा ! बसा दुःख करीत ! राज्य हवयं ना, घ्या ! राज्य घ्या !"

पांडवांचा तरी विजय झाला म्हणजे काय, राज्य मिळालं इतकंच. अभिमन्यू युद्धात मारला गेला, अगदी शेवटी युद्ध संपल्यानंतर त्या अश्वत्थाम्याने द्रौपदीची

सगळी मुलं मारली. म्हणजे विजय मिळाला असं तरी कसं म्हणावं? म्हणजे दुर्योधनाचा अभिमान शेवटपर्यंत कायम राहिला आहे. शेवटीसुद्धा गेला नाही. समोर इतका विनाश झालेला आहे. सर्वस्व गेलेलं आहे. मुलं, बाळं, आप्त इष्ट सर्व गेलेले आहेत, तरी दुर्योधनाला त्याचे काही नाही.

पांडवांना दु:ख झालेले आहे. द्रौपदीला जास्तीत जास्त दु:ख झाले आहे. द्रौपदीही अभिमानी होती. पण ईश्वराच्या सामर्थ्याची तिला जाणीव आहे. ज्यांनी माझी विटंबना करण्याचा प्रयत्न केला त्या कौरवांचा नाश झाला पाहिजे हा तिचा अभिमान आहे. पण त्यामध्ये अन्यायाची चीड आहे. अन्यायाने वागणाऱ्या दुर्योधन, दु:शासन वगैरे सर्व कौरवांचा नाश झाला पाहिजे, तरच वेणी बांधीन म्हणाली. तिने त्यावेळी सुटलेली वेणी बारा तेरा वर्षे बांधली नाही. तसेच मोकळे केस ठेवले. तर हा अभिमान आहे पण हा अभिमान ईश्वराजवळ आहे.

कृष्णाला शिष्टाईला पाठविण्याचे ठरले. धर्मराजाने कृष्णाला जाताना सांगितले "तुम्ही एकदा जाऊन त्या दुर्योधनाची समजूत काढा. मला युद्ध नको, युद्धाची मला इच्छा नाही." द्रौपदीला हे पटले नाही. तिने शेवटी कृष्णाची भेट घेऊन सांगितले "तुम्ही संधी करू नका, युद्ध होऊ दे. सर्व कौरवांचा नाश झालाच पाहिजे, तह करू नका." श्रीकृष्णांनी तिची इच्छा पूर्ण केली. युद्ध ठरवून आले.

त्या भयंकर अन्यायाची चीड होती द्रौपदीला! त्या दुष्ट कौरवांचा नाशच झाला पाहिजे ही तळमळ होती. म्हणून तो अभिमान मनामध्ये होता. ती तळमळ शांत झाली, कौरव मारले तेव्हां! आणि तिचा अभिमानही गेला. कौरव कोणीही जिवंत राहू नये हा तिने एक प्रकारचा शापच दिला होता. सतीचा शाप होता तो! सीतेचा शाप रावणाला लागलेला आहे. रावणाचा सर्वनाश झाला आहे.

रावणही अभिमानी! अभिमानामुळे ब्रह्मदेवांच्याजवळ वर मागताना मागितले "देव, दैत्य, गंधर्व, दानव वगैरे कोणाकडूनही मला मरण येऊ नये." रावणाला वाटले मानव माझे काय करणार आहे? मनुष्य माझ्याविरुद्ध उठणे शक्यच नाही म्हणून वरात 'मनुष्य' शब्द घातला नाही. या अभिमानाने वर मागितला. वानर तर काय मानवापेक्षा क्षुद्र! पण मनुष्य आणि वानररुपानेच रावणाचा नाश झालेला आहे.

त्या महिषासुरानेसुद्धा असाच वर मागितला होता. 'कोणत्याही पुरुषाकडून मला मरण येऊ नये.' म्हणाला, स्त्री काय करणार? ती अबला आहे अशीच त्याची समजूत होती. कारण अभिमान! त्यामुळे देवाला स्त्री अवतार धारण करावा लागला. सर्व देवांच्या शरीरातून निघालेल्या तेजातून ती महालक्ष्मी म्हणजे महिषासुरमर्दिनी उत्पन्न झाली आणि तिने त्याचा नाश केला. अशी पुष्कळ उदाहरणे आहेत.

अभिमानी मनुष्याच्या हातून फार अन्याय होतो. त्यात त्याचेही कल्याण नाही, इतरांचेही कल्याण नाही म्हणून प्रथम ही प्रार्थना केली आहे.

**"अविनयं अपनयं विष्णो ॥"**

ही प्रार्थना विष्णुला केली आहे. विष्णु याचा अर्थ भगवान महाविष्णु हा प्रसिद्ध आहे. विष्णु म्हणजे सर्वव्यापक. सर्व ठिकाणी जो परमात्मा आहे. तोच सद्गुरुही झालेला आहे. अनेक अवताररूपाने होणारा विष्णुच आहे. सर्व ठिकाणी रहाणारा परमात्मा.

**"स्थिर चर व्यापूनि अवघा । तो परमात्मा दशांगुळी उरला"**

पुरुष सूक्तामध्ये तो सर्वव्यापी आहे असे सांगितले आहे. सर्व विश्व हे त्याचेच रूप आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची शेवटी प्रार्थना आहे, की विश्व हाच देव आहे. विश्वरूपी तो आहे. "आता विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञे तोषावे." श्रीतुकाराममहाराज सुद्धा सांगतात की– "मनो वायुरूपा ॐकार स्वरूपा । विश्वाचिया रूपा पांडुरंगा ॥" ही सगळी ज्ञानी मंडळी ईश्वराचे स्वरूप केवढे मोठे आहे ते सांगतात. तो विश्वरूपी आहे. त्याचे स्वरूप म्हणजे विश्व आहे. म्हणून त्याला विष्णु म्हणतात. त्यात केवळ मानवच येतील असं नाही. मानव आहेत त्याचप्रमाणे पशुपक्षीही त्याचीच स्वरूपे आहेत. ही वृत्ती या ज्ञानी मंडळींच्या अंतःकरणात उत्पन्न झाल्यामुळे त्यांचा आणि अहंकाराचा काहीही संबंध नाही. म्हणून त्यांची वृत्ती निरभिमान झालेली असते. त्यांच्या वृत्तीत अहंकार कधी पाहायलासुद्धा मिळत नाही. म्हणून अहंकार हा पहिला दोष पार गेला तर परमेश्वराच्या कृपेने संसारसागरातून तरून जाता येते. त्याकरिता आचार्यांनी हे मागणे मागितले आहे.

**" तारय संसार सागरतः "**

हे सगळे मानसिक दोष आहेत. शरीराचे नाहीत.

"दमय मनः" ही दुसरी प्रार्थना आहे. मनाचा निग्रह झाला पाहिजे. कोणत्याही वासना मनामध्ये उत्पन्न होऊन उपयोग नाही. शुभवासना तरी असाव्यात किंवा नसाव्यात हाही एक मोठा प्रश्न आहे. अशुभ वासनेमुळे स्वतःचे आणि दुसऱ्यांचे नुकसान आहे. त्याला असुरच म्हटले आहे. विषयाकडे नेहमी लक्ष आहे. "विषय भोगप्रधान वृत्ती." त्याला असुर म्हणतात. या अशुभ वासना मनामधून गेल्या म्हणजे चांगले आहे. शुभ वासना असेनात का ! उत्सव व्हावेत, देवाचं अखंड नामस्मरण घडावं, दानधर्म आपल्या हातून घडावा, काही तप करावं, कायिक-वाचिक-मानसिक तप घडावं इ० या सर्व चांगल्या वासना आहेत. या असल्या तर काय हरकत आहे ? पण ज्ञानी महात्मा जो आहे, उच्च भूमिका असलेला, ज्याचे अन्तःकरण निर्वासन झालेले आहे, ज्याला भगवंताने 'सर्व संकल्प संन्यासी' म्हटले आहे. त्याला काही वासनाच नाही आहे. अशुभ तर नाहीच पण शुभही नाहीत. हे असं व्हावं, तसं व्हावं ही काही, इच्छाच नाही.

पुण्याला पानशेतचा पूर आला. सर्व गावात पाणी झालय. सगळा चिखल झालाय, जमीन भिंतींना ओल आलेली आहे. महाराजांना राहायालासुद्धा जागा नाही. मंडळीही पुष्कळ येतात. जागा पुरत नाही. सर्वांची इच्छा आहे की, पुण्यात महाराजांना राहायाला स्वतंत्र आश्रम तयार करावयाचा आहे. पण महाराजांचं सांगणं निराळं ! "गुरुमहाराजांची इच्छा असेल तसं होईल" एवढंच सांगायचे श्रीसद्गुरू महाराजांच्या इच्छेने, कृपेने पूर्ण होईल असेही म्हणत नाहीत. म्हणजे त्यातही महाराजांच्यावर सोपवायचं नाही. तुम्ही करा काही हरकत नाही. महाराज कृपा करतील. तुमची इच्छा पूर्ण होईल असेही नाही. जे होईल ते त्यांच्या इच्छेने होईल. म्हणजे स्वतःचा संकल्प नाही. भगवंताने या महात्म्यांना 'सर्व संकल्प संन्यासी' म्हटले असले तरी पुढे वर्णन करतात.

**" सर्वभूत हिते रतः "**

विरोधी आहे असे वाटेल आपल्याला. सर्व संकल्प संन्यासी जो महात्मा असतो तोच 'सर्वभूत हिते रतः' अशा भूमिकेवर असतो. सर्वही भूतांचे, प्राणीमात्रांचे हित करणारा हा महात्मा असतो. श्रीनारायणस्वामीमहाराज देवीच्या आणि श्रीदत्तात्रेयांच्या आज्ञेप्रमाणे त्या डोंगरावर गेले. त्या वाघाच्या पायातील काटा काढला आणि त्याला व्यवस्थित करून सोडले. म्हणजे हे महात्मे नुसत्या

मानवाच्याच नाही तर सर्व प्राणीमात्रांच्या कल्याणामध्ये, हितामध्ये रमलेले असतात. "सर्वभूत हिते रत:"

मनामध्ये स्वत:बद्दलची किंचित जरी ममता राहिली तर सर्व भूतांचे हित तो करू शकत नाही. स्वत:चे हित पाहून मग त्याला अविरोधी असेल तेवढेच करावं ही बुद्धी 'सर्वभूत हिते रत:' होऊ शकत नाही. मी, माझं, माझ मन हे नाहिसे व्हावे लागते, तेव्हां मनुष्य सर्व संकल्प संन्यासी होऊ शकतो. तो सर्वभूत हिते रत: असतो.

तर, ज्याच्या मनातून सर्वही वासना गेलेल्या आहेत, त्याचेकडून ईश्वरी आज्ञेने ते कार्य घडत असते आणि पारही पडत असते. त्यामुळे त्याच्या मनात अहंकार रहात नाही. ते स्वत:चे कर्तृत्व आहे असे त्याला वाटत नाही. चांगदेवांचे हित करावं अशी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची इच्छा आहे. चांगदेवालाही ज्ञानेश्वरांना गुरु म्हणून शरण जाण्याची इच्छा आहे. पण मध्ये तो अहंकार आडवा आला. मी मोठा, ज्ञानेश्वर लहान. म्हणून पत्र लिहिताना नमस्कार का आशीर्वाद हा गोंधळ मनाचा झाला. कोरा कागद पाठवून दिला. वास्तविक चांगदेवांचे केवढे योगसामर्थ्य होते. किती योगसिद्धी मिळविल्या होत्या. १४ वेळा मृत्यू परतवून. लावला. चौदाशे वर्ष राहिले. इतकेच नव्हे तर समाधीतून उठल्यावर ज्यांना ज्यांना मृत्यू आला त्यांनाही ते जिवंत करीत. असं सगळं सामर्थ्य आहे त्यांचे ! पण 'दमय मन:' ही प्रार्थना आचार्य करतात. मनाच दमन झालं पाहिजे. मनामध्ये अशा प्रकारची विरोधीवृत्ती कोणतीही उत्पन्न होऊन उपयोग नाही. अहंकार तर गेलाच पाहिजे. त्याच्याकरिता आचार्यांची स्वतंत्र वेगळी प्रार्थना आहे.

योगशास्त्रकारांनी अभ्यास करावयाची जी पद्धति सांगितली आहे ती अशी आहे, कोणत्याही वासना मनामध्ये असून उपयोगी नाही, अशुभ तर नाहीच परंतु शुभ सुद्धा उपयोगी नाही. मनामध्ये शुभ आणि अशुभ दोन्हीही वासना असू नयेत. अशुभ वासना सगळ्यांच्या मनात सारख्या असतात, चांगल्याही असतात. स्वार्थी वृत्ती मनात असली तरी आपल्याला बरं म्हणणारे, योग्य समजणारे, मान देणारे जे लोक आहेत त्यांचे कल्याण व्हावे अशी इच्छा मनात स्वार्थ असूनही होत असते. हेही चांगलेच आहे. काही हरकत नाही. मी एकट्यानेच सुखी व्हावे माझ्याशिवाय दुसर कोणी सुखी असो वा नसो मला त्याचं काही नाही अशी भावना नाही.

वासनाक्षय हा ममतेचा विषय आहे. 'निर्मम' झाल्याशिवाय वासनाक्षय होत नाही. मोठी भूमिका आहे. ज्ञान झाल्याचे ते चिन्ह आहे. स्वतःचे, स्वतःच्या मनाचे काहीही नाही. सर्वही कार्य ईश्वरी शक्तीने चालले आहे हा एक मोठा विश्वास पाहिजे. हे मोठं-खरं ज्ञान आहे. हा खरा सिद्धांत कळला पाहिजे. आपण माध्यम होऊ-कार्य आपलेकडून ईश्वर घडवून घेईल. कर्तृत्व आपले नाही. जीवाच कर्तृत्व काहीच नाही असा त्याचा अर्थ नाही.

मारुतीराय समुद्र उल्लंघन करून लंकेला गेले. सीतेचा शोध केला. सीतेला धीर नि आश्वासन दिलं. पण तेवढच काम करून आले नाहीत. आपण शत्रूच्या राज्यात आलोच आहोत तर शत्रूची शक्ती काय आहे ती पाहणे आपले काम आहे. ते राजदूत होते. राजदूत सांगकाम्या असून उपयोगी नाही. सांगितले तेवढेच करायचे हा सांगकाम्या. म्हणून मारुतीरायाने रावणाची शक्ती अजमाविण्याकरता त्या वनाचा नाश केला. त्याचा एक मुलगा ठार मारला. पुष्कळ सैन्य मारलं. मारुतीरायाला धरून राजसभेत नेले. त्यांना तेच पाहिजे होते. राजसभेमध्ये गेल्यावर रावणाने विचारले "कोण आहेस रे तू ?" उत्तर दिले, "मी रामदूत आहे." मारुतीराय भूमिगत झाले नाहीत. कारण काय भूमिगत होण्याचे ? स्वतःच्या सामर्थ्याची त्यांना खात्री आहे. मारुतीरायाने राजसभेत आणखी सांगितले की "तुझा नाश करायला लवकरच रामचंद्र येणार आहेत." रावणाला त्याच्या सभेमध्ये त्याच्या मंत्रीमंडळाच्या समक्ष सांगून मग मारुतीराय तेथून निघाले. म्हणजे कर्तृत्वाला वाव ईश्वरानुकूल कार्य असेल तर आहे. ही सुद्धा इश्वरेच्छा आहे.

याला अभिमान म्हणणार काय ? हा अभिमान नाही. लोकांनी मला विसरून जावं. याचा अर्थ असा की आपण केलेले कर्म कदाचित मोठ असलं तरी आपण ते विसरून गेले पाहिजे. त्यावेळी ते अमानित्व येते, कीर्ती नको, कीर्तीची इच्छा सुद्धा नको ही स्थिती अमानित्व आहे. मी कोण ? करणारा कोण आहे ? जीवात्म्याचे कर्तृत्व मर्यादित आहे हे मान्य करतात. पण वृत्तीत ते उतरत नाही.

मारुतीरायांनी सांगितलं मी समुद्र उल्लंघन करू शकत नाही. माझी शक्ती एवढीच आहे, या झाडावरून त्या झाडावर उडी मारणं ! म्हणजे समुद्राचे उल्लंघन मारुतीरायाने आपल्या मर्यादित शक्तीच्या जोरावर केलेले नाही. याची जाणीव

असल्याने समुद्र उल्लंघनाचे कर्तृत्व ते स्वत:कडे घेत नाहीत, तो रामाचा प्रभाव आहे. म्हणजे मोठं कार्य झालं म्हणजे आपण केलं, तेथे ईश्वर वगैरे काही नाही. ही वृत्ती मनात उत्पन्न झाली की संपलं ! माझं कर्तृत्व आहे म्हणून ईश्वर अनुकूल आहे असे वाटते ते असुर, हिरण्यकश्यपूने नुसते उभे राहून केवढी घोर तपश्चर्या केली. ब्रह्मदेवसुद्धा आश्चर्यचकित झाले. त्यांच्या शरीरात या तपश्चर्येने रक्तमांस काही शिल्लक राहिलं नाही. आपल्या कर्तृत्त्वाने ईश्वर अनुकूल झाला असे वाटणे म्हणजे केवढा अहंकार आहे. कृतज्ञता सुद्धा रहात नाही. आम्ही तपश्चर्या केल्या-मुळे ईश्वराने वर दिला असे वाटले त्याला. आमची तपश्चर्या महान आहे हा अहंकार ! आमच्या तपश्चर्येमुळे ईश्वराने वर दिला म्हणजे ईश्वराचे सामर्थ्य गौण आहे ही भावना. अशी वृत्ती रहाणे त्याला असुर म्हणतात.

पण मारुतीरायाचे उदाहरण पहा. द्रोणागिरी पर्वत उचलून आणला, समुद्र उल्लंघन केला. अशी सगळी कर्मे केली पण मारुतीराय म्हणतात हे सर्व रामचंद्रांच्या प्रभावाने झाले. मी काही केले नाही. मी करूच शकलो नाही. हे त्यांचे नुसते शब्द नाहीत. आपल्या कर्तृत्त्वाचा मनात सुद्धा विचार नाही. या वृत्तीला 'निवासन मन' म्हणतात. कर्तृत्त्वाची जाणीवही नाही, स्वत:च स्वत:ला विसरल्याशिवाय लोकांनीच मला विसरून जावं असं म्हणता येणं शक्य नाही. मी काँग्रेसचा चार आण्याचा सुद्धा सभासद-कार्यकर्ता नाही, हे सांगायला कशाला पाहिजे ? त्यांतही माझी आठवण ठेवावी म्हणूनच लोकांनी मला विसरून जावं हे म्हणणे नुसते शाब्दिक होणार आहे. बाहेर कशाला सांगायला पाहिजे ? निवृत्ती ही सांगून उपयोग नाही. तोही अभिमानच आहे. 'युद्धातून मी निवृत्त होणार' असे अर्जुन भगवतांना म्हणाला. तेव्हां भगवान म्हणतात हा तुझा अहंकार आहे. ही तुझी दया नाही. मी मोठा आहे, विचारी आहे, असं तुला वाटतं ! मी युद्धात भाग घेतला तर हे सगळे माझ्यामुळे मरून जातील असं तुला वाटतय ! हा तुझा अभिमान आहे. दया कसली ही ?

म्हणून "दमय मन:" ही प्रार्थना आहे. हे मनाचे दमन करायचे म्हणजे फारच मोठे नि अवघड आहे. शास्त्रावर विश्वास आहे. त्याप्रमाणे तपश्चर्या पण होत आहे. आपण कष्ट करतो आहोत. पण शेवटी आपण तपश्चर्या केली म्हणून देवाने वर दिला, अशी जर वृत्ती झाली तर ? कुठे झाले मनाचे दमन ?

हिरण्यकश्यपूला शंका होती. त्याने गुरुजींना विचारले, "तुम्ही गैरहजर

असता वाटतं शाळेतून वरचेवर ? देवाकडचे लोक, कोणकोणत्या वेषाने येत असतील. शाळेत आणि प्रल्हादाला उपदेश करीत असतील. मुलांना हरिभजन करायला त्यांनी शिकवलं असेल. तुमच लक्ष नाही शाळेकडे." असा हिरण्यकश्यपूने गुरुजींना दोष दिला. तेव्हा गुरुजींनी प्रल्हादाला विचारले, "प्रल्हादा, खर सांग, तुला कोणी शिकवलं भजन करायला ?" प्रल्हाद म्हणाला "मी भजन करीतच नाही. ते आतूनच होतय ! जो अंतर्यामी परमात्मा आहे, तो सर्वव्यापी विश्वात्मा आहे. आत बाहेर सगळीकडे तोच आहे. त्याच्या प्रेरणेने सगळी इंद्रीये काम करतात. मी काहीही करू शकत नाही. इंद्रिये माझी नाहीत."

**आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा कृपावंत वाचा त्याची ॥**

सर्व काही त्याच्या इच्छेनं झालेलं आहे, ही वृत्ती शेवटपर्यंत दृढ असल्याने प्रल्हादजी भक्त आहेत आणि हिरण्यकश्यपू असूर आहे.

रावणही शिवभक्त होता. त्याने आपली दहा मस्तके तोडली काय ? शीरा काढल्या काय ? तंतुवाद्य केले काय ? गायन केलं ! उत्तम गवई होता तो. सर्व रागांच ज्ञान होतं ! परंतु मनाचं दमन नाही. बिभीषणाने सांगितलं, मंदोदरीने सांगितले, "ही परस्त्री आहे. रामाला देऊन टाका." पण रावण त्यांना म्हणाला "आम्ही राक्षस आहोत, सगळ्या स्त्रिया आमच्या आहेत, आमच्या दृष्टीने कोणतीही स्त्री परस्त्री नाही." मुख्य नेताच जर म्हणायला लागला की, सर्व स्त्रिया आमच्या आहेत. वाटेल त्या स्त्रीया आम्ही आणू शकतो. तर मग अनुयायी यापेक्षा वेगळे काय करणार ? अशा राज्यात समाजाची व्यवस्था काय होईल ? अशी स्थिती पाहिल्यावर बिभीषणाने रावणाला सोडून दिले. आधी ज्येष्ठ बंधू म्हणून सांगून पाहिलं, प्रार्थना केली, वाट पाहिली, सगळं केलं; पण 'नाही' असं जेव्हा रावण म्हणाला, "नाही सीता द्यायची नाही. काय कारण ? आम्ही कशाला देऊ ? स्त्रिया सगळ्या आमच्या आहेत." मग बिभीषण म्हणाला "हा जिवंत राहून उपयोग नाही." मग राम आल्यावर बिभीषण रामाला शरण गेला आहे. रामानीही त्याला आश्रय दिला आहे. मनाचे पूर्ण दमन ईश्वराच्या कृपेशिवाय होत नाही. सगळ्या इंद्रियांच्या सगळ्या वृत्ती आवरणे मुख्य आहे. यासाठी योगशास्त्रकारांनी अभ्यास सांगितला आहे. आधी शुभवासना वाढविण्याचा अभ्यास करावा. 'सर्वां मुखी मंगल बोलवावे' हे मुद्दाम सांगितले आहे. हा अभ्यास झाला म्हणजे आपोआप अशुभ वासनांची निवृत्ती होते. पुढे शुभ-

वासनाही शांत होतात. ईश्वराच्या कृपेने जे व्हायचे ते होते. पण आपला अहंकार मोडून कर्तृत्वाभिमान वृत्ती बंद झाली म्हणजे मनाचे दमन होते.

आता तिसरी प्रार्थना आहे—

**" शमय विषय मृग तृष्णाम् । "**

त्याचा सिद्धांतही ते सांगतात आणि प्रार्थनाही करतात, विषयमृगतृष्णा—विषयांची तहान, विषयांची इच्छा—भागली पाहिजे. पंचविषयामध्ये सगळ्यांचा अंतर्भाव आहे. सगळी सुखसाधने याच्यामध्ये अंतर्भूत आहेत. ही शांत करा. विषयांची सारखी तहान लागली आहे. कितीही प्रयत्न केला तरी ती तहान शांत होत नाही. पण ही 'मृगतृष्णा' आहे. मृगाला—हरिणाला—तहान लागली आहे. पुढे पाणी दिसतं आहे. ते पाणी पिण्याकरता तो मृग उन्हातून सारखा धावतो आहे. थोडे दूर आणखी किरणे पडली आहेत. तिथंही त्याला पाणी दिसतयं ! तिथपर्यंत गेल्यावर त्याच्या पुढे आणखी पाणी दिसतयं ! तो मृग तिथपर्यंत धावतो आहे. किती धावणार तो ? त्याची तहान कधी शांत होणार ? विषय मिळाले तर शांत व्हावे ना ? पण नाही ! आपल्याला वाटते सगळे विषय स्थिर आहेत त्यांच्यापासून मिळणारे सुखही स्थिर आहे. मीही अजरामर आहे असे वाटते. अशा भावात सगळे जीवन चालले आहे.

एका मनुष्याने बंगला बांधला. सगळ्या सोयी त्यात केल्या. वाटतं मनुष्याला ! आपण बंगला बांधला आहे. अमुक सोयी केल्या आहेत. इथे देवघर आहे. इथे अमुक आहे. इथं तमुक आहे. असं दाखवतात. त्यालाही तशीच संवय झाली. येईल त्याला बंगला दाखवीत होता. एका साधु पुरुषाला त्यानं आणलं. त्याला सगळा बंगला दाखविला. सगळं काही सांगितलं. साधु पुरुष म्हणाले 'बरं झालं' पण तो मनुष्य म्हणाला "नाही यात कमी काय आहे, न्यूनता काय आहे ते सांगा." ते म्हणाले "मी बोलत नाही. उगीच तुला राग येईल." तो मनुष्य म्हणाला "नाही नाही. तुम्ही सांगा मला. म्हणजे त्या प्रमाणे दुरुस्ती करून घेईन." साधू म्हणाले "बघ, विचार कर, या घरात दोन दोष आहेत. हे घर तू असतांना नष्ट होईल किंवा तू तरी नष्ट होशील. ही कशी दुरुस्ती करणार तू ?" त्याला वाटले काही सुचवतील. ते म्हणाले "कशाला विचारलेस, जातो मी !"

आणि हे खरंच आहे. विषय अस्थिर आहेत. ते संपणारे आहेत.

विषयांचा फार मोठा संग्रह आहे, पण तो संपणारा आहे. तो मृग जसा पाणी आहे. पाणी आहे म्हणून सारखा धावतो आहे. तस पुढे सुख आहे म्हणून मनुष्य सारखा धावतो आहे. वास्तविक सगळ ही अस्थिर आहे. संग्रह स्थिर आहे आणि मीही स्थिर आहे, ही फक्त मनोभावना आहे. ही तृष्णा थांबवणं जीवाच्या प्रयत्नांनी शक्य नाही. कारण ती तृष्णा वाढतच जाते. हा भ्रम आहे. विषयसुख मिळवून आपण शांत-सुखी होऊ ही आपली समजूत चुकीची आहे, असे कधी वाटतच नाही. ती जाण्याचा प्रयत्न म्हणजे देवाजवळ प्रार्थना आहे ज्ञानेश्वरमहाराजांनी ते पसायदान देवाजवळ मागितले आहे. त्याशिवाय आणखी कोणीही प्रयत्न करू शकणार नाही.

शेवटी 'भूतदयांविस्तारय' ही महत्वाची प्रार्थना आचार्यांनी केली आहे. दु:ख निवृत्ती व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे. दु:ख पाहिल्याबरोबर जी वृत्ती उत्पन्न होते ती दयावृत्ती आहे. स्वत:ला दु:ख झाले, पायात काटा मोडला, ताप आला, डोक दुखतयं. तेव्हा सारख वाटत असते. केव्हा बर होईल ? केव्हा बर होईल ? असं दुसऱ्याचही दु:ख पाहून वाटले पाहिजे. दुसऱ्याच्या अन्त:करणाशी ज्यावेळी समरस होता येईल त्यावेळेला त्याचही दु:ख कमी होईल. त्याचही दु:ख गेलं पाहिजे, असे वाटले पाहिजे.

प्रल्हादजींना नृसिंह प्रसन्न झाले. काही तरी वर मागून घ्या म्हणाले. तेव्हा प्रल्हादजी म्हणाले, "वर मागण्यासाठी भक्ती करीत नाही." निष्काम भक्ती आहे. ही भक्तीसुद्धा मी करतो. अशी प्रल्हादजींची समजूत नव्हती. देवाच्या कृपेने भक्ती होत आहे असा त्यांचा विश्वास होता.

**"नामा म्हणे केशवा । केला पण चालवी माझा"**

मी काही करीत नाही. करविणारा तो आहे. त्याच्या कृपेने सर्व होते कर्ता मी दिसलो तरी करविता तोच आहे. म्हणून कर्त्यापेक्षा करविता- करवून घेणारा मुख्य आहे. हे खरे ज्ञान आहे.

तर अन्त:करणामध्ये दु:ख पाहिल्याबरोबर दया उत्पन्न होणे हे ज्ञानी, महात्मे, संत यांचे पहिले लक्षण आहे. प्रल्हादजींना वडिलांची दया आली आणि त्यांच्या कल्याणाचा वर मागितला. भागवतामध्ये सत्पुरुष कोणाला म्हणावे याची तीस लक्षणे सांगितली आहेत. ती लक्षणे तपासणाराही तसाच असला पाहिजे.

नाहीतर त्याला ही बुवाबाजी वाटेल. कृपाळू, सहनशील, सत्यनिष्ठ, शुद्ध चित्ताचा इ. गुण सांगितले आहेत.

परीक्षा पहाणे हा दोष नाही. स्वतःच्या जन्माचे कल्याण करून घ्यायचे आहे. त्याकरता संत सत्पुरुषांना तपासून नको का घ्यायला ? खरं आहे हे. पण त्यासाठी आधी काही दिवस सतसंगतीमध्ये राहिले पाहिजे. अनुभव घ्यावा. चांगल दिसल तर श्रद्धा वाढेल. संतांच्या सहवासात राहिलं, चांगले अनुभव यायला लागले आणि श्रद्धा वाढू लागली, तर पुष्कळ झाले की ! नुसती नांवे ठेवून काय उपयोग ? त्यापेक्षा आपलं कर्तव्य करीत रहाणे चांगले. तेव्हां संतांसारखी दयावृत्ती अन्तःकरणात उत्पन्न होणे फार कठीण आहे.

**"जे जे भेटले भूत । ते ते मानिजे भगवंत"**

ही संतांची दृष्टी नुसते ऐकून, वाचून येणारी नाही. सर्वत्र ईश्वर भरला आहे ही भावना ज्यांच्या मनांत उत्पन्न झाली ते संत ईश्वराचे कार्य कसकसे चालले आहे हे पाहाता आले म्हणजे ही दृष्टी येते. आपल्याला अनुकूल किंवा प्रतिकूल जे वाटते ते आपल्या वृत्तीमुळे वाटत असते. दुसरी काही तरी शक्ती आहे. तिच्या सामर्थ्याने सारे घडते हे कळले पाहिजे. हा विचार केल्यानंतर कळून येते. अनुकूल, प्रतिकूल परिस्थितीमध्ये कसे रहावे हे त्यांनी सांगून ठेवले आहे.

**"दुःखेषु अनुद्विग्न मनः । सुखेषु विगत स्पृहा ॥"**

संसारात सुख आणि दुःख दोन्हीही आहेत. तेव्हा कसे रहावे हे सांगितले आहे, हे विवेकाने साधते. ज्याला विवेक साधला त्याला हे साधलेले आहे.

ही जी दुःखं उत्पन्न झालेली आहेत याचे कारण ती ती पूर्वकर्मे आहेत. हा एक सिद्धांत आहे. तर्कानेही सिद्ध होणारा आहे. नुसतं शब्दप्रमाण आहे. रामायणात लिहून ठेवला आहे. व्यासांनी लिहून ठेवला आहे. तो तर्कशुद्ध आहे. अकल्पित ज्या घटना घडतात त्याला काय कारण असते ? एकदम पाय घसरून पडला. फ्रॅक्चर झालं. अमूक झालं, तमूक झालं. काय त्याची इच्छा होती का दुसऱ्याची इच्छा होती, तो पडावा म्हणून ? पण घडले. इच्छा होती, पण कोणी ढकलले आहे का ? इच्छा असू शकते की, याचं एकदा नुकसान व्हावं-वाटतं-पण तसं काही होत नसतं. तरी अचानक एकदम दुःख उत्पन्न होतं, त्याला कारण काय ? कारणाशिवाय कार्य होत नसते. हे आधुनिक बुद्धिवाद्याला

सुद्धा मान्य होईल. कार्य व्हायला कारण काय आहे ? हा काही नास्तिकपणा नाही. चिकित्सा म्हणजे नास्तिकपणा नव्हे. बरोबर विचार झाला पाहिजे. कारण काय आहे ? हा कारण विचार सुरू केला असतांना, शास्त्रज्ञ, संत, महात्मे यांचे म्हणणे असे आहे की, 'याला जे दुःख मिळालेले आहे याचं कारण याच्याच जवळ आहे, भोजन तयार झालेले आहे. दुसऱ्या घरात ताट वाढून ठेवलेले आहे. तेव्हा या घरात इथं बसून त्याला तृप्ती झाली असे कसं म्हणता येईल ? कसं शक्य आहे ते ? ज्याला भूक शांत करावयाची आहे त्याला त्याने स्वतः भोजन केले तरच भूक शांत होईल. कार्य आणि कारण एका ठिकाणी असलं पाहिजे. म्हणून दुःखभोगांचे कारण ज्याची कर्मे हेच आहे.

तुकाराममहाराज सांगतात—"वाढीला उद्वेग दुःखचि केवळ । भोगणे ते फळ संचिताचे" त्यांना काही कळत नव्हतं असं म्हणता येणार नाही. अत्यंत विचार करून साधू, महात्मे लिहित असतात, बोलत असतात. त्यांनाही बुद्धी आहे. त्यांची बुद्धी फार मोठी आहे.

**"न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो"**
**"विटंबो शरीर होते का विपत्ती । परी राहो चित्ती नारायण"**

जगाच्या कितीविरुद्ध ही मागणी आहे ? कोणी तरी याला मान्यता देईल ? तुकाराममहाराजांना काही कळत नव्हते म्हणून त्यांनी असे लिहून ठेवले असे वाटते. आपल्याला–व्यवहारात आपल्याला वाटतं, खायला-प्यायला पाहिजे. संपत्ती वाढली पाहिजे. संकट-आपत्ती-विपत्ती कधी येऊ नये. मानसन्मान मिळावा. पण महाराजांना असं वाटत का नाही ? याचा विचार झाला पाहिजे.

ते म्हणत—मला संपत्ती नको, धनधान्य नको, काही नको—पण "परि राहो चित्ती नारायण" हे एवढं पाहिजेच. हे त्यांनी मनोगत व्यक्त केले आहे. अगदी लिहून ठेवले आहे. प्रसिद्धही आहे. यावरून तुकाराममहाराजांना खरोखर व्यवहाराची काही कल्पनाच नव्हती, ते व्यवहार विन्मुख होते असे नाही. हे तर्क आहेत.

**"तुका म्हणे सगळे रे नाशवंत । आठवे गोपाळा तेचि द्रव्य"**

या शेवटच्या चरणात तुकाराममहाराजांनी कारण सांगितले आहे. हे सगळे नाशिवंत आहे आणि ईश्वर शाश्वत आहे. त्या साधूने त्या मनुष्याला हेच सांगितले. 'तू तरी जाणार किंवा घर तरी जाणार'. कारण नाशिवंत आहे

दोन्ही ही. तेव्हां संपूर्ण नाशिवंत गोष्टींच्या संग्रहाची इच्छा बाळगणे हा खरा बुद्धीवाद आहे कां, केव्हांही ज्या नाश होत नाही, अशा सच्चिदानंद परमात्म्याचे स्मरण राहो, त्याची आठवण राहो, हे मागणे– मागणे हा खरा बुद्धीवाद आहे ? त्यांनी सांगितले आहे की उद्वेग करून उपयोग नाही. दुःखाचे कारण म्हणजे पूर्वकर्म आहे. हा तर्क सिद्धांत आहे. अशारितीने कर्म सिद्धी एकदा तर्काने सिद्ध झाल्यानंतर ईश्वराची सिद्धी आपोआप होते. ईश्वर मानावा लागतो.

कर्म अचेतन आहे. ऑफिसमध्ये एकजण नियमीत, वेळेवर जातो. रजा घेत नाही. काम चांगलं करतो. या कर्माचे फळ त्याला प्रमोशन मिळणे हे आहे. पण ते फळ देणारा त्याचा वरचा अधिकारी असतो. तो अधिकारी याचे कर्म पाहून फळ देत असतो. तो अधिकारी-कर्मफळ देणारा-सचेतन आहे. चेतन कोणीतरी मानल्याशिवाय कर्माचे ज्ञान- कर्म साक्षी- कर्माची शिफारस आणि कर्माचे फळ देणे शक्य नाही.

चांगलं वागावं, चांगल्या वासना कराव्यात, एवढ्यानेच काम भागत नाही. त्याचे फळ देणारा ईश्वर आहे. ईश्वराची भक्ती केली पाहिजे. अखंड विश्वाचे कार्य कर्मन्यायाने चालले आहे. सर्व कर्मांचा ज्ञाता तो सर्वज्ञ आहे. त्याचे ऑफिस फार मोठे आहे. त्या ईश्वरासंबंधीचे ज्ञान, त्याची कल्पना, त्याची सिद्धी– तर्क आणि चिकित्सेतून मिळते. आपोआप नव्हे.

हा कर्म सिद्धांत संतांनी विचारपूर्वक समजून घेतला त्यामुळे ते सुखी झाले. कर्माने जरी सुख दुःख मिळत असले तरी ती जाणारी आहेत. ज्ञानाने धीर येतो. दुःख भोगत असताना मनाला काहीही दुःख होत नाही याचे. कारण गीतेमध्ये आरंभालाच हा सिद्धांत सांगितलेला आहे.

**“मात्रा स्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्ण सुखदुःखदाः**
**आगमापायिनोऽनित्यास्तां तितिक्षस्व भारत ॥ ”**

सुख आणि दुःख येते आणि जाते. आलेले सुख किंवा दुःख जाणारच आहे. या विचारांनी मनुष्य सहन करतो. हे सहन करण्याचे जे धैर्य आहे त्याला तितिक्षा म्हणतात. व्यवहारात आजारी असताना म्हणतो तो ‘औषध चालू आहे. बरा होईन मी’. या नुसत्या विचारांनी सुद्धा मनुष्याला समाधान वाटते. आजच्या-पेक्षा उद्या वेदना कमी होईल. या आशेवरच आपण जगत असतो ना ? व्यवहारामध्ये सुद्धा प्रत्येक गोष्टीत आपण आशेवर समाधान मानतो. तेच

समाधान या ठिकाणी विवेकाने विचार करून मानायला सांगितले आहे. हा संतांचा बुद्धीवाद आहे. आणि तशी वृत्ती अन्तःकरणामध्ये उत्पन्न होण्याकरिता हा सगळा कर्मविचार आहे. त्यानंतर सर्वज्ञ ईश्वरासंबंधी विचार करून जर त्याच्याबद्दल मनात प्रेम निर्माण झाले तर तो सुखी होऊन राहील.

आपल्याला आपल्या कर्माचे फळ म्हणून सुख किंवा दुःख मिळते तसे ते दुसऱ्यालाही मिळत असते. हे पूर्ण विचारांती पटल्यावर त्याच्याही दुःखाशी हा समरस होत असतो. हा एक अभ्यास आहे. ही दयाबुद्धी आली पाहिजे. वाटली पाहिजे. अभ्यासाने हे होते. ईश्वरावर व श्रद्धा विश्वास बसला, तशी भक्ती होऊ लागली, तशी प्रार्थना सुरू झाली, म्हणजे ईश्वरकृपेने सर्वकाही होते.

'भूतदयां विस्तारय' असे आचार्यमहाराज म्हणतात. भूतदया जितकी जितकी वाढेल तेवढी वाढू दे हे मागणे आहे. काही मागायच नाही ते वेगळे. आणि जे मागायचय तेही वेगळच आहे. भूतदया सगळ्या जगात वाढावी ही इच्छा आहे. मला एकट्याला भूतदया नको. भूतदयेचा विस्तार झाला पाहिजे. म्हणजे अहंकार कमी झाला पाहिजे.

मीच मोठा आहे. माझीच सत्ता आहे. माझच सगळ्या लोकांनी ऐकायला पाहिजे. असं अहंकारी लोकांना वाटतं. त्यात भूतदयेचा काहीही संबंध येत नाही. मी प्रत्येक ठिकाणी नियामक आहे असे वाटत असते. कुटुंबामध्ये काय, गावामध्ये काय, तालुक्यात काय, देशामध्ये काय मी मोठा आहे, नियामक आहे. आणि बाकीचे सर्व नियम्य आहेत. सर्वांनी माझे ऐकले पाहिजे. एखादा रागीट माणूस असतो. त्याचं ऐकलं नाही की तो रागावतो. मुलावर रागावणं, पत्नीवर रागावणं कशाने होते हे ? नियामक मी आहे. कुटुंब प्रमुख मी आहे. माझं ऐकलं पाहिजे हा अभिमान आहे. हा अयोग्य असला तरी तो स्वतःबद्दल विचारच करणार नाही. तो दुसऱ्याबद्दल मात्र हे चुकीचे आहे, चुकलेले आहे हे बोलायचे, दुसऱ्याचे दोष दाखवायचे. हे बरोबर नाही. हे सगळे दोष बाजूला झाले पाहिजेत. निरहंकारी वृत्ती आली पाहिजे. अभिमान गेला पाहिजे. म्हणजे भूतदयेचा विस्तार सगळीकडे झाला पाहिजे. मनाचं दमन करता आले पाहिजे. हे सगळही शेवटच्या प्रार्थनेत आहे. ही प्रार्थना करणारे संत, माहात्मे अत्यंत विचारपूर्वक प्रार्थना करतात. म्हणून ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात–

**वर्षत सकळ मंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भू मंडळी । भेटो तया भूता ॥**

विवेकसंपन्न संतांनी देवाजवळ केलेली ही प्रार्थना आहे. पूर्ण तितिक्षा आहे. पूर्ण मनाचे दमन आहे. अविनय बिलकूल नाही. उत्तम दया त्यांचे ठायी आहे आणि स्वतःकडे काहीही लक्ष नाही.

सर्व समाजात असणारा अविनय दूर झाला पाहिजे. संतांची ही सामाजिक-समाजासाठी प्रार्थना आहे. त्यांची ही वैयक्तिक, स्वतःसाठी केवळ प्रार्थना नाही. लोक असे म्हणतात की, सगळे साधूसंत वैयक्तिक कार्य करतात. ते समाजाच्या उपयोगी पडत नाहीत. नुसतं अध्यात्मिक घेऊन बसले आहेत. त्यांचा परमार्थ स्वतःकरता आहे. लोकांकरता नाही. असे आक्षेप घेण्याची संवय लागली आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनी सामाजिक कार्य केलय ना ? किती ग्रंथ केले ? सातशे वर्षे झाली. अजून त्यांच्या ग्रंथांद्वारे सामाजिक कार्य चालू आहे.

त्यांच्या पालखीचं एकदा एके ठिकाणी दर्शन झालं आम्हाला. लक्षावधी लोक बरोबर आहेत. दुपारी यायचे, कुठे असेल तिथं पाणी प्यायचं. तेथील लोक-ही वारकऱ्यांची खाण्यापिण्याची सोय करतात. काहीजण बरोबर पीठ घेऊन यात्रेला निघतात. गावात पालखीचा मुक्काम पडला की, हे लोक दगडाच्या चुली मांडतात. पोटापुरते काही करतात. खातात व पुनः चालायला लागतात. सातशे वर्षांपूर्वीपासून अखंड चालले आहे कार्य. किती लोकांना मार्गदर्शन केले आहे, करतात ! यातलं काय स्वतःकरता आहे त्यांचं ? ग्रंथ-रूपाने ज्ञानेश्वरी आहे, अमृतानुभव आहे, चांगदेव पासष्टी आहे. विचार करणारा खरा जो अधिकारी, महात्मा आहे त्याला त्याचे महत्त्व समजून येते. नामदेव त्यांच्या जातीचे आहेत म्हणून काय सांगतात ? "एक तरी ओवी अनुभवावी." त्यांनी इतके काय केले आहे. लोकांना सन्मार्ग दाखविला आहे. तरी आम्ही त्यांचे महत्त्व ओळखू शकतो काय ? अलिकडे लोकांना सन्मार्गाला लावण्यासाठी सभा घेतल्या असतील. वर्तमानपत्रातून त्याची प्रसिद्धी झाली असेल. पण हे कार्य आणि प्रसिद्धी काही काळापुरते असते. जास्तीतजास्त पांच वर्षे होईल. पुढे काय ? काही नाही. अशी काही स्थिती ज्ञानेश्वरमहाराजांच्या कार्याची नाही. त्यांच्या आज्ञेचे पालन करणे अखंड चालले आहे.

संतांनी सर्व राष्ट्राला निष्क्रिय बनविलेले आहे अशी एक कल्पना झाली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांवर आक्षेप काय तर इतक्या लहान वयातच ज्ञानेश्वरी का केली ? त्यांनी आणखी काही दिवस का राहू नये ? काहीतरी आक्षेप घ्यायची

सवंय झाली आहे ना ! इतक्या लहान वयात त्यांनी एवढे करून ठेवले आहे त्याचा तरी आपण किती उपयोग करून घेतो ? मग ते राहिले असते तर काय केलं असतं ? काय करावयाचे हेच समजत नाही.

निवृत्त होणे हा सुद्धा एक मोठा अधिकार आहे. ते साधत नाही. निवृत्त झाल्यानंतर सुद्धा अभिमान शिल्लक रहातो. "सेवानिवृत्त सेशन जज्ज" म्हणून एका ठिकाणी पाटी होती. काय उपयोग त्या पाटीचा ? सेशन जज्ज म्हटल्यानंतर सेवानिवृत्त कसा असेल आणि सेवानिवृत्त झाल्यानंतर तो सेशन जज्ज कसा असू शकेल ? परस्परविरोधी आहे. पण ती पाटी दिसली पाहिजे. नोकरीत असताना ती लावली तर हरकत नाही. निवृत्त झाल्यानंतर कशाला पाहिजे ती पाटी, पुन्हा 'सेवानिवृत्त' लिहून लावली. वास्तविक तो प्रसिद्धच आहे. पाटीने प्रसिद्ध नाही, प्रसिद्धी व्हावी ही जी मनोवृत्ती आहे त्यामुळे होते. सर्व ते लोकांमध्ये आले पाहिजे.

श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात– "जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो । भूतां परस्परे जडो । मैत्र जिवाचे ॥ राज्य शासन करू शकते का ? कितीही लष्कर असो, संपत्ती असो, काहीही असो, नाही होऊ शकत. संत महात्मे, ही प्रार्थना त्या सर्वेश्वराजवळ, विष्णुजवळ, सर्वव्यापक अशा परमेश्वराजवळ करतात. म्हणतात 'खळांची व्यंकटी सांडो' 'सत्कर्मी रति वाढो' 'सर्व प्राणीमात्राबद्दल स्नेहभाव उत्पन्न होवो' तेव्हा ईश्वरस्वरूप झालेल्या महात्म्यांच्या मुळे–त्यांच्या प्रार्थनेने–समाजात ही वृत्ती दिसू शकते. थोड्या प्रमाणात असेल. पण जी काही दिसते ती संतांच्यामुळे दिसते.

श्रीज्ञानेश्वरमाऊलींची पालखी आली म्हणजे त्या पुलावर सगळ्याप्रकारचे लोक येतात. विद्यार्थी येतात, स्त्रिया येतात, प्रोफेसर येतात, खेडूत तर दिसतातच. काय आहे हे दृश्य ? ज्ञानेश्वरांच्याबद्दल केवढी भक्ती आहे ? हे असं सातशे वर्षे चालले आहे. लोक सगळं सोडून येतात. म्हणतात आम्हाला काही नको, यश सुद्धा नको. संतांनी खरं ते मनापासून सांगितले ना ! म्हणून त्यांच्या पाठीमागून यश चालत आलेले आहे. त्यांचच यश व्हायला पाहिजे असे देवालावाटते. यशाकरता प्रयत्न करून यश मिळत नाही. दहाव्या अध्यायात देवांनीच सांगितले आहे की हे सगळे माझ्यापासून मिळतं. वैयक्तिक प्रार्थना असली तरी सर्वांसाठी आहे. व्यक्तिशः कार्य असले तरी त्याचा अभिमान नसतो.

"सर्वेषु सुखिनः संतु । सर्वे संतु निरामयः" या प्रार्थनेत सर्वांचा उल्लेख आहे. सर्वांमध्ये प्रार्थना करणारा येतो कि नाही ? का त्याला असे म्हणायचे आहे की, मला सोडून बाकीच्यांना सुखी करा. तेतरी बरे दिसेल का ? तुकाराम महाराजांनी घरी काही नाही म्हणून देवाजवळ मागत सुटले नाहीत. म्हणाले, देवा पोटापुरते द्या, थोडं द्या, देव वाटेल ते द्यायला तयार आहे. पण नाही. शिवाजीराजांचा नजराणा आला, पण घेतला नाही, परत पाठविला. नको म्हणाले. विष आहे. उचला. मनोवृत्ती खंबीर कायम राहिली पाहिजे. ईश्वराबद्दलचा विश्वास पूर्ण झाला पाहिजे. ही वृत्ती ते यत्किंचित कमी होऊ देत नाहीत. अशा वृत्तीला संत जपत असतात. हा गुण आमच्याजवळ राहणारा आहे. नजराणा नाशवंत आहे. मिळालेला राजाश्रय घेतला तर ईश्वराचा आश्रय कमी झाला, सुटला, आम्हीच सोडला. ईश्वराला त्याचेही काही नाही. ईश्वराकडे कोणी मागायला गेला, कोणी ईश्वराला सोडून दिले, पुन्हा गेले. ईश्वराला त्याचे काही नाही. अभिमान नाही ना ईश्वराजवळ ! इतके दिवस मला विचारले नाही आता कशाला आलात ? असं ईश्वर म्हणत नाही. सर्वसमृद्ध आहे तो !

एकदा तुकाराममहाराज ऊसाच्या मळ्यात गेले म्हणतात. तेथे काही कामधाम केले असेल. मालकाने त्यांना पुष्कळ ऊस दिले. मोळी करून डोक्यावर घेऊन आले गावात. गावाजवळ आल्यानंतर सगळी मुलं धावत आली. 'महाराज आम्हाला एक ऊस द्या', नुसतं म्हटलं नाही त्या मुलांनी, तर एकेक ऊस काढून घेतला प्रत्येकाने. तुकाराममहाराज म्हणाले—घेऊ देत ! काही हरकत नाही ! बाळ म्हणजे ईश्वररूप आहे. ज्ञानी मनुष्याने सुद्धा बालवृत्तीचा अभ्यास करावा. राग-द्वेष नाही. भांडण होईल मुलांचं पण लगेच संपेल. मनात सुद्धा राहणार नाही. हा केवढा विनय आहे ! कसा त्यांनी मिळवला असेल ! कुठ अभ्यास केला असेल ! कुठ वाचन केले असेल ! काही नाही ! स्वभावच आहे ! ज्ञानी पुरुषाने तशा वृत्तीने रहावे असे म्हणतात.

उरलेला एक ऊस घेऊन तुकाराममहाराज घरी आले. बायको त्रासून गेली होती बिचारी ! म्हणाली "काय, एकच ऊस घेऊन आलात ?" तोच ऊस तिने घेतला आणि त्यांच्या पाठीत मारला. काय झालं असेल ? पण काही नाही ! याचा अर्थ असा आहे काय की घरच्या मुलांना काहीही द्यायचं नाही म्हणून! आणि बाहेरच्या मुलांनाच द्यायचे ! असं नाही. असं असतं तर हा आग्रह

म्हणजे दंभ होईल. तुकाराममहाराजांची मुले जर त्या मुलात आली असती तर त्यांनी नको म्हटले नसते. ही भेदबुद्धी त्यांच्यात नाही. सर्व ईश्वर आहे, हे ज्ञान आहे.

ज्ञान कोणते आणि अज्ञान कोणते ? अभिनिवेष कोणता आणि ढोंग कोणते हे समजायला पाहिजे. आपल्या लोकांवर गोळीबार करायचा ! दुसऱ्या लोकांवर काही नाही ! ही काय दया आहे ? समबुद्धी आहे ? हा दंभ आहे. आपण चांगले आहोत हे दुसऱ्यांनी म्हणावे !

त्यावेळी त्यांची मुले आली नाहीत त्याला ते काय करणार ? "भोगणे ते फळ संचिताचे" म्हणून ते मोकळे झाले. मुलांनाही सुखदु:ख त्यांच्या संचिताने, मलाही सुखदु:ख माझ्या संचिताने ! असे मोकळे आहेत बुवा ! 'सर्वेषु सुखिन: संतु" मध्ये आपलाही समावेश आहे. त्यांची मोठी व्यापक बुद्धी आहे. महात्मा म्हणतात त्यांना. महान आत्मा म्हणजे ज्यांची बुद्धी फार मोठी झालेली आहे ते. त्यामुळे त्यांची प्रार्थना सुद्धा सर्वांसाठी आहे. त्यात वैयक्तिक स्वत:चा अंतर्भाव होतो. पण प्रार्थना मात्र स्वत:ला विसरून केलेली आहे. व्यक्तिश: मला मिळावं म्हणजे मी सुखी व्हावं अशी इच्छा आहे. त्यात दुसरा येऊ शकत नाही. आला तरी तो नुसता दाखविण्यापुरता असतो. म्हणतात आम्ही सगळ्यांकरता करतो पण त्यात मुख्य इच्छा आपल्याकरता असते.

'सर्वांमुखी मंगल बोलवावे' या सर्वांमध्ये आपला अंतर्भाव आहेच. साधन आपण करायचे ! आपल्याबरोबर इतरांनाही साधनेचे फळ मिळाले पाहिजे अशी बुद्धी हवी. प्रल्हादजींनी सांगितले. "माझा एकट्याचा उद्धार करुन सर्वांचा उद्धार करावा. मला एकट्याला उद्धार करून घेण्याची इच्छा नाही. मी एकटा तुमच्याकडे येणार नाही." अशी संतांची वृत्ती असते. सर्वांच कल्याण, विश्वाचं कल्याण होण्याकरता ही प्रार्थना आचार्य महाराजांनी केली आहे. तशीच प्रार्थना श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीही केली आहे.

**"वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भू मंडळी । भेटो तया भूता ॥"**

ईश्वरनिष्ठांचा समाज एकत्र व्हावा. समाजात ईश्वरनिष्ठांची संगती सर्वांना लाभावी. सर्वांमुखी मंगल बोलवावे. 'अविनय अपनय विष्णो....भूतदयां विसादय.'

या गुणांची समृद्धी सर्वत्र व्हावी. समाजाला पूर्ण सुख आणि शांती मिळावी. ईश्वराशी तुटलेला संबंध जोडला जावा. यासाठी ही प्रार्थना आहे.

हे संतांच्या डोळ्यापुढे आहे. त्यांनाही समाजाची सुधारणा व्हावी असेच वाटते. समाजाच्या अंतरंगापासून सुधारणा व्हावी असे वाटते. बाहेरची सुधारणा म्हणजे संपत्ती मिळणे, सत्ता मिळणे, काही अधिकार मिळणे यात काही महत्त्व नाही. समाधानही नाही. सर्वांनी सत्कर्मरत रहावे. 'सत्कर्मे योगे वय घालवावे' ईश्वराचं अखंड चिंतन, स्मरण रहावं म्हणजे मनाची सुधारणा होते. 'भूतदयां विस्तारय' हेच ज्ञानेश्वरही सांगतात. "भूता परस्परें पडो मैत्र जीवांचे" सगळ्या लोकांच्या मनात दया उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे सगळ्यांची जीवाभावाची मैत्री उत्पन्न झाली पाहिजे.

असे हे दिव्य गुण आहेत. हे समजले पाहिजे. गुणांना दोष समजण्याची वृत्ती आसुरी वृत्ती आहे. संतांनी सांगितलेलं सगळं चुकीच आहे, त्यात काही अर्थ नाही असे वाटण्यात आपले अहित आहे. चंद्रावर लोक गेले आहेत. आता काय करायचे आहे आळंदी, पंढरपूर करून. हे विचार मनात येता कामा नये. अंतरंगाची सुधारणा होण्यासाठी हे असते. संतांनी हे अनुभवाने सांगितलेले आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे वर्तन केल्यास आपल्यालाही ते समाधान, ती शांती, ते ज्ञान प्राप्त होते. ते त्यांचा मानसन्मान व्हाव, म्हणून सांगत नाहीत. लोक लोकमांगल्याकरता सांगतात, लोक कल्याणासाठी सांगतात. म्हणून संतवचनावर, शास्त्रवचनावर ईश्वर आज्ञाच आहे असा पूर्ण विश्वास ठेवून त्यांच्या सांगण्याप्रमाणे आपलं साधन व्हावं, परमेश्वराची, सद्‌गुरूंची अपणा सर्वांवर अखंड कृपा रहावी एवढीच श्रीगुरूमहाराजांच्याजवळ प्रार्थना आहे.

**"अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त"**

* * *